17.2

म. ग्रं. सं. ठाणें

विषय	लेखक	सन
संग्रहालय क्रमांक	पुस्तकाचें नांव	

ओ. वा. 83. दै.स. २०५८

बंधूदर्शनाकडे.

नं. ४३

वधूदर्पणमाला.

प्रतिबिंब पहिलें. सं. क्र. १०९८

ताराबाई व हिराबाई.

उपोद्घात.

जो मनुष्य या संसाराच्या स्थितीविषयीं मनांत कधींही विचार आणीत नाहीं त्यासारखा निष्काळजी मनुष्य दुसरा सांपडणें कठीण. या संसारांत विचार करण्यासारख्या अनेक गोष्टी आहेत; परंतु त्या सर्वांत अत्यंत अगत्याची गोष्ट म्हटली म्हणजे मनुष्याची स्थिति होय. मनुष्य जन्मतो तेव्हांपासून त्याच्या अंतकाळापर्यंत कोणकोणत्या गोष्टी त्याच्या अनुभवास येतात व तदनुरूप त्याच्या स्थितींत कसा काय फेरफार होतो याचा प्रथम विचार करणें अवश्य होय. मनुष्याच्या सर्व आयुष्यांत उत्तम काळ म्हटला म्हणजे बाळपण होय. या आंत मनुष्यास कोणत्याही प्रकारची काळजी नसते; आईबाप

त्या वेळीं अत्यंत लडिवाळपणानें व आस्थापूर्वक त्याचें पालनपोषण करितात. आपल्या बालकांच्या सुखासाठीं त्यांस कितीही संकटें च दुःखें सोसावीं लागलीं तरी त्यांस तीं जुमानीत नाहींत. आपल्या मुलांनीं चांगलें चांगलें खावें, प्यावें व ल्यावें, यांतच आईबापांस आनंद वाटत असतो. ज्या पुरुषांस बापाचें नातें येतें त्यांपैकीं कोणी मोलमजुरी, कोणी व्यापारउदीम, कोणी चाकरीधंदा वगैरे करून आपल्या मुलांस सुख मिळावें ह्मणून द्रव्य संपादन करितात. आणि ज्या स्त्रियांस आईचें नातें येतें त्या, नवऱ्याची कमाई घर-खर्चास पुरेनाशी झाली ह्मणजे, आपल्या शक्त्यनुसार कांहींतरी उद्योग करण्यास मागें पुढें पाहत नाहींत. कोणी शिवणकाम करितात, कोणी दाईपणा करितात, कोणी टोप्या विणतात, आणि कोणी तर अत्यंत गरिबीमुळें दुसऱ्यांचें दळणकांडण, स्वयंपाक वगैरे मेहनतीचीं कामें करून आपल्या मुलांबाळांचें पोषण करितात.

आपल्या मुलाविषयीं आईबापांचेठायीं जी प्रीति असते ती केवळ दांभिकपणाची किंवा ओढूनताणून चंद्रबळ आणल्यासारखी नसते; तर ती खरी व अंतःकरणांतल्या कळवळ्याची असते. जगन्नियंत्या परमेश्वरानें आईबापांच्याठायीं ही माया येवढ्याचकरितां उत्पन्न केली आहे कीं, तिच्या योगानें मुलांचें लालनपालन उत्तम प्रकारें व्हावें. मुलें जन्मतात तेव्हां तीं फार नेणतीं व अशक्त असतात; त्यांस चालतां बोलतां येत नसतें किंवा आपल्या हातानें खातां पितां येत नसतें. तेव्हां अशा वेळीं जर आईबापांकडून मुलांचें पालनपोषण ममतेनें झालें नाहीं तर त्यांस अन्नवस्त्र कोण मिळावें? आणि त्यांच्या ज्ञानाचीं मोठीं कशीं व्हावीं? ही माया केवळ मनुष्यप्राण्यांत

खाण्यापिण्याची व चिरगूटपांवरुणाची वगैरे ददात आईबापांच्या कृपेनें मुळींच नसतां जीं कोणतीही विद्या किंवा कला शिकत नाहींत, तर आपलें लहानवय केवळ खेळण्यावागडण्यांत व उनाडपणा करण्यांत घालवितात, तीं मुलें हतभाग्य होत. अशा मुलांचें पुढील सर्व आयुष्य दुखांत व विपत्तींत जावयाचें. आपल्या मुलांची ही अशी विपत्ति पाहून बिचाऱ्या आईबापांस मात्र दुःख होतें. आपल्या नजरेसमोर आपल्या मुलांचे हाल होऊं नयेत, येवढेंच नव्हे तर आपल्यामागेंही तीं सुख-समाधानांत राहावीं ह्मणून आईबापांची मरेपर्यंत खटपट चाललेली असते. इतकी आईबापांची प्रीति मुलांवर असतां तिचा मोबदला कित्येक मुलें मोठीं झाल्यावर फार वाईट रीतीनें देतात. खऱ्या पुत्रधर्मास अनुसरून तीं त्यांच्याशीं वागत नाहींत. त्यांस नाना-प्रकारीं त्रास व दुःख देतात. कित्येक तर अशीं अधम निपजतात कीं तीं मोठेपणीं आपल्या वृद्ध आईबापांस सोडून जातात, आणि त्यांचे अन्नवस्त्रावांचून हाल होत असतां आपण खुशाल चैनींत असतात!

या संसारांत सर्व जडजोखीम पुरुषांचे माथीं असतें. संसारास लागणाऱ्या सर्व कांहीं गोष्टी पैशानें प्राप्त होतात. तेव्हां तो मिळविण्याकरितां त्यांस रात्रंदिवस खपावें लागतें. स्त्रियांचें हें एक बरें असतें कीं, त्यांस फारकरून पैसा मिळविण्याची दगदग करावी लागत नाहीं. व्यवहारांतले एकंदर कमीजास्त मेहनतीचे धंदे पुरुषच करितात. यावरून कोणी असें समजूं नये कीं, खाणें, पिणें, निजणें, व गप्पा मारणें यांशिवाय संसारांतील कोणत्याही कामाशीं स्त्रियांचा संबंध नाहीं. घरांतील एकंदर कामकाज त्यांस करावें लागतें. आपली कमाई आणून स्त्रियांच्या स्वाधीन करितात. त

अशा चातुर्यानें व बेतावातानें खर्चिली पाहिजे कीं त्यांस कोणीही नांव ठेवूं शकणार नाहीं. बारीक विचार केला असतां असें स्पष्ट दिसून येईल कीं, पुरुष आणि स्त्री हीं संसाररूपी गाड्याचीं चाकें आहेत. तीं दोन्ही जर सुरळीतपणें चालणार नाहींत तर हा गाडा नीट कसा बरें चालेल?

मुलांनो, तुम्हीं बाळपणीं अशी विद्या शिका कीं ती मोठेपणीं तुमच्या कामीं पडेल; व मुलींनो, तुम्हीं अशा कला संपादन करा कीं तुम्हीं बायका झाल्यावर त्यांपासून तुम्हांस सुख व समाधान मिळेल. स्त्रियांची तुलना पुरुषांशीं केली असतां स्त्रियांस पुरुषांपेक्षां कांहीं अंशीं अशक्त निर्माण केलें आहे हें खरें. परंतु हात, पाय, कान, डोळे, बुद्धि, समज, स्मरणशक्ति हीं सर्व पुरुषांप्रमाणेंच त्यांस देवानें दिलीं आहेत. या साधनांच्या साहाय्यानें कोणी पंडित, कोणी शास्त्री, कोणी वैद्य, कोणी वकील, कोणी कारागीर, कोणी व्यापारी होऊन पुरुष आपआपला धंदा हुशारीनें व दक्षतेनें चालवितात. परंतु स्त्रियांचें पाहतां त्या आपलें लहान वय कोणतीही विद्या अथवा कला संपादण्यांत घालविण्या ऐवजीं बाहुल्यांचीं लग्नें करण्यांत व कहाण्या सांगण्यांत तें घालवून अडाणी राहतात. आपल्या देशांत प्राचीनकाळीं जानकी, तारामति, मंदोदरी, दमयंती, गार्गी, कात्यायनी, मैत्रेयी, द्रौपदी इत्यादि स्त्रीरत्नें जशीं निर्माण होत असत, तशीं आतां कां होत नाहींत? या प्रश्नाचें उत्तर अगदीं सोपें आहे. तें हेंच कीं, त्या काळच्या स्त्रियांना वेळेचें महत्व कळत असे. त्या आपला फुरसतीचा वेळ विद्याभ्यासांत किंवा कोणत्यातरी उपयुक्त कलेच्या अभ्यासांत घालवीत असत. त्यांस

हा विद्यादिकांचा संस्कार बाळपणापासूनच होत असे. त्याकाळीं मुलींस मुलांप्रमाणेंच शिकविण्याचा परिपाठ असे. ह्मणून वरच्या सारख्या स्त्रिया पुरातनकाळीं प्रसिद्धीस येऊन त्यांस त्या काळीं फार मान मिळत असे. त्या काळच्या स्त्रिया व पुरुष नेहमीं एकमेकांस जिवलग स्नेहीं मानीत असत. आतांप्रमाणें पुरुष यजमान आणि स्त्रिया ह्या केवळ दासी, असें तेव्हां मानीत नसत. पूर्वीच्या स्त्रियांना बरेंच स्वातंत्र्य असे. पुरुष जिकडे जात तिकडे त्यांस जावयास मोकळीक असे. पांडवांची द्रौपदी, रामाची सीता, नळराजाची दमयंती, हरिश्चंद्राची तारामती ह्या स्त्रिया आपल्या पतींबरोबर सर्वदा असत. रघुवंशांत अजराजा इंदुमतीविषयीं विलाप करीत असतां ह्मणतो, "गृहिणी सचिवोमिथः सखा." अशी पूर्वीच्या स्त्रियांची योग्यता असे, व पतिही त्यांना त्यांच्या योग्यतेप्रमाणें वागवीत. परंतु हल्लीं नवराबायकोचा स्नेह ह्मटला ह्मणजे होकायंत्रासारखा. ह्मणजे त्या यंत्रांतील कांट्यांची तोंडें एके ठिकाणीं केलीं तरी तीं वेगळीं व्हावयाचींच. एकाचें तोंड उत्तरेकडे तर दुसऱ्याचें दक्षिणेकडे असावयाचें. एकादी स्त्री आपल्या पतीला ह्मणाली कीं, "मी आज तुमच्या बरोबर येतें," तर "कांहीं जरूर नाहीं. पुरुषांचे धंदे पुरुषांनीं करावे व बायकांचे बायकांनीं करावे." असें त्याजकडून ठरीव उत्तर मिळतें. तसेंच जर एकादा पुरुष आपल्या स्त्रीस ह्मणाला कीं, 'आज सभेंत भाषण ऐकावयास अथवा समुद्रावर किंवा बागेंत स्वच्छ हवा खाण्यास चल.' तर तिच्याकडून असें उत्तर मिळतें कीं, 'आपल्या कुळांत अशी चाल नाहीं, व लोकांतही वाईट दिसतें, ह्मणून मीं यावयाची नाहीं.' अशा प्रकारचा हल्लीं परस्परांतील सलोखा आहे. फार तर काय, पण कित्येक-

स्त्रिया अशा कृतघ्न व कठोर मनाच्या असतात कीं, ज्यांच्याशीं त्यांच्या जन्माच्या गांठी पडलेल्या असतात त्यांस एकादी विपत्ति आली असतां त्याचें दुःख पाहून त्यांस कांहीं एक वाटत नाहीं. पूर्वीच्या स्त्रिया अशा नव्हत्या. श्रीरामाला बारा वर्षें वनवास भोगण्याकरितां कैकयीनें धाडिलें. तेव्हां नुकतेंच लग्न झालेली सीता, दशरथ व कौशल्या नको नको ह्मणत असतां व इतर लोकही न जाण्याविषयीं आग्रह करीत असतां, कोणाचें न ऐकतां, आपल्या प्रिय पतीबरोबर वनवासास गेली. त्याचप्रमाणें, दमयंती, द्रौपदी, तारामती इत्यादि स्त्रिया आपल्या पतीस विपत्ति प्राप्त झाली असतां त्यांच्या समागमें निरंतर राहून त्यांस हरएक प्रकारें सुख देण्यास कशा झटल्या, हें सर्वांस माहीतच आहे.

हें असें पतीविषयींचें प्रेम पूर्वकालच्या स्त्रियांमध्यें असण्याचें मुख्य कारण असें कीं, त्यांस त्या वेळीं सुशिक्षण मिळत असे. त्यांस बाळपणापासून नानाप्रकारच्या विद्या व कला शिकवीत असत. त्यांचा विद्याभ्यास पुरा होऊन त्या उपवर झाल्या ह्मणजे आपल्या परीक्षेनें पतीची निवड करीत. आतांसारखा आईबाप जो नवरा करून देतील त्यास मान्य करून घेण्याचा प्रकार तेव्हां नव्हता. त्या वेळच्या बायका घरांतील कामधंदा उरकून फावल्या वेळीं आपल्या पतींबरोबर अनेक विषयांवर भाषणें करीत. त्यांत कधीं वेदांतासारखे गहन विषयही असत. त्यांचे पति त्यांस समजे अशा रीतीनें निरनिराळ्या विषयांचें ज्ञान मोठ्या आवडीनें करून देत; आणि जर कारितां एकाद्या प्रकरणीं त्यांची समजूत बरोबर झाली नाहीं, तर त्या पतीस प्रश्न करून आपल्या शंकांचें निवारण करून घेत.

येणेप्रमाणें पतिसमागमें त्या आपलें आयुष्य सुखांत घालवीत असत. ह्याविषयीं एक दोन उदाहरणें येथें देतों.

शंकराचार्यांचा वेदांत विषयावर एक मोठा प्रसिद्ध ग्रंथ आहे. त्याचें नांव "शारीरभाष्य." त्याच्या पहिल्या अध्यायाच्या तिसऱ्या भागांतील दहाव्या सूत्रावर आचार्यांची टीका आहे. तींत अशी गोष्ट आहे कीं, याज्ञवल्क्यऋषीची स्त्री गार्गी आपल्या पतीशीं वेदांत विषयावर वाद करीत असतां गार्गीनें प्रथम असा प्रश्न केला कीं, "हे भगवन् वर दिसतें हें आकाश व खालीं दिसते ही पृथ्वी, व त्याजमधील हवेचा भाग व जें कांहीं होऊन गेलें, होत आहे व पुढें होणार आहे हें सर्व, कशावर शिवलें व गुंफलें आहे तें सांगा." अहाहा! अशा थोर व गहन विषयांवर विचार करणाऱ्या स्त्रिया आमच्या देशांत ज्या काळीं होत्या त्या काळच्या लोकांचें केवढें भाग्य समजावें! या गोष्टी मनांत आल्या व सांप्रत आमच्या स्त्रियांची जी अगदीं वाईट स्थिति झाली आहे ती लक्षांत आली ह्मणजे मन उदास होतें. ही स्थिति, बायकांविषयीं पुरुषांच्या मनांत अतिनीच विचार वागत आहेत, त्यांमुळें आली आहे, असें ह्मणावें लागतें.

आपल्यामध्यें सुमारें सात आठशें वर्षांपूर्वी लक्ष्मीदेवी ह्मणून एक मोठी विद्यासंपन्न स्त्री होऊन गेली. तिचीही गोष्ट येथें सांगण्यासारखी आहे. प्रसिद्ध याज्ञवल्क्यस्मृति ह्मणून जो एक धर्मशास्त्रग्रंथ आहे त्यावर 'विज्ञानेश्वरी' या नांवाची एक संस्कृत टीका आहे. ती टीका सामान्य जनांस समजण्यासारखी नसल्या कारणानें तिची विशेष विस्तारानें फोड ह्या लक्ष्मीदेवीनें केली आहे. काय या बाईची थोरवी वर्णन करावी! अर्पण पडलों जातीची स्त्री; तेव्हां आपल्या खऱ्या

नांवानें ग्रंथ प्रसिद्ध केला असतां तो ग्रंथ मोठमोठ्या पंडितांस मान्य होईल किंवा कसें याविषयीं शंका वाटून तिनें आपणास 'बालंभट्ट' असें नांव घेऊन आपल्या ग्रंथास 'बालंभट्टी टीका' असें नांव दिलें. तिच्या या ग्रंथांस 'लक्ष्मीव्याख्यान' अशीही संज्ञा आहे. या बाईच्या पतीचें नांव विद्यानाथ असें असून सासऱ्याचें नांव महादेवभट्ट व त्या घराण्याचें आडनांव पायगुंडे असें होतें.

आतांपर्यंत केवळ प्राचीन काळच्या स्त्रियांविषयीं सांगितलें. पण हल्लींच्या काळींही आपल्या देशांत वेळोवेळां अशीं स्त्रीरत्नें निर्माण होत आहेत. ताराबाई, अहिल्याबाई होळकरीण, भोपाळची बेगम, झांशीची राणी, रमाबाई, आनंदीबाई जोशी इत्यादि स्त्रियांविषयींची हकीकत सर्वांस माहीतच आहे. त्याचप्रमाणें यूरोप व अमेरिका खंडांतील सुधारलेल्या देशांत पुष्कळ स्त्रिया आपल्या विद्वत्तेनें व चांगुलपणानें प्रसिद्धीस येत आहेत.

कित्येक अज्ञान व वेडगळ बायका असा प्रश्न पुढें आणतात कीं, "आह्मांस पुरुषाच्या सत्तेंत रहावयाचें; मग आह्मांला विद्या शिकून व ज्ञान संपादन करून काय करावयाचें आहे? पुरुष जसें सांगतील तसें आह्मीं करावें ह्मणजे झालें. आह्मांस पुरुषांप्रमाणें धंदारोजगार थोडाच करायाचा आहे." असें ह्मणून जर या अज्ञानदशेंत राहतील, तर त्यांमध्यें व पशूंमध्यें भेद तो कोणता? घोडे, गाई वगैरे जनावरांचा व अशा स्त्रियांचा पुरुषांस सारखाच उपयोग ह्मटला पाहिजे. संसाराचें ओझें वाहण्यास पुरुषांला मदत करण्यासाठीं स्त्रियांस जी बुद्धि ईश्वरानें दिली आहे, ती त्यांनीं व्यर्थ घालवितां कामा नये. स्त्रियांच्या मदतीची पुरुषांस कितो जरुरी

आहे हें, ज्या लोकांमध्यें स्त्रिया आपल्या ज्ञानानें पुरुषांस मदत करण्यास समर्थ झाल्या आहेत त्यांचा संसार कसा चांगला चालतो हें पाहिलें ह्मणजे, सहज ध्यानांत येईल. उदाहरणार्थ इंग्रज लोक घेऊं. त्यांच्या स्त्रिया सुशिक्षित व सुज्ञ असल्याकारणानें त्यांच्याकडून आपल्या मुलांचें लालनपालन व शिक्षण हीं चांगलीं होतात; व त्याचप्रमाणें संसारांतील दुसऱ्या पुष्कळ गोष्टी त्या संभाळतात. त्यामुळें पुरुषांस द्रव्यसंपादनाच्या वगैरे दुसऱ्या कामांकडेच लक्ष लावावयास सांपडतें; ह्मणून तीं त्यांच्या हातून नीटपणें होतात.

आणखी एक गोष्ट येथें सांगण्याजोगी आहे. ती ही कीं, बायकांमध्यें कांहीं गुण असतात ते पुरुषांमध्यें नसतात, व पुरुषांमध्यें असतात ते बायकांमध्यें नसतात. तेव्हां एकमेकांच्या गुणांनीं एकमेकांची सुधारणा झाली पाहिजे. ती होण्यास एकमेकांचें एकमेकांवर वजन असलें पाहिजे. पण स्त्रिया जर सुशिक्षित नसल्या, तर त्यांचें वजन पुरुषांवर कधींच रहावयाचें नाहीं. यास्तव स्त्रियांनीं विद्या संपादन केली पाहिजे, हें निर्विवाद आहे. आतां स्त्रियांनीं ह्मणजे सर्वच विद्या शिकल्या पाहिजेत असें नाहीं. पण जितक्या शिकण्याची जरूरी आहे, तितक्या तरी कितीशा बायका शिकतात? थोड्यांत थोडें ह्मटलें तरी निदान साधारण शुद्ध लिहिणें, वाचणें व वाचलेल्याचा अर्थ समजणें, शिवणें, स्वयंपाक करणें हीं स्त्रियांस अवश्य आलींच पाहिजेत. त्यांपासून स्त्रियांस पुष्कळ फायदे होतात. शिवतां येत असलें ह्मणजे आपल्या नवऱ्याचे, मुलांचे व आपले कपडे त्यांस घरींच तयार करितां येतात. त्यामुळें एक तर त्यांचा पुरसतीचा वेळ व्यर्थ जात नाहीं, [illegible] दुसरें, गरिबी असली तर शिलाईचा खर्च वांचतो;

आणि नवऱ्याकडून आळशी म्हणून घेण्याची पाळी टळते. त्यांस कशिदा काढितां येत असल्यास त्यांला शेजारच्या दुसऱ्या बायका नावाजतात. दुसरें असें कीं, ज्या बायकांस कशिद्याचें काम करतां येतें त्यांस इतर बायकांशीं वेड्यावांकड्या गोष्टी सांगत बसण्यापेक्षां आपलें काम करीत बसण्यांत विशेष आनंद व हौस वाटते. त्यांस स्वयंपाक करितां येऊन चांगलीं चांगलीं पक्कान्नें करितां आलीं म्हणजे प्रसंगीं दुसऱ्या मनुष्याची गरज न लागतां पाहिजे त्यावेळीं पाहिजे तो पदार्थ त्यांस करतां येतो. इतिहास, भूगोल, व्याकरण व गणित ह्या विषयांचें ज्ञानही स्त्रियांस जरुरीचें आहे. कारण इतिहासाच्या अभ्यासानें आपल्या देशांत पूर्वी होऊन गेलेले थोर व शूर पुरुष आणि पतिव्रता स्त्रिया यांचीं मनोवेधक व बोधपर चरित्रें कळतात. तसेंच कोणाकोणामध्यें कोणकोणत्या कारणांनीं लढाया झाल्या, त्यांचे परिणाम काय झाले, वगैरे सर्व त्यांस कळतें. भूगोल शिकल्यानें देश, राष्ट्रें, शहरें, नद्या, पर्वत, इत्यादिकांविषयीं माहिती होते. व्याकरण शिकलें म्हणजे भाषा शुद्ध बोलतां येऊन; आपल्या नातलगांस पत्र लिहिणें झालें तर वाक्यरचना कशी करावी तें आपणांस चांगलें समजतें.

प्रत्येक स्त्रीस बहुतकरून आई व्हावयाचें असतें. आतां आईचा आणि मुलाचा जितका निकट संबंध असतो, तितका बापाचा आणि मुलाचा नसतो. म्हणून आई जर सुशिक्षित असली तर मूलही सुशिक्षित निपजतें. जर आईस चांगलें शिक्षण मिळालें नसलें, तर मुलास तें कोठून मिळणार? म्हणून स्त्रिया सुशिक्षित असणें अवश्य आहे. हल्लीं आपल्या देशांत अशा पुष्कळ सुशिक्षित स्त्रिया आढळ-

तात कीं ज्यांचीं मुलेंही सुशिक्षित निपजलीं आहेत. तेव्हां एकंदरींत काय कीं, मूल चांगलें किंवा वाईट निपजणें हें बहुतकरून आईच्या शिक्षणावर अवलंबून असतें. येथें कित्येक स्त्रिया असें ह्मणतील कीं, 'मुलांस शाळेंत पाठविलें तर त्यांस शिक्षण नाहीं का मिळणार?' यास उत्तर हेंच कीं मुलांस शाळेंत पाठविल्यानें त्यांस शिक्षण मिळेल हें खरें; परंतु लहानपणीं मुलांस आईकडून शिक्षण मिळालें असतां तें जसें मुलांच्या मनावर बिंबतें तसें दुसऱ्या कोणाचेंही बिंबत नाहीं. चांगल्यारीतीनें वागण्याचें शिक्षण तर मुलांस मुख्यतः आईकडूनच मिळालें पाहिजे. मूल कांहीं वाईट बोललें तर त्याला मना करणें हें आईचें कर्तव्य आहे. आईनें मुलास वाईट शब्द बोलण्याविषयीं मना केलें नाहीं तर तें तसेंच नेहमीं बोलेल. त्याचप्रमाणें दुसऱ्या शेंकडो गोष्टींविषयीं आईनें मुलास जपलें पाहिजे. परंतु तें तिच्याकडून चांगल्या प्रकारें घडण्यास तिला पुष्कळ गोष्टींचें ज्ञान पाहिजे. हें ज्ञान तीस विद्याभ्यासावांचून मिळणें नाहीं. ह्मणून मुली लग्न होईपर्यंत व मुलगे सुमारें दहा वर्षांचें होत तोंपर्यंत त्यांचा विद्याभ्यास घरींच झाला पाहिजे. पण जरकरितां आई अक्षरशून्य असली तर तो व्हावा तसा चांगला होणार नाहीं. आईच्या बुद्धीचा किंवा चालचलणुकीचा ठसा बालकांच्या कोमल मनावर जसा चांगल्या प्रकारें उठण्यासारखा आहे तसा दुसऱ्या कोणाचा उठणार नाहीं. ह्मणून बायानों, मुलांच्या पुढील बऱ्यावाईटाचीं सूत्रें तुमच्या हातीं आहेत. पहिल्यापासूनच जर तुह्मीं त्यांच्या मनावर ज्ञानाचा व सुविचारांचा ठसा उठविण्याचें मनावर घ्याल तर त्यांचें कल्याण होईल. त्याच्यायोगें, तीं मोठीं झाल्यावर नांवालौकिकास चढून सुखानें कालक्रमणा करतील, व [illegible] तुमचे उपकार आठवितील. आणि जर तुह्मीं

त्यांच्याठायीं चांगल्या गुणांचीं वाढ करण्याविषयीं न झटतां त्यांच्यांत दुर्गुणांचा विकास होऊं द्याल तर तीं मोठेपणीं दुराचारी व दुष्ट निपजून आपलें आयुष्य विपत्तींत कंठितील.

मुलास बोलतां येऊं लागल्यापासून आईनें त्यास शिकविण्यास आरंभ केला पाहिजे. मूल शाळेंत घालण्याजोगें होण्यास बराच काळ लागतो. हा काळ फुकट जाऊं देतां कामा नये. आणखी असें कीं, मुलांस लहान वयांत शाळेंत जाण्याची आवड नसते; त्यांना आपल्या प्रिय आईस सोडून कोठें जावेसें वाटतच नाहीं. पण अशा वयांत आईनेंच जर त्यांस शिकविण्याचें मनावर घेतलें तर ती त्यांस शाळेंतल्या शिक्षकांपेक्षां पुष्कळ चांगल्याप्रकारें शिकवूं शकेल. मुलें शाळेंत जाऊं लागल्यावरही कित्येक दिवसपर्यंत तीं निष्काळजीनें व अर्थ समजल्याशिवाय शाळेंतील धडे शिकतात. यामुळें त्यांची विद्याभ्यासांत लवकर गति होत नाहीं. अशा वेळीं त्यांस आईकडून पुष्कळ मदत मिळण्याजोगी असते. कां कीं आई त्यांच्याजवळ सगळा वेळ असून तिच्या सारखी प्रीति व माया दुसऱ्यांत कोठून असणार? एकाद्या अक्षरावर किंवा शब्दावर मुलाचें दुर्लक्ष झालें किंवा तो त्यास समजला नाहीं तर ती लागलीच तो त्यास समजाऊन सांगते. याप्रमाणें हरएक गोष्टींत प्रतिक्षणीं आई आपल्या मुलास कांहींनाकांहीं शिकवूं शकते. आणि तिच्या शिकवण्याचा मुलाच्या मनावर जसा चांगला व लवकर परिणाम होतो तसा शिक्षकानें वर्षांची वर्षें मेहनत केली तरी होत नाहीं. आईच्या शिकविण्यांत दुसरें हें एक सुख असतें कीं, मुलांस शिकतांना कोणत्याही प्रकारचें भय वाटत नाहीं. तर उलट त्यांची शिकण्याविषयींची उमेद वाढत जाते.

वास्तविक पाहतां आपल्या बालकांच्या शरीरसंपत्तीचें रक्षण करून त्यांस ज्ञानाची गोडी लावणें व त्यांचें आचरण सुधारणें हें काम आईचें आहे. पण पुष्कळ मातांना तें चांगलेंसें करितां येत नाहीं. कित्येकांस तर या संबंधाची जबाबदारीच मुळीं कळत नाहीं. अशा मातांचीं लेंकरें खरोखरीच हतभाग्य होत. तेव्हां मातेचें वास्तविक कर्तव्य काय आहे तें समजण्याची व त्याप्रमाणें वागण्याची बुद्धि व शक्ति आमच्या स्त्रियांना सुशिक्षणावांचून प्राप्त होणार नाहीं, हें निर्विवाद आहे.

कित्येक स्त्रियांना वाचण्याचा जितका नाद असतो तितका लिहिण्याचा नसतो. हें कांहीं चांगलें नव्हे. त्यांना साधारणपणें चांगलें शुद्ध लिहितां येणें अगत्याचें आहे. आतां शुद्ध लिहितां येणें हें वाचतां येण्यापेक्षां कांहीं अंशीं कठीण आहे खरें; पण एकाद्या पुस्तकांतून दररोज दोनचार ओळी लिहिण्याचा क्रम ठेवून, शिवाय आपणास येईल तसा कांहीं तरी नवा मजकूर रचून लिहिण्याची सवय केली आणि आपण लिहिलेलें शुद्ध आहे किंवा नाहीं तें नीट समजून घेतलें तर थोड्याच दिवसांत शुद्ध लिहितां येईल. आतां स्त्रियांस वळणदार अक्षर काढतां आलेंच पाहिजे असा कांहीं अर्थ नाहीं. पहिल्यानें जरी शुद्ध लिहितां आलें नाहीं किंवा अक्षर अगदींच वेडेंवांकडें येत असलें, तरी आपणास तें येणार नाहीं असें म्हणून नाउमेद होऊं नये. कारण कोणतीही गोष्ट पाहिली तरी आरंभीं ती चांगली येत नसते. असें पहा कीं, एकाद्या मोठ्या पंडिताला मुलाचें साधेसें झबलें किंवा टोपी वेतण्यास किंवा शिवण्यास सांगितलें तर तें त्याला यावें कसें? कारण तें काम त्यानें

कधींही केलेलें नसतें. हें तर काय पण चालणें, फिरणें ह्याविषयीं तुह्मांस आतां कांहींच वाटत नाहीं; तुह्मीं विनधोक इकडून तिकडे तिकडून इकडे धांवता फिरतां. तें शिकण्यास पहिल्यानें किती प्रयास पडले तें तुह्मांस माहीत नाहीं. पण तुमच्या आईबापांस किंवा घरांतील वडील माणसांस तें पक्कें माहीत आहे. प्रथम तुह्मीं आपटतधोपटत रांगावयास शिकलां. मग कांहीं दिवसांनीं बाजेच्या खुराला, खिडकीच्या गरादीला किंवा भिंतीला धरून उभ्या राहूं लागलां; आणि जेव्हां तुमच्या पायांत थोडीशी शक्ति येऊन ते मजबूत झाले तेव्हां पांगूळगाडीस धरून हळू हळू पावलें टाकूं लागलां. असें करतांना अनेक वेळां पडून दररोज तुह्मांस कांहींनाकांहीं दुखापत होत असे, तेव्हां आईबापांस तुमच्याबद्दल किती काळजी बाळगावी लागत असे बरें? त्याच तुह्मीं दोन तीन वर्षांच्या होतांच बेधडक हिंडू फिरूं लागलां, व पुढें पुढें तर पाहिजे तेवढें जलद धांवण्याची तुमच्यांत ताकद आली. अशीच गोष्ट लिहितां येण्याची आहे. पहिल्यापहिल्यानें चांगलें लिहितां येणार नाहीं. पण गरजे पुरतें तर येईल? आणि मग धोब्याची धुणावळ, किंवा दळणकरणीची दळणावळ दिली किती व राहिली किती, याची आठवण रहावी ह्मणून भिंतीवर रेघा ओढून ठेवण्याची अथवा दगडधोंडे मोजून ठेवण्याची गरज पडणार नाहीं. घरखर्चाचा एकंदर हिशोब व देणेंघेणें हीं सर्व ध्यानांत ठेवणें ह्मटलें ह्मणजे फार कठीण आहे; आणि कित्येक पुरुषांची अशी चाल असते कीं, जो पैसा घरांत खर्चास दिलेला असतो त्याचा नेहमीं ते हिशोब विचारीत असतात. अशा वेळीं जर आठवण नसली तर पुरुषांस उगाच संशय येतो कीं, हिनें हे पैसे कोंकरले? यावरून

उभयतांमध्यें निरर्थक बोलाचाली होऊन भांडणास मूळ होतें. याकरितां स्त्रियांनीं निदान आपलें आपणांस समजण्यापुरतें तरी लिहावयास शिकलें असतां किती बरें चांगलें होणार आहे ?

लिहिण्यावाचण्याप्रमाणें शिवणें व स्वयंपाक करणें ह्या दोन्ही कला शिकण्याची प्रत्येक मुलीस जरूरी आहे. पुढें आपणावर कोणता प्रसंग केव्हां येईल हें मनुष्यास माहीत नसतें. मोठमोठाले उमराव व धनिक एकाएकीं गरीब होऊन त्यांस धड अन्न देखील मिळेनासें होतें. अशा वेळीं जर एकादी कला किंवा विद्या त्यांस येत असली तर ती किती बरें उपयोगीं पडते? पूर्वीच्या काळचे बादशहा व राजे मोठ्या ऐश्वर्यांत असतांही अनेक प्रकारच्या कला व विद्या शिकत असत. त्या इतक्याचसाठीं कीं त्यांच्यावर मागें पुढें एकादा वाईट प्रसंग आला असतां त्यांचा उपयोग व्हावा. ह्यासाठीं जोंपर्यंत आपला चालता काळ आहे तोंपर्यंत बेफिकीर राहून असेंच नेहमीं सुख मिळेल असा भरंवसा बाळगणें चांगलें नव्हें. ह्यासाठीं आपला उत्कर्ष असतो तेव्हां चांगलें जपून वागून आपला फुरसतीचा वेळ चांगल्या व्यवसायांत घालवावा.

ईश्वराच्या दयेनें तुह्मांस दासदासी अनुकूल असल्या तरी तुह्मीं आपल्या उद्योगाच्या संवई मोडतां कामा नये. कारण हें तुमचें वैभव कदाचित् अकस्मात् गेलें तर मग तुह्मांस जडलेली आळशी रहाण्याची संवय फार जाचेल. लहानसान कामासाठीं चाकर माणसांस किंवा घरांतील लहान बहीणभावंडांस त्रास देऊन आपण स्वस्थ बसणें हें फार वाईट. तर असें न करितां नेहमीं चलाख व हुशार राहून आपणास करितां येण्यासारखें सर्व काम स्वतः

करण्याची संवय ठेवावी. येणेंकरून अंगांत चपळपणा येऊन उद्योग करण्याची संवय अंगीं वाढेल; आणि घरांतील आई वगैरे माणसांस तुह्मीं विशेष प्रिय व्हाल. ह्यासाठीं आपल्याकडून होण्याजोगें जें काम असेल तें करण्यास कधींही हेळसांड करूं नका. आपल्या आईस आपल्यासाठीं विनाकारण मेहनत पडावी किंवा तिनें तें काम स्वतांस फावत नसल्यामुळें शेजारच्या मायबहिणीस बोलावून तिजकडून करवावें, हें कांहीं चांगलें नव्हे. रात्रीं निजावयास जाल तेव्हां आपला बिछाना आपले हातानें घालून निजा; आणि सकाळीं उठलां ह्मणजे तो तुह्मींच गुंडाळून बंदोबस्तानें जागचे जागीं ठेवा. आपल्या कपड्यांचें गाठोडें फार शोधल्याशिवाय आपल्यास वेळेवर मिळेल असें ठेवा. जुने कपडे बदलून नवे घालाल तेव्हां जुने कोठें फाटले तुटले असल्यास नीट शिवून ठेवा. आपले मळलेले कपडे धोबी येईपर्यंत एका निराळ्या पेटींत किंवा गाठोड्यांत बंदोबस्तानें बांधून ठेवा. कपडे बदलल्यावर मळलेले कपडे गोळा करून उचलून नीट सांभाळून ठेविले नाहींत तर कदाचित् उंदीर ते कुरतुडून टाकितील. तुमच्या अंगावरचे दागिने फार मोलाचे असतात, ह्मणून निजण्यापूर्वीं व सकाळीं उठल्यावर ते सर्व नीट अहेत किंवा नाहींत तें तुह्मी तपासून पाहिलें पाहिजे. अनेक वेळां असें होतें कीं, मुली खेळण्याच्या नादांत आपल्या अंगावरचा एकादा दागिना किंवा खेळावयास घेतलेलें खेळणें कोठें तरी टाकतात; आणि नंतर कित्येक दिवसांनीं त्यांला त्याची आठवण होते. मग त्या ह्मणूं लागतात कीं, माझ्या कानांतलें कुडें काय झालें? नथीचें मोतीं कोठें पडलें? इकडे घरांतील केरकचरा अनेक वेळां काढल्यानें लहान्सान वस्तु कोठें

नाहींशी होऊन किंवा मातींत दडपून जाऊन सांपडेनाशी होते; मग त्या निष्काळजी मुली घाबरून जाऊन अतिशय रडूं लागतात, आणि सगळें घर शोधून शोधून हैराण होतात. याप्रमाणें आपली मुलगी घातलेला दागिना नीट संभाळून न ठेवितां खेळण्याच्या नादांत कोठें तरी सांडते असें आईबापांच्या नजरेस आलें ह्मणजे तीं त्यांस चांगले दागिने वगैरे घालावयास देत नाहींत.

घरांतील कामांपैकीं कोणतें काम आपल्याजोगें आहे याचा तुह्मांस नेहमीं विचार केला पाहिजे. फारकरून लहान बहीणभावंडें रडत असतात त्यांस तुह्मी सांभाळलें तर आईला दुसरें काम करण्यास तितकी फुरसत मिळेल. त्यांचे हात तोंड धुणें, त्यांच्या खाण्यापिण्याची तरतूद ठेवणें व त्यांस कपडे घालणें हीं सर्व कामें तुह्मीं मनावर घ्याल तर सहज करूं शकाल. आणि हें करण्याचें टाकून उलटें त्यांच्या खोड्या काढून त्यांस रडवाल तर तीं तुमचा तिरस्कार करितील. एवढेंच नव्हे तर त्यापासून तुमच्या आईस सुख न होतां उलट तुमच्यापासून तिला त्रास मात्र होईल. ती घरचें काम सांभाळील कीं तुमच्या रडण्या रुसण्याकडे पाहील? घरांत जें अन्न शिजतें तें खाऊन संपविण्याचेंच कायतें आपलें काम असें समजून, तें केव्हां शिजेल आणि केव्हां एकदां आपल्या पोटांत पडेल, असें टपत बसणें तुह्माला मुळींच शोभत नाहीं. अशानें घरांतल्या कुत्र्यां मांजरांत आणि तुह्मांत कांहींच फरक नाहीं असें होतें. तर असें न करितां आई स्वयंपाक करते तेव्हां ती काय काय करते तें नीट बारकाईनें पाहावें आणि तिला लागेल तेथें मोठ्या आनंदानें मदत करण्यास नेहमीं तत्पर असावें. निरनिराळीं पक्वान्नें कशीं करतात व त्यांत काय

काय घालतात तें जर तुह्मीं लहानपणापासून लक्षपूर्वक पाहत जाल तर तुह्मांस थोड्याच दिवसांत सर्व प्रकारचा स्वयंपाक करितां येईल. ही सर्व कला चांगली साध्य झाल्यानें संसारांत तुह्मांस पुष्कळ सुख मिळेल. नेहमींच्या प्रचारांतलीं पक्कान्नें खेरीजकरून इतर पक्कान्नांचीही माहिती करून घेतली पाहिजे. आल्यागेल्याच्या पाहुणचारास नेहमीं परीपरीच्या पक्कान्नांची गरज लागते. साखरभात, केशरीभात, पुरण-पोळी, अनरसे, जिलब्या, मांडे, नानातऱ्हेचे लाडू, श्रीखंड, बासुंदी इत्यादि पक्कान्नें करण्याचे प्रकार चांगले लक्षांत ठेविले पाहिजेत.

आतां शिवणकामाविषयीं ह्मटलें तर तें फारसें कठीण आहे असें नाहीं. पण कपडे बेतण्याचें काम मात्र थोडेंसें तर्काचें आहे. तेव्हां तें नीट समजून घेणें फार जरुरीचें आहे. पहिल्यानें बायकांचे कपडे कापण्यास शिकणें फार अगत्याचें आहे. अशा पुष्कळ अडाणी बायका आमच्या पहाण्यांत आल्या आहेत कीं, त्या आपल्या चोळ्या बेतण्याकरितां लोकांच्या दारोदार हिंडत असतात, आणि ह्या एवढ्याशा कामाकरितां लोकांचें आर्जव करून त्यांस उगाच त्रास देत असतात. आतां बायकांना पुरुषांचेही कपडे शिवतां येणें इष्ट आहे. पुरुषांच्या कपड्यांपेकीं आंगरखा बेतणें कांहीं अंशीं कठीण आहे हें खरें. पण मनावर घेतल्यास तेही दोन चारदां पाहिल्यावर कसे बेतावे तें सहज लक्षांत येईल.

मुली मनांत पक्कें समजत असतात कीं, कुंवारपणाचे आपले आणखी थोडे दिवस आहेत. लग्न झालें ह्मणजे मग आपणास सासरीं जावें लागेल; आणि तेथें अगदीं निराळ्या तऱ्हेनें आयुष्य लोटावें लागेल. आई, आजी, काकी, वहिनी वगैरे कुटुंबांतील बायकांकडे पाहून त्यांस

आपली पुढें काय स्थिति होणार तें स्पष्टपणें कळत असतें. बायकांच्या शिरावर संसारांतील कामाचा बोजा केवढा असतो ; येवढेंसें कांहीं चुकलें कीं त्यांच्यावर शिव्या शापांचा भडिमार कसा होत असतो. त्याचप्रमाणें एवढ्या तेवढ्या कारणावरून वेळोवेळां तंटे बखेडे माजून किती प्रकारें जाच व दुःख सोसावें लागतें याचें चित्र त्यांच्या डोळ्यांपुढें नेहमीं असतें. तेव्हां अशा प्रकारच्या सासुरवासांत शहाणपणानें च हुशारीनें वागण्यास मुलींनीं माहेरींच शिकलें पाहिजे. लग्न झाल्यावर स्त्रियांचा मान व प्रतिष्ठा कोणत्या तऱ्हेनें राहते; आणि पुरुष त्यांच्याशीं कोणत्या रीतीनें वर्तन करितात वगैरे गोष्टींचा विचार मुलींनीं केला पाहिजे. मोठ्या कुळांतील स्त्रियांच्या स्थितीकडे त्यांनीं पाहूं नये. कारण मोठ्या कुळांतील कित्येक स्त्रीपुरुषांची परस्परांविषयीं असावी त्यापेक्षां जास्त प्रीति दिसून येते. अशा स्थितींतील कांहीं बायका शिरजोर होऊन नवऱ्यास जुमानिनातशा होतात आणि कांहीं ठिकाणीं तर याच्या अगदीं उलट प्रकार आढळतो. सासरच्या व माहेरच्या लोकांत कांहीं तरी कारणामुळें तंटा लागून बिचाऱ्या सुनेचे हाल होतात. ही मोठ्या लोकांची गोष्ट झाली.

हल्लींच्या काळीं आमच्या लोकांमध्यें स्त्रियांस कोणत्याही प्रकारचा मान किंवा प्रतिष्ठा मिळत नाहीं. स्त्रीजात जाल्याच अज्ञान असा लोकांचा दृढ समज होऊन गेलेला आहे. पुरुषांच्या मुखीं नेहमीं "स्त्रिया साहसी, घातकी ;" स्त्रियश्चरित्रं पुरुषस्य भाग्यं । देवो न जानाति कुतो मनुष्यः*" वगैरे शब्द असतात. पुष्कळ

* स्त्रिया केव्हां काय करतील व पुरुषाचें नशीब केव्हां उघडेल तें देवाऱ्यानेंही सांगवणार नाहीं, मग माणसाची कथा काय ?

कवींनीं स्त्रियांच्या साहसकर्माबद्दल व मूर्खपणाबद्दल लिहून ठेविलें आहे. वृद्धचाणाक्यानें यासंबंधानें येणेंप्रमाणें म्हटलें आहे:—

अनृतं साहसं माया मूर्खत्वमतिलोभता ।
अशौचं निर्दयत्वं च स्त्रीणां दोषाः स्वभाविनाः ॥१॥

भावार्थः—मिथ्या भाषण, साहस, कपट, मूर्खपणा, फार लोभ, अमंगळपणा आणि निर्दयपणा हे सात स्त्रियांचे स्वाभाविक दोष जाणावे.

स्त्रीणां द्विगुणमाहारो लज्जा सापि चतुर्गुणा ॥
साहसं षड्गुणं चैव कामश्चाष्टगुणः स्मृतः ॥ १ ॥

भावार्थः—पुरुषांपेक्षां स्त्रियांचा आहार दुप्पट असतो, लज्जा चौपट असते, साहस सहापट असतें, व काम आठपट असतो.

ही अशी स्त्रीजातीची विटंबना कवींनीं जी केली आहे तिचें कारण काय म्हणाल तर आमच्या स्त्रियांस सुशिक्षण न मिळाल्यामुळें त्यांस कोणत्या प्रकारें वर्तन करावें तें कळत नाहीं. वास्तविक पाहतां हे दोष स्त्रीजातीच्याठायीं असतात असें सांगितल्यानें त्या वर्गाची विनाकारण निंदा केल्यासारखें मात्र होतें. वरील कविता करणारे जातीचे पुरुष असल्या कारणानें त्यांनीं बिचाऱ्या अबलांवर यथेष्ट तोंडसुख घेतलें आहे. दुसरें काय ?

घरांतील स्वयंपाकाचें वगैरे काम करणें एवढाच स्त्रियांचा अधिकार आहे, अशी आमच्या लोकांची समजूत आहे असें दिसतें. संसारविचाराच्या नाजूक कामांत स्त्रियांची सल्लामसलत पुरुष घेत नाहींत. ज्या घरांत स्त्रियांचा मान व प्रतिष्ठा राखतात तेथेंही फार

फार झालें तर " कसें काय, आज सण आहे तर काय काय पक्कान्नें करावयाचीं ? मुलीसाठीं शालू पाहिजे ती पैठणी आणूं कीं अमदाबादी चिरडी चालेल ? तुजकरितां नथ साधी करून आणूं कीं तिला टीक पाहिजे?", वगैरे ज्या गोष्टींत त्यांचा प्रत्यक्ष संबंध असतो त्याच त्यांस विचारतात. पुरुषानें कधीं म्हणजे मोठमोठ्या गोष्टींत त्यांचें अनुमत घेतलें आहे किंवा कोणतेंही नाजूक काम त्यांच्यावर सोंपलें आहे असें सहसा आढळून येत नाहीं. तेव्हां हे स्त्रियांनो, अशा लाजीरवाण्या स्थितींत रहाण्याचा तुम्हांस कंटाळा येत नाहीं काय? पुरुषांचा तुमच्यावर विश्वास नाहीं व त्यांजकडून तुमची अनेक प्रकारें अप्रतिष्ठा होते त्याबद्दल कधीं तुम्हांस खेद होत नाहीं काय ? पुरुषांनीं आपला मान व प्रतिष्ठा राखावी, अशी योग्यता आपल्या अंगीं यावी अशी इच्छा तुम्हांस वाटत नाहीं काय? तुमच्या अंगीं योग्यता असेल तर पुरुष तुम्हांस सहसा तुच्छ मानणार नाहीं. पण तुम्हीं भातभाकरी करण्यांत व फाटलें तुटलें शिवण्यांतच काय तो मोठेपणा आहे असें समजत आहां. जशी तुमची समजूत व आचरण तसें तुम्हांस फळ मिळत आहे यांत नवल काय ?

म्हणून हे स्त्रियांनो, तुम्हीं पुरुषांचीं अंतःकरणें आपल्या गुणांनीं आकर्षण करून घ्या. त्यांच्या सर्व आनंदाचें व सुखाचें केवळ भांडारच तुम्हीं आहां. यास्तव त्यांस जेणेंकरून आनंद व सुख होऊन त्यांच्या दुःखाचा परिहार होईल असें आपलें वर्तन ठेवा. पुरुषांच्या मोठमोठ्या कामांत मदत करण्याची योग्यता तुमच्या अंगीं असून वेळ पडल्यास तीं करण्याचें सामर्थ्य जर तुमच्यांत असेल, तर खरोखर पुरुष तुमची प्रतिष्ठा राखतील, आणि तुम्हांस आपल्या गळ्यांतील

ताईत करून ठेवतील यांत संशय नाहीं. कारण उघडच आहे कीं, सदैव आनंद व सुख देणारा, संकटसमयीं किंवा रोगादि विपत्ति प्राप्त झाल्या असतां कायावाचामनेंकरून मदत करणारा व कशीही स्थिति प्राप्त झाली तरी आपलें सतत कल्याणच चिंतिणारा मित्र त्यांस या दुनियेंत तुमच्यावांचून दुसरा कोणी नाहीं.

परंतु अशी योग्यता तुमच्या अंगांत यावी कशी ? ती अंगीं येण्यास मुख्य साधन जी विद्या तिचा तुह्मांस गंधही नाहीं. त्याच-प्रमाणें तुह्मांस कोणत्याही प्रकारची मोकळीक नसल्यामुळें तुह्मीं केवळ बंदिवानाप्रमाणें झालां आहां. चांगले बोधपर ग्रंथ वाचून व संभावित लोकांच्या समाजमंडळयामध्यें जाऊन ज्ञान मिळविण्याचा मार्ग तुह्मांस खुला नाहीं. परंतु अलीकडे आमच्या लोकांचें स्त्रीशि-क्षणाकडे अधिकाधिक लक्ष लागत चालल्यामुळें ही अडचण कांहींशी दूर होत आहे. हें एक सुचिन्ह समजावयाचें. असो.

येथपर्यंत जें विवेचन केलें त्यावरून स्त्रियांस शिक्षणाची आवश्य-कता किती आहे तें स्पष्टपणें समजेल, अशी उमेद आहे. आतां माझ्या सर्व देशभगिनींना माझी अशी सविनय विनंति आहे कीं, जर त्यांना आपला संसार सुखानें व शहाणपणानें चालावा असें वाटत असेल, जर त्यांना आपल्या पतीचें आपणावर खरें प्रेम राहून घरांतील इतर माणसांचाही लोभ संपादावयाचा असेल, जर त्यांना अंगीं सद्गुण येऊन लोकांकडून चांगलें ह्मणवून घ्यावयाचें असेल, तर त्यांनीं ज्ञानसंपादनाचें मुख्य साधन जें लिहिणें वाचणें तें अवश्य शिकावें. कारण खरें ज्ञान असल्यावांचून वरील इष्ट गोष्टी साधा-वयाच्या नाहींत; आणि ज्ञान तर विद्येवांचून ह्मणण्यासारखें मिळा-

वयाचें नाहीं. ह्यासाठीं ज्या बायांना लहानपणीं लिहिण्यावाचण्यास शिकविलें असेल त्यांनीं तें सासरीं गेल्यावर विसरून जाऊं नये. तर फावेल तेव्हां एकादें बोधपर पुस्तक मिळवून वाचण्याचा परिपाठ ठेवावा; आणि त्यांतील बोधाप्रमाणें आपलें आचरण सुधारण्याचा प्रयत्न करावा. आतां ज्यांस लहानपणीं लिहिणें वाचणें शिकविलें नसेल त्यांनीं शेजारच्या बायांजवळ बसून वेड्या वांकड्या गोष्टी बोलत बसण्याऐवजीं त्यांतील एकादी बाई थोडेंबहुत शिकलेली असल्यास तिच्याकडून आपणही शिकावें. असें केल्यानें एकतर फुरसतीचा वेळ व्यर्थ न घालविलासा होऊन अक्षय आनंदाचें व सुखाचें एक साधन आपण मिळविलेंसें होईल. आतां अज्ञानदशेंत राहिल्यानें संसारांत कसकशीं संकटें प्राप्त होतात याविषयीं एक गोष्ट सांगतों. ती माझ्या देशभगिनींनीं मननपूर्वक वाचावी.

ताराबाईची गोष्ट.

प्रकरण पहिलें.

ताराबाई नांवाच्या एका व्राल्य मुलीचें लग्न बुद्धिवंत नांवाच्या एका तरुण गृहस्थाशीं झालें होतें. ह्या मुलीनें दोन वर्षें सुद्धां सासरीं गुण्यागोविंदानें नांदून काढलीं नाहींत. लग्नास पुरतें वर्ष झालें नाहीं तोंच ती नव-ऱ्यास रडगाणें सांगूं लागली. एके दिवशीं आपल्या नव-ऱ्यास एकांतीं गाठून ती त्यास येणेंप्रमाणें ह्मणाली:—

"ऐकिलेंका सासू नणंदा वगैरे घरच्या माणसांशीं माझा निभाव लागणार नाहीं. यासाठीं तुह्मीं आपलें निराळें बिऱ्हाड कराल तर बरी गोष्ट आहे."

बुद्धिवंत—घरांतील माणसांशीं जेव्हां जेव्हां तुझी बोलाचाली होतांना मी ऐकतों, तेव्हां तेव्हां त्या सर्वांत तुझाच अपराध मला दिसून येतो. ह्या पेठेंत जे हलक्या प्रतीचे लोक राहतात, त्यांच्या नाड मुलींशिवाय तुला एक क्षण सुद्धां चैन पडत नाहीं; इतकें ांचें तुला वेड लागून गेलें आहे. काळू हजामाची मुलगी सट-

वाय, सदू माळ्याची मुलगी गंगू व मल्हारी धोंडफोड्याची मुलगी साळू, ह्या सगळ्या पहाव्या तेव्हां तुजजवळ बसलेल्या असतात. ह्याची तुला कांहींच लाज वाटत नाहीं कशी? हे लोक काय आमच्या जातीचे आहेत, कीं त्यांच्याशीं आमचा कांहीं व्यवहार, संबंध आहे, कीं कधीं त्यांच्या घरीं जाणें येणें वगैरे आहे, असें कांहीं नाहीं. पेठेंतील सर्व लोक तुझें हें करणें पाहून छीः थूः करितात व माझ्या आईस ह्मणतात कीं, 'कसली सून बाईनें आणिली आहे ही! जेव्हां पाहावें तेव्हां उनाड मुली जमवून धांगडधिंगा घालीत असते.' आपल्या पेठेंत पंडित रामशास्त्री, शोभाचार्य उपाध्ये, धनाजीराव जाधव रिसालदार, त्रिंबकराव दाभाडे इत्यादि संभावित लोक राहत आहेत. या सगळ्या लोकांशीं आमचा घरोबा असून त्यांच्या मुली सुना आमच्या घरीं नेहमीं येत जात असतात. त्यांच्याशीं तुला कधीं धडपणीं बोलतांनाही मीं पाहिलें नाहीं. ह्मणून आईनें त्या उनाड मुलींबरोबर धांगडधिंगा घालूं नको ह्मणून तुला सांगितलें असेल. त्यांत वाईट तें काय झालें?

ताराबाई—एकादीचें कोणाबर प्रेम जडतें तें कळवळ्यावांचून जडत नाहीं. माझ्या माहेरीं देऊ माळीण ह्मणून एक बाई राहते. तिची मुलगी सखू माझी मोठी जिवाची मैत्रीण होती. लहानपणीं आह्मीं एकमेकांबरोबर खेळत असूं. एक वेळ मीं आपल्या बाहुलीचें लग्न सखूच्या बाहुल्याबरोबर लाविलें होतें. सखू बिचारी फार भोळी होती. तिला मी आईस नकळतां घरांतील पुष्कळ वस्तु नेऊन देत असें. माझ्या आईनें मला अनेक वेळां धमकावून सांगितलें; पण मीं सखूची मैत्री कधीं सोडली नाहीं."

बुद्धिवंत–(राग आल्यासारखें दाखवून) तर मग तूं मोठे दिवे लावलेस !

ताराबाई–देवाची शपथ, मी तुह्मांस सांगतें कीं, मजबरोबर बोलायाचें असलें तर आपलें तोंड संभाळून बोला; नाहींतर मी आपलें कपाळ आपटून जीव देईन.

असें ह्मणून ती आपल्या आईबापांस शाप देऊन मोठ्यानें रडूं लागली; आणि ह्मणाली :—

"देवा ! माझ्या आईबापांचा सत्यनाश होवो. मेल्यांनीं मला असल्या चांडाळाच्या घरीं दिलें. काय माझें प्रारब्ध हें ! माझ्या ओळखीचें येथें कोणी नाहींसें पाहून सर्वांनीं माझा छळ मांडला आहे. देवा माझें एकदांचें मढें बाहेर काढ !"

असें ह्मणून ती गडबडां लोळूं लागली, व लोळतां लोळतां चौरंगावर पानसुपारीचें तबक ठेविलें होतें तें तिनें रागाच्या सपाट्यांत लात मारून खालीं पाडलें. त्यामुळें त्यांतील कात, चुना वगैरे सर्व कांहीं खालीं सत्रंजीवर पसरलें; आणि पासोडी घडी करून तेथें जवळच ठेविली होती, तिला चुना लागतांच मोठे मोठे डाग पडले. तबक पडल्याचा आवाज ऐकतांच समोरच्या दालनांतून सासू धांवत आली. आई आपल्याकडे येत आहे असें पाहतांच बुद्धिवंत दुसऱ्या दरवाजानें निघून गेला. तो मनांत ह्मणूं लागला कीं "किती तरी मी मूर्ख ! चिखलांत दगड टाकून उगीच चिखल अंगावर उडवून घेतला." सासूनें येऊन पाहिलें तों चुना नुकताच आणून चंबाळांत भरून ठेविला होता, तो सर्व सत्रंजीवर पडला आहे, व पासोडी तर त्यांत अगदीं भरून गेली आहे, आणि सून मोठमो-

ठ्यानें रडत आहे. तेव्हां नवऱ्याबायकोची कांहीं तरी खटपट झाली असेल असें समजून तिनें सुनेला पोटाशीं धरली आणि मुलावर फार रागावली. सासूस आपल्याविषयीं इतका प्रेमाचा पाझर आलासें पाहून, "आधींच नाचरी आणि त्यांत पायीं बांधिली घागरी" ह्या म्हणीप्रमाणें ती अधिकच रडूं लागली. सासूनें अंजारून गोंजारून पुष्कळ समजावून सांगितलें; पण ती हट्टी पोर कांहीं केल्या उगी होईना. शेजारच्या बायका तिंचा तो आकांत ऐकून धांवत आल्या. काळू हजामाची मुलगी सठवाय हिला ती बातमी लागतांच तिणें तारेच्या माहेरीं जाऊन "पिसाचा कावळा" म्हणतात त्याप्रमाणें एकाचीं चार करून सांगितलीं. तारेची आईही आपल्या मुलीप्रमाणेंच फार तापट स्वभावाची बायको होती. ती आपल्या मुलीचा वृत्तांत ऐकतांच तिच्या सासरीं नागणीसारखी धांवत आली; आणि तारेच्या सासूस पुष्कळ शिवीगाळ करून मुलीस घेऊन घरीं गेली. ही गोष्ट घडल्यावर कित्येक महिनेपर्यंत दोहोंकडचें येणें जाणें वगैरे सर्व कांहीं व्यवहार बंद पडले.

या हट्टी व कजाग मुलीचें नांव तिच्या ह्या स्वभावावरून सासरीं "ऋन्यादाबाई" असें पडलें होतें. ही मुलगी अज्ञान व तिरसट स्वभावाची होती. पण तिची धाकटी बहीण हिराबाई ही बुद्धिमान् व शिकलेली असून फार चांगल्या स्वभावाची होती. ती वयानें लहान होती तरी तिनें बाळमित्र इसापनीति वगैरे सोपीं सोपीं पुस्तकें बरींच वाचलीं होतीं. त्याचप्रमाणें रामविजयादि कित्येक ओवीबद्ध ग्रंथही तिच्या वाचण्यांत आले होते. तिला लिहितां ही चांगलें येत असे. घरचा सर्व मजकूर आपल्या बापास आठवड्याच

आठवड्यास पत्र लिहून ती कळवीत असे. बहुतेक सर्व प्रकारचे बारीकमोठे कपडेही तिला शिवतां येत असत. त्याचप्रमाणें सर्व जातींचीं पक्कान्नें करण्याची तिला बरीच माहिती झाली होती. या तिच्या गुणांवरून पेठेंतील सर्व लोक तिची वहावा करीत असत. आईच्या घरची सगळी व्यवस्था हिराबाई पाहत असे. बाप जेव्हां रजा घेऊन घरीं येई तेव्हां घरसंसाराच्या सर्व व्यवस्थेंत तिचें मत घेत असे. घरांतील एकंदर पैसाअडका व सामानसुमान हीं तिच्या स्वाधीन असत. आईबापांचा अगदीं तिजवर जीवप्राण असे. त्या पेठेंतील सर्व लोक तिजवर प्रीति करीत. हें पाहून तिची मोठी बहीण ताराबाई हिचें नेहमीं तिच्याशीं वांकडें असे. वेळेनसार तिनें हिराबाईस एकांतीं पाहिलें ह्मणजे, कांहींतरी कुरापत काढून, तिच्याशीं भांडून तिला कधीं कधीं मारण्यासही ती मागेंपुढें पाहत नसे. असें ती करी तरी हिराबाई आपल्या वडील बहिणीचा मान ठेवी. तिची चहाडी आईस कधींही सांगत नसे. ताराबाईस ज्या घरीं दिलें होतें त्या घरचीच मागणी हिराबाईलाही आली होती. बुद्धिवंताचा सत्यवंत ह्मणून एक सख्खा भाऊ होता. ताराबाईचा विवाह बुद्धिवंत याजबरोबर झाला होता. हें मागें सांगितलेंच आहे; आणि हिराबाईचा विवाह त्याचा धाकटा भाऊ सत्यवंत याजबरोबर होण्याचें ठरून साखरपुडाही जाहाला होता; काय तें लग्न मात्र व्हावयाचें राहिलें होतें. ताराबाईच्या वाईट स्वभावामुळें तिच्या घरच्या सर्व जणांस असें वाटत असे कीं, कसेंही करून एक वेळ हिराबाईची मागणी मोडो ह्मणजे झालें. पण या मुलीची मावशी पेंताच्या घराशेजारीं रहात असे. ती नेहमीं ही मागणी न मोडण्याविषयीं भर देत असे. ताराबाईला जरी भांडणतंटा करून

तिच्या आईनें माहेरीं नेलें होतें, तरी तिची पुष्कळ फजिती करून व तिला नीट समजावून दिपवाळीच्या सणांत परत सासरीं आणून पोंचविलें. तेव्हां बुद्धिवंत आपल्या बायकोशीं मुळीं बोलेना कीं तिजकडे पाहिना. शेवटीं माऊस सासूनें या नवराबायकोचें समेट करून दिलें. पण कितीही झालें तरी नव्या उमेदींतील नवराबायकोच्या मनांत त्यांच्या अल्लड स्वभावामुळें परस्परांविषयीं एकदां विकल्प आला ह्मणजे त्यांची कितीही प्रीति जमो, पण मनांत राहिलेली धुसधुस जेव्हां तेव्हां जरा तब्यत बिघडली कीं लागलीच बाहेर पडावयाची. एके दिवशीं असें झालें कीं, बुद्धिवंतानें आपल्या एका मित्रास आपल्या घरीं भोजनास बोलाविलें, आणि त्याच्याकरितां चांगले चांगले पदार्थ करण्यास आईला सांगितलें. त्यावर आई ह्मणाली :—

" बाळा, आतांशा मला स्वयंपाकाची दगदग मुळींच होईनाशी झाली आहे. कायसांगूं आज तीन दिवस झाले, मी चुलीकडे गेलें कीं, मला कांपरें भरून येतें. त्या वेळीं मला स्वतांची देखील शुद्धि रहात नाहीं. ती बिचारी शेजारची गंगूताई येऊन तेवढा स्वयंपाक करून देते ह्मणून बरें आहे. देव तिचें कल्याण करो. बाळा वेसरीं आपल्या मित्राला आमंत्रण करण्यापूर्वीं मला विचारावयाचें सट होतेंस. ह्मणजे कोणाच्या तरी हातांपायां पडलें असतें." बोलून

बुद्धिवंत—(आश्चर्ययुक्त मुद्रेनें आपल्या स्त्रीकडे पाहून) " मायानें काय झालें आहे स्वयंपाक करायाला ? "

तारेस हें ऐकिल्यावर मग धीर कुठचा ? तिनें लगेच उत्तर दिलें. " या सासूबाईस विचारा कीं मुलाचें लग्न केलेंस, व दास-

विकत घेतलीस? तुम्हींच पहा कीं, घरीं कामकरीण असतां चुलींत तोंड घालून बसावें हें योग्य आहे काय?

हें तिचें उद्धटपणाचें उत्तर ऐकून बुद्धिवंतानें मनांत विचार केला कीं, जर आतां कांहीं अधिक उणें बोलेन तर पूर्वीच्या सारखाच प्रकार घडून येईल. ह्मणून तो हिरमुसलें तोंड करून उगाच राहिला. नंतर शेजारच्या गंगूताईच्या हातापायां पडून त्याच्या आईनें तिच्याकडून चार पांच बरीं वाईट पक्कान्नें करवून ती वेळ मारून नेली. पुढें थोड्याच दिवसांनीं दिपवाळीचा सण आला. बुद्धिवंतानें दिपवाळीच्या अगोदर एक आठवड्यापासून क्रव्यादाबाईच्या लुगड्याचोळीची वगैरे तयारी चालविली होती. आज कोटें पैठणी शालू आण, उद्यां अमदाबादी काळी चंद्रकळा आण; याप्रमाणें दररोज कांहींना कांहीं तरी तऱ्हतऱ्हेच्या साड्याचोळ्या व शालू तो तिला दाखविण्यासाठीं आणीत असे. पण त्यांतून एकहीं त्या क्रव्यादा बाईस पसंत पडेना. शेवटीं दिपवाळीस एक दिवस राहिला तेव्हां निरुपाय होऊन तारेच्या मावशीच्या एथें तो गेला; तों तिचें दार बंद होतें. त्यानें बाहेरून हांक मारिली. तेव्हां जांवयाचा शब्द ऐकून मावस सासू धांवत बाहेर आली, आणि दार उघडून बुद्धिवंतास दिवाणखान्यांत नेऊन बसविलें. कांहीं इकडच्या तिकडच्या गोष्टी झाल्यावर ताराबाई खुशाल आहेना ह्मणून तिनें त्यास विचारिलें.

बुद्धिवंत—मामी काय सांगूं? ती मोठी चमत्कारिक बायको आहे. माझा तर तिनें नाइलाज करून सोडिला आहे. तिचे रंग ढंग, बोलणें चालणें पहावें तें सगळेंच विलक्षण. यास करावें तरी काय? मामी, खरेंच सांगतों, माझा आतां अगदीं निरुपाय झाला आहे.

सासू—अहो असे उतावळे होऊं नका. सध्यां तिचा पोरस्वभाव

आहे. कांहीं दिवसांनीं मूलबाळ होऊन संसाराचें ओझें तिच्या डोईवर आलें ह्मणजे आपोआप तिचा स्वभाव बदलेल. ईश्वरानें तुह्मांस काय कमती केलें आहे? मौज पहाणारे पुष्कळ आहेत; पण त्यांत अब्रू कोणाची जाते हें पाहिलें पाहिजेना?

बुद्धिवंत–मीही असेंच समजून आज पुष्कळ दिवस कानाडोळा करीत आहें. मामी, आतां तुह्मींच पहा कीं, उद्यांपासून दिपवाळी सुरू झाली. तर तिनें अजून बांगड्या भरल्या नाहींत, कीं आपली चोळी शिवून ठेविली नाहीं. परवां लुगडीं आणिलीं होतीं त्यांतून तिला एकही पसंत होईना? तुह्मीं जरा तेथवर येऊन तिला समजावून सांगाल तर पहा. मी तर सांगून सांगून दमलों. त्याचप्रमाणें आईनेंही पुष्कळ विनवणी केली. पण ती आपली रुसून फुगून बसली आहे. काय कारण असेल तें नकळे.

सासू–बरें, जरा थांबा फराळाचें सामान आणण्याकरितां ते बाजारांत गेले आहेत. त्यांला येऊं द्या; ह्मणजे त्यांस विचारून मी तुह्मांबरोबर येतें.

इतक्यामध्यें तिचा नवरा बाजारांतून आला. त्यास विचारून ती बुद्धिवंताबरोबर त्याच्या घरीं गेली; आणि कांसारास बोलावून आणून ताराबाईस बांगड्या भरल्या. व आणलेल्या खणांतला एक खण तिजकडून पसंत करवून त्याची तिच्या अंगाची चोळी बेतली. आणि सर्वजणी मिळून ती शिवावयास बसल्या.

मावशीनें तोरस ह्मटलें कीं, "मुली ही घे तूं हातास कळी लाव, आणि तुझी सासू तोंपर्यंत दुसऱ्या हातास जरीची फीत लावील. मी इकडे गळा जोडून त्यावर टीप घालतें." ताराबाई कांहीं जास्त न बोलतां मावशीनें सांगितलें तसें करूं लागली. थोडक्याच वेळांत

दोन्ही हातांस कळ्या लावल्या; आणि मोठ्या डौलानें मावशीस "पहा मावशी तुझी अर्ध्या गळ्यावर टीप घालून झाली ें मी दोन्ही हातांस कळ्या लावून टाकल्या." हें ऐकून मोठें आश्चर्य वाटलें, आणि पाहते तों जरीची फीत लावलेल्या सून कळ्या उलट्या जोडल्या आहेत! पण करते काय? सू जवळ असल्यामुळें ती तिला कांहीं एक बोलली नाहीं. ज्ञा- तिला हळूच दोनचार चिमटे अशा जोरानें घेतले कीं - असेंडाळ्यांत आंसवें भरून आलीं. आपण कांहीं चूक केली र्त्रा तारेस वाटून तिनें आपल्या शिवणकामाकडे पाहिलें तों तांचतिच्या सहज लक्षांत आली. मग ती आपण शिवलेलें पुन्हा गासून मावशीनें दाखविल्याप्रमाणें कळ्या लावूं लागली. कळ्या ्याचर मावशी पाहते तों सगळ्या शिवणींत अगदीं चूण माणिआहे. तेव्हां तर तिच्यानें मुळींच राहवेना. तारेच्या दा डोळा चूकवून तिनें तिच्या हातास खूप जोरानें सुई टोंचली, र्लीनें; िवलेलें सगळें उसवून आपण शिवूं लागली. ह्याप्रमाणें कीच्यां ा एकदांची तारेची चोळी तयार झाली. पण ती - करून ा बरीच रात्र लोटली. मग रात्र फार झाली असें ा ांगलीं मावशी आपल्या घरीं निघून गेली; आणि घरांतील ्याद जेवणखाण आटपून निजली.

आहे. कांहीं दिवसांनीं मूलबाळ होऊन संसाराचें ओझें तिच्या डोईवर आलें ह्मणजे आपोआप तिचा स्वभाव बदलेल. ईश्वरानें तुह्मांस काय कमती केलें आहे? मौज पहाणारे पुष्कळ आहेत; पण त्यांत अब्रू कोणाची जाते हें पाहिलें पाहिजेना?

बुद्धिवंत–मीही असेंच समजून आज पुष्कळ दिवस कानाडोळा करीत आहें. मामी, आतां तुह्मींच पहा कीं, उद्यांपासून दिपवाळी सुरू झाली. तर तिनें अजून बांगड्या भरल्या नाहींत, कीं आपली चोळी शिवून ठेविली नाहीं. परवां लुगडीं आणिलीं होतीं त्यांतून तिला एकही पसंत होईना? तुह्मीं जरा तेथवर येऊन तिला समजावून सांगाल तर पहा. मी तर सांगून सांगून दमलों. त्याचप्रमाणें आईनेंही पुष्कळ विनवणी केली. पण ती आपली रुसून फुगून बसली आहे. काय कारण असेल तें नकळे.

सासू–बरें, जरा थांबा फराळाचें सामान आणण्याकरितां ते बाजारांत गेले आहेत. त्यांला येऊं द्या; ह्मणजे त्यांस विचारून मी तुह्मांबरोबर येतें.

इतक्यामध्यें तिचा नवरा बाजारांतून आला. त्यास विचारून ती बुद्धिवंताबरोबर त्याच्या घरीं गेली; आणि कांसारास बोलावून आणून ताराबाईस बांगड्या भरल्या. व आणलेल्या खणांतला एक खण तिजकडून पसंत करवून त्याची तिच्या अंगाची चोळी बेतली. आणि सर्वजणी मिळून ती शिवावयास बसल्या.

मावशीनें तोरस ह्मटलें कीं, "मुली ही घे तूं हातास काळी लाव, आणि तुझी सासू तोंपर्यंत दुसऱ्या हातास जरीची फीत लावील. मी इकडे गळा जोडून त्यावर टीप घालतें." ताराबाई कांहीं जास्त न बोलतां मावशीनें सांगितलें तसें करूं लागली. थोडक्याच वेळांत

दोन्ही हातांस कळ्या लावल्या; आणि मोठ्या डौलानें मावशीस "पहा मावशी तुझी अर्ध्या गळ्यावर टीप घालून झाली ! मी दोन्ही हातांस कळ्या लावून टाकल्या." हें ऐकून मोठें आश्चर्य वाटलें, आणि पाहते तों जरीची फीत लावलेल्या सून कळ्या उलट्या जोडल्या आहेत ! पण करते काय ?

सू जवळ असल्यामुळें ती तिला कांहीं एक बोलली नाहीं. ज्ञा- तिला हळूच दोनचार चिमटे अशा जोरानें घेतले कीं अंडाळ्यांत आंसवें भरून आलीं. आपण कांहीं चूक केली त्र्यां तारेस वाटून तिनें आपल्या शिवणकामाकडे पाहिलें तों तांचतिच्या सहज लक्षांत आली. मग ती आपण शिवलेलें पुन्हा गासून मावशीनें दाखविल्याप्रमाणें कळ्या लावूं लागली. कळ्या ्याचर मावशी पाहते तों सगळ्या शिवणींत अगदीं चूण ाणिआहे. तेव्हां तर तिच्यानें मुळींच राहवेना. तारेच्या दा डोळा चूकवून तिनें तिच्या हातास खूप जोरानें सुई टोंचली, ्हींतें; िवलेलें सगळें उसवून आपण शिवूं लागली. ह्याप्रमाणें ीच्यां ा एकदांची तारेची चोळी तयार झाली. पण ती करून । बरीच रात्र लोटली. मग रात्र फार झाली असें ांगलीं मावशी आपल्या घरीं निघून गेली; आणि घरांतील ्याद जेवणखाण आटपून निजली.

प्रकरण दुसरें.

दुसरे दिवशीं नरकचतुर्दशी असल्यामुळें केव्हां उडेल आणि आपण केव्हां गोडगोडफराळ करूं घरांतील मुलांस होऊन गेलें होतें. त्यांस सारी नीट झोंप देखील आली नाहीं. मोठी पहाट होतां सारींजणें उठलीं, आणि कोणी तेलउटणें अं लावण्यासाठीं घाई करूं लागलीं; कोणी आपल्या हातानें उटणें अंगास लावून स्नान करण्यास गेलीं; अं स्नान करून आल्यावर कारिटें फोडून उंच स्वरानें "गोविं गोविंदा!" ह्मणूं लागलीं; कोणी फटाक्या लावूं लाग असा सर्वांनीं एकच गोंगाट मांडला. बुद्धिवंतही बाबू बरोबर उठून तेलउटणें लावून स्नानास गेला. स्नान आल्यावर तो पहातो तों सर्व मुलें स्नानकरून व चां वस्त्रें लेऊन फराळाची वाट पहात बसलीं आहेत. पण क बाई तेवढी नेहमींप्रमाणें बिछान्यावर हातपाय ताणून मो घोरत पडली आहे. असें पाहून बुद्धिवंत आपली धाकटी ल शांताबाई हीस हाक मारून ह्मणाला, "शांते, जाग तिला कर." हें ऐकतांच शांताबाई मनांत जरा दचकली. ठां कज्यादाबाईला ती फार भीत असे. लग्न झाल्यापासून

दिवसही ती आपल्या धाकटे नणंदेबरोबर गोडीगुलाबीनें बोलली नव्हती, अथवा तिची कधीं वेणीफणी आवडीनें केली नव्हती किंवा आपल्या बरोबर तिला कोठें कधीं नेलें आणलें नव्हतें. पण बापडी करते काय? भावाची आज्ञा तिला मोडवेना. तशांत वर्षाचा सणाचा दिवस, ह्मणून मोठ्या आनंदानें धांवत धांवत जाऊन ती तिला हांका मारूं लागली: "वहिनी ग वहिनी, ऊठ, चल उटणें बिटणें लावून आंघोळ कर." वहिनी काय विचारतां! तिनें रागारागानें उठून शांताबाईच्या एक चांगली तोंडांत दिली. त्यासरशीं शांताबाई मोठ्यानें रडूं लागली. बुद्धिवंत बाहेर उभा होताच. तिच्या रडण्याचा स्वर ऐकतांच तो धांवत खोलींत आला; व त्यानें तिला कडेवर उचलून घेऊन कां रडतेस ह्मणून विचारलें. शांताबाईनें रडत रडत उत्तर दिलें कीं, "वहिनीनें मला मारलें." क्रव्यादाबाई ह्मणाली, "पहा काय तरी लबाड, आपण धांवतां धांवतां पडली आणि माझें उगाच नांव घेते. मी ह्मणजे आपली अगदीं वाईटच्चना?" "हें ऐकून बुद्धिवंतास पराकाष्ठेचा राग आला; पण करतो काय? ती वेळ भांडत बसण्याची नव्हे असा विचार करून तो उगा राहिला; व शांताबाईस उगी करून आपल्या बायकोस ह्मणाला, "बरें चल, ऊठ. आंघोळ करून आपलें चोळीलुगडें नेस. दिवस पहा किती वर आला तो. तूं खेरीज करून बाकीच्या साऱ्यांचें आंगधुणें झालें. मला बाजारांतून फराळाचें सामान आणावयास उशीर झाला." क्रव्यादाबाईनें नाक मुरडून आणि मान मोडून ह्मटलें, "मी एवढ्या मोठ्या पहांटेस आणि तशांत अशा कडक थंडीच्या वेळीं न्हाणार नाहीं. तुह्मी बाजारांत जाणार तर जा. माझ्याबांचून तुमचें काय खोळंबलें आहे? मी कांहीं कोणास बांधून बिंधून

ठेविलें नाहीं." बुद्धिवंतास हा जबाब ऐकून फार वाईट वाटलें. इतक्यांत बुद्धिवंतास आईनें हांक मारून म्हटलें, "बाळा बाजारांत जाऊन फराळासाठीं केळींबिळीं आण; तोंपर्यंत मी इकडे बाकीची तयारी करितें." बुद्धिवंत म्हणाला "होय आई, पैसे दे, म्हणजे जाऊन आणतों. पण मी बाजारांतून येईपर्यंत जर ही आंघोळ वगैरे करून नवी चोळी लुगडें नेसली नाहीं, तर सर्व कपडे चुलींत घालून जाळून टाकीन." असें म्हणून आईनें दिलेले पैसे घेऊन फराळाचें सामान आणण्यासाठीं तो बाजारांत गेला.

आपल्या बुद्धिवंताचा स्वभाव फार तापट आहे. अगोदर त्यास एकाएकीं राग येत नाहीं, आणि एकवेळ आला म्हणजे मग त्याचें डोकें ठिकाणावर लौकर येत नाहीं, हें आईला पक्कें माहित होतें. म्हणून म्हटल्याप्रमाणें कदाचित् खरोखर तो कपडे जाळून टाकील, असें वाटून ती घाई घाईनें सुनेपाशीं गेली आणि म्हणाली :

"मुली, हें बग, तुला देवाची शपथ आहे; अशा सणासुदिशीं तरी हट्ट करूं नकोस. चल ऊठ, न्हा आणि आपलें नवें लुगडें नेस कसें."

कव्यादा०—नाहीं सासूबाई, मी अशा थंडीच्या वेळीं न्हाणार नाहीं. आणखी अंमळ थांबून थंडी जरा कमी झाल्यावर मग न्हाईन.

तरी पण सासूनें पुष्कळ प्रकारें समजावणी करून शेवटीं एकदाचें सुनेला उठविलें, आणि तीस न्हाऊं घालून बुद्धिवंत येण्यापूर्वी सजवून तयार केलें. बुद्धिवंत हें पाहून फार खूष झाला. आणि मग सर्वजणें मिळून एकदम फराळास बसलीं. फराळ आटोपल्यावर बुद्धिवंतानें शनवारवाडयाच्या समोरील चौकांत त्या दिवशीं मोठा वार्षिक

मेळा भरला होता तेथें जाण्याची तयारी केली; आणि जातेवेळीं शांताबाईस विचारलें, "शांते, तुला मेळ्यांतून काय काय आणूं ग?"

शांताबाई—दादा, दोन चांगल्याशा रंगीत फळ्या माझ्या दप्तरांतील पुस्तकें आणि कागद चुरतात ते न चुरावे म्हणून बांधायाला आणि दऊतलेखण्या ठेवायाला एक लहानसें कलमदान आण.

क्रव्यादाबाई—(जवळ उभी होती. ती कोणी विचारल्याशिवाय आपणच होऊन बोलली) आणि माझ्यासाठीं काय आणाल?

बुद्धिवंत—तूं जें कांहीं सांगशील तें आणीन.

क्रव्यादाबाई—बरें तर चांगलीं कोंवळींशीं मक्याचीं कणसें, सिंगाडे, अमदाबादी बोरें, चांगले भाजून फुलविलेले विलायती वाटाणे, व एक बाजा येवढें आणा म्हणजे पुरे.

बुद्धिवंत—(हें ऐकून किंचित् विस्मय पावून) बाजा कशाला?

क्रव्यादा०—कशाला म्हणजे? वाजवायाला.

बुद्धिवंत मनांत समजला कीं, या मूर्ख बायकोचा पोरस्वभाव अद्याप गेला नाहीं. हिला पोरांप्रमाणें खाणें आणि खेळणें यांशिवाय दुसरें कांहींएक सुचत नाहीं. ती नवीं वस्त्रें नेसल्यामुळें बुद्धिवंतास जो आनंद झाला होता, तो सर्व हा तिचा पोरकटपणा पाहून नाहींसा झाला, आणि उदास होऊन तो मेळ्यास जावयास निघाला. तो पाठमोरा झाला नाहीं तोंच क्रव्यादाबाई सासूस म्हणाली:

"मला आपल्या आईच्या घरीं जावेंसें वाटतें. माझ्यासाठीं एक गाडी आणवा."

सासू०—मुली ही माहेरीं जाण्याची वेळ काय ग? चार महिने माहेरीं राहून आल्यास तुला आज पुरते आठ दिवस देखील

झाले नाहींत; आणि तशांत आज सणाचा पहिलाच दिवस असतां तूं माहेरीं जावें हें मला तर नीट वाटत नाहीं बाई.

ऋव्यादा०—सासूबाई, आज कीं नाहीं माझा जीव फार कासावीस होत आहे. माझ्या मनास कुठेंच चैन पडत नाहीं. मला माझी मैत्रीण देवू माळणीची मुलगी सखू हिची आठवण घडीघडी होत आहे.

सासू—खरेंच आहे तें. कोणाचें एक वेळ मनास मन मिळालें ह्मणजे असेंच होतें. तिच्या वांचून तुला जर आज करमत नसेल तर त्या सखूसच इकडे बोलावतें ह्मणजे झालें कीं नाहीं?

ऋव्यादा०—काय मोठ्या बोलावणाऱ्या! बोलवावयाचें असतें तर कालच बोलावून तिला माझ्या बरोबर बांगड्या नसत्या का भरल्या?

सासू—तुला तिची आज अशी एकाएकीं आठवण होऊन प्रेमाचा हुंदका येईल हें मला ग काय बाई माहीत?

ऋव्यादा०—पुरे पुरे सासूबाई. असला वितंडवाद करून काय फळ? गाडी मागविणें असेल तर मागवा, नाहीं तर मीं सटवायचा बाप काळू न्हावी याला तीं आणावयास सांगतें.

सासू—अग, तुझी अक्कल गेली कोणीकडे? तूं नवऱ्यास विचारल्याशिवाय आप खुशीनें चाललीस हें काय बाई? तुझ्या नवऱ्याला विचारल्याशिवाय तुला पाठवूं आणि जनांकडून मी आपली फजिती करून घेऊं होय?

ऋव्यादा०—त्यांना हो बाई काय विचारायचें आहे? मी आपल्या आईबापांला दिवाळीसारख्या सणाच्या दिवशींही भेटण्यास जाऊं नये कीं काय?

असें ह्मणून काळू हजामाकडून गाडी आणवून ती माहेरीं चालती झाली.

थोडक्या वेळानें बुद्धिवंत मेळ्यांतून घरीं आला; व दाराशीं येतांच स्त्रीस मोठ्यानें हांक मारून ह्मणाला, "अग हा तुझा बाजा घे, आणि बैस वाजवीत." पण तो घरांत येऊन पहातो तों सर्व जणें उदासवाणीं बसलीं आहेत. तेव्हां घाबरा होऊन आईस विचारूं लागला, "असें काय? काय झालें? सगळीं बरीं आहेतना? शांताबाई ह्मणाली, "दादा, वहिनी माहेरीं गेली हो." हें ऐकतांच बुद्धिवंत अगदीं संतापून ह्मणाला, " कां गेली? तिला कशासाठीं जाऊं दिलें?"

आई—बाळा कांहीं एक कारण नसतां ती एकाएकीं हट्ट धरून बसली कीं मी आपल्या आईच्या घरीं जाणार. मी तिला पुष्कळ समजावून नको जाऊं ह्मणून सांगितलें; पण तिनें कांहीं ऐकिलें नाहीं. काळू न्हाव्याकडून गाडी आणवून ती आह्मी नको नको ह्मणत असतां चालती झाली.

हें ऐकतांच बुद्धिवंताच्या अंगाचा तिळपापड झाला व आतांच्या आतां सासुरवाडीस जाऊन त्या कजागबायकोस शिक्षा करावी असा निश्चय करून तो घराबाहेर पडला. त्याचा हेतु लागलाच आईच्या लक्षांत येऊन ती त्यास मागें परतण्याविषयीं हांका मारूं लागली. त्या तो ऐकल्या न ऐकल्याशा करून चालता झाला. तें पाहून ती ह्मणाली, "काय मुलगा पण! अरे, मी तुला हांका मारितें त्या तूं ऐकतोस, पण मागें परतत नाहींस! वः कलियुगांत आईबापांचा थोरपणा मुलांनीं असाच राखावयाचा नाहीं?" हे आईचे रागाचे शब्द ऐकतांच बुद्धिवंत माघारा फिरला.

आई—बाळा, तूं इतक्या घाईनें उन्हांतून कोठें चाललास? अरे, तुला मेळ्यांतून आल्यास पांच मिनिटेंही झालीं नाहींत आणि इतक्यांत कोठें निघालास? जाईना ती. तुझा सोन्यासारखा जीव मात्र उन्हांत कासावीस होईल.

बुद्धिवंत—आई, मी कोठें जात नाहीं. आपल्या शहरची दिपवाळी पाहण्याकरितां माझा एक मित्र खेडयांतून आला आहे; त्यास भेटण्याकरितां शेजारच्या घरीं जातों.

आई—शेजारच्या घरीं जायाचें तर तेथें हा शिलेपोस कशास पाहिजे! अंगरखा पागोटें काढून ठेविनास?

आईनें असें सांगतांच बुद्धिवंत घोटाळ्या सारखा झाला. हें पाहून तिनें त्याचा हात धरून खालीं आपल्या जवळ बसविलें आणि त्याच्या डोक्याकडे पाहून ती झणाली:

"अरे, उन्हांतून आल्यानें घाम येऊन तुझे केंस कसे अगदीं ओलेचिंब झाले आहेत, आणि कपडेही घामानें भिजून गेले आहेत. तर अंगांतले कपडे काढून ठेवून या उशीवर अंमळ डोकें टेंक. मी तुझे केंस फणीनें विंचरून साफ करितें.

बुद्धिवंतानें आईच्या सांगण्याप्रमाणें डोकें टेंकलें. इकडे शांताबाई आपल्या भावानें उशीवर डोकें टेंकलेंसें पाहून पंखा घेऊन त्यास वारा घालूं लागली. बुद्धिवंतास मेळ्यांत जाऊन आल्यानें फार श्रम झाले होते झणून, व त्यास पंख्याच्या गार वाऱ्याची झुळूक लागल्यामुळें आणि आईनें प्रेमानें डोकीवरून हात फिरविल्यामुळें लौकरच गाढ झोंप लागली.

प्रकरण तिसरें.

मागील **प्रकरणांत** सांगितल्याप्रमाणें बुद्धिवंत जो झोपीं गेला तो सूर्यास्त होईपर्यंत जागाच झाला नाहीं. उठल्यावर आईनें त्याला तोंड धुण्यास पाणी दिलें; आणि थोडासा फराळ त्याच्या पुढें आणून ठेवला. ह्या वेळीं त्याच्या मनांतला बायकोविषयींचा राग बराच कमी झाला होता. आईनें घातलेला फराळ खाल्यावर तो पुनः सासुरवाडीस जावयास निघाला. तेव्हां त्याची आई ह्मणाली:

"सासुरवाडीस जा; पण तेथें कांहीं कमीजास्त बोलशील तर तुला माझ्या गळ्याची आण आहे."

बुद्धिवंत—तर मग मी मुळीं जातच नाहीं.

आई—अरे बाळा, तुला सासुरवाडीस जाऊं नको असें मी नाहींहो सांगत. तूं जाच, पण तेथें भांडत बसूंनको. हा घे एक रुपया. तुझी मेहुणी हिराबाई हिच्या हातीं तो दिपवाळीच्या मिठाईसाठीं ह्मणून दे; आणि ही अधेली तुझ्या माऊस सासूचा मुलगा उमाकांत त्याच्या हातीं दे. शिवाय तूं बाजारांतून आणलेलीं खेळणीं, फटाक्यांच्या पेट्या, मिठाई वगैरे जिनसांतील कांहीं एका ताटांत घालून व वरती सरपोस टांकून ठकी मोलकरणीच्या डोईवर देऊन घेऊन जा. आणि सासरच्या मुलांस त्या वाटून दे.

बुद्धिवंत--आणि आई, तो बाजाही घेऊन जाऊंका?

आई—जा घेऊन बापडा, पण सांगितलेलें लक्षांत ठेव.

बुद्धिवंत सासुरवाडीस जाऊन पोंचला तेव्हां घरांत ताराबाई ही आपल्या मैत्रिणी जमवून धागडधिंगा घालीत होती. त्याची ओरड थेट चोळाच्या नाक्यापर्यंत ऐकूं जात होती. पहिल्यानें ठकी घरांत गेली. ती हिराबाईनें दुरून आंत येतेशी पाहून आपल्या बहिणीस हळूच हांक मारून म्हटलें, "अगे आका, तुमचा खेळ जरा बंद करा पाहूं. ही तुझ्या सासऱ्याहून मोलकरीण आली आहे." ठकी आंत जाऊन तिनें बुद्धिवंतास येण्याविषयीं सूचना केली. बुद्धिवंत आंत जाऊन पहिल्यानें सासूच्या पायां पडला. तेव्हां सासूनें "चिरंजीव हो" असा आशीर्वाद दिला. हिराबाईही आपला पदर सरसाऊन खोलीच्या बाहेर आली आणि मोठ्या नम्रतेनें आपल्या आईपाशीं उभी राहिली. बुद्धिवंतानें हिराबाईस आपल्याजवळ बसवून घेतलें, आणि आईनें दिलेला रुपया काढून तिच्या हातीं तो देऊं लागला. तेव्हां हिराबाई आईच्या तोंडाकडे टकमक पाहूं लागली. तें पाहून आई म्हणाली, "घे मुली घे. तुझा मेहुणा तुला तो दिवाळीच्या मिठायीसाठीं देत आहे." हिराबाईनें रुपया घेतला आणि त्याच्या जवळून उठून पलीकडे जाऊन बसली. मग थोड्या वेळानें तिनें आईच्या सांगण्यावरून कणारांगोळी घालून पाट, तांब्या पंचपात्री वैगेरे मांडलीं, आणि एका ताटांत शेवयांची खीर, मोतीचूर लाडू, करंज्या, अनारसे, जिलब्या वैगेरे मिष्टान्नें घालून पाटापुढें आणून ठेविलें. तेव्हां सासूनें बुद्धिवंतास म्हटलें:

"उठा, हातपाय धुऊन थोडा फराळ करा."

बुद्धिवंत—नको, मला कांहींएक नको. आतांच मी घरून फराळ करून आलों आहें.

सासू—घरीं फराळ केला ह्मणून काय झालें? आज दिवाळीचा सण आणि नाहीं ह्मणतां हें कसें! चला उठा.

असें ह्मटल्याबरोबर सासूच्या भिडेस्तव बुद्धिवंत उठला आणि हातपाय धुऊन फराळास जाऊन बसला. इकडे फराळ होई तोंपर्यंत हिराबाईनें चांगल्या पिकलेल्या पानांचा वेलची जायफळ वैगेरे घालून मेहुण्याकरितां छानदार विडा करून ठेविला. फराळ आटपून थोडा वेळ इकडच्या तिकडच्या गोष्टी झाल्यावर बुद्धिवंत ह्मणाला:

"मला आतां निरोप द्या."

सासू—अहो येवढ्या रात्रीं कोठें जातां? बाहेर काळोख ठिक्कर पडला आहे. रात्रच्यारात्र येथेंच निजा झालें.

बुद्धिवंत—नाहीं आज दिपवाळीचा पहिलाच दिवस आहे; तेव्हां घरीं आल्यागेल्याचा समाचार घेतला पाहिजे; व कोणास कांहीं भेट वैगेरे पाठविणें राहिली आहे कीं काय तें पाहिलें पाहिजे. तशांतून रहाण्याविषयीं आईस विचारून आलों असतों तर ती गोष्ट निराळी होती.

सासू—भेटी पाठविण्यास तर आतां वेळ राहिला नाहीं, कारण आतां रात्र झाली. आणि त्या पाठविण्याचें तुमच्यामुळें अडून राहील असें कांहीं नाहीं. कारण आमच्या सगुणाबाई घरीं अहेतच. तुम्हीं आजची रात्र येथें राहिलां असें ठकी जाऊन सांगेल ह्मणजे झालें.

बुद्धिवंतानें पुष्कळ आढेवेढे घेतले. पण सासूनें फारच आग्रह केला. तेव्हां निरुपाय होऊन बुद्धिवंतास राहणें भाग पडलें. जेवणखाण आटपेपर्यंत दहा घटका रात्र झाली. हिराबाईनें भांडींकुंडीं घांसून जिकडेतिकडे पडलेल्या वस्तू जागचे जागीं नीट लावून ठेविल्या,

वाड्याच्या फाटकाची दिंडी लावून घेतली, आणि कोठाराच्या खोलीस कुलूप लावून त्याची चावी आईचे स्वाधीन केली. नंतर स्वयंपाक-घरांतील व दिवाणखान्यांतील दिवे मालवून आपल्या आईस, आकास व मेहुण्यास पानाचे विडे करून दिले आणि मग ती आपल्या खोलींत जाऊन निजली.

सासू—(बुद्धिवंताकडेस वळून) अहो, तुह्मां नवराबायकोंत आल्या-दिवसा भांडणें तंटे होतच असतात हें काय? तरेस तर अशी वाईट संवय लागून गेली आहे कीं सासरची कसलीही गोष्ट तिच्या तोंडांतून कधीं चुकून देखील येत नाहीं. नाहीं तर लोकांच्या मुली; जरा कांहीं सासरीं झालें कीं लागल्याच माहेरीं येऊन सांगतात. पण हिलाच तेवढी न सांगण्याविषयीं ईश्वराकडून शपथ आहे कीं काय कोण जाणे. ती कांहीं सांगेल ह्मणून विचारतां विचारतां तोंड थकून जातें. पण हिच्या तोंडांतून एक शब्दही निघत नाहीं. पण येथेंत नेहमीं चर्चा होत असल्यामुळें तिच्या सासरीं काय होतें तें आह्मांस घरीं बसल्या ठिकाणीं आपोआप समजतें.

याप्रमाणें सासूचें बोलणें ऐकतांच बुद्धिवंत थोडा वेळ विचारांत पडला. लज्जेमुळें तोंडांतून एक शब्दही त्याच्यानें काढवेना. पण मनांत ह्मणाला कीं, हा योग फार दिवसांनीं घडून आला आहे; आणि हिनें आपण होऊनच ही गोष्ट काढली आहे. तेव्हां कांहीं न बोलतां मुकाट्यानें रहावें हें ठीक नाहीं. बेहत्तर आहे, साऱ्या जन्माच्या दुःखाचा आज काय उलगडा होईलतो करूं. असें मनांत आणून व मोठा धीर करून लाजत लाजत ह्मणाला :

"ती येथेंच आहे, तिला विचारा कीं आमच्या घरीं तिला काय जाच किंवा दुःख सोसावें लागतें तें. तिला कोणत्या गोष्टीची कधीं

कमताई किंवा वाण आहे तें तर तिला सांगूं द्या; किंवा तिच्या बरोबर कोणी कधीं भांडलें आहे किंवा कोणी कधीं कांहीं तरी तिला बोललें आहे तें तिलाच सांगूं द्या. तुह्मांस माहीत आहे कीं, आमच्या घरीं कायतीं सारीं तीन माणसें. आमची तर आई किती सोशीक व साध्या स्वभावाची आहे तें सगळी पेठ सांगेल. तिलर कोणाबरोबर भांडणाचा प्रसंग ह्मणून कसा तो कधीं मुळीं माहीतच नाहीं. कोणी कितीही लावून बोललें तरी त्यास प्रत्याचें न देतां ती आपली उगीच बसत असते. माझा धाकटा भाऊ रहावंत तर सारा दिवस आपल्या अभ्यासांत गुंतलेला असतो. भ्रसा सकाळीं बाहेर जातो तो संध्याकाळीं दिवे लागतां घरीं परत येतो. आला कीं जेवून नीट आपल्या निजावयाच्या खोलींत जातो. मी आज दिवसपर्यंत त्याला हिजबरोबर कधीं बोलतानां देखील पाहिलें नाहीं. शांताबाई तर हिला पाहिल्याबरोबर थरथरां कांपते. आतां बाकी राहिलों मी, तो हा येथें हजर आहें. तर जें मजविषयीं कांहीं गाऱ्हाणें असेल तें तिला बेलाशक न भितां सांगूं द्या.

सासू—(आपल्या मुलीकडे वळून) मुली, तुझ्या मनांत जें कांहीं असेल तें स्पष्ट सांगून टाक पाहूं. मनांत ठेवल्यानें चांगलें होत नाहीं, उलटें त्यापासून जास्त दुःख व त्रास मात्र होतो.

ताराबाई कुभांड रचण्याच्या कामांत मोठी बहादर बायको होती, तरी नवऱ्याच्या समक्ष तरी तसें करावयास तिची छाती होईना. आईनें विचारतांच ती मनांतल्यामनांत घाबरून गेली. तिला वाटलें कीं, मी आजपर्यंत सासरच्या माणसांच्या हजारों चहाडचा तिखटमीठ लावून आईस सांगितल्या आहेत, त्या सर्व आतां बाहेर

पडतील. म्हणून त्या गोष्टीची उडवाउडव करून व कांहीं एक उत्तर नदेतां इतकेंच म्हणाली:

"तें कांहींही असो; मी आपली निराळी रहाणार."

सासू–(जांवयाकडे वळून) बरें मी विचारतें, तुम्हांला निराळें होऊन रहावयाला काय अडचण आहे? आज ईश्वरानें सर्व कांहीं गोष्टी तुम्हांस अनुकूळ आहेत. तुम्हाला चाकरी दिवा पोटापुरते चार पैसे मिळत आहेत; कोणत्याही गोष्टीनें म्हणजे संवयाापांवर तुमचा भार आहे असें नाहीं. आपली कमाई कधींा आपला खर्च असें असून दुसऱ्याच्या तंत्रानें राहण्यांत काय अर्थ? आईबाप, बहीणभावंडें कितीही जिव्हाळ्याचीं असलीं तरी जें सुख निराळें राहिल्यानें होतें तें त्यांच्या जवळ राहिल्यानें कधींही व्हावयाचें नाहीं. निराळें राहिलें म्हणजे मनास वाटेल तें खावें प्यावें व ल्यावें. जरा विचार करा म्हणजे तुम्हांस समजेल कीं, आईबापांजवळ राहून लाखो रुपये कमाविले तरी नांवलौकिक नाहीं. लोकांस काय ठाऊक कीं तुम्हीं आपल्या कमाईचें खातां, कीं आईबापांचें खातां?

बुद्धिवंत–सासूबाई, सुखाविषयीं जर म्हणाल तर जें सुख सध्यां आम्हांस मिळत आहे तें किती अमोल आहे तें निराळें राहिल्यावर आम्हांस लौकरच कळून येईल. सध्यां तर दोन्ही वेळां आयतें शिजलेलें खावयास मिळून बिनफिकीर रहावयास मिळतें. निराळें राहिलें म्हणजे तांदूळ, डाळ, गहूं, मीठ, भाजीपाला या सर्वांची काळजी करावी लागेल; आणि घरसंसाराचा गाडा चालविणें हें लहानसान किंवा सोपें काम नव्हे हें तुम्हीं जाणतच आहां. असें असतां निराळें राहणें यांत मला तर कोणत्याही अर्थानें

शहाणपण वाटत नाहीं. तुह्मीं म्हणाला कीं, निराळें राहिल्यावर मनास वाटेल तें खावयास सांपडेल; तर हिला विचारा कीं, कधीं हिला कांहीं खावेंसें वाटलें आणि तें मिळालें नाहीं, असें कधीं झालें आहे काय. कुटुंब मोठें असलें तर मात्र तुम्हीं म्हणतां अशी अडचण असते खरी. एकास नुसता डाळभातच आवडतो तर दुसऱ्याचें मिष्टान्नाशिवाय चालत नाहीं; तिसऱ्यास खिचडीच हवी असते; चवथ्यास भाकरी वांचून चालत नसतें; पांचव्याचें तिखट मीठच वैद्यानें वर्ज केलेलें असतें. याप्रमाणें दहा-जणांचे दहा प्रकार असतात. पण आमच्या घरांत असा मोठा रगडा आहे कोठें? कोणताही पदार्थ करा म्हणून सांगणारे. आम्ही आणि खाणारेही आम्हीच. जर हिला एखादा पदार्थ खावासा वाटला तर हिणें काय तो करावयास सांगावा. अम्चें आई अनेक वेळां हिला सांगून चुकली आहे. हिलाच विचारा. असें सांगितलें आहे कीं नाहीं तें? बरें तुम्हीं नांवलौकिकाविषयीं म्हणतां; तर तेंही मला सयुक्तिक दिसत नाहीं. कारण एकत्र राहिल्यानें आपल्यास जर खरोखर सुख होत आहे, तर लोक आपल्या मनांत कांहींका समजेनात. आम्ही आईबापांच्याच अंगावर पडलों अहों असें लोकांनीं म्हटलें तर त्यांत अप्रतिष्ठा ती कोणती? आणि त्याबद्दल वाईट काय म्हणून वाटावें? आईबाप कांहीं कोणी परकी नाहींत. उलटे सर्व प्रकारें अम्हांवर त्यांचे उपकार आहेत. त्यांनीं आम्हांस लहानाचे मोठे केलें, अन्नवस्त्र पुरविलें, विद्या शिकाविली, दोन हातांचे चार हात केले; या सर्व प्रसंगीं आमची अप्रतिष्ठा झाली नाहीं, आणि आतांच आम्हीं त्यांच्याजवळ राहिलों तर त्यांत आमची अप्रतिष्ठा होईल म्हणतां हें कसें?

सासू—अहो, असे जर सगळेच लोक तुमच्याप्रमाणें धर्मराज असते, तर मग निराळे काय म्हणून होते? खरें म्हणाल तर मुलांनीं आईबापांपासून विभक्त रहावें हा एक सृष्टीचा नियमच आहे. आणि त्याप्रमाणें परंपरा चालत आली असून तुम्हांसही तींच पुढें चालविली पाहिजे; आणि मला वाटतें जगांत अशी एकही बायको नसेल कीं जिचा नवरा स्वतः कमावीत असून ती म्हणजे सासूनणंदांच्या कचाटींत खुशीनें राहूं इच्छील.

बुद्धिवंत—हें तुमचें म्हणणें मात्र कांहीं अंशीं खरें आहे. कारण जर मुलें आईबापांपासून निराळीं न होतीं तर आज गांवांत इतकीं घरें होतीं ना. तथापि माझ्या स्थितीच्या मानानें पाहतां मला जेवेराळें होणें अगदीं अयोग्य होय. कारण एक तर माझी कमाई म्हायती दहा रुपड्या; तेवढ्या कमाईवर स्वतंत्र बिऱ्हाड करून संसार चालविणें म्हटलें म्हणजे फारच कठीण. तशांत पाण्याच्यरचा बुडबुडा म्हणतात त्याप्रमाणें माझी हल्लींची चाकरी आहे. ती केव्हां जाईल याचा नेम नाहीं. ती गेल्यावर मग नकटें नाक घेऊन फिरून बापाच्या घरीं जाण्यांत मला मेल्यापेक्षांही अधिक वाईट वाटेल; आणि अशा प्रसंगीं मात्र माझी अप्रतिष्ठा व फजिती होण्याचा जास्त संभव आहे. कारण मग लोक म्हणतील कीं, हे लंबकर्ण मोठे शहाणे होऊन बापापासून निराळे झाले होते. पण शेवटीं पुनः उपासमर होऊं लागली तेव्हां मुठींत नाक धरून बापाचे पाय पुनः धरावयास आले. तेव्हां तुमचा हा गुरुमंत्र मला मुळींच हिताचा नाहीं. याविषयीं आपणास एक गोष्ट सांगतों. एका व्यापाऱ्यानें शहरांतील बाजारांत जाऊन आपल्या गांवीं जाऊन विकण्यासाठीं मीठ व कापूस खरेदी केला; आणि तीनें

खेंचराच्या पाठीवर लादून कापूस गाढवावर घातला. जातां जातां मार्गांत एक नदी आडवी आली. नदी तर पूर येऊन दोहों थडींनीं तुडुंब भरून चालली होती. असें असतां, त्या गृहस्थानें त्या जनावरांच्या पाठीवरचीं ओझीं न उतरतां त्यांला तसेंच पाण्यांतून चालविलें. नदीच्या मध्यभागीं गेल्यावर खेंचरानें पाण्यांत बुडी मारली आणि थोडया वेळानें डोकें वर केलें. तेव्हां गाढवानें त्यास विचारलें, "गडया, तूं असें काय केलेंस?" खेंचर बोलला, "दादा, काय सांगूं? तुझें नशिब मोठें चांगलें कीं, तुजवर कापूस भरला आहे. त्याचें तुला ओझें कसचें? मी पडलों फुटक्या नशिबाचा. ह्मणून माझ्या वांट्यास मीठ आलें. त्याच्या भारानें माझी कंबर मोडून गेली आहे. हा आमचा धनी असा पाषाणहृदय आहे कीं त्यास आमच्या मेहनतीचें कांहींच वाटत नाहीं. मन मानेल तसा आडवा तिडवा बोजा लादून देतो. मला असें वाटतें कीं, घरीं पोहोंचे पर्यंत माझ्या कमरेचे दोन तुकडे होऊन पडतील. तेव्हां पाण्यांत बुडी मारली ह्मणजे मीठ भिजून थोडेंसें विरघळून जाईल, आणि तेवढा भार तरी कमी होईल. याबद्दल धनी फार तर सात आठ दांडके जास्त लगावील. एरवीं तरी रस्ताभर दांडे खातच येत आहें. मग तेवढ्यांचीच काय बिशाद. पहा आतां माझें ओझें अर्धें कमी झालें आहे." हें ऐकून त्या मूर्ख गाढवाला वाटलें कीं, आपणही पाण्यांत डुबकी मारावी; आणि त्यानें ती लागलीच मारलीही. मग काय विचारतां! कापूस भिजल्याबरोबर पहिल्यापेक्षां दुप्पट जड झाला. मान वर करितो तों ती त्यास इकडून तिकडे हालवितां येईना. हें पाहून खेंचर हंसून ह्मणाला.

"काय, गाढव दादा, कसें काय वाटतें?" गाढवानें उत्तर दिलें, "गड्या, मी तर खरोखर मरतों बाबा." खेंचर बोलला, "अरे मूर्खा, मला तरी विचारायाचें होतें कीं नाहीं? तूं असा विचार केला नाहींस कीं, तुझ्या पाठीवर मीठ नसून कापूस होता." तेव्हां तात्पर्य काय कीं, ह्या गाढवाप्रमाणें लोकांचें पाहून मी वागूं लागलों तर माझी स्थिति त्याच्या प्रमाणेंच होईल.

सासू—ही तुमची शंका घालवितां आली नाहीं तरी मला ही गोष्ट स्पष्ट समजते आहे कीं, तुम्हीं दरमहा दहा रुपये कमावीत आहां; आणि ईश्वराच्या दयेनें आमच्या शहरीं दाण्यागोट्याची स्वस्ताई आहे. तशांत तुम्हांस मुलांलेंकरांचा कांहीं जंजाळ आहे असेंही नाहीं. तेव्हां तुम्हा नवराबायकोचें पोट खुशाल भरून कसा तरी बारीक मोठा कपडा नेसावयाला मिळेल. तुमच्यासारखे जर सर्वच पुढें काय होईल याची काळजी वाहूं लागतील तर जगाचा एवढा मोठा कारखाना आजच अगदीं बंद पडेल. अहो तुम्हीं चाकरीच्या शाश्वतीविषयीं काळजी वाहतां. पण आयुष्याचा तरी भरंवसा कोठें आहे? जो दिवस जातो तोच आपला असें समजून समाधानानें व आनंदानें रहावें. उगीच विवंचना करण्यांत काय अर्थ?

बुद्धिवंत—मला सुख निराळें राहिल्यानें जास्त मिळेल, कीं एकत्र राहिल्यानें मिळेल, याविषयींच मुळीं शंका आहे.

सासू—हा असा वितंडवाद करून काय फळ? सरळ गोष्ट कां नाहीं बोलत कीं, मला आईपासून निराळें होणें नाहीं. एक येवढीशी गोष्ट तुम्हांस तुमच्या बायकोनें विचारली तिचा निकाल करण्यास तुम्हांस इतके आढेवेढे घ्यावे लागले; आणि एकीकडून तर म्हणतां कीं, मी हिला कोणतेही गोष्टीविषयीं निराश किंवा निरु-

त्साह होऊं देत नाहीं. मनाजोगें वागणें म्हणजे काय कीं, ज्यांत नवराबायको एक मनानें व एक विचारानें चालतात.

येवढें बोलून ती हिरमुसल्यासारखी होऊन आळस टाकीत व जांभया देत स्वस्थ उगी बसली. तेव्हां बुद्धिवंतही कांहीं बोलेनासा झाला. मग रात्र फार झाली म्हणून त्यानें सासूस सांगितलें कीं, "आतां आपण जाऊन निजा. मी या गोष्टीविषयीं पुन्हा विचार करीन." नंतर सर्वजणें उठून निजावयास गेलीं. बुद्धिवंताच्या मनांत नाना विचार घोळत असल्यामुळें त्यास अवघी रात्र झोंप लागली नाहीं. पहांट झाल्याबरोबर उठून बाहेर येऊन पाहतो तों हिराबाई आंगणांत केर काढीत आहे. मेहुण्यास हिराबाईनें पाहतांच "कसें काय, ठीक आहे ना? रात्रीं झोंप चांगली लागली ना?" असें मोठ्या मंजुळ स्वरानें विचारलें आणि म्हणाली कीं, "आपणाला तोंड धुण्यास पडवींत ऊन पाणी ठेविलें आहे तें जाऊन घ्या."

बुद्धिवंत—इतके श्रम हिराबाई तुम्हीं उगीच घेतलेत; आतां मी उठून असाच घरीं जाणार होतों.

हिराबाई—थांबा, जाऊं नका. त्यांत श्रम कसले? तुमच्यासाठीं चहाही केव्हांचा तयार करून ठेविला आहे.

बुद्धिवंत—बरें आहे तर तुमच्या मर्जीप्रमाणें कां होईना.

हिराबाई—पण तुमचा स्वर कांहींसा घोगरा झाला आहे. कदाचित् पित्तामुळें असेल तर चहानें तो अधिक होईल.

बुद्धिवंत—नाहीं. पित्ताची व्यथाबिथा कांहीं नाहीं. रात्रौ सासूबाईंबरोबर बराच वेळपर्यंत बोलत बसल्यामुळें जरा जागरण झालें, म्हणून अंमळ त्रास झाला आहे.

नंतर शौचविधि व मुखमार्जन करून बुद्धिवंत दिवाणखान्यांत

आला. तेथें सासू तोंडधुणें वगैरे आटपून अगोदरच येऊन बसली होती. "तिला कसें काय, बरें आहेना"? असें विचारून तो एका खुर्चीवर जाऊन बसला. इकडे हिराबाईनें एक मोठा चौरंग आणून त्याच्यापुढें ठेविला, आणि त्यावर चहादाणी, एक प्यालाबशी, एक चमचा, आणि एका वाटींत थोडीशी साखर अशीं आणून ठेविलीं. बुद्धिवंत चहादाणींतून चहा ओतून प्याला. तो पितांच त्याचा जीव बराच शांत झाला. इकडे ताराबाई आपल्या नित्य क्रमाप्रमाणें बिछान्यावर घोरत पडली होती. बुद्धिवंतानें ती कोठें दिसली नाहीं असें पाहून सासूस ह्मटलें, "ती कोठें आहे? अजून उठली नाहीं कीं काय?

सासू—काय सांगूं? ती आपल्या मावशीची फार लाडकी आहे; आणि तिच्या लाडांमुळेंच तिला ह्या सर्व वाईट संवई जडल्या आहेत. ती लहान होती तेव्हां ह्या वाईट संवईबद्दल मीं तिला कधीं कधीं धमकावीत असें. असें केलें ह्मणजे मग ती मजशीं कित्येक दिवसपर्यंत मुळीं बोलत देखील नसे. तीं एक वेळ हट्टास पेटली ह्मणजे तिला हात लावण्याची कोणासही छाती होत नसे. एकाद्या क्षुल्लक गोष्टीवरून ती रागास चढे आणि हट्ट घेऊन बसे, आणि जें कांहीं हातास मिळे तें रागानें तोडून फोडून चकाचूर करून ठेवी. या भीतीमुळें तिला कोणी कांहीं बोलत नसे. या असल्या तिच्या स्वभावामुळें माझें आणि त्यांचें (नवऱ्याचें) कधीं कधीं भांडण देखील होई.

बुद्धिवंत—जळो तें राहूं द्या; दिवस फार आला. आतां घरीं जाण्यास आपली रजा असावी. तिकडे आई वाट पाहत बसली असेल.

सासू—बरें जा; पण रात्रीची गोष्ट ध्यानांत असूं द्या बरें. तशी कांहीं तरी व्यवस्था लवकरच करा ह्मणजे झालें.

प्रकरण चवथें.

निराळें रहाणें.

बुद्धिवंत तेथून निघाला तो सर्व रस्ताभर त्याच गोष्टीचा विचार करीत आला. घरीं पोंचल्यावर त्याच्या तोंडाकडे आईनें पाहिलें तों हा कसल्या तरी काळजींत आहे असें त्याच्या चर्येवरून तिला दिसून आलें. त्यावरून तिनें ताडलें कीं, सासुरवाडीस यानें कांहीं तरी भांडण तंटा केला असावा. म्हणून तिनें त्यास विचारलें:

"अरे बुद्धिवंता, शेवटीं माझें सांगणें न मानतां आपलें तैंच खरें केलेंसना?"

बुद्धिवंत—नाहीं आई; भांडणतंटा कांहीं केला नाहीं.

आई—तर मग बाळा तुझ्या तोंडावर इतकी ग्लानि कां दिसते?

बुद्धिवंत—ग्लानि कसची आई? निजलेलाच उठून आलों त्यामुळें कदाचित् तुला मीं उदाससा दिसतों असेन.

आई—अरे, निजून उठलेला मी कधीं तुला पाहिला नाहीं काय? काय झालें तें खरें सांग? तुला माझ्या गळ्याची शपथ आहे.

बुद्धिवंतानें निरुपाय होऊन रात्रीं सासूशीं झालेलें एकूणएक बोलणें आईस सांगितलें. आईनें तें सगळें ऐकिल्यावर तिच्या अंगाचा थरकांप होऊन सर्व अंगावर कांटा उभा राहिला, व ती

अगदीं फिक्की पडली. अशी तिच्या मनाची स्थिति झाली तरी ती मोठ्या खोल विचाराची बायको होती. त्यामुळें यत्किंचित्ही न डगमगतां ह्मणाली:

"माझी हा वेळपावेतों अशी इच्छा होती कीं, माझा जिवांत जीव आहे तोंपर्यंत तुह्मीं दोघां मुलांनीं माझ्यापासून दूर राहूं नये. तर तुह्मीं दोघे भाऊ रामलक्ष्मणासारखे एकमेकांच्या मानेवर मान घालून सुखानें मजपाशीं रहावें. पण हें कांहीं सगळेंच विपरीत दिसतें. मी तुला खचीत सांगतें कीं, तुझें लग्न झाल्यावर दुसऱ्या महिन्यापासूनच ऋव्यादाबाईच्या मनांतून निराळें बिऱ्हाड करावयाचें आलें आहे. तूं जे दहा रुपये आणून दरमहा मजजवळ देतोस ते तिच्यानें पाहवत नाहींत. तिच्या मैत्रिणी मला वेळोवेळां सांगतात कीं, तिच्या मनांतून गोंसाविपुऱ्यांत बिऱ्हाड घेऊन तेथें सटवायला घरकाम करण्यास ठेवावयाचें आहे. जेव्हां जेव्हां त्या मैत्रिणी एके ठिकाणीं जमतात तेव्हां याच गोष्टीची चर्चा त्यांच्यांत नेहमीं चालत असते. मी तुझ्या माऊस-सासूसही एक वेळ असें सांगितलें होतें कीं, जर ऋव्यादाबाईस आमच्याजवळ कुटुंबांत रहाणें आवडत नसेल तर खुशाल तिनें आपला संसार निराळा करावा. त्यास आमची बिलकुल आडकाठी नाहीं. मात्र तिनें या घरांतच निराळी चूल करावी. मला सोडून दूर कोठें जाऊं नये. पण तिजकडून मला कळलें कीं, ऋव्यादाबाईच्या मनास तेंही येत नाहीं. मनुष्य लग्न जें करितो तें केवळ आपल्यास सुख मिळावें ह्याकरितांच ना? पण तुझें लग्न झाल्यापासून हरहमेश भांडण करावें, पाहावें तेव्हां कपाळास आठ्या घालाव्या, असा प्रकार तुझ्या बायकोनें मांडला आहे. याकरितां जर तुझ्या

बायकोस निराळें रहाण्यामध्येंच सुख वाटत असेल तर त्यास माझी ना नाहीं. तुम्हीं कोठेंही रहा, पण सुखानें व आनंदानें नांदा म्हणजे मला पुरे आहे. ईश्वरानें आईच्या जिवाला वेडी माया लावून दिली आहे. म्हणून तुला माझें एवढेंच सांगणें आहे कीं, तुला फुरसत मिळेल तेव्हां मला भेटत मात्र जा. म्हणजे तेणेंकरून माझ्या जिवास कांहीं तरी समाधान होईल. आणि मीही तुला घरखटल्यांतून फुरसत मिळेल तेव्हां येऊन भेटून जात जाईन."

आईचें हें बोलणें ऐकून बुद्धिवंतास गहिंवर आला, व दुःखाचा इतका हुंदका आला कीं तो कांहीं केल्या आवरेना. त्याचप्रमाणें मुलगा जिवंत असून आपणास नसल्याप्रमाणें होणार हा विचार मनांत येऊन आईसही फार दुःख वाटून गहिंवर आला. नंतर कांहीं वेळानें बुद्धिवंत म्हणाला:

"ती पाहिजे तर निराळी राहो किंवा घरांतून निघून जावो; मी म्हणून कदापि निराळा रहाणार नाहीं."

आई—अरे, नवऱ्यानें आपल्या बायकोस सोडून आपण निराळें रहावें असें आजपर्यंत कोठें झालें आहे काय? तुला तर सर्व आयुष्य तिजबरोबर घालविणें आहे. माझें काय दहा गेले आणि पांच उरले; माझी आतां स्मशानाची वाट थोडी राहिली. माझी परवा तूं मुळींच करूं नको. ती सांगते त्याप्रमाणें कर. आम्हीं तर ज्या दिवशीं तुझें लग्न केलें त्याच दिवशीं तूं आम्हास अंतरलास असें समजलों. या दुनयेंत तूंच कायतो मुलगा आहेस आणि मीच तेवढी आई आहें असें नाहीं; जगांतील इतर मायलेंकरांचें नातें तेंच तुझें आणि माझें.

बुद्धिवंतानें या गोष्टीच्या संबंधानें आपल्या एका मित्राचा अभि-

प्राय विचारला. तेव्हां त्यानेंही याचप्रमाणें सल्ला दिला कीं, "भांडणाचा शेवट ज्या गोष्टीनें होत आहे तीच करणें शहाणपण होय; एके ठिकाणीं रहाण्यांतच काय आहे? आईस सोडून निराळें राहूनही तिच्या सेवेंत तत्पर रहातां येईल." दुसऱ्याही कित्येक ओळखीच्या गृहस्थांनीं याचप्रमाणें आपलें अनुमत दिलें. तेव्हां बुद्धिवंताचा विचार फिरला; आणि मनांत ह्मणाला, बरें कांहीं दिवस निराळें राहून पाहूं. कदाचित् असें केल्यानें जर ही बायको सुधारेल आणि घरसंसारांत दक्ष राहून वाईट चाली, हट्टी स्वभाव व दांडगटपणाचें बोलणें चालणें वगैरे सोडून देईल, तर निराळें रहाण्यापासून आपला फायदाच होईल. निराळें राहिल्यानें तिला घरसंसाराची काळजी वहावी लागेल, इतकेंच नव्हे तर आदा पाहून खर्च कसा करावा हेंही तिला समजेल. आतां संसाराची काळजी पाहिली तर ती ह्मणजे कोणास सुटली आहे असें नाहीं. पण हा संसाराचा भार तिच्या शिरीं आल्यानें मी या दररोज होणाऱ्या कलहांतून तरी सुटेन. आतां दहा रुपयांत गुजारा कसा होईल ही काळजी करणें व्यर्थ होय. कारण ईश्वरानें जितकें नेमिलें आहे तितकेंच आपणास मिळावयाचें. मनुष्यानें हजारों यत्न केले ह्मणून काय होणार आहे? असा विचार करून बुद्धिवंतानें वेगळें रहाण्याचा निश्चय केला. आणि आईच्या घराजवळच एक लहानसें बैठें घर रिकामें झालें होतें तें दरमहा एक रुपया भाडें ठरवून घेतलें; आणि घरधन्यास भाडेचिठ्ठी लिहून देऊन दरवाजास आपलें कुलूप लाविलें; आणि सासुरवाडीस बायकोला सांगून पाठविलें कीं, नवीन बिऱ्हाड घेतलें आहे तेव्हां आतां तरी येण्याची मर्जी असेल तर यावें, ह्मणजे चांगला दिवस पाहून

नवीन बिऱ्हाडांत जाऊन राहूं. इकडे त्यानें आईसही सांगितलें कीं, मी शेजारचें ढमढेऱ्यांचें घर भाड्यानें घेतलें आहे. तेव्हां आईनें ऋव्यादाबाईची कपड्यांची पेटी, कांहीं भांडीं कुंडीं, पलंग, बिछाना इत्यादि जें कांहीं सामान त्यांस लागण्यासारखें होतें तें सर्व निराळें काढून एका खोलींत भरून ठेविलें. निरोप पोंचला त्या दिवशीं संध्याकाळीं ऋव्यादाबाई सासरीं आली. दुसऱ्या दिवशीं सकाळीं उठल्यावर आईनें सामानाच्या खोलीचें दार उघडून बुद्धिवंतास म्हटलें :

"बाळा, तुम्हांस लागणारें सामानसुमान ह्या खोलींत ठेविलें आहे, तें पाहून घ्या; आणि तुमचें स्वतांचें कांहीं सामान अजून राहिल्यास सांगा. मी तें बिनहरकत तुमच्या स्वाधीन करीन."

बुद्धिवंत—आई, हें तूं काय म्हणतेस?

आई—बाळा, तुझ्या बायकोच्या माहेरून आणलेल्या सामानापैकीं एकादी वस्तू कोठें राहिली असेल म्हणून असें म्हणतें. कोण ग आहे तिथें, ठके, जा त्या शेजारच्या रमाबाईला बोलावून आण; आणि तुम्ही दोघीजणी मिळून हें समान ढमढेऱ्यांच्या घरीं पोहोंचतें करा.

इतक्यांत ताराबाईच्या मैत्रिणी सटवाय, गंगी, साळू, या घारीसारख्या तेथें येऊन पोंचल्या; आणि हां हां म्हणतां त्यांनीं तें सर्व सामान नव्या घरांत नेलें. ऋव्यादाबाई मोठ्या हौसेनें नवीन बिऱ्हाडांत गेली. तेथें गेल्यावर तीन दिवस पर्यंत सांजसकाळ बुद्धिवंताच्या आईनें त्यास जेवण पोंचतें केलें. चौथे दिवशीं बुद्धिवंत आपल्या बायकोस म्हणाला :

"अग आज आपणास येथें येऊन तीन दिवस झाले. तेव्हां नवीन बिव्हाडांत आल्यासारखी आज तरी चूल पेटीव ?

ऋव्यादा०—अहो, अझून सर्व सामान अस्ताव्यस्त पडलेलें आहे. तें तुह्मांस दिसत नाहीं का ? तें ठिकाणावर लागलें ह्मणजे मग फुरसतीनें चूल पेटवतां येईल; घाई कशाला ? सध्यां तर मला हें ठिकाणावर लागल्याशिवाय डोकें वर करितां येणार नाहीं.

याप्रमाणें आणखी चार दिवस कधीं आईकडून जेवण आणून व कधीं बाजारांतून फराळाचें आणून त्यावर दोघांनीं निर्वाह केला. शेवटीं पाठीस लाग लागून बुद्धिवंतानें ऋव्यादा-बाईकडून जेवण करण्याचा एकदांचा मुहूर्त करविला. ऋव्यादा-बाईस आजन्मांत कधीं रांधण्याचा कसा तो प्रसंग आला नव्हता. त्यामुळें पहिल्या दिवशीं तिनें भाकरी केल्या त्या काय विचारतां ? धड ना गोल कीं चौकोनी, एक कोन उत्तरेस तर दुसरा पूर्वेस, कांठावर जाड तर मध्यें पातळ, भाजली तीही कोठें कच्ची तर कोठें अगदीं करपलेली, जाळ कमी झाल्यामुळें एकादी तव्यास चिकटून ती परतीत असतां तिचे तुकडे झालेले, आणि त्या शेकतेवेळीं राखेंत अगदीं मारवून गेलेल्या ! भात शिजविला त्यांतही तीन तऱ्हा, ह्मणजे बुडाशीं करपून गेलेला, मध्यें मऊ व वरती कच्चा ! वरण केलें तेंही तसेंच, डाळ निराळी व पाणी निराळें. आंबटी केली तिला तर मुळींं चवच नव्हती. एकादा पदार्थ मीठ घालून अगदीं खारट केला तर दुसरा अगदीं अळणी. याप्रमाणें बुद्धिवंतानें चार आठ दिवस जेम तेम काढले. पुढें बायकोच्या हातून धड जेवण मिळण्याची आशा नाहींसें पाहून तो पुनः आईच्या घरीं जाऊन जेऊं लागला. इकडे ताराबाईनेंही आपल्या जेवणाची अशी व्यवस्था लाविली कीं,

दोन्ही वेळां बाजारच्या पुऱ्या, बासुंदि, भजीं इत्यादि फराळाचें मागवून ती खाई आणि घरांत जें कांहीं ती शिजवी तें सटवाय वगैरे तिच्या मैत्रिणींस खाऊं घाली. यांत त्या तिच्या मैत्रिणींची मात्र चंगळ उडे खरी. पण दहा रुपड्यांच्या पगारांत ही अशी उधळपट्टी चालली कशी, याविषयीं वाचकांच्या मनांत सहज संशय आला असेल. तर हा असा खर्च चालण्याकरितां ऋव्यादाबाई नवऱ्यास न कळतां घरांतील थोड थोडें सामान विकून टाकीत असे. एके दिवशीं असें झालें कीं, बुद्धिवंत नेहमींप्रमाणें चाकरीवर गेला असून ऋव्यादाबाई ही आपल्या नित्यक्रमाप्रमाणें दोन प्रहरची निजली होती. अशा वेळीं तिची मैत्रीण साळू हिनें आपल्या मैत्रिणीस गाढ झोंप लागली आहे असें पाहून तिच्या घरांतील सामान पळविण्यासाठीं आपला भाऊ खंड्या यास बोलावून आणिलें. हा खंड्या अट्टल चोर होता. त्यानें ती उठण्यापूर्वीं सर्व भांडींकुडीं व घरांत सांपडलें तितकें सामान पसार केलें. ऋव्यादाबाई उठून पाहते तों घर जिकडे तिकडे लख्ख! कुलूप मारलेल्या खोलींत जेवढें सामान होतें तेवढें मात्र राहिलें. बाकी एकूनएक नाहींसें झालें. पाणी पिण्यास लोटी सुद्धां उरली नाहीं! बुद्धिवंत चाकरीवरून आल्यावर हें पाहून फार कष्टी झाला; आणि तिला पुष्कळ बोलला. पण बापडा करतो काय? त्रासून संतापून उगाच बसला. दुसरे दिवशीं त्यानें कोणाचें थोडेंसें कर्ज काढून दोन हलक्याशा पातेल्या विकत आणिल्या, आणि दुसरीं कांहीं लहानमोठीं भांडीं त्यानें आईजवळून मागून आणलीं. तवा, कढई वगैरे कांहीं जिनसा सासूनें पाठवून दिल्या. असें करितां करितां जेमतेम पुनः एकदां संसार जमला.

ह्या संधीस त्या शहरांत एक चेटकी बाई आली होती.

तिनें नानाप्रकारचीं मिषें करून लोकांस लुटण्याचा सपाटा चालविला होता. तिच्यामुळें सारें पुणें शहर अगदीं खळबळून गेलें होतें. बुद्धिवंतानें या बाईची हकीकत आपल्या बायकोस सांगून ताकीद केली होती कीं कोणत्याही परक्या स्त्रियेस घरांत मुळींच घेऊं नको. इतकें नवऱ्यानें बजावून सांगितलें असतांही ऋग्यादाबाईनें काय मौज केली ती पहा. ती मुळापासून अगदीं वेडगळ होती. कोणत्याही परक्या माणसाबरोबर तिचें एक दोन वेळ भाषण झालें म्हणजे तेवढ्यावरून त्या मनुष्यावर सारा विश्वास टाकावयाचा, असा तिचा स्वभाव होता. एके दिवशीं अर्से झालें कीं, ती चेटकीण वैरागिणीचा वेष घेऊन ऋग्यादाबाई स्नात असे त्या बोळांत आली. ती चेटकीण मूर्ख बायकांस फसविण्यासाठीं नानाप्रकारच्या औषधी व प्रासादिक वस्तू आपल्याजवळ ठेवीत असे. त्यांत मुख्यत्वेंकरून पंढरीचा अबीर, काशीच्या पांच साहा जातींचा पेढे वगैरे प्रसाद, आळंदींत ज्ञानोबानें चालविलेल्या भिंतीची माती, रामेश्वराचें तीर्थ, द्वारकेची पिंजर याप्रमाणें निरनिराळ्या तीर्थांच्या ठिकाणच्या प्रासादिक वस्तूंचा संग्रह तिजजवळ मोठा असे. तिनें बोळाच्या नाक्याशीं एक चांगलीशी जागा पाहून तेथें आपल्या बटवींतील सर्व वस्तूंचा बाजार मांडला न मांडला तों असपासचीं पांचपन्नास पोरें तिच्या सभोंवतीं जमा झालीं. ऋग्यादाबाईला ही बातमी लागतांच तिनें सठवायला सांगून ठेविलें कीं, जेव्हां ती बैरागीण नाक्यावरून उठून जावयास लागेल तेव्हां तिला इकडे बोलावून आण, म्हणजे मी तिजपासून कांहीं प्रसाद घेईन. त्याप्रमाणें बैरागीण जाण्याच्या सुमारास सठवाय धांवत जाऊन तिच्या-

जवळ उभी राहिली, आणि जेव्हां ती आपला बाजार आटपून जाऊं लागली तेव्हां तिला ऋव्यादाबाईकडे घेऊन आली. ऋव्यादाबाईनें तिचें मोठ्या प्रेमानें आगतस्वागत करून तिला आपल्याजवळ पाटावर बसविलें, आणि तिच्या जवळच्या एकूणएक वस्तू निरखून पाहिल्या. मग त्यांतून पंढरीचा अबीरबुक्का व द्वारकेची पिंजर अशा दोन वस्तू तिनें पसंत केल्या. तेवढ्यावरून त्या चेटकिणीनें ताडलें कीं, ही बायको थोड्याशा युक्तीनें सहज फसणारी दिसते. ह्मणून तिनें एका पैशाचा पुष्कळसा अबीरबुक्का तोलून दिला, आणि दोन आण्यांची पांचसहा तोळे पिंजर दिली, आणि मुंबईची एक नकली आंगठी तिला आपल्या आठवणी दाखल बक्षीस दिली. हें औदार्य पाहून ऋव्यादाबाई अगदीं मोहून गेली. नंतर कांहीं वेळ त्या बैरागिणीनें समुद्रांतील प्रवासाची मौज, सेतुबंध रामेश्वराच्या गोष्टी आणि दुसरे दोनचार गमतीचे चुटके असे तिखटमीठ लावून रचून सांगितले कीं, ते ऐकून ऋव्यादाबाईला त्या बैरागिणीचें अगदीं वेड लागून गेलें. मग बैरागिणीनें विचारलें:

"बाई, आपल्यास कांहीं मूलबाळ आहे काय?"

ऋव्यादा०—(खालीं मान घालून व खिन्न होऊन) आमची बाई तशी पुण्याई आहे कोठें?

वैरागीण—बरें मुली, लग्न होऊन तरी कितीसे दिवस झाले?

ऋव्यादा०—येत्या शिमग्यांत एक वर्ष होईल.

हें ऐकून तर ऋव्यादाबाईच्या पोरस्वभावाविषयीं बैरागिणीची अगदीं खात्रीच झाली; आणि ती मनांत म्हणाली कीं, मुलाचें नांव काढतांच हिणें एवढा मोठा सुसकारा टाकला यावरून हिला न्हाण येऊन जणूंकाय कित्येक वर्षें झालीं आहेत, आणि अजून

हिला मूल होत नाहीं असें वाटत असावें. ह्मणून उघडपणें म्हणते:

"मुली, यांत कांहीं निराश होण्यासारखी गोष्ट नाहीं, कारण तुझे मूल होण्याचे दिवस अजून पुढेंच आहेत. तुला इतकीं मुलें होतीलसें मी करीन कीं तुला तीं सांभाळण्याची सुद्धां पंचाईत पडेल. पण सध्यां हें खरें आहे कीं, एवढ्या मोठ्या घरांत सारा दिवस तूं एकटी असल्यामुळें कदाचित् तें तुला उदास वाणें वाटत असेल. बरें मुली, नवऱ्याचें तरी सुख कसें काय आहे?"

ऋव्यादा०—(पुनः खिन्न होऊन) ते तर सदा मजवर रागावलेले असतात. तें बाई कांहीं सांगण्याची सोय नाहीं.

याप्रमाणें ऋव्यादाबाईनें पहिल्याच भेटीला घरची बारीक सारीक हकीकत मोकळ्या मनानें त्या बैरागिणीला सांगितली; आणि शेवटीं ती निरोप घेऊं लागली तेव्हां ऋव्यादाबाई मोठ्या नम्रतेनें तिला ह्मणाली:

"बरें आतां या, पण आपलें दर्शन पुन्हां कधीं होईल?

बैरागीण—काय सांगूं मुली, माझी कीं नाहीं एक भाची एथें काळेवावरांत रहात असते. तिला बेरं वाटत नाहीं, ह्मणून तिच्या समाचाराकरितां मी दिल्लीहून एथें आलें आहें. तिला मेलें औषधपाणी करतां करतां व शेकतां भाजतां मला मुळींच फुरसत मिळत नाहीं. असें आहे तरी दोन चार दिवसांनीं तरी एकदां तुझा क्षेमसमाचार घेत जाईन.

यावर एक दिवस देखील गेला नाहीं तोंच दुसरे दिवशीं ती बैरागीण एक बऱ्हाणपुरी जरीकांठी खण खांद्यावर टाकून आली. ऋव्या-

दाबाई ती दुरून येत आहे असें पाहून मनांत फार आनंद पावली; आणि ती जवळ येतांक्षणींच तिनें तिला विचारलें:

"हा खण कोठून आणला?

बैरागीण—हा कीं नाहीं एकीनें विकण्याकरितां मजजवळ दिला आहे.

क्रव्यादा०—हा कोठपर्यंत विकण्यास सांगितला आहे?

बैरागीण—कोठपर्यंत काय, फार झालें तर मेली चार आणे घेईल, आणखी तें तिला काय मिळणार? बाई एक कीं नाहीं तुझ्यासारखी मोठी श्रीमंताची मुलगी सदाशीव पेठेंत रहाते. पण सध्यां ती अगदीं कंगाल दशेस येऊन पोंचली आहे. काय करील बापडी! अब्रूसाठीं अंगावरचें थोडथोडें किडुकमिडुक विकून चरितार्थ चालविते. मीं कीं नाहीं तिच्या अशा पुष्कळ वस्तू विकून दिल्या आहेत.

जरीकांठी खण इतका स्वस्त मिळतो हें पाहून क्रव्यादाबाईच्या तोंडास पाणी सुटलें, आणि तिनें लगेच चार आण्याचे पैसे काढून बैरागिणीच्या हातावर ठेवले आणि ती तिला म्हणाली:

"या नंतर पुढें जें जें कांहीं ती बाई विकावयास देईल, तें तें सर्वांच्या अगोदर मला आणून दाखवीत जा.

बैरागीण—बरें आहे मुली, अगोदर तुला दाखवून मग दुसऱ्यास दाखवीन. माझें काय गेलें यांत?

नंतर कांहीं वेळ इकडच्यातिकडच्या गोष्टी झाल्यावर त्या बैरागिणीनें आपल्या बटवींतून एक चंची काढली. तीमध्यें कपड्यांत गुंडाळलेल्या कांहीं कागदाच्या पुडया होत्या. त्यांपैकीं ज्या

पुर्डींत लवंगा होत्या तीं उघडून त्यांतील दोन लवंगा तिनें ऋष्यादा-बाईला दिल्या, आणि ती ह्मणाली :

" मुली, या जगांत ईश्वरानें प्रीति एवढ्याचकरितां उत्पन्न केली आहे कीं, तिजपासून एकमेकांस फायदा व्हावा. ह्या ज्या दोन लवंगा मीं तुला आतां दिल्या आहेत त्यांपैकीं एक तूं आपल्या अंबाडयांत खोव, आणि दुसरी तुझ्या नवऱ्याच्या पागोट्यांत ठेव. कदाचित् त्यास संशय येईल तर त्याच्या बिछान्यावरील उशींत घालून ती शिवून टाक ह्मणजे झालें. हा तोडगा कसा काय आहे याचा आजच्च तुला प्रत्यय कळून येईल. पण स्वच्छ व निर्मळ रहाण्याविषयीं मात्र फार जप. आतां तुझ्या उंची बरोबर एक सूत मला मापून दे, ह्मणजे त्याची दोरी करून तींत एक ताईत घालून तुला आणून देईन. मी कीं नाहीं सेतु-बंध रामेश्वराच्या यात्रेस गेलें होतें, तेव्हां आमच्या जहाजांत काश्मी-रची राणी होती. कदाचित् तुला तिचें नांव ऐकून ठाऊक असेल. मैनावती त्यांचें नांव होतें. ईश्वरानें कोणत्याही गोष्टीविषयीं ह्मणजे त्यानां उणें केलें होतें असें नाहीं. धनदौलतीस तर पारा-वार नव्हता. नोकर चाकर, दास दासी, हत्ती घोडे, मेणे पालख्या वगैरे सर्व कांहीं उदंड होतें. राणीच त्या, मग त्यांनां काय कमी आहे! मात्र पोटीं संतान नव्हतें येवढ्याचकरितां त्या नेहमीं फार दुःखी व उदास असत. त्यांच्या पतिमहाराजांचेंही त्यांच्यावर पूर्वी-प्रमाणें प्रेम नव्हतें. याचें कारण तरी पोटीं पुत्रसंतान नव्हतें हेंच होतें; नाहीं तर राणीसाहेब ह्मटल्या ह्मणजे सौंदर्याची व सद्गुणांची केवळ खाण होत्या. असें सौंदर्य व धनदौलत असतांहीं त्या इतक्या साध्या स्वभावाच्या होत्या कीं, त्या आमच्यासारख्या

यःकश्चित् मनुष्यासही जवळ बसवून त्याच्याशीं त्या मोठ्या सलगीनें बोलत चालत. या राणीचा साधुसंतांवर फारच विश्वास असे. एक वेळ त्यानां असें वर्तमान कळलें कीं, काश्मिरापासून तीन कोसांवर एक मोठा अवलिया साधु आलेला आहे. हें ऐकतांच काळोख्या रात्रीस आपल्या महालांतून बाहेर पडून पायींच त्याजकडे त्या गेल्या. आणि तो ध्यानस्थ होता ह्मणून एक प्रहरपर्यंत त्याजपुढें हात जोडून उभ्या राहिल्या. नंतर त्या ह्मणाल्या, "साधुमहाराज, मी ही गरीब स्त्री आपणास दंडवत करित आहें." हे शब्द ऐकतांच त्या साधूनें डोळे उघडून तिच्याकडे पाहिलें, आणि "सौभाग्यवती भव" असा आशीर्वाद देऊन तो तिला ह्मणाला, "मातोश्री, जा पौर्णिमेच्या रात्रीं तुला दृष्टांत होईल त्याप्रमाणें कर, ह्मणजे ईश्वर तुझा हेतु पूर्ण करील."

पुढें पौर्णिमेच्या रात्रीं राणीस दृष्टांत झाला कीं, "तूं रामेश्वराच्या यात्रेस जा. ह्मणजे तुझी मनःकामना पूर्ण होईल. राणी सकाळीं उठल्याबरोबर दृष्टांताप्रमाणें रामेश्वरास जाण्याच्या तयारीस लागली; व ज्यांस रामेश्वराच्या यात्रेस जाण्याची इच्छा होती अशा सुमारें पांचशें गरीब लोकांस आपल्या खर्चानें घेऊन निघाली. त्यांपैकींच मी एक होतें. पुढें राणीचा व माझा परिचय होऊन त्यांचा मजवर इतका विश्वास बसला कीं त्या मला एक क्षणभरही विसंबत नसत. ईश्वर त्यांचें कल्याण करो. आह्मी निघाल्यावर बऱ्याच दिवसांनीं द्वारकेस पोंचून तेथें कांहीं दिवस मुक्काम केला, आणि पुढें जाण्यासाठीं जहाजांत बसलों. आमचें जहाज हांकारल्यावर सुमारें एकसारखी पंधरा दिवस आह्मांस जमीन कशी ती दिसली नाहीं. सोळावे दिवशीं सकाळीं आह्मी उठून हातों तों आमच्यासमोर त्या अफाट समुद्रांत एक डोंगरासारखी

उंचवट्याची जमीन दिसूं लागली. तेव्हां आह्मीं जहाजावरील तांडेलास हें काय दिसतें ह्मणून विचारिलें. त्यानें सांगितलें कीं, जेव्हां राम सीतेस आणण्याच्या हेतूनें लंकेस जाऊं लागला तेव्हां मार्गांत समुद्र लागला. त्याच्या पैलतिरीं जाण्याकरितां त्यानें एक सेतु बांधविला. हा सेतु बांधण्यासाठीं वानरसैन्याकडून ज्या पर्वतावरील दगड आणविले तोच हा होय. ह्यास द्रोणाद्रि ह्मणतात. ह्यापर्वतावर आज पुष्कळ वर्षें एक अवलिया गोसावी रहात आहे. त्याजवळ जो गेला त्याचे ह्मणजे मनोरथ शेवटास गेले नाहींत असें कधींच झालें नाहीं." हें ऐकून आमच्या राणी साहेबांनीं सांगितलें कीं, "कसेंही करून मला त्या डोंगरावर घेऊन चला." तेव्हां तांडेलानें सांगितलें कीं, "मां साहेब, तिकडे जहाज जाण्यासारखें नाहीं; पण जर आपली आज्ञा होईल तर जहाज येथेंच नांगरून आपणास लहानशा मचव्यांत बसवून तेथें घेऊन जातों." त्यावर राणीनें सांगितलें कीं, "ठीक आहे, तसें करा." तेव्हां मी व आणखी चार जणी, राणीबरोबर त्या पर्वतावर गेलों. तेथें जाऊन पोंचल्यावर आह्मांस जिकडे तिकडे सुवास येऊं लागला. जातां जातां शेवटीं साधूच्या आश्रमापर्यंत जाऊन पोंचलों. तेथें आह्मांस कोणीही मनुष्य दिसला नाहीं. काय तो एकटा साधू तेवढाच त्या पर्वताच्या एका उंच शिखरावरील गुहेमध्यें आश्रम करून राहिला होता. काय त्याचें तेज सांगावें! तो इतका ह्मातारा झाला होता तरी पंधरा वर्षांच्या ऐन उमेदींतील पुरुषाप्रमाणें तेजस्वी दिसे. त्यानें आह्मांस आशीर्वाद दिला व राणीसाहेबांस बारा लवंगा कांहीं मंत्र उच्चारून व फुंक मारून दिल्या; आणि त्या अवलियानें मला ही आशीर्वाद दिला कीं, "तुझे हातून पुणें व दिल्ली येथील लोकांचें कल्याण कर."

ह्या ज्या दोन लवंगा मीं तुला दिल्या आहेत त्या, त्या राणीला त्यानें दिलेल्या वारा लवंगांपैकीं होत. पुढें रामेश्वराची यात्रा करून आम्ही माघाऱ्या फिरलों तों इकडे काश्मीरचे महाराज आपल्या राणीस नेण्याकरितां मुंबईस येऊन एक महिना वाट पाहत राहिले होते. शेवटीं आमचें जहाज मुंबईच्या बंदरांत येऊन दाखल झालें; आणि राणीची आणि महाराजांची भेट होतांच त्यांनीं आपला मुगुट काढून त्यांच्या पायांवर ठेविला, आणि आपल्या हातून घडलेल्या सर्व अपराधांची त्यांच्यापाशीं क्षमा मागितली. पुढें आम्ही सर्व जणें मुंबईहून निघून काश्मिरास जाऊन पोंचलों. या नंतर मी सहा वर्षें काश्मिरांत राहिलें. तेवढ्या मुदतींत ईश्वरकृपेनें व त्या साधूच्या आशीर्वादानें राणी साहेबांस चार पुत्ररत्नें झालीं. नंतर आपल्या जन्मभूमीस परत यावें असें माझ्या मनांत येऊन मी राणीसरकाराजवळ रजा मागितली, तेव्हां त्यांनीं पुष्कळ हरकत घेतली. पण मीं सांगितलें कीं, साधुमहाराजांनीं मजकडे पुणें व दिल्ली येथील लोकांचें कल्याण करण्याचें काम सोंपलें आहे. तेव्हां मला तिकडे गेलें पाहिजे; नाहीं तर सत्पुरुषाचा बोल लागेल. हें राणीनें ऐकतांच तिला त्या गोष्टीची आठवण झाली आणि निरुपाय होऊन मला तिनें निरोप दिला. निघतांना मला त्यांनीं पुष्कळ देणगी देऊन माझा बहुमान केला, आणि दोन सांडणीस्वार मजबरोबर देऊन मला दिल्लीस पोंचती केली."

प्रकरण पांचवें.

विभक्त राहिल्यानें संसाराचा नाश आणि पश्चात्ताप.

मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें सुमारें दोन घटका त्या वैरागिणीनें तिखट मीठ लावून सांगितलेली गोष्ट ऐकून व शेवटीं तिनें त्या लवंगा दिल्यावरून तिच्यावर ऋव्यादाबाईचा पूर्ण विश्वास जडला. लवंगा दिल्यावर ती वैरागीण निघून गेली. ती गेल्यावर ऋव्यादाबाई न्हाऊन धुऊन व वेणीफणी करून स्वच्छ चोळी लुगडें नेसली; आणि त्या दोन लवंगांपैकीं एक लवंग जगदंबेचें नांव घेऊन तिनें आपल्या बुचड्यांत खुपसून ठेविली, आणि दुसरी आपल्या नवऱ्याच्या पलंगावरील उशींत अडकवून ठेविली. संध्याकाळीं बुद्धिवंत चाकरीवरून आल्यावर बायकोकडे पाहतो तों ती नीट सजून तयार झाली आहे, आणि घरांतील एकंदर चीजवस्त जेथल्या तेथें ठेवून जिकडे तिकडे झाडलोट करून स्वच्छ केलें आहे, असें पाहून तो फार खुष झाला, व तिजबरोबर मोठ्या प्रीतीनें भाषण करूं लागला.

ऋव्यादा०—पाहा, मी एक जरीचा चोळखण आज विकत घेतला आहे (असें ह्मणून तो ती आणून दाखविते.)

बुद्धिवंत—केवढ्याला घेतलास हा?

ऋव्यादा०—तुम्हीच सांगा पाहूं केवढ्यास घ्यावा तो?

बुद्धिवंत—खण तर बऱ्हाणपुरी किंवा अहमदाबादी असावा. कारण याचें सूत व खुमास फार नाजूक दिसते. याला कमींतकमी तीन चार रुपये तरी पडले असतील.

ऋव्यादा०—काय तीन चार रुपये! मी तर हा चार आण्यांस घेतला!

बुद्धिवंत—काय ह्मणतेस? चार आण्यांला?

ऋव्यादा०—तुमच्या गळ्याची शपथ. मीं यास चारच आणे दिले.

बुद्धिवंत—खरेंच का? तर मग हा तुला खरोखर फारच स्वस्त मिळाला. पण हा इतका स्वस्त मिळाला कसा?

ऋव्यादा०—एक बैरागीण कीं नाहीं फार विश्वासू आहे. ती आज कित्येक दिवसपर्यंत या पेठेंत येत असते. कोणी आमच्यासारख्या खात्यापित्या श्रीमंताच्या मुली दुर्दैवानें गरीब स्थितीस आलेल्या आहेत. त्यांच्या कांहीं वस्तु कधीं कधीं ती विकावयास आणते. (असें ह्मणून अबीर, बुका, पिंजर व आंगठी या वस्तु नवऱ्यास दाखविते.)

लोभ हा फार वाईट आहे. मनुष्य कितीही शहाणा व चतुर असला तरी तो लोभामुळें अगदीं बुद्धिहीन होऊन जातो. मैना, पोपट, बुलबुल आदिकरून वनांतील पक्षी मनुष्यास पाहतांच भिऊन पळून जातात. परंतु तेच धान्याच्या लोभानें फसून जाळ्यांत सांपडतात, आणि प्राणास मुकतात, किंवा आमरण पिंजऱ्यामध्यें अडकून रहातात. मनुष्याचीही गत अशीच आहे. आशेच्या व लोभाच्या जाळ्यांत सांपडून गांगरून फसला नाहीं असा मनुष्य फारच विरळा. आशा व लोभ यांची मोहनीच मुळीं विलक्षण आहे. तिच्या पुढें मोठमोठ्या विरक्त व शहाणे ह्मणाविणा-

ज्यांची मति गुंग होते. मग बिचाऱ्या बुद्धिवंताचा काय पाड? तो आपला स्वार्थ पाहून फार खुष झाला.

ऋव्यादा०—ती बैरागिण याउपर त्या श्रीमंताच्या मुलीचें जें जें सामान विकावयास आणील, तें तें पहिल्यानें मला दाखविण्याचा करार करून गेली आहे.

बुद्धिवंत—पण ती चोरीविरीचा माल आणून विकीत असेल हो! याविषयीं मात्र सावधगिरी ठेव; नाहींतर विनाकारण आह्मांस तिजबरोबर चावडीवर जावें लागेल. याखेरीज आणखी ती बैरागीण चेटकीण किंवा लुच्ची भामटी वगैरे असेल. याकरितां तिच्याशीं फार जपून वागलें पाहिजे.

ऋव्यादा०—भलतेंच! मला नाहीं वाटत ती बैरागीण भामटी असेलशी.

ह्याप्रमाणें बुद्धिवंतावरोवर या अशा प्रीतीच्या गोष्टी झाल्यावरून तर ऋव्यादाबाईचा त्या लवंगांवर दृढ विश्वास बसला. दुसरे दिवशीं सठवायला पाठवून त्या बैरागिणीला नाक्यावरून बोलावून आणलें. ती आल्यावर त्या दोघींच्या थोडा वेळ इकडच्या तिकडच्या सुखदुःखाच्या गोष्टी झाल्या. संध्याकाळीं बुद्धिवंत घरीं आला तेव्हां पुन्हा त्या बैरागिणीविषयीं गोष्टी निघाल्या. तेव्हां बुद्धिवंतानें पुनः आपल्या बायकोस सांगितलें कीं, तिजविषयीं फार सावध रहा. अशा वेषानें आजकाल पुष्कळ भामट्या बायका शहरांत हिंडत आहेत. पण लोभानें बुद्धिवंताची बुद्धि फारच गुंग झाली होती. वास्तविक पाहतां तीन चार रुपयांची वस्तु कोणी झालें तरी चार आण्यांस कशी देईल? असा विचार त्याच्या मनांत यावयास हवा होता; आणि त्यानें त्या बैरागिणीस पुनः दारीं उभी न करण्याविषयीं आपल्या बाय-

कोस सांगून तिनें दिलेल्या सर्व वस्तू तिला परत देवविल्या पाहिजे होत्या. ऋव्यादाबाई पाहावी तर तिला स्वतांची अक्कल तेवढीच होती. तेव्हां तिला हा विचार सुचतो कशास? पुढें कांहीं दिवस लोटल्यावर एके दिवशीं तिच्या घरीं ती बैरागीण आली असतां ती तीस विचारते :

"कांहो आजीबाई, आतांशा त्या बाईचें कांहीं विकावयाकरितां तुह्मी आणीत नाहींत त्या?"

बैरागीण मनांत समजली कीं, या बाईला फार लोभ सुटला आहे. मग उघडपणें ह्मणतें.

"तुमच्या लायक कांहीं वस्तू निघाल्या ह्मणजे अगत्यपूर्वक आणीन. मला आपण सांगितल्याची पक्की आठवण आहे. पण उगाच लहानसान किंवा फुटक्या तुटक्या वस्तू कशाला आणूं?"

पुढें दोन चार दिवस गेल्यावर एके दिवशीं ती खोट्या मोत्यांची एक जोडी घेऊन ऋव्यादाबाईकडे आली आणि ह्मणाली :

"मुली, ही पाहा मोत्यांची जोडी तुजकरितां आणिली आहे. ही त्या बाईच्या नथीच्या आडवटांतील मोत्यें आहेत. ही जोडी निदान पांचशांची तरी आहे. गंभीरमल्लाच्या पेढीवर गेलें होतें. त्यानें तर ही जोडी पाहून तोंडांत बोट घातलें, व माझ्या हातावर दोनशें रुपये रोख ठेवूं लागला. पण मी त्यास ती विकली नाहीं. कारण मला तुमच्या सांगणीची आठवण होती. मी तर त्या बाईला पन्नास रुपये येतील असें सांगून ही आणली आहे. तुह्मीं ठेवीत असाल तर ठेवा. अशी वस्तू पुनः मिळावयाची नाहीं."

ऋव्यादा०—पण आजीबाई, सध्यां मजजवळ पन्नास रुपये रोख नाहींत, त्याला कसें करावें?

बैरागीण—हात्तेच्या! रोख रुपयेच कशाला पाहिजेत? ऐवज चालेल. तुमच्या हातांत मी त्या दिवशीं बाजूबंद पाहिला होता तो तुम्ही मला घाल तर हीं मोतें मी तुम्हांस देईन. असा सवंग सौदा पुनः मिळावयाचा नाहीं; घालवूं नका. आज ही जोडी तुमच्या हातून गेल्यावर पुनः परत ती मिळेल असा भरंवसा नाहीं.

बैरागिणीनें तिखटमीठ लावून अशी बतावणी केल्यावर क्रव्यादाबाईनें लगेच जाऊन आपल्या पेटींतून दागिन्यांचा करंडा आणला, आणि त्यांतून आपला बाजूबंद काढून बैरागिणीच्या स्वाधीन केला. तेव्हां बैरागीण क्रव्यादाबाईचे दागिने पाहून म्हणाली:

"अेरेरे, काय एवढ्या चांगल्या दागिन्यांचा मातेरा करून ठेवला आहे हा! मुली, या तांदूळपोतींत नवा दोरा तरी घालून घेग. या कर्णफुलांत तर सर्व मळच मळ होऊन गेला आहे. मळ सोन्यास खाऊन टाकतो बरें मुली! नेहमीं धुवून पुसून स्वच्छ ठेविले तरच ते दागिने."

क्रव्यादा०—आजीबाई, तुम्हीं सांगतां तें सगळें खरें; पण मला दोरा घालून आणून देतें कोण बाई? आणि हे मळलेले दागिने कोण बाई धुवून देतें? त्यांना सांगितलें म्हणजे म्हणतात कीं, मला फुरसत नाहीं. काय करावें बाई.

बैरागीण—हा वेडे मुली, यांत मोठें काम तें ग कसचें? इकडे पहा, हा हार मजकडे दे कसा, म्हणजे मी आतां जाऊन ही तांदूळ-पोत कशी छानदार पटवून आणतें ती पाहा. आणि जे दागिने फार मळकट झाले आहेत तेही मजकडे काढून देत असलीस तर दे; म्हणजे त्यांसही लागलाच सोनाराकडून जरा उजळा देऊन आणतें.

हें ऐकून ऋव्यादाबाईनें आपले सर्व दागिने काढून बैरागिणीचे हवालीं केले. तेव्हां बैरागीण ह्मणाली :

"सठवायाला मजबरोबर द्या. ह्मणजे ती सोनाराच्या दुकानीं बसले, तेवढ्यांत मी पटवेकऱ्याचे येथें जाऊन पोतींत दोरा घालून आणीन."

ऋव्यादा०—पण सठवाय तर येथें नाहीं बाई. पण जरा थांबा, तिला हांक मारून पाहतें.

असें ह्मणून ऋव्यादाबाईनें सठवायला हांक मारली. ती आल्यावर बैरागिणीनें तीस ह्मटलें :

"मुली चल, जरा मजबरोबर येऊन सोनाराच्या दुकानीं हे दागिने साफ करीपर्यंत बैस."

असें ह्मणून दागिने बांधलेला रुमाल बैरागिणीनें आपल्याजवळ घेतला, व सठवायला बरोबर घेऊन तेथून दोघीजणी निघाल्या. गल्लीच्या नाक्यावर गेल्यानंतर बैरागिणीनें दागिने बांधलेला रुमाल सोडला आणि सठवायला म्हणाली :

"आपण उजळा द्यावयाचे व धुवावयाचे दागिने निराळे काढूं व पटवेकऱ्याकडे न्यावयाचे तेवढे निराळे करूं, म्हणजे तेथें गेल्यावर ठीक पडेल. (दागिने निराळे करतां करतां सठवायला म्हणते) अगे पण या गोखरूचें मळसूत्र कुठें आहे बाई?"

सठवाय—यांतच कोठें तरी असेल तें. जाणार कोठें? त्या पाटल्यांखालीं असेल पाहा.

बैरागीण—(पाटल्यांखालीं पाहून आठवण ह्माल्यासारखी करून) हो हो, तें त्या पानपुडावरच राहिलेंसें वाटतें. जा, तेवढें धांवत जाऊन घेऊन ये; मी येथेंच उभी रहातें.

सठवाय—(धांवत जाऊन गल्लींतूनच क्रव्यादाबाईला हांक मारून) वैनी, अहो वैनी, पानपुडावर गोखरूचें मळसूत्र राहिलें आहे तें वैरागणीनें मागितलें आहे. ती गल्लीच्या नाक्यावर वेलाभाई वाण्याच्या दुकानासमोर बसली आहे.

क्रव्यादा०—(हें एकतांच अगदीं घाबरून व दांतओंठ खाऊन) अगे कारटे, तूं वेडीतर नाहीं ना झालीस? माझ्या गोखरूला मळसूत्र होतें तरी का? तुला नाहींका माहीत? अग जा, धांव कारटे, ती वैरागीण कोठें गेलीबिली असेल.

हें ऐकून सठवाय तशीच लगबगीनें माघारी धांवत गेली, आणि पाहते तों वैरागीण आहे कोठें? ती पळून गेली. मग तिला शोधण्याकरितां ती रस्त्यावरून धूम धांवत सुटली. पण तिचा पत्ता लागतो कशाला? शेवटीं वैरागीण कोठेंच दिसत नाहींसें पाहून ती क्रव्यादाबाईपाशीं आली आणि म्हणाली :

"वैनी, वैरागिणीचा तर कोठेंच पत्ता नाहीं. मी थेट मंडईपर्यंत धांवत गेलें. पण तिचा कोठें ठावनाठिकाण. ती भामटी इतक्यांतच कोठें नाहींशी झाली बाई कोण जाणे!"

क्रव्यादा०—(हें ऐकून घाबरली व कपाळावर हात मारून व मोठ्यानें आक्रोश करून) हाय हाय, मला लुटलें ग लुटलें! अग ग! मी फुकट नागावलें!! अग आई, मी आतां काय करूं? ते घरीं आले म्हणजे मला काय म्हणतील!

हें तिचें दीनवाणें रडणें ऐकून शेजारच्या लोकांस तिची दयाआली, व ते जिकडे वाट फुटेल तिकडे तिच्या शोधार्थ धांवत गेले. त्यांपैकीं कित्येक काळेवावरापर्यंतही गेले. तेथें चौकशी करितां लोक असें सांगूं लागले कीं, एक कोठची भामटी महिनाभर भाड्यानें खोली

घेऊन येथें राहिली होती. पण चार दिवस झाले, भाडें दिल्या-शिवाय ती कोठें चालती झाली. हें कळल्यावर लोकांस आणखी चौकशी करण्यांत कांहीं अर्थ आहेसें वाटेना. संध्याकाळीं बुद्धिवंत घरीं आला तेव्हां हें सर्व वर्तमान ऐकून कपाळावर हात मारून घेऊं लागला; तो बायकोस ह्मणाला:

"अग अवदसे, तूं साऱ्या घरादाराला आग लावून आतां मला जाळावयाचें बाकी ठेविलें आहेस. मी पूर्वीपासूनच तुला पक्की ओळखून होतों."

क्रव्यादा०—त्या दिवसचा चोळखण पाहून मला तुह्मींच सांगि-तलेंना कीं, त्या बाईकडच्या आणखी कांहीं वस्तू अशाच स्वस्त मिळाल्या तर घे ह्मणून?

सारांश, त्या दिवशीं बुद्धिवंताचें बायकोबराबर मोठें कडाक्याचें भांडण झालें. तें पाहण्याकरितां पेठेंतील लोकांची गर्दी जमली. त्या बैरागिणीच्या ठकबाजीचा पुकारा चौहोंकडे झाला, तेव्हां तिच्या लुच्चे-गिरीच्या आणखी पुष्कळ गोष्टी उघडकीस आल्या. त्या बैरागिणीनें हैबती दफेदाराच्या बायकोचे सर्व दागिने एका फकिरापासून किमया करून दुप्पट करून आणून देतें असें सांगून उपटून नेले. त्याचप्र-माणें धनाजीराव जाधव रिसालदार ह्याचे कन्येशीं तिनें अशी मैत्री जमविली कीं तिचे कांहीं दागिने, एक बाई त्या नमुन्याचे दागिने आपल्यासाठीं करणार आहे तिला दाखवावयाला नेतें, असें सांगून घेऊन गेली.

ह्याप्रमाणें क्रव्यादाबाईचे दागिन्यांपरी दागिने जाऊन शिवाय लोकांचीं बोलणीं मात्र ऐकावीं लागलीं. भांडीकुंडीं तर पूर्वीच चोरीस गेलीं होतीं. बरें ती पांचशें रुपयांची मोत्यांची जोडी लोकांनीं

पाहिली तेव्हां ती तर अगदीं कवडीच्या मोलाची ठरली! पुढें त्या वैरागिणीच्या ठकबाजीची वातमी चावडीवर गेली. लोकांनींही आपणांकडून होईल तितकी चौकशी केली. पण त्या वैरागिणीचा कोठें पत्ता लागला नाहीं.

येवढा वेळपर्यंत ताराबाईचे दागिने व भांडींकुंडीं यांची क. वाट झाली तें तुह्मीं वाचलें. आतां शिल्लक राहिलेल्या वस्त्र-प्रावरणांचें काय झालें तें सांगून हा कथाभाग आटपूं.

तुह्मांस माहीत आहेच कीं, लग्न झालें ह्मणजे मुलीचा बाप आपल्या मुलीस शक्त्यनुसार कांहीं आंदण देत असतो. त्याप्रमाणें ताराबाईच्या बापानें तिला पुष्कळ दागदागिने, भांडींकुंडीं व वस्त्र-प्रावरणें दिलीं होतीं. जेथपर्यंत ताराबाई ही सासूच्या येथें होती तेथपर्यंत सासू दर पंधरवड्यास किंवा निदान महिन्यांतून एकदां तरी सर्व कपडे झाडून झटकून त्यांस ऊन दाखवीत असे. पण ताराबाई पावसाळ्याच्या अखेरीस निराळी झाली होती, त्यामुळें ज्या खोलींत कपड्यांची पेटी एकदां आणून टाकली होती तेथेंच ती पडून राहिली होती. ती तिनें एक दिवस सुद्धां उघडून पाहिली नव्हती. पुढें थंडी पडूं लागली तेव्हां तिला रजईची आठवण झाली. त्यावरून ती पेटी उघडून पाहते तों बहुतेक कपड्यांस वाळवी व कसर लागून गेली होती; आणि कित्येक कपडे उंदरांनीं कुरतुडून खाऊन टाकिले होते. एक कपडा देखील कामास येण्यासारखा राहिला नाहीं!

तात्पर्य काय कीं, ज्या मुली लहानपणीं आईबापांच्या फाजील लाडांमुळें कोणतीही विद्या किंवा कला शिकत नाहींत, त्यांस ताराबाईप्रमाणें आमरण दुःख व क्लेश भोगावे लागतील. ताराबाईची

ही हकीकत वाचून तुह्मांस समजलेंच आहे कीं, ताराबाईस आईच्या मायशीच्या लाडांमुळें वारंवार कसकशीं संकटें व दुःखें सोसावीं लागलीं तीं. ताराबाईनें लहानपणीं कोणतीही विद्या किंवा कला साध्य करून घेतली नव्हती, यामुळें तिचा स्वभाव यत्किंचितही सुधारला नव्हता. ती सासूच्या घरांतून निघून निराळी राहिली तेव्हां भांडींकुंडीं, लत्ताकपडा, दागदागिने सर्व कांहीं मिजवळ होतें. पण घरसंसार चालविण्याचें तिच्या अंगीं गुण नसल्यामुळें थोड्याच दिवसांत त्या सर्वांची राखरांगोळी होऊन एका वर्षाच्या आंतच ती कंगाल होऊन बसली.

ताराबाईची ह्याप्रमाणें अगदीं वाईट स्थिति झाल्याचें वर्तमान तिच्या बापास कळलें तेव्हां तिची धाकटी बहीण हिराबाई हिच्या नांवें त्यानें एक पत्र लिहिलें. तें आह्मी येथें देतों.

श्रीजगदीश प्रसन्न.

चिरंजीव हिराबाई ईस,

अनेक आशीर्वाद. लिहिण्यास कारण कीं, तूं आपल्या मोल्या पत्रांत ताराबाईची हकीगत मला लिहून कळविलीस, ती वाचून मला मोठा खेद झाला आहे. माझ्या पोटीं अशी वेडी, खुळी व स्वछंदी मुलगी निपजावी हें खरोखरीच मला मोठें लांछन आहे. आह्मीं तिला लहानपणापासून अक्षरें लिहिण्याची हौस व मनास येईल तसें वागणारी झाल्यामुळें तिच्यावर पुढें कोणत्याच ठाव राहिला नाहीं. मला माझ्या नोकरीमुळें नेहमीं परगांवीं रहावें उत्पन्न होता तिचें वर्तन व स्वभाव सुधारण्यास मलाही सवड झाली नाहीं. दरें, आतां इतीं दिलें त्या घरीं सुद्धां साराच पोरवडा. तेव्हां तेथेंही तिची हें शिक्षण झाली नाहीं. यामुळें आजला तिची अशी दुःखकारक स्थिति ह्या गोष्टीस पण आतां तिला कदाचित् आपल्या वाईट वर्तनाबद्दल व अज्ञानमुळें तुह्मे पश्चाताप झाला असेल. तेव्हां ह्या संधीस तिला दोन उपदेशाच्या बोल्यासारख्यास तीं कदाचित् ताळ्यावर येईल; आणि यापुढें आपले वर्तन

सुधारून व थोडेबहुत लिहिणें वाचणें वगैरे शिकून सुखी होईल. ह्यापरी तिला मी हें पुढील पत्र लिहीत आहें. हें तूं तिला वाचून दाखीव; आणि ह्यांत शेवटीं जें सांगितलें आहे तसें खचीत करीन असें तिला आश्वासन दे; आणि ती वाटेवर आल्यास तूं तिला लागेल ती मदत करण्यास ह्यींच आळस करूं नको. कळावें हें आशीर्वाद. मुकाम निपाणी चैत्र व. १५ शके १८०२.

चिरंजीव सौभाग्यवती ताराबाई हीस,

चिरंजीव हिराबाईनें तुझी हकीगत मला पत्र लिहून कळविली. ती वाचून मला पराकाष्टेचें दुःख झालें आहे. तूं लहान होतीस तेव्हांपासून आम्ही तुला शाळेत पाठविली. पण तूं पोरबुद्धीमुळें त्यावेळीं शिकण्याकडेच मुळींच लक्ष दिलें नाहींस. याबद्दल आम्हीं तुला शिक्षा केली म्हणजे तूं हें घेऊन बसावें आणि आमच्याशीं मुळीं बोलूंच नये. या तुझ्या वर्तनाचा पुढें वाईट परिणाम होणार आहे, हें त्या वयांत तुझ्या लक्षांत येत नसे. हल्लीं तूं येवढ्या लहान वयांतच सासूसासऱ्यांशीं भांडून आपल्या नवऱ्यास दुसरें बिऱ्हाड करावयास लावलेंस, आणि कोणाचीही परवा न करितां वाटेल तसें वागून ह्या विपत्तीं तूं आपणास व आपल्या नवऱ्यास पाडलें आहेस. यावरून वाईट वागणुकीचें व अज्ञानपणाचा परिणाम काय होतो तें तुला आतां चांगलें कळून आलें आहे. जगांत लोकांशीं कसें वागावें, आपला संसार कसा चालवावा वगैरे गोष्टींचें ज्ञान मुळींच नसतां केवळ स्वछंदपणानें हवें तसें वागतां यावें हा उद्देश मनांत धरून सासूसासरा, नणंदाजावा यांच्याशीं कांहींएक कारण नसतां भांडण करून नवऱ्यास विभक्त रहाण्याविषयीं भर देणाऱ्या तुझ्यासारख्या अविचारी मुलींची दशा अशीच व्हावयाची. संसार चांगला हुशारीनें व दक्षतेने चालवितां येण्यास बायकांच्या अंगीं पुष्कळ शहाणपण व अनुभव हीं असावीं लागतात. आतां शहाणपण जे आहे तें कांहीं उपजत येत नसतें. तें लोकांचें ऐकून पाहून मिळवावें लागतें. आपल्यापेक्षां जीं वडील माणसें असतात तीं जे काय सांगतात ते नीट लक्ष देऊन ऐकलें पाहिजे. तीं जे कांहीं सांगतात तें आपल्या बऱ्यासाठींच असतें. यासाठीं तीं सांगतात तसें मोठ्या आवडीनें व काळजीनें वागण्याचा नेहमीं प्रयत्न केला पाहिजे. आई, बहिणी, सासू, सासरे, नणंदा वगैरे वडील माणसांच्या मनांत आपलें विश्वास येण्या असतें. माहेरीं किंवा सासरीं मुलींच्या हरएक प्रकारच्या वर्तनाव सर्वच माणसांचीं नजर अंमळ करडी असते. याचें कारण एवढेंच णास अनुरूप असें त्यांचें वर्तन व्हावें आणि त्यांचें कोणत्याही प्रक फालील ऊल पडूं नये. पण तुझ्या सारख्या अल्लड स्वभावाच्या मुलींना हा रपणा सहन होत नाहीं; आणि मग त्या सगळ्यांचाच द्वेष करूं ला ताराहा द्वेष साधेल तेव्हां उगवून घेण्यास त्या मागेंपुढें पाहत नाहींत. ताराबाईची

ह्याप्रमा[illegible]ुंबांत कलह माजून फाटाफूट होते; आणि हे एकत्र रहाणे नको असें [illegible]ड्या व अविचारी मुलींच्या नवऱ्यांस वाटूं लागतें. मग त्यांस त्याच रहाण्याची ऐपत येतांच ते आपल्या मातापितरांस सोडून स्वतंत्र [illegible] करून रहातात. ह्याप्रमाणें सासूसासऱ्यांच्या व नणंदाजावांच्या [illegible]ेऊन [illegible]न सुटून मुली अल्पवयांतच स्वतंत्रपणें राहूं लागल्या ह्मणजे मग काय व मर्यादा! त्यांस वाटतें कीं, आपण पाहिजे तें करण्यास मुखत्यार आहों. [illegible]रंतु आपणास कोणी विचारता ना पुसता. पण या अशा घातक स्वतंत्रतेचा [illegible]रें म काय होतो तो तुला आतां पूर्णपणें कळला आहे. 'घणाचे घाव सोसल्याविांचून देवकळा येत नसते', अशी जी एक ह्मण आहे ती तुझ्यासारख्या तरुण मुलींनीं अवश्य लक्षांत ठेविली पाहिजे. सासूसासऱ्यांचा जाच होतो तो बहुतकरून तरुण मुलींच्या बऱ्यासाठीच असतो. तो जाच सोसतां सोसतां [illegible]ऱ्ह्याऊ प्रकारचें शहाणपण अंगीं येतें. हें शहाणपण येरवीं कोठेंही फारसें मिळण्यासारखें नसतें. दुसरें असें कीं, तरुण मुलींच्या सर्व प्रकारच्या वर्तनावर सासरच्या माणसांची नेहमीं टीका होत असल्यामुळे त्यांस फार सांभाळून वागावें लागतें. यामुळें मनुष्यस्वभावांत असलेला थोडाबहुत अल्लडपणा कमी होऊन मनोनिग्रह करण्याची उत्तम सवय लागते. हा मनोनिग्रह ही एक या दुनियेंत अजब चीज आहे. आपणास नाना प्रसंगीं वाईट रीतीनें वागण्याचा मोह पडतो. अशा वेळीं आपल्या अंगीं स्वताचें मन आवरण्याची सवय असेल तरच आपला बचाव होतो. नाहींतर तें वाईट काम आपल्या हातून घडतें, आणि मग आपण अनेक दुःखांत व संकटांत पडतों. ताराबाई तूंच सांग पाहूं कीं, तुझ्या हात[illegible]ऱ्या कित्येक वाईट गोष्टी घडल्या ह्मणून मी ऐकतों. त्या कशामुळें बरें घडल्या? तुला लोकलज्जा किंवा मनलज्जा नव्हती ह्मणून काय? असें कांहीं नव्हे. तर तुझ्या त्या दुष्ट मैत्रिणींनीं तुला भर दिली आणि तूं लागलीच त्यांनीं सांगितलें तसें करावयास तयार झालीस. तोच तुझ्या अंगीं मनोनिग्रह असता तर तूं त्या कपटी मैत्रिणींस झिटकारून देऊन सासरीं सुखानें नांदतीस; आणि सासरचा जाच तुला कांहींच वाटला नसता. तेव्हां तात्पर्य काय कीं, आह्मां हिंदु लोकांच्या बायकांच्या अंगीं मर्यादशीलपणा, शहाणपणा वगैरे जे कित्येक अमूल्य सद्गुण आढळतात, ते, त्यांच्या ठायीं केवळ त्यांस सासुरवास जरासा जरवेचा घडतो ह्मणूनच, उत्पन्न होतात.

आतां शहाणपणा अंगीं येण्यास दुसरा उपाय ह्मटला ह्मणजे शिक्षण होय. हें शिक्षण ज्या मुलींस लहानपणीं मिळत नाहीं त्या हतभाग्य होत. तुला ह्या गोष्टींची अनुकूळता होती. पण तुझ्या हट्टीपणामुळें व फाजील लाडांमुळें तुझें कांहींच शिकणें झालें नाहीं. तरी अजूनही ही तुझी उणीव नाहींशी होण्यासारखी आहे. तुझी धाकटी बहिण चांगली शिकलेली आहे. तिच्या

साऱ्याचा तूं थोडें थोडें शिकण्याचा निश्चय करशील तर थोड तिला काशांत तूं चांगली हुशार होशील. आणखी मी तुला असें सांगतों पर्यंत स्वतंत्रपणें संसार चालविण्याची योग्यता आपल्या अंगीं तोंपर्यंत विभक्त रहाणें ठीक नाहीं. अग, ह्या संसारांत अनुभविक गतो. हा अनुभव, वडील माणसांजवळ राहून, तीं हरएक गोष्टींत कशाचा नीट लक्षलावून पाहिल्यावांचून, व तीं सांगतात तसें मनापासून स्व वांचून, येणारा नव्हे. यासाठीं तुला मी असें निभून सांगतों कीं, तूं रहाण्याचा विचार सोडून दे, आणि पुनः आपल्या सासूपाशीं जाऊन रहा. एकदां तिच्याकडून भांडून त्रासून निघालें, आणि आतां परत कोणतें तोंड घेऊन तिच्याकडे जाऊं, असा विचार मनांत बिलकूल आणूं नको. मला ठाऊक आहे कीं, ती तुझी सासू मोठी दयाळू व सोशीक बायको आहे. तुला आपल्या घरीं पुनः नांदविण्यास तीं मुळींच कांकू करणार नाहीं. मी ऐकतों कीं, तुझा नवरा तर आपल्या आईकडेच जेवीत असतो. तर आतां असें कर कीं, भादव्याचें बिऱ्हाड सोडून सासूच्या घरीं जाऊन रहा; आणि त्या तुझ्या साऱ्या मैत्रिणींच्या पुनः वाऱ्यास सुद्धां जाऊं नको. असें तूं करून आपलें वर्तन सुधारलेंस, या मजकुराचें पत्र तुझ्या धाकट्या बहिणीच्या हातचे मला येतांच मी तुला व तुझ्या नवऱ्याला कांहीं लुगडीं व धोतरजोडे आणि कांहीं नवे डागिने करण्याकरितां दोनशें रुपये इकडून पाठवून देईन; आणि हिराबाईच्या लग्नाच्या वेळीं मी तुझ्या पायांत एक तोडयांचा जोड घालीन. पण यापुढें तुझ्या संबंधानें माझ्या कानावर मुळींच कागाळी येतां कामा नये; आणि तूं हिराबाईकडे बसून थोडथोडें लिहिण्यावाचण्यास व कशिदा काढण्यास शिकलें पाहिजे. मी हिराबाईच्या लग्नास येईन तेव्हां तुला निदान चांगलें वाचतां तरी आलें पाहिजे. तुझी चांगली स्थिति व्हावी व तूं आपल्या नवऱ्याच्या घरीं सुखानें व आनंदानें नांदावें, येवढीच माझी इच्छा आहे. तुझी जनांत फजिती होऊन तूं दुःखांत व विपत्तींत पडल्यास त्यांत माझा दुर्लौकिक आहे. हें तूं नीट ध्यानांत ठेव, आणि यापुढें आपलें वर्तन सुधारून मला समाधान वाटेल असें कर, येवढेंच माझें तुला सांगणें आहे. कळावें हें आशीर्वाद.

तुझें सतत कल्याण इच्छिणारा

विश्वासराव.

याप्रमाणें आलेलें बाबाचें पत्र हिराबाईनें वाचून दाखविलें, तेव्हां ताराबाईला पराकाष्ठेचें रडें कोसळलें; आणि तिनें बापास उलट डाकेनें पत्र लिहून कळवायाला सांगितलें कीं, मी तुमच्या क्षण-

ग्याप्रमाणें ह्या घटकेपासून वागण्यास सुरवात केली आहे. नंतर त्याच दिवशीं संध्याकाळीं बिऱ्हाडांत कांहीं चीजवस्त होती ती घेऊन ती सासूच्या घरीं गेली; आणि तेव्हांपासून अगदीं गरिबीनें च मर्यादेनें घरांत वागूं लागली. हें पाहून तिच्या नवऱ्यास फारच समाधान वाटलें, व सासूही तिला जीवप्राण करूं लागली. त्याचप्रमाणें त्या वेळापासून ती फुरसतीप्रमाणें थोडथोडा लिहिण्या-वाचण्याचा अभ्यास करूं लागली; आणि पुढें लवकरच हिराबाईचें तिच्या धाकट्या दिराशीं लग्न झालें. तेव्हांपासून तर तिनें आपला अभ्यास मोठ्या हौसेनें पुढें चालविला. तो इतका कीं, पांच सहा महिन्यांच्या आंत तिनें बापास आपल्या हातानें वेडें वांकडें पत्र लिहून पाठविलें. तें पाहून विश्वासरावास परम संतोष झाला. आणि त्यानें आपल्या मागल्या पत्रांत कबूल केल्याप्रमाणें तिला दोनशें रुपये दागिन्यांसाठीं पाठवून दिले, आणि आणखी कांहीं तरी लवकरच पाठविण्याचें अभिवचन दिलें.



हिराबाईची गोष्ट.

प्रकरण सहावें.

लग्नसमारंभ.

मनुष्याच्या सर्व देहास जसे डोळे शोभा देतात, किंवा बागेस जसें गुलाबाचें फूल शोभा देतें, तशी हिराबाई ही त्या कुटुंबास शोभा देत असे. अनेक उपयुक्त विद्या व कला तिनें संपादन केल्या असून तिच्या अंगीं सारासारविचार व व्यवहारज्ञान हीं फारच होतीं. स्त्री जातीस आवश्यक असे सर्व कांहीं सद्गुण तिच्या अंगीं तारीफ करण्याजोगे होते. लहानपणापासूनच खिदळणें थट्टामस्करी करणें इत्यादि गोष्टींचा तिला कंटाळा असे. लिहिणें वाचणें, शिवणें तुरपणें व घरचें काम करणें यांत तिचा सगळा वेळ जात असे. ती एक पळही व्यर्थ आळसांत किंवा गप्पा मारण्यांत घालवीत नसे. ती कोणाबरोबर कधीं भांडण करीत नसे. पेठेंतल्या साऱ्या बायका तिजवर आपल्या मुलाप्रमाणें प्रीति करीत असत. धन्य भाग्याच्या आईबापांचें कीं त्यांच्या पोटीं हीं अशी चांगल्या गुणांची मुलगी निपजावी. तसेंच ज्यांच्या घरीं ही पडली त्यांचेंही सुदैवच समजावयाचें.

हिराबाईला तेरावें वर्ष लागल्यावर तिची मागणी कर्मधर्मसंयोगानें सत्यवंताकरितां होऊन चुकली होती, असें मागें सांगितलेलें वाचकांस

आठवत असेलच. पुढें कोणत्या महिन्यांत व कोणत्या मुहूर्तावर लग्न धरावें याची वाटाघाटा सुरू झाली. इकडे सत्यवंताच्या आईनें आपली मोठी सून ताराबाई हिचे रंग ढंग पाहिल्या दिवसापासून तिच्या मनांत अशी भीति उत्पन्न झाली होती कीं, न जाणों कदाचित् हिराबाई ही आपल्या बहिणीसारखीच वाईट स्वभावाची असेल. यास्तव ही मागणी मोडून दुसऱ्या कोठेंतरी सोयरीक करावी, असा तिचा इरादा होता. हा तिचा बेत बुद्धिवंताला कळला. तेव्हां यानें एके दिवशीं आईस विचारलें:

"आई, तुझ्या मनांत सत्यवंतासाठीं घातलेली मागणी मोडावयाची आहे असें मीं ऐकतों. हें खरें का?"

आई—काय सांगूं बाळा! मी मोठ्या काळजींत पडलें आहें. मला कांहीं सुचत नाहीं. तुझी त्या बायकोमुळें झालेली दशा पाहून मला फार खेद वाटतो. मला त्यावेळीं कोठून बुद्धि सुचली कोण जाणें? ह्मणून तुझ्या संसाराचें असें मातेरें झालें. आतां सत्यवंताची तरी दशा तुझ्यासारखी न व्हावी असें माझ्या मनांत आहे.

बुद्धिवंत—आई, मी खरोखर सांगतों कीं, तूं कितीही शोधिलेंस तरी हिराबाईसारखी गुणी मुलगी आपल्या ज्ञातींत सांपडावयाची नाहीं. जशी रूपलक्षणांनीं तशीच गुणांनींही ती परिपूर्ण आहे. तिच्यासंबंधानें कोणत्याही गोष्टीविषयीं मनांत संशय बाळगण्याचें कारण नाहीं. तिच्याशीं सत्यवंताचें लग्न करण्यास तूं मागेंपुढें पाहूं नको. माझ्या बायकोच्या गुणांवरून जर तूं हिराबाईची पारख करीत असशील तर ती तुझी चूक आहे.

अगे, तुकाराम साधूचा गाथा कालच मी वाचीत होतों, त्यांत हा अभंग मला आढळला:—

दह्याचिया अंगीं निघे ताक लोणी ।
एका मोलें दोन्ही मागों नये ॥
आकाशाचे पोटीं चंद्र तारागण ।
दोहोंशीं समान पाहों नये ॥
पृथ्वीचे पोटीं हिरे गारगोटी ।
दोहोंशीं समसाठी करूं नये ॥
तुका ह्मणे तैसे संत आणि जन ।
दोहोंशीं समान भजूं नये ॥ १ ॥

या साधूच्या वचनाप्रमाणें पाहतां एकाच मातापितरांच्या पोटीं दोन निरनिराळ्या गुणांचीं मुलें निपजणें कांहीं अशक्य नाहीं. ह्यासाठीं एकीच्या गुणांवरून दुसरीच्या गुणांचें अनुमान करून दोघींसही समान मानणें हें योग्य नव्हे. त्यांतून मला जी तिची थोडी बहूत चालचलणूक माहीत आहे, तीवरून ती चांगल्या गुणांची मुलगी आहे, अशी माझी खात्री झाली आहे; आणि माझें हें ह्मणणें खरें आहे कीं नाहीं, तें तुला अनुभवाअंतीं कळून येईल.

बुद्धिवंतानें हिराबाईची अशी तारीफ केल्यावरून आईचें मन फिरलें, आणि तिलाच आपली सून करावी, असा तिचा पक्का निश्चय ठरला. मग एके दिवशीं दोहोंकडचीं वडील माणसें एकत्र मिळून लग्नाचा दिवस ठरला. हिराबाईचा बाप विश्वासराव हा घांटावर निपाणकरांजवळ चाकरीस होता. त्यास हें वर्तमान लिहून कळविलें. तें कळतांच विश्वासरावास फार आनंद वाटला. कारण सर्व मुलांत हिराबाईवर

त्याची ममता विशेष असे, याकरितां तावडतोब रजा मिळावी म्हणून त्यानें सरकारांत अर्ज केला. पण सध्यां रजा देण्यास सवड नाहीं, असा साफ जबाब मिळाला. पुष्कळ मध्यस्थी घातल्या पण कांहीं-एक चाललें नाहीं. पर्जन्यकाळ संपून कामाचे दिवस असल्यामुळें रजा दिल्यास सरकारी कामाचा खोळंबा होईल, असा अभिप्राय कारभारी लोकांचा पडला. विश्वासरावास रजा न मिळाल्या कारणानें फारच वाईट वाटलें. त्याचा वडील मुलगा रमाकांत हा त्याजपाशींच होता. त्यास लग्नसंबंधीं सर्व कांहीं व्यवस्था कशी काय करावयाची तें समजावून देऊन व पांचशें रुपये रोख देऊन घरीं पाठविलें. घरीं कपडालत्ता, दागदागिने, भांडींकुंडीं वगैरे लग्नाचें साहित्य पूर्वीच तयार करून ठेविलें होतें. मात्र दाणागोटा वगैरे किरकोळ सामान घ्यावयाचें राहिलें होतें. रमाकांत घरीं पोहोंचल्यावर त्यानें गहूं, तांदूळ, डाळ, तेल, तूप इत्यादि जेवढें अगत्याचें सामान होतें तेवढें खरेदी केलें. योजलेला दिवस येऊन ठेपला तेव्हां दोन्ही घरच्या माणसांची गडबड उडाली. हिराबाईच्या आईच्या मनांत होतें कीं, तिला ताराबाईपेक्षां जास्त हुंडा द्यावा, व लग्नही मोठ्या डामडौलानें करावें. आईचा हा हेतु हिराबाईला कळला. तेव्हां जर ती वेडी असती तर तिला खरोखर मोठा आनंद झाला असता. पण नाहीं. तिला याबद्दल मोठें वाईट वाटून आईच्या हातून अशी गोष्ट न होऊं देण्यास काय युक्ति करावी या विचारांत ती पडली. शेवटीं सुमतीबाई म्हणून तिची माऊस बहीण होती, तिजजवळ तिनें लाजत लाजत ही गोष्ट काढली आणि म्हणाली:

"गडे सुमति, आई मला आमच्या आकापेक्षां जास्त हुंडा देणार आहे असें मीं ऐकिल्यापासून कीं नाहीं, मला बाई मोठी काळजी

लागली आहे; आणि आज कित्येक दिवस विचार करितें आहे कीं देवा याला काय करूं. बरें झालें कीं, आज तुझी भेट झाली. तूं माझ्या बरोबरीची आहेस, तेव्हां तुझ्याजवळ सांगण्यास कांहीं आडकाठी नाहीं. तरी कसेंही करून आईस इतकें समजावून सांग कीं, आकापेक्षां यत्किंचित् देखील अधिक हुंडा मला देण्याच्या भरीस पडूं नको."

सुमति—तुझा तरी बाई मला मोठा चमत्कार वाटतो. मेली ह्मण आहे कीं नाहीं, "वाळाला दिली वाटी पण वाळ मागतो करटी," तशांतली तुझी अवस्था आहे. ती खुशीनें देत असतां तूं ग कां ह्मणतेस नको? तुझ्या जागीं जर का मी असतें, तर मला बाई याबद्दल मोठा हर्ष झाला असता

हिराबाई—तूं तरी बाई वेडीच आहेस; यांत केवढें तंट्याचें मूळ आहे तें तुला समजत नाहीं का? अग, आकाचा स्वभाव तर तुला माहितच आहे. तेव्हां तिला या गोष्टीमुळें फार दुःख होईल; आणि मग कीं नाहीं ती आईबरोबर नेहमीं भांडत राहील.

सुमति—ती ग कां ह्मणून भांडत बसेल? अग, हें ज्याचें त्याचें नशीब आहे. पाहूं गेलें असतां यांत मनाची समजूत करण्यास हजार गोष्टी आहेत. तिच्यासारखी तूं कांहीं चार वर्षें मागणी होऊन घरीं राहिली नाहींस. शिवाय लग्न झाल्यापासून तिला आणणें, नेणें, भेटा वगैरे यांस थोडका का खर्च लागला असेल?

हिराबाई—तूं ह्मणतेस कीं नाहीं तें सगळें खरें. पण हुंडा तो हुंडाच? तो धाकटीला ज्यास्त मिळाला असतां मोठीला त्याचें दुःख सहजच वाटेल. आह्मी दोघीजणी एका घरांत राहणार,

व नेहमीं एके ठिकाणींच उठणार बसणार. तेव्हां ज्या गोष्टीपासून तिच्या मनांत मत्सर उत्पन्न होईल ती करूं देणें मला नाहीं बाई प्रशस्त वाटत.

सुमति–गडे, अशानें तूं उगाच आपला तोटा करून घेशील. अग, नवें नवें आहे तोंपर्यंत तिला वाईट वाटेल. पण बघशील तर खरें, एक दोन महिने गेले नाहीं तोंच तिला या गोष्टीचा आपोआप विसर पडेल.

हिराबाई–गडे, आईबापांच्या देण्यानें मोठी श्रीमंती का येणार आहे? हुंडा कधीं कोणाच्या जन्मास का ग पुरला आहे? अग, ईश्वराची दया असली तर तो सर्व कांहीं देतो. तूं या गोष्टी-विषयीं माझें मन फिरविण्याचा उगीच यत्न करूं नको. तुला ही गोष्ट आईस सांगावयाची नसेल तर तसें मला काय तें सांग; ह्मणजे मी दुसऱ्या कांहीं तरी उपायानें तजवीज करीन. पण अशी गोष्ट मी कधींही घडूं देणार नाहीं.

शेवटीं हिराबाईचें तें ह्मणणें आईच्या कानावर गेलें. तेव्हां तिनेंही विचार करून आपला पूर्वीचा बेत फिरविला; आणि मनांत ह्मणाली कीं, द्यावयाचेंच आहे तर पुष्कळ प्रकार आहेत; त्याची आजच घाई कशाला?

याप्रमाणें सर्व कांहीं व्यवस्था होऊन नेमलेल्या दिवशीं सुमुहूर्तावर हिराबाईचें सत्यवंताबरोबर मोठ्या समारंभानें लग्न झालें. तिचा भाऊ रमाकांत हा असा बेताबातानें वागणारा होता कीं, त्यानें एकट्यानें मोठ्या कुशलतेनें व काटकसरीनें आपल्या धाकट्या बहिणीचें हें मंगल-कार्य सिद्धीस नेलें. दोहोंकडल्या वऱ्हाड्यांची व आल्यागेल्याची त्यानें चा वर्षा-ऐचित संभावना केली. कोणत्याही प्रकारें नांव

ठेवण्यास म्हणून काडीभर देखील जागा त्यानें ठेवली नाहीं. लग्नकार्यास आलेली सर्व मंडळी शेवटपर्यंत मोठ्या आनंदांत होती. हिराबाईची घरभरणी सासरीं जावयास निघाली तेव्हां घरांतील सर्व लहानथोर मंडळीस पराकाष्ठेचें वाईट वाटलें. आईच्या दुःखास तर पारावार उरला नाहीं. पेठेंतील सर्व बायकाही अगदीं गहिंवरून गेल्या. आली गेली ती तिला मोठ्या प्रेमानें पोटाशीं धरून रडे. "जा बेटा, सुखानें नांद," . "अष्टपुत्रा सौभाग्यवती भव," "शतायु हो," "तुझें कल्याण असो," असे सर्वांच्या तोंडांतून शुभ उद्गार निघूं लागले. सारांश, तो देखावा पाहणारास एका अर्थानें फारच समाधानाचा पण दुसऱ्या अर्थानें दुःखाचा असा दिसत होता. हिराबाई याप्रमाणें सर्वांच्या आशीर्वादांचा फारच मोठा हुंडा घेऊन सासरीं आली. तेव्हां तेथेंही मोठ्या आनंदानें तिच्या लग्नोत्सवाची परिसमाप्ति झाली. हिराबाईचें सासरचें नांव **विजयालक्ष्मी** असें ठेविलें. हें नांव तिला खरोखर साजण्यासारखें होतें.

प्रकरण सातवें.

पितृबोध.

पुढील पानांत तुह्मांस हिराबाईनें घरसंसार कोणत्या रीतीनें चालविला, तो चालवीत असतां तीस कोण कोणतीं संकटें आलीं, व त्यांचें तिनें कसकशा युक्तीनें व सारासार विचारानें निवारण केलें तें कळून येईल. आतां या ठिकाणीं हिराबाईच्या स्थितीची ताराबाईच्या स्थितीशीं थोडीशी तुलना केली असतां बरें पडेल असें वाटल्यावरून ती येथें थोडक्यांत करितों.

हिराबाई ही आपल्या आईची दुसरी मुलगी आणि सासूची दुसरी सून. दोहोंकडच्या माणसांनीं आपली हौस हिराबाईच्या लग्नामध्यें हवी तशी पुरवून घेतली होती. ताराबाईचें लग्न सोळावे वर्षीं झालें असून हिराबाईचें वय लग्नसमयीं पुरें तेरा वर्षांचेंही नव्हतें. ताराबाईचें लग्न झालें तेव्हां तिचा नवरा बुद्धिवंत यास पंधरा रुपयांची चाकरी होती; आणि हिराबाईचें लग्न झालें तेव्हां तिचा नवरा सत्यवंत हा हायस्कुलांत शिकत होता. सत्यवंताची बुद्धिवंताशीं तुलना केली असतां तो बुद्धिवंतापेक्षां जरा कमी बुद्धीचा असून त्याचें शिक्षणही त्याच्याइतकें झालें नव्हतें. ताराबाईचें लग्न झाल्यावर पांच सहा वर्षेपर्यंत तिला मूल झालें नव्हतें. पण हिराबाईला लग्न झाल्यापासून तिसऱ्या वर्षीं एक पुत्र झाला. ताराबाईस आपलें शहर सोडून

परगावीं जाण्याचा कधींच प्रसंग आला नाहीं. पण हिराबाईला बरींच वर्षें देशोदेशीं फिर वें लागलें. एकंदरींत पाहतां हिराबाईच्या स्थितीची ताराबाईच्या स्थितीशीं तुलना केली असतां ती ह्मणण्यासारखी चांगली नव्हती. पण हिराबाईस लहानपणापासून चांगलें शिक्षण मिळालें होतें. त्यामुळें तिनें आपला घरसंसार चांगल्या प्रकारें चालविला. ह्मणून तिचें आयुष्य नेहमीं सुखसमाधानांतच गेलें. हिराबाईचा विवाह झाल्यावर एकंदर सर्व वृत्तांत रमाकांतानें आपला बाप विश्वासराव यास पत्र पाठवून कळविला. तो वाचून विश्वास-रावास फार समाधान वाटलें. पण कन्येच्या वियोगाचें दुःख त्याला फारच झालें. या वेळीं त्यानें हिराबाईस येणेंप्रमाणें पत्र लिहिलें होतें :—

श्री.

चिरंजीव सौभाग्यवती हिराबाई हीस,

फार फार आशीर्वाद, लिहावयास कारण कीं, चिरंजीव रमाकांत याच्या पत्रावरून तुझ्या लग्नाची सर्व कांहीं हकीकत मला कळली. पुष्कळ वर्षांपासून माझा हेतु होता कीं, हें मंगलकार्य मी आपल्या हातानें करावें; परंतु तो सिद्धीस नेण्यास कारभारी साहेबांकडून मला रजा मिळाली नाहीं. याकरितां मी फार दुःखी आहें. तुला ठाऊक आहेच कीं, सर्व मुलांमध्यें मला तुझीच ममता व काळजी विशेष होती. हें मी ह्मणजे तुला लिहून कळविलें पाहिजे असें नाहीं. तूं आपल्या गुणांनीं व प्रिय भाषणानें माझें व घरांतील प्रत्येक मनुष्याचें मन आकर्षण करून घेत असस. आठ वर्षांच्या वयापासूनच तूं माझा संसार प्रौढ मनुष्यासारखा पहायाला लागलीस. तुझ्या आईला घरांतील कोणत्याही गोष्टीविषयीं काळजी वाहावी लागत नसे, असें माझ्या ऐकण्यांत वेळोवेळां येत असे; आणि मला सवड मिळून जेव्हां जेव्हां ह्मणून मी घरीं येत असें, तेव्हां तेव्हां तुझा हरएक गोष्टीविषयीं बेतबात पाहून मला फार हर्ष वाटत असे आतां तूं सासरीं गेल्यामुळें माझ्या संसाराचें फारच नुकसान होईल. ईश्वर तुझे सदैव कल्याण करो. चिरंजीव रमाकांत याच्या पत्रावरून मला हेंही कळून आलें आहे कीं, चिरंजीव सौभाग्यवती ताराबाईपेक्षां अधिक हुंडा आपणास नको ह्मणून तूं सांगितलेंस. यावरून तुझी दीर्घदृष्टि व खरा

उदारपणा हीं दिसून येतात. तुझा हा असा विचारीपणा व शहाणपणा पाहून मला परम संतोष वाटत आहे. आणि अशी सद्गुणी मुलगी माझ्या पोटीं आल्याबद्दल मला आजन्म समाधान वाटेल. आतां यापुढें कोणत्या रीतीनें आपलें वर्तन ठेवलें असतां तुला सुख होईल, याविषयीं दोन शब्द लिहितों, त्याचें तूं चांगलें मनन करून त्याप्रमाणें वागशील अशी माझी पूर्ण खात्री आहे. द्रव्यरूप आंदण तुला मीं कितीही दिलें तरी त्यापासून तुला ह्मणजे अक्षय सुख प्राप्त होईल असें नाहीं. तर हा बोधरूप हुंडा तूं आपल्यापाशीं नित्य बागवून तदनुसार आपलें वर्तन ठेवलेंस तर तुला सुखाची व आनंदाची मुळींच कमताई पडणार नाहीं. या संसारांत अनेक संकटें वेळोवेळां यावयाचीं. त्यांतून पार पडण्यास मनुष्याच्या अंगांत शहाणपणा व ज्ञान हीं पाहिजेत. तेव्हां तीं जेणेंकरून मिळतील तें मनुष्याने नेहमीं करावें असें आहे. ह्यासाठीं हा माझा बोधरूप हुंडा तूं आपल्यापाशीं सदोदित ठेवशील, अशी मला पूर्ण आशा आहे.

प्रथमतः लग्न ह्मणजे काय तें आपणास समजलें पाहिजे. लग्न ह्मणजे फक्त तऱ्हेतऱ्हेचीं उंची वस्त्रें नेसल्यानें किंवा चार आया बाया एकत्र जमल्यानें किंवा दागदागिनें घातल्यानें व आंदण मिळाल्यानेंच होतें असें नाहीं. तर लग्नानें एक नवीन प्रकारचें जिणें सुरू होत असतें तें झाल्यावर नव्या लोकांशीं सहवास करावा लागतो, आणि नव्या घरांत रहावें लागतें. ज्याप्रमाणें गोऱ्हा नांगरास जुंपावयाचा असला ह्मणजे त्याच्या मानेवर पहिल्यानें नुस्तें जूं ठेवीत असतात, त्याप्रमाणें मनुष्याच्या मानेवर पहिलें जूं लग्न हें होय. लग्न झालें ह्मणजे मुलगी बायको होते व मुलगा नवरा होतो. येथून पुढें त्या दोघांस संसाररूप जो गाडा त्याला जुंपिलें आहे ह्मणून समजावें. तो त्यांनीं मोठमोठाल्या दऱ्या, खोरीं, पर्वत, रानें ओलांडून व महत् संकटें सोसून स्मशानभूमीपर्यंत नेला पाहिजे. ह्मणून लग्न झालें ह्मणजे मन दृढ करून मोठ्या सहनशीलतेनें हें मोठें ओझें ओढण्यास सिद्ध होऊन आयुष्याचे जितके दिवस जातील तितके मोठ्या अन्नूनें व गुण्यागोविंदानें एकत्र नांदून काढले पाहिजेत. नाहींतर शिव्यागाळी, तंटेभांडणें इत्यादि केल्यानें ही संसारयात्रा अधिकाधिक दुःखप्रद होत असते. हे माझे प्रिय कन्ये हिराबाई, जगन्नियंत्या परमेश्वरानें स्त्रीपुरुषांमध्यें किती निकट संबंध ठेविला आहे तें तुला एक पौराणिक गोष्ट सांगून दाखवितों.

शिवलीलामृत व दुसऱ्या इतर पुराणांत अनेक ठिकाणीं शिवपार्वतीविषयीं ज्या गोष्टी आहेत त्यांवरून असें दिसतें कीं, शिवाचा स्वभाव तामसी व वृत्ति विरक्त असल्यामुळें नेहमीं कांहीं तरी विचित्र प्रकारचें वर्तन करण्याकडे त्याचा कल असे. पण पार्वतीनें आपल्या मनोहर सौंदर्यानें व मधुर भाषणानें पतीची समजूत करून त्याचा कल फिरवून त्यास ठिकाणावर आणावें. याविषयींचे दाखले पुष्कळ आहेत. ते तुला विदित असल्यामुळें येथें देण्याची गरज नाहीं. परंतु ह्या गोष्टीवरून तात्पर्य इतकेंच घ्यावयाचें

ल्यामुळें नवऱ्याचे प्रेम तिजवर जडून तिच्या इच्छेप्रमाणें वागण्याविषयीं त्याचाही कल स्वाभाविकपणें होऊन तो पुढें वेगळा रहाण्याची खटपट करूं लागतो. यावरून पाहतां लग्नानंतर आईबापांशीं मुलाचा थोडेच दिवस संबंध राहून कधींना कधीं तरी कोणत्याना कोणत्या कारणानें त्यास निराळें रहावें लागतें. जगांत आजपर्यंत असाच प्रकार घडत आला आहे. पण सुनांस इतका धीर कोठचा? त्यांस लवकर वेगळें व्हावे असें वाटतें. हें कांहीं चागलें नव्हे. कित्येक मुलींस अशी वाईट खोड असते कीं, त्या सासरच्या बारीक सारीक गोष्टी देखील माहेरीं येऊन सांगत असतात; व माहेरचीं माणसेंही मुलीस खोदखोदून विचारीत असतात. पण या अशा विचारण्यानें व बोलण्यानें कांहीं निष्पन्न न होतां भांडण व कलह मात्र वाढतात. कित्येक सुनाही इतक्या मिजाशी असतात कीं, कांहीं पुसूं नको. सासरीं कितीही चांगलें अन्नवस्त्र मिळत असले तरी त्यास तुच्छ मानीत असतात. अशानें घरांतील मंडळीचें व नवऱ्याचें मन अगदीं संतापून जातें. मुली हिरे, तुला या गोष्टीविषयीं फार सावध राहिलें पाहिजे. तुला सासरच्या प्रत्येक गोष्टीला मोडेपणा दिला पाहिजे. आणि तुला जीं भाजीभाकर व बरें वाईट लुगडें चोळी मिळेल त्यांतच नेहमीं आनंद दाखविला पाहिजे. ह्मणजे तेणेंकरून घरांतील माणसें तुजवर प्रीति करितील. प्रथमच सासरीं जाणाऱ्या मुलींनीं तेथें उदास वृत्तीनें राहतां कामा नये. आतां हें खरें आहे कीं, नव्या व अनोळखी लोकांत रहाण्याची संवय नसल्यामुळें पहिल्याने वाईट वाटतें. पण कसेंही करून मनाचें समाधान केलें पाहिजे. हल्लीं पाहावें तों माहेरून सासरीं जावयाचें झटलें ह्मणजे रडें झटकून यावयाचें व तेथे असेपर्यंत कपाळास सदोदित आठ्या असावयाच्या; व कांहीं दिवस तेथें राहणें झालें नाहीं तोंच पुनः माहेरीं जाण्याची उत्कंठा व चिंता लागावयाची, असा प्रकार आढळतो; तो चांगला नाहीं. तर उत्तरोत्तर सासरच्या मनुष्यांची प्रीति संपादन करण्याकरितां झटलें पाहिजे. माहेरचा फारच लळा दाखविणें हें सासरच्या लोकांस आवडत नाहीं.

बोलणें चालणें मर्यादेचें असावें. कोणी विचारल्या पुसल्या शिवाय उगाच सारा दिवस बोलत राहूं नये. तसेंच अगदीं अबोला धरूनही उपयोग नाहीं. त्यामुळें आपण गर्विष्ठ आहों असें दिसतें. पुष्कळ बोलण्याची संवय असल्याचा परिणाम दुःखदायक होतो. कारण रात्रंदिवस हजारो प्रकारचे विषय निघतात. तेवढ्या सगळ्यांमध्यें आपण कांहीं तरी बोललें असतां एकादे वेळीं नकळत भलतीच गोष्ट आपल्या तोंडांतून निघून जाते. बरें थोडेंही बोलतां कामा नये. आपण बोलावें ह्मणून लोकांस आपली खुशामत किंवा विनवणी करावी लागूं नये; किंवा धाक घालण्यापर्यंत पाळी येऊं नये. कोणत्याही गोष्टीविषयीं आपलाच दुराग्रह घेऊन बसणें हें चांगलें नाहीं. एकादी गोष्ट खरी असून तुझ्या इच्छेविरुद्ध जरी त्याचा निर्णय झाला तरी त्या वेळीं उतावीळ न होतां धीर धरावा. कारण पुढें केव्हां तरी त्या गोष्टीचें खरें स्वरूप

रहात नाहीं त्याचप्रमाणें कोणत्याही वस्तूविषयीं हांवरेपण हांवरेपणा केल्यानें लोक आपणास हलकट समजतात. जें करीत असतील नें तूं करण्याविषयीं लाजूं नको. लहानांवर मोठ्यांशीं भीडमर्यादेनें वागणें, हे दोन उपाय सर्वांची प्रीति संपादण्याविषयीं रामबाण आहेत. आपलें कोणतेंही काम दुसऱ्यावर

याप्रमाणें आहे
क्षण परिणाम
चाचून तिला
ऊन तिला
ठेवण्यालेला है
काहीं
क्षणजे तूर्त पुरे आहे असो. आतां तुला मी प्राचीन काळच्या महान् महान् साधु व विचारी पुरुषांनीं स्त्रियांच्या वागणुकीविषयीं वगैरे कांहीं वचनें लिहून ठेविलीं आहेत, त्यांपैकीं कांहीं येथें लिहून हे पत्र पुरें करितों:—

ढकलूं नये. त्याचप्रमाणें आपली कोणतीही वस्तू अव्यवस्थित ण तीं कोणी केव्हांच उचलून घेऊन जाईल. जेव्हां कोणी ी बोलत असतील, तेव्हा आपण त्यांपासून दूर व्हावें; आणि तीं आपसांत काय बोलत होतीं याची विचारपूससुद्धां करूं नये; किंवा तीं आपणाविषयींच कांहीं बरें वाईट बोलत होतीं, असेंही समजूं नये. सासवासुनांची हल्लींची स्थिति आह्मां लोकांत मोठी लाजिरवाणी आहे. इतकेंच नाहीं, तर ती सुधारल्याविना आमच्या स्त्रियांची हल्लींची गुलामगिरीची अवस्था दूर करून त्यांस योग्य पदास चढविणें अथवा आमची गृहस्थिति सुधारणें हें अशक्य आहे. यास्तव आह्मांमधील सर्व सुशिक्षित पुरुषांनीं आणि स्त्रियांनीं सासूसुनांचा हा दुष्ट व निंदाकारक संबंध बदलण्याविषयी निकरानें यत्न केला पाहिजे. प्रत्येकानें आपापल्या कुटुंबांत याविषयीं निश्चयपूर्वक उद्योग केला

"प्रिय भाषण करणें हाच स्त्रीचा मोठा पराक्रम आहे.

"स्त्रियांच्या अंगीं मर्यादा असणें हें मोठें भूषण आहे.

"जी प्रीतीनें मधुर भाषणें भ्रताराजवळ बोलते ती स्त्री योग्य, आणि मुलांस शिक्षा लाविते तो बाप योग्य

"लज्जा आणि मर्यादा मुख्यत्वेंकरून स्त्रियांच्याठायींच फार शोभतात.

"स्त्रियांस ईश्वरानें मधुर कंठ दिला आहे, तो भांडण्याकरितां दिला आहे असें नाहीं. आणि त्यांस गर्विष्ठ होण्याकरितां अबला केलें आहे असें नाहीं ह्मणून त्यांनीं गर्व आणि भांडण करूं नये.

"जी स्त्री माहेरीं शिक्षेंत नसते, आणि सासरच्याही धाकांत नसते ती दुर्गुणी होते.

"स्त्रीनें लहानपणीं आईच्या शिक्षेंत, मोठेपणीं नवऱ्याच्या आज्ञेंत, आणि म्हातारपणीं मुलांच्या आश्रयानें राहून चालावें.

"कुलीन आणि सुशील अशी पत्नी ज्यास मिळेल तोच खरा भाग्यवान् होय

"नवरा बाहेरून घरीं आला असतां त्यास उभें राहून मान देणें, त्याच्याशीं नम्रपणें भाषण करणें, त्याची सर्व प्रकारची तरतूद ठेवून त्याजबद्दल अंतः

रणांत पूज्यबुद्धि ठेवणें, तो निजल्यावर आपण आपण उठणें इत्यादि गोष्टी स्त्रियांत अवश्य असाव्य

"पतीवर प्रीति करणें, चाकरमाणसांवर दया करणें वागणें, जावांवर लोभ ठेवणें, वडिलांचा मान राख असतां त्याच्या अंगावर चवताळून न जातां त्यास आनंदवृत्तीनें असणें, हीं चांगल्या स्त्रीचीं लक्षणें होत.

"नवऱ्याच्या आज्ञेशिवाय घराबाहेर पाऊल ठेवणें ह्मण वर पाय देतें असें जीस वाटतें, जीस आपलें घर सोडून ह्मणजे एकाद्या दुसऱ्या देशांत गेलें असें वाटतें, जिचें हंसणें खिदळणें एकाद्या धनलोभ्याच्या द्रव्यासारिखें दुसऱ्या कोणाच्या दृष्टीस पडत नाहीं, आणि जीस आपल्या पतीशिवाय दुसऱ्या पुरुषांकडे पाहणें हें महत्संकटाप्रमाणें वाटतें, ती स्त्री कुलीन जाणावी.

"एकाद्या कृत्यांत योग्य सल्ला देणारी अशी हुशार, संसाराचें काम दक्षतेनें व झटून करणारी, अनेक प्रकारचीं पक्वान्नें करून नवऱ्यास सुग्रास भोजन घालण्यास समर्थ, आपल्या प्रेमभरित भाषणानें त्याचें श्रम अंतःकरण आनंदित करणारी, धार्मिक आणि क्षमाशील, अशी षड्गुणवती स्त्री सुखदायक होय.

"सदोदित नीटनेटकी व निर्मळ राहून गोड व थोडें बोलणारी, नवऱ्याचे आज्ञेत वागणारी व त्याच्या सेवेंत दक्ष अशी स्त्री कोणास आनंद देणार नाहीं?

"ज्याची बायको कुरूप, घाणेरडी आणि भांडखोर आहे, त्याच्यासारखा दुःखी प्राणी कोणी नाहीं.

"पंक्तींत एकाला एक दुसऱ्याला दुसरें असें वाढणारी, नवऱ्याशीं कपट करून त्याच्याशीं खऱ्याचें खोटें व खोट्याचें खरें करणारी, घरांतील पदार्थ चोरून विकणारी, आणि मुलांवर कमी प्रीति करून मुलींवरच विशेष लोभ करणारी अशी स्त्री दुःशीला होय.

"मैना व कोकिळा यांचा सुस्वर हेंच त्याचें रूप; कुरूप मनुष्यास विद्या हेंच रूप; तपस्वी लोकांस क्षमा हेंच रूप; आणि स्त्रियांस त्यांचें पातिव्रत्य हेंच रूप होय.

"पंडित हे अनेक प्रकारच्या विद्यांनीं शोभतात, राजे पराक्रमानें शोभतात, श्रीमान् योग्य दानानें शोभतात, आणि कुलीन स्त्रिया लज्जेनें शोभतात.

असो. तुर्त एवढींच वचनें लिहून हें पत्र पुरें करितों. आणि शेवटीं प्रिय हिरे, मी तुला इतकेंच सांगतों कीं, हें पत्र तूं प्रत्यहीं निदान एक वेळ तरी नियमानें वाचीत जावेंस. असें केल्यानें या पत्रांतील उपदेश तुझ्या सतत डोळ्यांसमोर राहील. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

"तुझें सतत कल्याण इच्छिणारा,

विश्वासराव.

याप्रमाणें बापाकडून आलेलें पत्र पाहून हिराबाईच्या मनावर विलक्षण परिणाम झाला; व तो खऱ्या कळवळयानें लिहिलेला मजकूर वाचून तिला आनंदाचा गहिंवर आला; आणि डोळे अश्रूंनीं भरून येऊन तिला पराकाष्ठेचें रडें कोसळलें. पण कोणी पाहील ह्मणून तिनें तो आलेला हुंदका आंतल्या आंत दाबून टाकला. नंतर तें पत्र तिनें मोठ्या काळजीनें आपल्या दागिन्याच्या पेटींत ठेविलें, व त्या दिवसापासून ती तें पत्र प्रत्यहीं न विसरतां एकदां वाचून त्यांतील सद्बोधाचें मनन करीत असे.

प्रकरण आठवें.

सासुरवास.

लग्न होऊन हिराबाई सासरीं प्रथमच येऊन राहिली अस ल्याकारणानें तिचें मन फार उदास असे. याचें कारण उघडच आहे कीं, एकदम आईचें घर सोडून तिला नव्या लोकांत व नव्या घरांत रहावें लागलें. बापाच्या घरीं असतां तिला जी मोकळीक व स्वतंत्रता होती तिचा लवलेशही या ठिकाणीं मिळेनासा झाला. सासरचीं व शेजारचीं माणसें तिच्या हरएक गोष्टीकडे व रीतीभाती कडे बारकाईनें पाहत असत. कोणी तिच्या तोंडाकडेच न्याहळून पाहत; कोणी तिच्या केसाच्या लांबीवरच टीका करीत, कोणी ती आंबाडा कशी बांधिते याकडेच नजर ठेवीत; कोणी तिच्या उंचीकडेसच पाहत; कोणी दागदागिने, व कोणी चोळी लुगडें यांविषयीं बोलत. जेवावयास बसली कीं तिनें घांस किती मोठा घेतला, तोंड किती उघडलें, तोंडांत घालतांच तो गिळला, किंवा चावून गिळला; चालते वेळीं पदर कसा घेते, निऱ्या कशा खोंवते, निजावयास गेली केव्हां व उठली केव्हां, या सर्वांविषयीं तिजवर नजर असे. हा सर्व प्रकार तिच्या लक्षांत येऊन अशा स्थितींत रहाण्यापासून तिला पराकाष्टेचें दुःख होत असे. पण ती जात

हुशार व बुद्धिमान् असल्यामुळें या सर्व गोष्टींत ती उत्तम प्रकारें कसोटीस उतरली; व तिची सर्व चालचलणूक सासरच्या लोकांस आवडली. ती बोलूं लागली तर उगाच फार बडबड करीत नसे, किंवा फार कमीही बोलत नसे. त्यामुळें ती वाचाळ, मुखस्तंभ, गर्विष्ठ किंवा दुर्मुखलेली नाहीं, अशी त्यांची खात्री झाली. त्याच-प्रमाणें तिचें जेवणेंखाणें माफक असून तिचें निजणेंउठणेंही बेताबाताचें होतें. अधाशासारखें खाखाखाल्लें, किंवा एकदां जमि-नीस अंग लागलें कीं आठ आठ दहा दहा तास निजून राहिलें, असें तिच्याकडून कधींच होत नसे. पहांटेस उठून घरांतील झाडलोट वगैरे करण्याची तिला माहेरींच संवय असल्यामुळें तिला तें काम सासरीं मुळींच जड जात नसे. कांहीं तरी काम करावयास असल्यावांचून तिला चैनच पडूं नये, असा तिचा स्वभाव होऊन गेला होता. तेव्हां अशी मुलगी कोणास प्रिय होणार नाहीं?

नवी सून आली ह्मणजे कांहीं दिवस शेजारपाजारच्या मुली तिजभोंवतीं जमत असतात. त्याप्रमाणें हिराबाईजवळही पहाव्या तेव्हां पांच दहा मुली असत. पण हिराबाईनें त्यांपैकीं एकी-बरोबरही मैत्री केली नाहीं. एकादी मुलगी सारा दिवस तिजजवळ बसून राहिली तरी तिणें असें ह्मणूं नये कीं, "बाई, तुह्मीं आपल्या घरीं जा." तसेंच एखादी मुलगी एक दिवस मुळींच न आली तरीही ती विचारीत नसे कीं, "बाई, काल तुह्मीं कोठें होतां किंवा आलां कां नाहीं?" याप्रमाणें सासरच्यांस आवडेल अशा रीतीनें शेजारच्या मुलींशीं हिराबाईकडून वर्तन होत असल्यामुळें त्या मुली हळूहळू येतनाशा झाल्या. कांहीं हलक्या घराण्यांतील मुलींचें लक्ष कांहीं मिळण्याजोगें असेल तें काढून घेण्याकडे असतें. त्यांनीं

जेव्हां पाहिलें कीं, आपणांस हिच्याकडून कांहीं मिळावयाचें नाहीं, तेव्हां त्या हळूहळू तिजकडे येण्याच्या बंद झाल्या.

हिराबाईनें पहिल्यानें आपली नणंद शांताबाई हिजबरोबर स्नेह जोडला. शांताबाई जात्या शहाणी मुलगी असल्यामुळें थोड्याशा लाडीगोडीनें तिजबरोबर तिचें अनायासें संघटण पडलें. सारा दिवस ती अगदीं हिराबाईजवळ असे. हें पाहून एक दिवस तिच्या आईनें तिला झटलें.

"कां ग शांते, याच भावजईवर तुझी एवढी माया, आणि मोठे भावजईचें तुला दर्शन देखील नको, याचें कारण काय?"

शांता०—आई, ती कीं नाहीं जेव्हां तेव्हां मला वाईट शब्द बोलते, व माझ्याशीं भांडते. तिचें मला नांव देखील नको. आणि ही माझी धाकटी वहिनी मजवर फार प्रीति करिते.

या प्रकारें शांताबाई अनुकूळ झाल्यावर हिराबाईस आपले सर्व मनोरथ शेवटास नेण्यास सोपें पडलें. प्रथम तिजकडून तिनें सर्व कुटुंबाची व पेठेची हकीकत विचारून घेतली. त्याचप्रमाणें ज्या गोष्टी प्रथमतः लाजेमुळें आपण होऊन विचारण्यास तिला धीर होत नसे, त्या मोठ्या युक्तीनें शांतेकडून तिनें काढून घेतल्या. ती शांताबाईस हरएक कामांत मदत करीत असे. शांताबाईस नेमून दिलेलें काम वेळांत वेळ काढून ती आपण होऊन करीत असे. संध्याकाळ झाली कीं शांताबाईच्या हातचा कापूस घेऊन तिला वाती वळून द्याव्या; घरांत शाकभाजी आणली असेल ती नीट निवावी, आणि धुऊन चिरून द्यावी. शांताबाईचे व घरांतील माणसांचे कपडे शिवून द्यावे; सासूसाठीं व नवऱ्यासाठीं विडे करून ठेवावे. असें करतां

करतां पुढें ती स्वयंपाकघरांत जाऊन स्वयंपाकाचें काम पाहूं लागली. त्या कामांत तर ती इतकी सुगरीण होती कीं, कांहीं दिवस लोटल्यावर हिराबाईच्याच धोरणानें सर्व स्वयंपाक होऊं लागला. स्वयंपाकांत हिराबाईचा हात शिरला तेव्हांपासून घरांतिल जेवण उत्तम प्रकारें होंऊं लागलें; आणि सर्वजणांची तिच्यावर ममता बसत चालली. आणि मग असें होई कीं, ज्या दिवशीं हिराबाईला कांहींतरी कारणामुळें स्वयंपाकाच्या कामांत सल्ला मसलत घ्यावयास फावत नसे, त्या दिवशीं भोजन कोणासही आवडूं नये. ज्या त्या जिनसास सर्व मंडळी नांवें ठेवी.

आपल्या लोकांत सासवासुनांचें कधीं नीट पडावयाचें नाहीं, असा साधारण नियम आहे. हिराबाईच्या अंगीं न आवडण्यासारखे व भांडणास कारण होतील असे गुण मुळींच नव्हते. असें होतें तरी ह्या ठिकाणीं तिचा चांगुलपणा व कर्तृत्व हींच भांडणास कारण झालीं. घरांत ठकी नांवाची एक मोलकरीण होती ती इतकी वरचढ झाली होती कीं, तिच्या शिवाय घरांतिल काडी सुद्धां हालत नसे. कपडालत्ता, दाणागोटा इत्यादि सामानसुमान बाजारांतून आणण्याचें काम सर्व तिच्या हातीं असे. एकादा दागिना करावयाचा असला तर तें काम तिलाच सांगत असत. फार तर काय, पण एकादे वेळीं कर्ज काढावयाची जरूर लागली तर तेंही तिच्याच मार्फत काढीत असत. सारांश सांगावयाचें काय कीं, ठकी ही एकाद्या मोठ्या कर्त्या पुरुषाप्रमाणें त्या घरचा सर्व कांहीं कारभार चालवित असे. जेव्हांपासून हिराबाईनें स्वयंपाकाच्या कामांत हात घातला, तेव्हांपासून प्रत्येक गोष्टींत ठकीची ठकबाजी उघडकीस येऊं लागली. एके दिवशीं वांगीं चुलींत भाजत असतां हिराबाई स्वयंपाकघरांत बसली

होती. वांगीं हवीं तशीं भाज़ून तयार झाल्यावर त्यांस दहींमसाला लावायाची वेळ आली. तेव्हां हिराबाईनें झटलें:

"ठकू मावशी, दहीं कसें आहे तें मला पाहूं दे तर खरें कदाचित् तें आंबट असलें तर भरीत बिघडेल."

मोलकरणीनें थोडेंसें दहीं काढून हिराबाईच्या हातावर ठेवलें. तें तिनें चाखून पाहिलें तों पराकाष्ठेचें आंबट. किती दिवसांचें होतें कोण जाणे !

"अरे राम ! किती आंबट तरी दहीं हें ! हें तर भरिताच्या अगदींच उपयोगी नाहीं. मावशे, जलदी जाऊन दुसरें एक पैशाचें चांगलें ताजें गोडें दहीं आण."

ठकी—काय झणतेस मुली ? पैशाचें दहीं ! पैशाच्या दह्यानें ग काय होणार याला ? हें जें दहीं तूं आंबट झणतेस तें एक आण्याचें आहे बरें !

हिराबाई—(आश्चर्य पावून) मावशे, माहेरीं मी वांग्यांचें भरीत करीत असें. त्या वेळीं कीं नाहीं, नेहमीं रोजच्या भरितास फार तर दोन पईचें दहीं मी मागवीत असें. झणून त्या मानानें पैशाचें दहीं याला पुरेल असें समजून मीं तुला सांगितलें.

ठकी—मुली, तूं आपल्या पेटेचा हिशोब इकडे सांगूं नको. कुठें मंडयी आणि कुठें शुक्रवार पेठ ? जी वस्तु मंडयींत एका पैशाला मिळते ती येथें चार पैसे दिले तरी मिळणार नाहीं. ही मेली पेठ उजाडनगरी झणतात कीं नाहीं तशी आहे. नेहमीं प्रत्येक वस्तूचा मेला दुष्काळ. कोणती वस्तु झणजे वेळेवर पाहिजे तर मिळेल असें नाहीं.

हिराबाई—(जेवणास उशीर होत होता झणून म्हणाली) बरें,

मावशे, जेवढ्याचें आणलें पाहिजे तेवढ्याचें तरी जाऊन लवकर घेऊन ये.

हिराबाई ही इतकी भोळी नव्हती कीं, मोलकरणीच्या म्हणण्यावर ती विश्वास ठेवील. ती मनांत पक्कें समजून राहिली कीं, येथें कांहीं तरी काळेंबेरें आहे. पई दोन पईचा फरक असता तर कांहीं चिंता नव्हती. एकाच शहरच्या दोन निरनिराळ्या पेठा, किंचित् परस्परांपासून लांब असल्या म्हणून भावांत एवढा मोठा फरक असेल हें तिला मुळींच खरें वाटलें नाहीं. म्हणून त्या दिवसापासून हिराबाई तिच्या पाळतीवर राहूं लागली. दुसरे दिवशीं ठकीनें खायाचीं पानें आणिलीं, तीं पाहून हिराबाई म्हणते:

'मावशे, तूं तर बाई अगदीं हिरवीं पानें आणतेस. त्यांस कांहीं चव ना गोडी. बकरीकरितां चारा आणतात कीं नाहीं तो तरी यांहून बरा असतो. आतां तर थंडीचे दिवस आहेत. पानांस कांहीं तोटा नाहीं. चांगलीं चांगलीं कळीदार पिकलेलीं पानें पाहून आणीत जा.

ठकी—मुली, पिकलेलीं कळीदार पानें तर पैशास पांच मिळतात, आणि येथें तर दररोज पन्नास पाऊणशें पानांचा फन्ना उडणार, तेव्हां कळीदार पिकलेलीं पानें आणून कसा निभाव लागेल?

हें त्यांचें बोलणें चाललें आहे तों हिराबाईच्या माहेरची मोलकरीण सखी ही तिचा समाचार घेण्याकरितां तेथें आली. तेव्हां हिराबाईनें तिला विचारिलें:

'सखे, आतांशा पानें कशीं मिळतात ग?'

सखी—पैशास सोळा मिळतात.

हिराबाईनें पेटी उघडून दोन पैसे सखीच्या हातावर ठेविले आणि म्हटलें:

'जातर, या दोन पैशांचीं याच पेठेंतील तांबोळ्यापासून पानें घेऊन ये बरें.'

नंतर सखी जाऊन चांगलीं कळीदार व पिकलेलीं पानें दोन पैशांचीं ४० आणलीं. हें पाहून:

हिराबाई–वः, हिनें तर बाई मंडयीपेक्षां दर पैशामागें चार पानें अधिक आणिलीं.

सखी–आका, ही पेठ तर शहरचें नाकें आहे. सर्व बागबगिचे या पर्वतीच्या बाजूस असल्यामुळें जें कांहीं शहरांत जातें तें याच रस्त्यानें जात असतें. यामुळें कीं नाहीं भाजीपाला, फळफळावळ इत्यादि सर्व कांहीं वस्तु या पेठेंत मंडयींतल्यापेक्षां थोड्याबहुत स्वस्त मिळतात. कांहीं किंचित् महाग असतील तर ते बटाटे व कांदे. ते इकडे होत नसल्यामुळें दुकानदार लोक ते मंडयींतून आणतात. पिकलेलीं पानें ह्मणून दोन पैशाचीं चाळीस मिळालीं. हिरवीं घेतलीं असतीं तर ६० सुद्धां मिळालीं असतीं.

हिराबाई–(हळूच) ही अवदसा ठकी प्रत्येक वस्तूंत अशी ठकविते यास काय करावें? सखे, तूं तरी बाई दोन चार दिवस येथें रहा. तुला येथें ठेवून घेतलें ह्मणून मी आईस सांगून पाठवतें. तेथचा कामधंदा कसा तरी दोन चार दिवस ती सांभाळून घेईल.

सखी–आका, तुह्मी सांगाल त्यास मी राजी आहें, मजकडून कांहीं ना नाहीं. मला कीं नाहीं तुमच्याजवळच रहाणें बरें वाटतें.

ह्याप्रमाणें पुढें ही सखीमोलकरीण चार दिवसपर्यंत तेथें राहिली. आणि तेवढ्या अवकाशांत हिराबाईनें घरांत लागणारी प्रत्येक वस्तू बाजारांतून विकत आणण्याचें काम तिला सांगितलें. त्यावरून

ठकी किती ठकबाजी करीत असे, हें स्पष्टपणें दिसून आलें. हा सर्व प्रकार हिराबाईनें अशा कांहीं चातुर्यानें केला कीं, त्याविषयीं सासूस किंवा दुसऱ्या कोणास तिनें कांहींच कळूं दिलें नाहीं. हिराबाई ही सुशील व दयाळू बायको असल्यामुळें त्या ह्याताऱ्या मोलकरणीची फजिती करणें तिला बरें वाटलें नाहीं.

या ठकीची गोष्ट अशी होती कीं, ती सतत पंचवीस वर्षें त्याच घरांत कामाला होती. तिचें लक्ष्य नेहमीं लुटण्याकडे असे. एक दोन दिवसांची गोष्ट असती तर चालून जाती, पण तिची दररोज कांहींना कांहीं तरी लबाडी उघडकीस आल्यावांचून रहात नसे. यामुळें तिला कैक वेळां घरांतून काढूनही लाविलें होतें. पण तिला काढलें कीं, ज्या वाणी उदमी वगैरे लोकांशीं तिच्या मार्फत उधारीचा व्यवहार केलेला असे, ते सर्व आपापल्या कर्जाविषयीं तगादा लावीत, आणि यामुळें तिला पुन्हा बोलावणें भाग पडे. या अशा घरच्या अव्यवस्थित कारभारामुळें ठकी दिवसेंदिवस अट्टल चोर व शिरजोर होऊन बसली होती. ती आपणास काय लागेल तें घरांतून सांगून सवरून राजरोसपणें तर घेईच; परंतु त्याशिवाय आणखी काय पाहिजे तें चोरीतही असे. त्याचप्रमाणें आपणास लागेल तो जिन्नस दुकानदारांकडून उधार घेऊन तो धन्याच्या खात्यावर ती लिहून ठेववीत असे. घरांत पुसाल तर प्राप्ति थोडी व खर्च मोठा मिजाशी मऱ्हाटेशाहीचा अशी स्थिति होती. खाण्यापिण्यांतच्चे सुमार उधळेपणा होत असे, यामुळें ज्याचें त्याचें कर्ज काढावें लागे; आणि हें सारें ठकीच्या हिमायतीवर मिळत असे. ह्मणून ती धडधडीत बोलून दाखवीत असे कीं, मी या घरांतून अशी तशी नाहीं निघावयाची; यांच्या घरादाराचें लिलांव करवून चार लोकांत यांची फजिती करवीन तेव्हांच निघेन. हिराबाई घरखर्चावर

अशी करडी नजर ठेवूं लागली तेव्हां तिचा ठकी अतिशय द्वेष करूं लागली. ती हरदमख्याली बायको होती. नाहीं नाहीं तीं कंवटाळे रचून हिराबाई, तिचा नवरा व सासू यांजमध्यें वैमनस्य उत्पन्न करण्याच्या प्रयत्नास ती लागली. ही मोलकरीण असें करील हा विचार हिराबाईच्या स्वप्नीं सुद्धां आला नव्हता. पुढें तिच्या असें लक्ष्यांत आलें कीं, ठकी ही घरची सर्व प्रकारें मुक्त्यार आहे. ती जीव गेला तरी आपली खोड ह्मणून सोडणार नाहीं, किंवा घरांतून निघणार नाहीं. मग उगीच हिजबरोबर कटकट करण्यांत कांहीं अर्थ नाहीं. पुनः आपल्या सासूला ठकीशीं कटकट केलेली आवडत नाहीं, उलटी ती आपणासच वाईट ह्मणते. हें पाहून हिराबाईनें स्वयंपाकघरांत जाऊन ठकीला स्वयंपाकाच्या कामांत मदत करण्याचें अगदीं बंद केलें. परंतु घरांतील मंडळीस हिराबाईच्या हातच्या जेवणाची गोडी लागली होती. त्यामुळें जेवणार मंडळीला पुनः वाईट जेवण मिळूं लागलें. कोणी ह्मणत, "काय ही भाकरी मातीसारखी कचकचीत लागते," कोणी ह्मणत, "या वरणांत मीठ तरी किती हें? कालवलेला घांस तोंडांत घालावा तों ओकारी येते."

प्रकरण नववें.

मोलकरणीचें कंवटाळ.

पावसाळ्यांत एके दिवशीं सत्यवंतास गरम गरम भजीं खावींशीं वाटून तीं बायकोकडून करविण्याविषयीं त्यानें ठकीला सांगितलें. आलीकडे हिराबाई ही कांहीं तरी काम घेऊन माडीवर जाऊन बसत असे. तूप पीठ वगैरे भज्यांस लागणारें साहित्य तयार करून ठकी सत्यवंतास ह्मणाली :

'बाळासाहेब भज्यांचें सर्व साहित्य तयार केलें आहे. आतां माडीवर जाऊन धाकट्या बाईसाहेबांस बोलावून आणितें.'

असे ह्मणून माडीवर गेली, आणि हिराबाईला भज्यांविषयीं कांहीं एक न सांगतां खालीं येऊन सत्यवंतास ह्मणाली :

'बाळासाहेब, वैनीबाई ह्मणतात कीं, माझें डोकें दुखतें.'

ठकीला साधा डाळभात देखील बरोबर करतां येत नसे. तेव्हां तिला भजीं कसचीं करतां येणार? सर्व जिनसांची तिनें माती करून टाकली. सत्यवंतानें भजीं मोठ्या आशेनें करण्यास सांगितलीं होतीं. तीं अशीं वाईट झालेलीं पाहून तो अगदीं खिन्न झाला. नंतर माडीवर जाऊन पाहतो तों हिराबाई आपल्या चोळीवर वेलबुट्टी काढीत आहे. तेव्हां तो मोठ्यानें चरफडून ह्मणाला कीं,

'वेलबुट्टी काढतांना तुझें डोकें दुखत नाहीं, आणि भर्जी करावयास सांगितलें त्यास डोकें दुखण्याचें निमित्त काय? बरें आहे, याची चांगली आठवण असूं दे.'

याप्रमाणें हिराबाईविषयीं सत्यवंताच्या मनांत कुविचार उत्पन्न होण्याचा हा पहिलाच प्रसंग होय. अशाच लहान लहान गोष्टींमुळें प्रथमतः स्त्रीपुरुषांमध्यें बेबनाव उत्पन्न होतो; आणि आपल्या लोकांत लहानपणीं लग्न करून टाकण्याची चाल असल्यामुळें त्या वयांत दीर्घदृष्टि, सारासार विचार, तारतम्यज्ञान हीं मुळींच नसतात. एकादी गोष्ट जरा मर्जीविरुद्ध झाली तर नवऱ्यानें बायकोवर संतापावें किंवा तिला मारझोड करावी, आणि बायकोनें तोंड दडवून कोठें कोना कोपऱ्यांत जाऊन रडत बसावें, असें वारंवार होत असतें. मनांत एकदां थोडासा विकल्प आला ह्मणजे तोच दुसऱ्या कित्येक कारणांमुळें हळूहळू वाढत जाऊन मोठमोठ्या भांडणांस कारण होतो. आणि असें झालें ह्मणजे मग उभयतांमध्यें प्रेम किंवा भीड मर्यादा मुळींच रहात नाहीं, आणि तीं सर्व आयुष्यभर एकमेकांचीं वैरी होऊन बसतात. असें न होऊं देण्याचा उत्तम व सोपा उपाय ह्मटला ह्मणजे मुलगे व मुली अज्ञान व अल्पवयी आहेत तोंपर्यंत त्यांचीं लग्नें न करितां त्यांस चांगलें शिक्षण द्यावें; आणि तीं सुशिक्षित व प्रौढ झालीं ह्मणजे त्यांच्या इच्छेनुरूप जोडपें पाहून त्यांचा विवाह करावा तें चांगलें.

सत्यवंताच्या अंगीं जर दीर्घदृष्टि, प्रौढपणा व सारासार विचार असता, तर खचित त्यानें आपल्या बायकोस ठकीनें सांगितलेली चहाडी कळविली असती, व तिचें त्यावर काय ह्मणणें आहे तें ऐकून घेता; मग जर ती दोषी आहे अशी त्याची खात्री झाली असती तरच तो

तिजवर रागावता. नवऱ्याचा आपणावर विनाकारण राग झाल्यामुळें हिराबाईस फार वाईट वाटलें. ती ह्मणाली, "देवा, आतां कसें करूं! भांडणाचें चिन्ह दिसत आहे. सासूकडे पाहावें तर तिचीही चर्या बरी दिसत नाहीं. देवा, मज दुबळीवर काय प्रसंग हा!" हें संकट कसें टाळावें या विवंचनेंत ती होती, तोंच ठकीनें दुसरें एक कुभांड रचलें. तें कोणतें ह्मणाल तर, त्या वेळीं दसऱ्याचा सण जवळ आल्याकारणानें सगुणाबाईनें ठकीस ह्मटलें:

"कायग ठकू, दसऱ्याचा सण तर जवळ येऊन ठेपला. त्यासाठीं एव्हांपासूनच तयारीस लागलें पाहिजे; नाहीं तर सगळ्याच गोष्टींची एकदम घाई होऊन जाणार. लहान मोठ्या सर्व भांड्यांस कल्हई करून घेतली पाहिजे; घरास चुना लाविल्यास वर्ष होत आलें, तर तोही लावून घेतला पाहिजे; तेव्हां तूं तिलकचंद मारवाड्यापाशीं जाऊन त्याजकडून कसेंही करून दसऱ्याच्या खर्चास ह्मणून पन्नास रुपये मागून आण, ह्मणजे झालें.

ठकी—आईसाहेब, हा इतका खर्च पाहिजे कशास? धाकट्या वहिनी तर आपल्या माहेरीं जाणार आहेत. आणि मी ऐकतें कीं, त्यांचा बापही घांटावरून येथें येणार आहे. तो आला ह्मणजे अर्थातच सणासाठीं मुलीस घेऊन जाईल. मी आणखी असेंही ऐकिलें आहे कीं, धाकट्या वहिनींच्या मनांतून आपल्या बापाबरोबर निपाणीस जावयाचें आहे. तेव्हां त्या जर गेल्या तर बाळासाहेबही तिकडे जातील असें वाटतें; कारण सुई तिकडे धागा. मग तुह्मा एकादोघांच्या जिवांकरितां घराला चुना व भांड्यांस कल्हई पाहिजे कशाला? तो मेला तिलकचंद तर हल्लीं गर्वानें इतका फुगून गेला आहे कीं आल्या दिवसा त्याचा मनुष्य मागच्या देण्यासाठीं

दारावर येऊन तगादा लावित उभा आहेच. असें असतां तो आणखी कर्ज कसें देईल?

हें ऐकून सगुणाबाईस फार खेद झाला. कारण खेद होण्याजोगीच ती गोष्ट होती. तिचा नवरा कोल्हापुरास गेला त्या दिवसापासून त्यानें परत घरचें तोंड कसें तें पाहिलें नव्हतें. मनांत आलेंच तर कधीं वर्ष सहा महिन्यांनीं तो कांहीं तरी घरखर्चास पाठवीत असे. मोठा मुलगा बुद्धिवंत यास अवघे बारा रुपये मिळत. घरांत पुरुष म्हणावयास कायते दोघे मुलगे. आणि त्यांपैकीं एकजण जवळून गेला म्हणजे मग काय? घर उजाड! पाहायाला नको.

सगुणा०—अग ठकू, विजयालक्ष्मी माहेरीं जाणार हें खरें का?

ठकी—आईसाहेब, खरें कीं खोटें तें ईश्वरास ठाऊक, पण मी जें ऐकलें तें सांगितलें.

सगुणा०—बरें, ठकू, तूं हें कोठें ऐकिलेंस व याविषयीं कोण बोलत होतें, तें तर सांगशील?

ठकी—तिच्या माहेरची मोलकरीण सखी हिजपाशीं मी परवां दोन रुपये उसने मागितले, तेव्हां ती म्हणाली, "मी रुपये दिले असते पण मला लौकरच घाटावर जावयाचें आहे." मग तिचें माझें बरेंच बोलणें झालें; त्यावरून मला समजलें कीं, निपाणीस जाण्याची सर्व तयारी होऊन आतां तहशीलदार येण्याची मात्र खोटी आहे. ते आले कीं दसऱ्याच्या पूर्वी एकदोन दिवस सर्वजणें येथून निघणार. आतां हें खरें कीं खोटें याची तुम्हीच चौकशी करा. पाहा. काय आईसाहेब, आलीकडच्या तिच्या रंगाढंगांवरून तुम्हांस कळत नाहीं काय? पाहिल्यानें ती कशी घरचा कामधंदा पहात

होती; आणि आतांशा आपली माडीवर जाऊन बसते, खालीं उतरेल तर शपथ; ती आपल्या बापाला पत्रांवर पत्रें पाठवित असते. ' त्यांत तरी दुसरें काय असणार?

हें ऐकतांच सगुणाबाईच्या अंगाचा तिळपापड झाला. इतक्यांत सत्यवंत कोठें बाहेर गेला होता तो घरीं आला. त्यास तिनें आपलेजवळ बलाविलें, आणि ह्मणाली:

"बाळा, मी तुला कांहीं विचारितें तें तूं खरें खरें सांग हो.

सत्यवंत—आई मी तुजकडून कांहीं छपवीन अशी गोष्टच मुळीं माझ्या ध्यानीं मनीं नाहीं.

मग सगुणाबाईनें जें कांहीं मोलकरणीकडून ऐकलें होतें, तें सर्व त्यास सांगितलें.

सत्यवंत—आई, खरें ह्मणशील तर याविषयीं मला कांहीं एक ठाऊक नाहीं; व ती मजजवळ याविषयीं मुळींच कांहीं बोललीही नाहीं.

सगुणा०—चल लबाडा! माझ्या पुढें असला लपंडाव नको. अरे ही गोष्ट तुला माहीत नाहीं असें होईल तरी कसें?

सत्यवंत—आई, तुला मी ह्मणतों तें खरें वाटत नाहींना? तुझी शपथ; याविषयीं मला कांहीं एक ठाऊक नाहीं.

सगुणा०—(ठकीकडे पाहून) काय ग, ए ठके, तूं कीं नाहीं मला जी गोष्ट सांगितलीस ती सत्यवंत ह्मणतो आपणास अगदीं माहीत नाहीं, हें कसें?

ठकी—(सत्यवंताकडे पाहून) बाळासाहेब, तुमच्या घरकरणीनें जायाची तर तयारी केली आहे. याविषयीं कांहीं संशय नाहीं. कदाचित् तुमच्याजवळ ती चोरीत असेल. ती कांहीं फटकळ तोंडाची ऋष्यादाबाई नव्हे, कीं जें तोंडास येईल तें बोलून सोडायचें. मग

त्यांत कोणाचीही अमर्यादा होवो, किंवा कांहीं होवो. ह्या तर नांवांच्या विजयालक्ष्मी! यांच्या पोटांत काय आहे तें कोणास कधीं कळावयाचें नाहीं बरें! मनांत एक आणि जनांत एक असें त्यांचें आहे. हें तुम्हीं पक्कें समजा.

सगुणा०—बरें, बाळा, ही गोष्ट खरी असली तर तुझें काय ह्मणणें आहे?

सत्यवंत—पण आई, ही गोष्ट खरी होईल कशी? उगाच खरी ह्मणण्यांत अर्थ काय? मला काय असें वेड लागलें आहे कीं, तुला टाकून मी जाईन? आणि तिला तरी असा काय माज आला आहे कीं, ती तुला विचारल्या पुसल्या खेरीज माहेरीं जाण्याच्या तयारीस लागेल? जा ग ठके, तिला इकडे बोलावून आण. मीच तिला प्रत्यक्ष विचारतों.

सगुणा०—ह्या अवदसे मोलकरणीच्या बोलण्यावर भरंवसा ठेवून उगाच तूं कीं नाहीं कांहीं तिच्याशीं भांडाभांड करूं नकोस. ही गोष्ट खरी ठरल्यास पुढें पाहतां येईल.

या प्रकारें ठकीमोलकरीण हिराबाईविषयीं तिच्या सासूच्या व नवऱ्याच्या मनांत किल्मिष उत्पन्न करण्यास नाना उपाय करीत होती. इतकें झालें तरी हिराबाईला ह्मणून कोणी प्रत्यक्ष विचारून खऱ्याखोट्याचा निकाल केला नाहीं. तथापि बाहेरील सर्व चिन्हांवरून ती मनांत पक्कें समजली होती कीं, आपल्या विषयीं यांच्या मनांत कांहीं तरी वांकडें आहे. घरांत काय ती तेवढी शांताबाई मात्र हिराबाईच्या पक्षाची होती. तिच्या अपरोक्ष ज्या गोष्टी घरांत होत त्या सर्व शांताबाई येऊन लगेच तिला सांगत असे. ह्यामुळें ठकीचें हें वर सांगितलेलें सारें कंवटाळ तिला कळलें होतें. परंतु

हिराबाई ही इतकी उतावळी बायको नव्हती. ती मोठी विचारी होती. तिची इच्छा अशी होती कीं, हा ठकीचा खोटसाळपणा परस्परच उघडकीस यावा.

ताराबाई एके दिवशीं आपल्या बहिणीस ह्मणाली:

"ह्या मोलकरणीमुळें आपला या घरांत टिकाव लागणार नाहीं."

हिराबाई—तूं मुळींच चिंता करूं नको. पहा तर खरी तिची कशी दशा करून टाकतें ती. ती आतांशा फार चढून जाऊन घरांत कलह माजऊं पाहते आहे. मी नांवाची हिराबाई होईन तरच तिचें डोकें अशा ठिकाणीं मारवीन कीं, जेथें पाणी पाहिजे तर एक थेंब सुद्धां मिळणार नाहीं; आणि असें करून टाकीन कीं, तिला या पेठेंत पुनः कधीं येण्यास सुद्धां पंचाईत पडेल.

ताराबाई—पण ती तर आमच्या सासूबाईंच्या अगदीं गळ्यांतला ताईत आहे. तिच्याविरुद्ध एक शब्दही बोललेला त्यांना खपायाचा नाहीं.

हिराबाई—ताई, मी तें सगळें जाणून आहें. अग, तिचा बडेजाव कोठवर चालणार आहे? सासूबाईंच्या नजरेस तिच्या लबाड्या आल्यावर त्या तिला एक घटका सुद्धां घरांत राहूं देणार नाहींत, समजलीस? त्या आपल्या साध्या सरळ स्वभावाच्या आहेत ह्मणून ह्या लुच्चीचा घरांत खेळखंडोबा चालला आहे.

ताराबाई—हिरे, तूं ह्मणतेस तें सारें खरें. पण आज इतकीं वर्षें ती घरांत राबत असून तिची लबाडी सासूबाईंच्या नजरेस आली नसेल? मला तर बाई नाहीं हें खरें वाटत.

हिराबाई—तें कांहींही असो, पण मी तिचा खेळखंडोबा आतां केल्याशिवाय राहणार नाहीं असा करून टाकतें.

इकडे ठकीच्या मनांत हिराबाईचा चांगलाच सूड उगवावयाचा होता. ह्मणून वर सांगितल्याप्रमाणें खोटें नाटें सांगूनही तिची तृप्ति झाली नाहीं. तिनें आणखी एक तिसरेंच कुभांड रचलें. तें असें: एके दिवशीं तिलकचंद मारवाडयानें ठकीस आपल्या दुकानावरून जातांना पाहून तिला थांबवून ह्मटलें: "ठकी, आज्य घणा दिवश झ्याला, मजे गरिबच्या हिसाब किताबनीं कांई याद अशूं दे हो."

ठकी–कायरे, लाला,आतांशा तूं तर आपला मला चिडवायाचा धंदाच मांडला आहेस? मला पाहून जेव्हां तेव्हां तुझ्या पोटांत उकळतें वाटतें? मी बिचारी गरीब माणूस. माझ्याजवळ एका फुटक्या कवडीची देखील माया नाहीं. असें असतां आमच्या धन्याच्या देण्याबद्दल तुझा उगाच माझ्या पाठीशीं तगादा कां ह्मणून?

तिलकचंद–ये तमे शूं वात करते कीं माझ्यो साथ संबंध न्हाय! दुकान उपरथी तर तमे माल घेऊनशी जाते. हातशी हात पिछाणते हाय, आन् ह्मनुशी हामी तर तुह्मांला पिछाणते हाय, अने तमचे साख उपर अवडा माल धिरले हाय, न्हाय तर अमे घरवाल्याशी काय पिछाणते?

ठकी–अरे लाला, जरा शुद्धीवर ये. असें वेडयासारखें करूं नकोस. काय बिचारा भोळा! अरे आज शेंकडो रुपये व माल जो तूं मला दिलास तो कांहीं माझी दौलता खंडोगणती पाहून दिला नाहींस. माझी तर नाहीं जाहगीर कीं नाहीं दौलत. हे पैसे मजपासूनच जर घेणार असलास तर जा आतांच घे कसे घेणार ते. का माझे वाडे उभे आहेत ते लिलांव करणार आहेस? का सरकारांतून पेनशन येतें तें जप्त करणार आहेस?

तिलकचंद—(थोडासा दचकून) आज्य तमे कोणाची साथे भांडण करूनशी आलेला जणाते. जरा शांग तर खरे शूं वात हाय ती. बायजी शाबनीं शूं ह्मटला ईया न्हाना बाळाशाबने घुस्सा ह्याले, हायतरीकाय? वारूं इकडे येऊनशी जरा बश तर खरा.

असें ह्मणून दुकानावर मुलगा बसला होता त्याजपाशीं एक पैसा देऊन त्याला त्यानें सांगितलें:

"ज्या छोकरा जलदीथी जरदो नखावीनें सारा मज्याना करावी बे बिडा लाव." (ठकी बसली तेव्हां तिजकडे वळून) "ठके, मने ज्यणाते के आज तमे खरे खरे कोणाची साथ तरी भांडण करूनशी आले हाय."

ठकी—राम! राम! असें ह्मणूं नकोस. भांडणाचें तोंड काळें. अरे तूं मलाच कर्जाबद्दल दरडावून विचारलेंस ह्मणून मी तुला खरें होतें तें सांगितलें. खऱ्यास काय मरण आहे?

तिलकचंद—ये तर तमे ठीक वात शांग्लेश. व्यवार तर मालकाचे साथे हाय. पण ते तमचे हातशी होते कीं न्हाय. न्हाय हामचे नामनी चिट्ठी काय पतरी, तमे मालकच्ये नांमशी जे काय मागते ते मे तमाला आपते.

ठकी—हां; या गोष्टीस मी कोठें नाहीं ह्मणतें? मी जें घेऊन गेलें आहे तें हजारांत तर काय पण लाखों माणसांत सांगून देईन. त्यास मी भीत नाहीं. आणि आमच्या बाईसाहेबही बिचाऱ्या कधीं तरी तक्रार करतात का, कीं अमुक असें कां आणलेंस किंवा अमुक कां आणलें नाहींस ह्मणून?

तिलकचंद—ठके, बाईशाब तर लई सारा अने अमीर माणश हाय. वाव्हा, कुठे त्येची वात? (असें ह्मणून हळूच विचारतो) न्हा-

नले बहूजीच्या कशा हाल हाय? पोताचे मोठी बेनच्या पगला पर हाय कीं जूदे तरेच्या मिजाज हाय.

ठकी—तें काय पुसूं नकोस. लाला झांकली मुठ सवा लाखाची. मुलगी तर मोठ्या कुळांतली आहे. पण बाई मोठी चिकू. एकदमडीचा सौदा असला तरी ती तो चारदां परत करवील. तरी देखील तो मनास यावयाचाच नाहीं. पण तिच्या अंगीं विद्या, हुन्नर, भीड, मर्यादा वगैरे गुण बाकीच्या बायकांपेक्षां अधिक आहेत. स्वयंपाककामांत तर तिची मोठा हुशार आचारीही बरोबरी करूं शकणार नाहीं. त्याचप्रमाणें शिवण्यांतही ह्मणशील तर शिंपी व शिंपिणी तिजपुढें हात टेंकतात. पण या सगळ्यास काय आग लावायाची आहे, लाला? पहिल्या पहिल्यानें मजबरोबर ती हुमरीतुमरी करूं लागली होती. पण लाला, तुला तर ठाऊक आहेच कीं, माझें काम कसें चोख असतें तें. शेवटीं तिला आपली वटवट आटपून गुपचूप बसावें लागलें. बाईसाहेब तर मनाच्या शुद्ध आहेत; त्या आहेत ह्मणून तर त्या घरांत लक्ष्मी नांदत आहे; आणि ह्मणून आमच्यासारख्या गरीब विश्वासू बायकाही त्यांच्या आश्रयानें राहिल्या आहेत. पुष्कळ लोकांनीं बाईसाहेबांस मजविषयीं नाहीं नाहीं तें सांगितलें. पण त्यांच्या ह्मणून मनांत मजविषयीं कधीं काळेबेरें आलें नाहीं. येवढा त्यांचा माझ्यावर विश्वास व लोभ आहे.

तिलकचंद—मे ऐकला हाय कीं न्हानी बहुजीला पुस्कल हुंडा मिळाला हाय. तर ही खरी वात काय?

ठकी—छे रे लाला. अगदीं कमी मिळाला आहे. मोठ्या बहिणीपेक्षांही कमीच.

तिलकचंद—तर आ पुस्कल ताजुबची वात हाय. तेच्ये लगनच्ये

वखते तर तेच्या बाप इश्वासराव तहशीलधार झ्याला होता, तेव्हां मोठी छोकरी करता वधारे देवाच्ये त्येला लाजम होते.

ठकी—बिचाऱ्या तहशीलदाराचा यांत कांहीं अन्याय नाहीं बरें, लाला! त्या बापुड्यानें तर आपणाकडून होईल तेवढी तयारी केली होती. पण हीच अवदसा! आईबापांपाशीं हट्ट घेऊन तिनें पुष्कळ हुंडा कमी करविला.

तिलकचंद—हा जर येम हाय तर मोठी बेनच्या जेवा ये पण जुदुं घर करशेल.

ठकी—निराळें घर तर काय, पण ही तिच्याहूनही जबरदस्त आहे. मोठी सून कर्कशा आहे खरी; पण मनाची मोठी चोख आहे. तशी ही नाहीं. ही तोंडापुरती मात्र गोड गोड, पण मनांत विषापेक्षांही कडू. कोणीं जीव देऊन जरी काम केलें तरी तिच्या मनास ह्मणून यावयाचें नाहीं. बोलेल तीही कशी तोंडावर एक आणि मनांत एक. ही बायको एक दिवसही कोठें टिकावयाची नाहीं. आतांशा तर काय बापाकडेस घांटावर जाण्याच्या तयारीस लागली आहे.

तिलकचंद—कोळापुराशी अमणा कांहीं कागद पतर आले हाय कीं न्हाय.

ठकी—कांहीं नाहीं. बाईसाहेब तर दररोज वाट पाहत आहेत. तिकडे काय झालें आहे तें कळतच नाहीं. घरांत खर्चाची तर फारच ओढघस्त आहे. तशांत आणखी दुसरा खर्च येत आहे. दोन-चार दिवसांपूर्वी बाईसाहेब मला ह्मणत होत्या कीं, तिलकचंदापाशीं जाऊन दसऱ्याकरतां पन्नास रुपये कसें तरी करून आण.

तिलकचंद—(कर्जाचें नांव ऐकतांच दचकला आणि ह्मणाला)

आगला रुपयाचें वाट बाईशाब करशेल तेवा बीजा रुप्याची वात. हाथां तर माज्या भागीया मानते न्हाय, बाईशाबासनी च्यांगला समज्याऊनशी शांघ की जिकुडशी बनून येयल तिकुडशी रुपिया आनूनशी देसेल. न्हाइ तर माज्या खालींपिली बदनाम होशेल.

ठकी–तुझे रुपये कीं नाहीं फिटण्याची सध्यां तर मुष्कीलच दिसते. पुढें काय होईल तें कांहीं सांगवत नाहीं. बाईसाहेबांस तर ज्याच्या त्याच्या कर्जाच्या तगाद्यानें जीव नकोसा होऊन गेला आहे.

तिलकचंद–मने बिज्या मागनारच्ये शाथ काय लागते वळगते हाय? आमचे दुकानच्या हिशाब बाईशाबांनीं फेड करवा पडशेल, मे तर बाईशाबचे घरचे लई मुलाजा राखते हाय, पन माज्ये भागीया छदामीमल्ल मोज्या मानते न्हाय, अगर त्येला ही वात ठाऊक पडशेल तर आज्य फरयादी ठोकूनशी देशेल.

ठकी–ही गोष्ट मी बाईसाहेबांस पाहिजे तर कळवीन; पण कळवून तरी कांहीं वळेल असें दिसत नाहीं. कारण घरची थोडी बहुत मला माहिती आहे. फिर्यादी करा किंवा टांच काढा. दोन्ही सारखींच. रुपये ह्मणून मिळावयाचे नाहींत. घरांत कांहीं ऐवज असता तर येवढें कर्ज कशाला झालें असतें?

इतक्या गोष्टी करून ठकी तेथून चालती झाली, आणि बाजार करून घरीं गेली.

सगुणाबाई–(बाजारांतून येण्यास उशीर लागलासें पाहून) ठके, तूं बाई बाजारांत एकदां गेलीस ह्मणजे कीं नाहीं, पाठीमागची काळजी तुला मुळींच नसते. पाहा बरें, दिवस किती वर आला

आहे तो. आतां चुलींत आग केव्हां पेटेल आणि जेवण केव्हां तयार होईल? तूं तर बाई मला पुरे पुरे केलेंस.

ठकी—मेल्या तिलकचंदाशीं तंडण्यांत माझा खोळंबा झाला. मेला नेहमीं येतां जातां माझ्याशीं कटकट करतो. आज तर त्यानें मला अगदीं भंडावून सोडलें. मी झटलें कीं, तूं माझ्या पाठीस असा हात धुवून कां लागलास? जीव कां देतोस? जरा चार दिवस धीर धर. कोल्हापुराहून हुंडी येऊं दे, झणजे तुझा जो कांहीं मागलापुढला हिशोब झाला असेल तो चुकवितां येईल. मेला आतांशा कीं नाहीं तो फारच चढून गेला आहे. भर बाजारांत कीं हो त्यानें माझी फजिती केली.

सगुणाबाई—आजच त्याच्या डोक्यांत इतकें वेड कां शिरलें बरें? आज पुष्कळ वर्षें त्याच्याशीं आपला व्यवहार आहे; व आमच्याकडून त्याच्या कर्जाचा निकाल वेळोवेळां होत गेला आहे. पण तो इतका हातघाईवर कधींच आला नव्हता बाई.

ठकी—आईसाहेब, कोणी दुसरा छदामीमल्ल नांवाचा शेट त्याच्या दुकानाचा भागीदार झाला आहे. त्या मेल्यानें ही इतकी घाई चालविली आहे. ज्यांच्याकडे कांहीं येणें आहे त्यांजपासून तो उभ्यांउभ्यां वसूल करीत चालला आहे; आणि जे देत नाहींत त्यांजवर फिर्यादी मांडण्याचा त्यानें सपाटा मांडला आहे. तिलकचंदानें तर हात जोडून तुह्मांस सांगितलें आहे कीं, आतां माझा कांहीं इलाज नाहीं. या दोन चार दिवसांत कसेंही करून रुपयांची फेड करून टाका; नाहीं तर तो नांवाचा छदामीमल्ल आहे. तो फिर्याद केल्या शिवाय सोडणार नाहीं.

सगुणाबाई—(हें ऐंकून फारच भिऊन) ठके, कोल्हापुराहून

तर फार दिवस कांहीं एक वर्तमान कळत नाहीं. तेव्हां तिकडून हुंडीची आशा कुठली? तिलकचंदानें खरोखरीच फिर्याद मांडली तर मग कसें होईल? माझ्या जवळ तर इतके दागदागिनेही नाहींत कीं ते विकून त्याचें कर्ज फेडीन. त्यानें फिर्याद मांडल्यावर पैसे देण्यांत काय शोभा? कारण मग सर्व शहरांत आमची बेअब्रू होईल. ह्मणून जा लौकर गाडी घेऊन ये. भवानी पेठेंत माझी बहीण दुर्गाबाई ही रहाते, तिच्याकडे जातें, आणि पहातें तिच्याकडून कांहीं मदत झाली तर.

ठकी—आईसाहेब, तो फिर्याद तर केल्यावांचून रहाणारच नाहीं. त्यानें एकदां मनावर घेतल्यास त्याला फिर्याद करावयास किती उशीर? दुर्गाबाईपाशीं तरी रुपये मिळतीलसें वाटत नाहीं. कारण त्या स्वतःच सध्यां अडचणींत आल्या आहेत.

सगुणाबाई—अग, तें खरें. पण आतां येथें आपलें दुसरें कोण आहे!

ठकी—(जवळ जाऊन हळूच) धाकट्या वहिनीबाईंच्या हातांत सोन्याचे गोट आहेत ते त्या देतील तर हें अरिष्ट टळेल. ते गोट कोठें तरी महिन्याच्या बोलीनें गहाण ठेवून तिलकचंदाचा सध्यां अर्धा तरी हिशोब चुकवूं. तोंपर्यंत कोल्हापुराहून हुंडी येईलच. ती आली ह्मणजे ते सोडवितां येतील.

सगुणाबाई—छे, वेडी आहेस तूं. तुझी असली मसलद मला नाहीं बाई पसंत. पुन्हा असें कांहीं कधीं बोलूंसुद्धां नकोस. माझ्या घरादाराचें लिलांव झालें किंवा माझा प्राण गेला, तरी सुनेचा दागिना मी कदापि मागणार नाहीं.

ठकी—आईसाहेब, मी आपलें भोळेपणानें ह्मटलें. गोट आप-

णांस विकावयाचे थोडेच आहेत? एरवीं तरी महिन्याचे महिने ते पेटींत पडून राहिलेले असतात, ते एक महिना सावकाराच्या येथें राहिले झणून काय झालें?

सगुणाबाई—ठके, तुला समजत नाहीं. नवीनच लग्न होऊन घरीं आलेल्या सुनेजवळ डागिना मागण्यास मला बाई मुळींच प्रशस्त वाटत नाहीं. संभाळ हो, ही गोष्ट कोणापाशीं पुन्हा बोलूंसुद्धां नकोस. सुनबाईच्या कानावर तर ही गोष्ट मुळींच जातां कामा नये.

ठकी—शांताबाई तर आतां येथें नुकतीच बारीच्या आड उभी होती. तिनें आमचें सारें बोलणें ऐकलें आहे. पण ती अजून लहान आहे. तिला असल्या गोष्टी कळत नाहींत.

सगुणाबाई—बरें जा लवकर गाडी घेऊन ये. दुर्गीजवळ जातें तर खरी. मग तेथें जसा विचार ठरेल तसें करितां येईल.



प्रकरण दहावें.

कर्जदारांचा तगादा.



मागील भागांत सांगितल्याप्रमाणें सत्यवंताची आई गाडींत बसून भवानीपेठेंत गेल्यावर शांतेनें सर्व कांहीं घडलेला प्रकार आपल्या धाकट्या वहिनीस जाऊन सांगितला. तेव्हां अशा प्रसंगीं हिराबाईस दुसरें तर कांहीं सुचलें नाहीं. पण तिनें तत्क्षणीं आपला वडील भाऊ रमाकांत यास खालीं लिहिल्याप्रमाणें निपाणीस पत्र लिहून पाठविलें :—

मुक्काम पुणें आश्विन वद्य ९.

प्रिय बंधु रमाकांत दादा यांस,

शिरसाष्टांग दंडवत, विनंती विशेष.

फार दिवस होत आले तरी मजकडून तुह्मांस वेगळें पत्र गेलें नाहीं, याबद्दल मला फार वाईट वाटतें. निराळें पत्र न पाठविण्याचें कारण इतकेंच कीं, इकडील जो कांहीं मजकूर कळविण्यासारखा असतो, तो बाबांस पत्र पाठवून नेहमीं कळवीत असतें. हीं माझीं पत्रें आपल्या पाहण्यांत येतच असतील, असें समजून तुह्मांला निराळें पत्र पाठविण्याची आवश्यकता मला आजपर्यंत दिसली नव्हती. तेव्हां त्याबद्दल राग नसावा. आतां, हें पत्र लिहिण्यास असे कांहीं कारण झालें आहे कीं, तें तुह्मांस कळविल्यावांचून गतिच नाहीं. मी सासरीं आलें त्या दिवसापासून आजपर्यंत मला वाईट वाटण्याजोगी कोणतीही गोष्ट घडून आली नाहीं, आणि आकास वारंवार कागाळी करावी लागत असे. तशी कागाळी करण्याचा प्रसंगही मला आजपर्यंत आला नाहीं. सर्वजण जवर प्रीति करीत असतात, ह्यामुळें मी नेहमीं सुखांत आहें. पण घरांत ठकी

ह्मणून एक मोलकरीण आहे. तिजपासून मला फार त्रास होतो. तसा त्रास मोठ्या कर्कशा सासूकडून किंवा अगदीं तुसडया स्वभावाच्या नणंदेकडूनही सहसा होणार नाहीं. ही ठकी ह्या घरांतली फार जुनी मोलकरीण आहे. घरसंसाराचें एकंदर काम ही पाहत असते. ह्या बायकोवर घरांतील माणसांचा फारच विश्वास आहे. तिचा संशय मुळींच कोणासही येत नाहीं. ह्यामुळें ती फारच शेफारली आहे; आणि ज्या त्या गोष्टीमध्यें लबाडी करण्यांत तिचा अगदीं हातखंडा झाला आहे. घरांतील एकंदर देवघेव तिच्या हातीं असल्यामुळें तर तिला हवें तसें लुटण्यास फावतें. सध्यां कर्ज तर इतकें झालें आहे कीं, तें फिटण्याची मुळीं आशाच दिसत नाहीं. घरांत कोणत्याही रीतीची व्यवस्था किंवा शिस्त कसली ती मुळींच नाहीं. मी कांहीं दिवस घरचें कामकाज पहात होतें; त्या वेळीं मला त्या मोलकरणीची पुष्कळ ढकबाजी दिसून आली. पण माझ्या नजरेस तिचें तें कृत्रिम येऊन मी तिला जिथेंतिथें फजीत करूं लागलें. तेव्हां ती माझा द्वेष करूं लागली. दररोज नाहीं नाहीं तीं कुभांडें मजवर रचून कलह माजविण्याचा तिचा उद्योग चालला आहे. आजदिवसपर्यंत भांडणापर्यंत मजल येऊन ठेपली नाहीं. परंतु ही मोलकरीण केव्हांना केव्हांतरी भांडण लावून देईल. असें मला आतां मोठें भय वाटत आहे. ही बाई घरांतून निघणेंही सध्यां फार कठीण दिसत आहे. कारण बाजारचा सर्व सौदा हिच्या मार्फतीनें उधार मिळतो, त्यामुळें तिला काढावयाचें नांव घेतलें कीं, ही लगेच जाऊन ती कर्जदारांचे कान फुंकते. बरें कर्जाचा कांहीं हिशोब तरी आहे ह्मणावा तर तोही नाहीं. देण्याघेण्याचा सर्व व्यवहार तिच्या हातून चाललेला असतो. तेव्हां माझ्या मनांत असें आहे कीं, सर्व लोकांचा हिशोब चांगल्या रीतीनें होऊन तो एकदां कागदावर मांडला जावा; व दर महिन्यास अमुक रकमेपर्यंत खर्च करावा असा कांहीं निर्बंध व्हावा. असें केल्यावर मग कर्ज कसेंतें मुळींच काढावयाचें नाहीं, असा ठराव व्हावा. इतकीं जें कांहीं कर्ज असेल त्याची दरमहा अमुक हप्ता देऊन फेड करावी, अशी व्यवस्था व्हावी. असा जर कांहीं प्रकार होईल तरच ही मोलकरीण घरांतून निघेल. एरवीं कांहीं इलाज दिसत नाहीं.

दसऱ्याच्या सणासाठीं बाबा इकडे येणार आहेत असें समजतें; त्यांजबरोबर तुह्मींही इकडे यावें; आणि येतेवेळीं कोल्हापुरास जाऊन मामंजीस हा सर्व प्रकार कळवावा; व एक पंधरवड्यासाठीं त्यांसही बरोबर घेऊन याल तर फार चांगलें होईल. कारण, आपण सर्वजण इकडे आलां ह्मणजे मी जें लिहिलें आहे तें खरें आहे किंवा नाहीं, याचा तुह्मांस प्रत्यक्ष अनुभव येईल. मी हें पत्र मोठ्या संकटाच्या वेळीं लिहीत आहें. कारण कोणीएक सावकार फिर्याद करण्यास उठला आहे; व मोलकरणीच्या मतें माझ्या हातांतील गोट गह्राण ठेवून त्याची समजूत करावी असें आहे.सासूबाई याची काय तोड करावी याविषयं

विचार करण्याकरितां दुर्गाबाईच्या येथें गेल्या आहेत. या शिवाय कांही विशेष मजकूर ह्या प्रसंगी मला सुचत नाहीं. कळावें लोभ असावा हे विज्ञापना.

तुमचें नित्य प्रिय इच्छिणारी बहीण,

हिराबाई.

वरील मजकुराचें पत्र हिराबाईनें आपल्या भवाास पाठविलें, व नंतर आपल्या मावशीस सांगून धाडलें कीं, "आह्मीं घरांत एकट्या आहों, याकरितां कसेंही करून दोन दिवसांसाठीं सुमती-आकास आमच्याकडे पाठवावें. ती माहेरीं आली आहे, असें मीं कालच ऐकिलें."

त्याच दिवशीं संध्याकाळीं सुमती येऊन पोंचली आणि गाडींतून उतरूत घरांत येतांच ह्मणाली.

"काय ग हिराबाई, तुझ्यासारखी अधीर बायको मी कोठें पाहिली नाहीं बाई. मी मावशीचें पत्र ना ग मागितलें होतें? तें तूं पाठविलें नाहींस कसें? आजकाल बाई माणसाला धीर नाहीं. तुला वाटलें असेल कीं, मी तें पत्र खाऊनबिऊन टाकीन, नाहीं का?

हिराबाई–पत्र केव्हांग मागाविलेंस? आणि कोणाबरोबर? हा काय बाई लटकाच कांहीं तरी आरोप मजवर करिते आहेस तूं?

सुमती–हातचे कांकणास आरसा नको. ही पाहा येथें ठकी आहे काय ग ठके, गेल्या शुक्रवारीं तूं माझ्या घरीं आली होतीस तेव्हां तुला मी काय सांगितलें होतें?

ठकी–होय बाई, तुह्मीं पत्र आणावयास सांगितलें होतें पण मेली मला आठवणच राहिली नाहीं. या घरच्या कामधंद्यापुढें मला कांहीं सुचत नाहींसें झालें आहे.

हिराबाई–(हळूच) पण कांहीं चोरावयाचें असलें किंवा कांहीं

सगुणाबाई तेथें थोडे दिवस राहिली. तेवढ्या मुदतींत ठकीनें बसल्या बसल्या आणखी एक नवीनच विभू रचला. तो फारच भयंकर व घाबरवून सोडण्यासारखा होता. तो असा:—

त्या सुमारास महाराणी विक्टोरिया साहेबांचे ज्येष्ठ चिरंजीव प्रिन्स आफ़् वेल्स हिंदुस्थान पाहण्याच्या उद्देशानें पहिल्यानें मुंबईस येऊन तेथून पुण्यास यावयाचे होते. ह्मणून पूर्वीपासूनच सर्वांनीं आपआपल्या घराची आणि सभोंवतालील जाग्याची साफसफाई करण्याची म्युनिसिपल कमिशनराकडून ताकीद मिळाली होती. दरएक पेठेंत व दरएक गल्लीकुचींत जाहिरनामा लावण्यांत आला होता कीं, सर्व घरवाल्यांनीं आपापल्या गल्ल्या, बोळ व घरें साफसफा ठेवावीं व घरास चुना लावावा. जर कोठें केरकचरा आढळण्यांत येईल तर तेथल्या घरवाल्यांस जबरदस्त दंड होईल. असा एक जाहिरनामा पेठेच्या नाक्यावरील घराच्या भितीस लावला होता. शुक्रवारीं ठकीनें रातोरात जाऊन तो हळूच तेथून काढून आणला, व आपल्या घराच्या दरवाज्यावर लावून दिला. नंतर मोठ्या पहांटेस उठून ती सगुणाबाईस ही हकीकत कळविण्याकरितां भवानी पेठेंत गेली; आणि घराचें कवाड उघडलें नव्हतें तोंच तिनें मोठ्यानें हांक मारली. सगुणाबाईनें हांक ऐकतांच ठकीचा शब्द ओळखला आणि घाबऱ्या घाबऱ्या ह्मणाली, "अरे धांवा आधीं, जाऊन कवाड उघडा. ठकी अशा वेळीं कां धांवत आली आहे नकळे." (ठकी आंत आल्यावर) ठके, काय झालें ग? सगळीं खुशाल आहेत ना?

ठकी—आईसाहेब, होय सगळीं खुशाल आहेत; पण आपल्या घरास नोटीस कीं पोटीस काय ह्मणतात ती लागली आहे. मला वाटतें कीं, तिलकचंदाच्या फिर्यादीबाबद त्यांत कांहीं तरी असावें.

सगुणाबाई–(बहिणीस) बाई दुर्गे, मी जातें. त्या तिलक चंदाच्या हातां पायां पडून पाहतें त्यास कांहीं दया आली तर. एरवीं दुसरा उपाय मला कांहीं एक ह्या वेळीं सुचत नाहीं.

दुर्गाबाई–आका, मला मोठें वाईट वाटतें बाई तुझी ही तारंबळ पाहून. ही माझ्या गळ्यांतील सरी घेऊन जा. ही गहाण ठेवून काम होत असेल तर बरेंच झालें, नाहीं तर विकून टाक.

सगुणाबाई–बरें, सध्यां ही सरी मी घेऊन जातें. पण त्याचे रुपये फार झाले असतील; ते येवढ्याशा सरीनें फिटतील असें मला वाटत नाहीं.

दुर्गाबाई–येवढ्यानें भागण्यासारखें नसेल तर त्यांनीं झटकें आहे कीं, मी कोठून तरी दुसऱ्या सावकाराकडून रुपये कर्जी आणून तुझी गरज पुरवितों. पण तूं जाच; उशीर करूं नकोस. अंमळशानें ते उठतील; उठले कीं तुझ्याकडे पाठवून देतें.

सगुणाबाई तेथून निघून आपल्या घरीं आली. अंगणांत येतांच दरवाज्याकडे पाहते तों तिला ठकीनें सांगितल्याप्रमाणें खरोखरच नोटीस चिकटवलेली आहे. ती पाहून तिला मोठी धास्ती पडली; आणि अगदीं खिन्न होऊन घरांत जाऊन बसली. सासू आली असें ऐकतांच हिराबाई माडीवरून खालीं आली, आणि तिची ती चर्या पाहून म्हणते:

" सासुबाई, आपण आज इतक्या उदास कां दिसतां बरें?"

सगुणाबाई–अगे उदास होऊं नको तर काय करूं? सावकार नोटीस देऊन तर चुकला. आतां फिर्यादीस काय उशीर? रुपयांची तजवीज कोठेंच होत नाहीं. दुर्गेकडे गेलें होतें पण ती बिचारी कोठून देणार? आतां काय करूं!

हिराबाई–सासुबाई, आपण यांची अगदीं काळजी करूं नका. तिलकचंदानेंच जर नोटीस लाविली असेल तर कांहीं चिंता नाहीं. कारण सुमतीबाईच्या सासरीं त्याची देवघेव आहे. तुम्हीं येथून गेलां त्या दिवशींच ती येथें आली होती. जातेवेळीं ती मला पक्कें वचन देऊन गेली आहे कीं, मी कसेंही करून याविषयीं तिलकचंदास मामंजींकडून सांगवीन; व तो नच ऐकेल तर त्याच्या रुपयांची फेड कोणत्याही रीतीनें करवीन. म्हणून सासुबाई, आतां उगाच काळजी वाहून काय उपयोग? अशानें जिवाची मात्र वाट लागेल. तुकारामानें म्हटलें आहे:—

"आलिया भोगासीं असावें सादर ॥ देवावरी भार घालूनियां ॥"

सगुणाबाई–तूं म्हणतेस हें सगळें खरें. पण सुमती तर अजून मुलगी आहे; तिला बिचारीला सरकारदरबारच्या गोष्टी काय माहीत? आपण तिच्या भरंवशावर रहाण्यांत कांहीं अर्थ नाहीं.

हिराबाई–होय, सुमती वयानें लहान आहे खरी; तरी ती बोलल्याप्रमाणें करील अशी माझी पूर्ण खात्री आहे.

येणेंप्रमाणें सासूसुनेचें बोलणें चाललें आहे तों सुमतीचा धाकटा भाऊ उमाकांत वाडीच्या फाटकाशीं येऊन हांका मारूं लागला. त्याची हांक ऐकतांच हिराबाई म्हणाली:

"पाहा, हा उमाकांत आला. खचित कांहीं तरी निरोप घेऊन तो आला आहे."

असें म्हणून शांताबाईस फाटक उघडण्यास सांगितलें. तिनें जाऊन तें उघडलें व उमाकांत आंत आला. तो आंत आल्यावर हिराबाईनें त्यास विचारलें:

"उमाकांता येवढ्या सकाळीं कोठेंबा?"

उमाकांत—आकानें मला तुझी सासू बाहिणीच्या येथून आलं किंवा नाहीं तें पाहण्यासाठीं पाठविलें आहे. बाबानें तिलकचंदास बोलावून आणलें होतें; त्यास त्यानें वरेंच धमकावलें. त्यावरून त्यानें माफी मागितली व फिर्याद करणार असें सहज थट्टेनें ठकी जवळ बोललों होतों, असेंही तो ह्मणाला. हें तुला कळवावयास आकानें मला सांगितलें आहे.

" हें ऐकून सगुणाबाईस कांहींसा धीर आला. पण हिराबाईस त्याचें मोठें आश्चर्य वाटलें. ती मनांत ह्मणाली, तिलकचंद फिर्याद करणार असें जर थट्टेनें बोलला होता, तर ही नोटीस कशी लागली? तेव्हां ह्या नोटिशींतच कांहीं तरी कपट असावें. कारण मी घरांत प्रत्यक्ष बसलें असतां मला या नोटिशीविषयीं कांहीं कळलें नाहीं हें कसें? सरकारांतून नोटीस लागली असती तर कोर्टाचा शिपाई किंवा चपरासी कोणी तरी येऊन त्यानें घरच्या माणसांस हांक मारली असती. असा विचार करून शांतेस ह्मणाली, "शांताबाई, जा पाहूं, दरवाज्यावर कागद चिकटवला आहे तो तूं हळूच काढून आण."

शांतेनें तो काढून आणून हिराबाईपाशीं दिला. तिनें तो वाचून पाहिला, तों त्यांत गल्याकुच्या साफसफा ठेवणें व घरादारांस चुना लावणें याविषयीं मजकूर असून तिलकचंदाचें नांवही नव्हतें. त्यावरून ती मनांत पक्कें समजली कीं, ही ठकीशिवाय दुसरे कोणाचीही ठकाबाजी नव्हे. हिराबाईनें या गोष्टीविषयीं सासूस कांहीं एक कळूं दिलें नाहीं. पण तिनें तिला नोटीस वाचून दाखविली तेव्हां तिची खात्री झाली कीं, आतां कोणत्याच प्रकाची तूर्त काळजी वहाण्याचें कारण नाहीं.

प्रकरण अकरावें.

खर्चाची काटकसर.

मागील भागांत सांगितल्याप्रमाणें मारवाडयाच्या फिर्यादीचें अरिष्ट टळल्यावर एक दोन दिवसांनीं सगुणाबाई मोलकरणीस ह्मणूं लागली कीं:—"दसऱ्याचा सण जवळ आला आहे; व तो गेला कीं त्याच्या पाठोपाठ वीस दिवसांनीं दिवाळी येईल. हे दोन्ही सण खर्चाचे आहेत. घरांत कांहीं तरी चालीप्रमाणें केलें पाहिजे; नाहीं तर मुलांना त्या दिवशीं दुसऱ्याच्या तोंडाकडे पाहावें लागेल. कोल्हापुराहून कागदपत्र येण्याचें मुळीच बंद झालें. यास काय करूं? या काळजीनें माझा जिव रात्रंदिवस झुरणीस लागला आहे बाई.

ठकी—बाईसाहेब तो मेला द्वाड मारवाडी तर आपणांस आतां एक छदामही कर्जी देणार नाहीं.

हिराबाई—सासूबाई दिवाळीस तर अजून पुष्कळ दिवस आहेत. ईश्वर सर्वांची काळजी वहाणारा आहे. तेव्हां अर्थातच त्याच्या दयेनें तेथपर्यंत कोठूनना कोठून सर्व सुयंत्र होईल. सध्यां त्याची काळजी कशाला? दसरा मात्र जवळ आला खरा. त्यास फार तर आठ दिवस असतील. पण तो सण असा नाहीं कीं त्यांत ह्मणजे फारसा खर्च केलाच पाहिजे.

सगुणा०—अग मुली, माझ्या घरीं तर दर वर्षास हा सण आला कीं कमींत कमी निदान वीस रुपयांचा खर्च होतो. ह्या ठकीच्याच हातून सारा खर्च होतो. तिला विचारून पाहिनास.

हिराबाई—बापडे शंभर रुपये खर्च केले तरी नाहीं का चालणार? पण दसरा झटला झणजे कांहीं दिवाळीसारखा मोठा सण नाहीं; त्यांत अधिक खर्च लागणार तो कशाला?

सगुणा०—मुली तुला अजून घरखर्चाचा अनुभव नाहीं, झणून तुला असें वाटतें. आतां उद्यां सण आला झणजे पाहशील. ह्या सणांत आणखी एक मोठा खर्च आहे. तो कसला झणशील तर माझ्या सत्यवंतास चांगली बायको मिळावी झणून लक्ष्मीनारायणाला मी नवस केला होता, तो फेडला पाहिजे; आणि दिवाळींत तर तुझ्या एकट्या नवऱ्यासच पांच रुपये पाहिजेत. शिवाय शांतेस फटाक्याच्या पेट्या, बाहुल्या बुडकुल्या वगैरे जत्रेंतले जिन्नस घेऊन दिले पाहिजेत. सत्यवंताचा कीं नाहीं अजून पोरस्वभाव आहे तो आहे. निदान शें दोनशें चंद्रज्योती, पन्नास पाउणशें नळे, व वीस पंचविस फटाक्यांच्या पेट्या इतकें तो दिवाळींत जाळील तेव्हांच त्याची तृप्ति होईल. नाहीं तर माझा जीव तोडतोडून खाईल. आणि शांताबाई तर बाहुल्याबुडकुल्यांसाठीं रडूनरडून प्राण सोडील, पण ऐकावयाची नाहीं.

हिराबाई—आपल्या मनांत नवस फेडावयाचा आहे तर त्यास फार तर पांच शेर पेढे लागतील. आतां मोठी चिंता कायती दारूसामानाची व बाहुल्याबुडकुल्यांची, तर त्याविषयीं तिकडची व शांतेची मी समजूत करीन, सर्व कांहीं खर्च करायचें काम मजकडे सोंपवा झणजे झालें. पाहूं बरें किती खर्च होतो तो. कर्ज काढण्यासंबंधाची उगीच काळजी करूं नका.

हिंराबाई सासूकडे याप्रमाणें बोलून चुकली खरी; पण दारू-सामानावरून नवऱ्याचें मन कसें फिरवावें याविषयीं तिला मोठी चिंता पडली. शेवटीं तिनें अशी युक्ति योजली कीं, एक तर सहज गोष्टीवरून गोष्ट निघावी, आणि तिमुळें नवऱ्यास वाईट न वाटतां उलटा बोध व्हावा. एके दिवशीं सत्यवंताच्या समोर हिराबाई शांतेस चिडवून ह्मणाली:

"कसें काय शांताबाई, तूं दसऱ्यादिवाळीसाठीं काय काय बेत करून ठेवले आहेस?"

शांताबाई—वहिनी, त्यांत बेत ते कसले? दादा आपणाकरितां दारूसामान आणील तेव्हां त्याजबरोबर मलाही त्यानें थोडेंसें आणलें ह्मणजे झालें. बाहुल्याबुडकुल्या तर दर वर्षीं आई मला घेऊन देतच असते.

हिराबाई—असलें निरुपयोगी सामान आतां नाहीं हो आणायचें? शांते, नळे चंद्रज्योतींत कायग मौज असते; मात्र घरीं दारीं धराची घाणच घाण होऊन जाते.

शांताबाई—वहिनी, नळा सोडला ह्मणजे मनाला नाहीं का मौज वाटत? व: काय ते तारे, कसे एका मागून एक उडत जातात!

हिराबाई—आपल्या पेठेंत त्या दिवशीं हजारों नळे सुटतील, तेच आपण ओटीवरून किंवा माडीवरून पाहावे ह्मणजे झालें.

शांताबाई—व:, वहिनी काय सांगतेस पण! लोक आपल्या घरीं जेवतात तें पाहूनच राहावें; स्वत: कांहीं खाऊं पिऊं नये होय?

हिराबाई—पण शांते, तुला दारूकाम सोडते वेळीं भीति नाहीं का ग वाटत?

शांताबाई–भीति वाटते तर खरी; पण माझें दारूकाम मी स्वत: काढें उडवितें.

हिराबाई–तर मग मी ह्मणतें तसेंच झालें. दारूकाम दुस-ऱ्यांनीं लावलेलें जसें तूं पाहतेस तसेंच पेठेंतले लोक लावतील तें पाहा ह्मणजे झालें. पाहा शांते, हा दारूचा खेळ कीं नाहीं फार वाईट आहे बाई; कां ह्मणशील तर यांत अंग भाजण्याची भीति फार असते. एकदां माझ्या माहेरीं एक मुलगी हातांत नळा घेऊन उभी असतां त्यावर दुसरीकडून एकाएकीं ठिणगी येऊन पडली आणि तो फुटला; तेव्हां काय विचारतेस! त्या बिचाऱ्या मुलीचे दोन्ही डोळे फुटून ती जन्माची आंधळी होऊन बसली. ह्मणून अशी मौज पाहावयाचीच असली तर ती नेहमीं फार लांब राहून पाहिली पाहिजे. बरें, शांते, सासूबाई हल्लीं किती काळजींत आहेत तें तुला माहीत नाहीं का ग?

शांताबाई–होय, हल्लीं ती उदास दिसते खरी.

हिराबाई–बरें, त्या अशा उदास कां दिसतात, याविषयीं तूं कधीं विचार केलास काय?

शांताबाई–नाहीं, उदास होण्याचें कारण मला मुळींच माहीत नाहीं.

हिराबाई–शांते, हीच का तुझी आईवरील प्रीति! तूं तर ह्मणत असतेस कीं, आईवर माझी फार प्रिति आहे.

शांताबाई–बरें, वहिनी, आई उदास कां असते, सांग पाहूं.

हिराबाई–याचें कारण इतकेंच कीं, तूर्त खर्चाची फार अड-चण आहे; आणि आतां सावकारही कर्ज देईनासा झाला आहे.

त्यामुळें त्यांना अशी चिंता लागली आहे कीं, उद्यां तूं नळेचंद्र-ज्योतींविषयीं हट्ट घेऊन बसलीस तर ते त्यांनीं कोठून आणून द्यावे?

शांताबाई—असें आहे तर मी नळेचंद्रज्योती, बाहुल्याबुडकुल्या कांहींच मागणार नाहीं, मग तर झालेंना?

हिराबाई—शाबास शांते, शाबास, यावरून तर तूं फार विचारी मुलगी आहेस असें दिसतें.

सत्यवंत, हातांत एक पुस्तक घेऊन तें वाचीत आहे असा डौल करून, ह्या सर्व गोष्टी हळूच कान देऊन ऐकत होता. हिराबाई जें कांहीं बोलली तें सारें वाजवी असल्याकारणानें त्याला तें पटलें. तो लागलाच माडीवरून खालीं उतरून आईपाशीं आला आणि ह्मणाला, "आई, तूं दसऱ्यादिवाळीच्या खर्चाच्या चिंतेंत आहेस ह्मणून ऐकलें. तर तूं आह्मांविषयीं कांहीं काळजी करूं नको. मला नळे, चंद्रज्योती वैगरे कांहीं नको. आणि शांताही बाहुल्याबुडकुल्यांविषयीं मुळींच हट्ट करणार नाहीं."

याप्रमाणें खर्चाची एक बाब नाहींशी होऊन लक्ष्मीनारायणास केलेला नवसही दोन रुपयांच्या पेढ्यांनीं खासा मजेनें फिटून गेला. लोकांच्यायेथें भेटी पाठवावयाचें काम हिराबाईनें आपल्याकडे घेतलें होतें. बाहेरून भेटीचें ताट आलें ह्मणजे ती तें लागलेंच दुसरीकडे पाठवून देई, व दुसरीकडून आलें ह्मणजे तें ती तिसरीकडे पाठवी, असें करून सर्व कांहीं व्यवस्था तिनें लावून दिली. आणि वरांतला पक्कान्नांचा खर्च दोन रुपयांत आटपून घेतला. ही काटकसर पाहून ठकीच्या तोंडांत मारल्यासारखें झालें. तिच्या पायांची तिडीक मस्तकास गेली. कारण कीं, दर वर्षीं बाहेरून भेटी येत असत तितक्या सर्व ती एकटी गट्ट करीत असे. शिवाय

घरांतून जी मेवामिठाई बाहेर जात असे, तींतून ती निम्मे अधिक काढून घेत असे.

दसऱ्याच्या सणासाठीं हिराबाईचा बाप विश्वासराव हा निपाणीहून घरीं आला होता. हा दसऱ्याच्या पूर्वी चार दिवस अगोदर आला होता. आपला बाप अमुक दिवशीं येणार हें हिराबाईस पूर्वीपासूनच माहीत होतें. ह्मणून त्याच्या भेटीस जाण्या-संबंधानें तिनें सासूस व नवऱ्यास पूर्वीच विचारून ठेविलें होतें.

विश्वासराव आल्याची बातमी हिराबाईस कळली तेव्हां ती ताराबाईस घेऊन तशीच गाडी करून माहेरीं गेली. बापानें त्या दोघींना पाहतांच पोटाशीं धरिलें, आणि आपल्या आवडत्या मुली पुष्कळ दिवसांनीं भेटल्यामुळें त्यास गहिंवर येऊन डोळे आंसवांनीं भरून आले. एकंदर खुशाली विचारल्यावर बाप हिरा-बाईस ह्मणाला :

"मुली तूं लिहिल्याप्रमाणें रमाकांत कोल्हापुरास गेला आहे. उद्यां किंवा परवां तुझ्या सासऱ्यासह तो येथें येऊन पोंचेल असें वाटतें. तिकडे गेल्यावर त्यानें पत्र पाठविलें आहे. त्यांत तो लिहितो कीं, तुझ्या सासऱ्याला कारभारी साहेबांकडून रजा मिळाली आहे."

हें ऐकून हिराबाईला मोठें समाधान वाटलें. नंतर विश्वासरा-वानें ताराबाईचें वाचून वगैरे घेतलें. तेव्हां ती चांगली हुशार झाली आहे असें त्याला आढळून आलें; आणि आपल्या सांगण्या-प्रमाणें तिनें लिहिणेंवाचणें शिकून स्वतांचें वर्तन सुधारलें, याबद्दल त्याला मोठा आनंद झाला; आणि तिच्यासाठीं कांहीं सोनें आणलें होतें त्याचे तिला डागिने करावयास दिले. ते देतांना

हिराबाईस एकादा डागिना हवा काय म्हणून विचारलें. तेव्हां तिनें आपणास आहेत तेवढेच पुरत म्हणून सांगितलें.

त्या आल्या त्या दिवसाची रात्र आणि दुसरा सगळा दिवस माहेरीं राहून संध्याकाळीं बापास विचारूं लागल्या कीं,

"बाबा, जर आपण आज्ञा द्याल तर आम्ही आज आपल्या घरीं परत जाऊं."

विश्वा०—मुलींनो आज मी कैक वर्षांनीं येथें आलों आहें, तर तुम्ही आल्यासारख्या चार आठ दिवस तरी रहा; आणि मग पाहिजे तर जा. मी तुमच्या सासुबाईस याबद्दल सांगून पाठवितों. ती कांहीं तुम्ही राहिलांत म्हणून रागें भरणार नाहीं.

हिराबाई—बाबा, आम्हांलासुद्धां तुमच्याजवळ चार दिवस तरी राहावेंसें वाटतें. पण मामंजी येण्याच्या अगोदर आम्हीं सासरीं जावें हें मला बरें वाटतें.

विश्वासराव—(विचार करून) होय, तूं म्हणतेस तेंही खरें आहे; बरें जा तर आज.

नंतर हिराबाई आणि ताराबाई बापाची आज्ञा घेऊन निघाल्या त्या सूर्यास्तापूर्वीं सासरीं येऊन पोहोंचल्या.

प्रकरण बारावें.

कर्जाची फेड.

दुसरा झाल्यावर तिसरे दिवशीं ऐन दोनप्रहरीं जेवणाच्या वेळीं सत्यवंताचे वडील माधवराव हे घरीं येऊन पोंचले. माधवराव हे कोल्हापुरकरांजवळ दुय्यम कारभारी होते. त्यांस दरमहा शंभर रुपये पगार मिळत असून शिवाय रहावयास घर सरकारांतून मिळालें होतें. रमाकांत हा हिराबाईनें लिहिल्यावरून कोल्हापुरास गेला होता, असें मागील प्रकरणांत सांगितलेंच आहे. त्यानें तेथें जाऊन हिराबाईचें पत्र माधवरावास दाखविलें. सुनेच्या हातचें पत्र पाहून माधवराव फार खुष झाले. आणि तिला पाहण्याची त्यांच्या मनांत उत्कंठा उत्पन्न झाली. एरवीं त्यांनीं कदाचित् रजा घेऊन घरीं येण्याची खटपट केली नसती.

लग्न झाल्यापासून हिराबाईनें सासऱ्याला कधींच पाहिलें नव्हतें; म्हणून माधवराव आलेले पाहून लाजेनें ती माडीवर जाऊन बसली होती. सगुणाबाई त्यांस अकस्मात् आलेले पाहून मनांत दचकली, आणि ते येण्याचा कांहीं संभव नसतां त्यांचें असें येणें कां झालें, या विचारांत ती पडली. नंतर जेवणखाण आटोपल्यावर इकडच्या तिकडच्या गोष्टी निघतां निघतां माधवराव आपल्या बायकोस म्हणाले:

"ऐकलेंस का, तुझ्या धाकटे सुनेनें मला इकडे कसें आणलें तें?"

असें म्हणून त्यानें तिच्या पत्राची व रमाकांत कोल्हापुरास गेल्याची सर्व कांहीं हकीकत तिला कळविली, आणि विजयालक्ष्मीला इकडे बोलावून आण असें सांगितलें. तेव्हां ती माडीवर जाऊन हिराबाईला म्हणाली:

"चल, ते तुला खालीं बोलावीत आहेत; त्यांस इतकें लाजायाचें कांहीं कारण नाहीं. तूं तर लहानपणीं त्यांच्या अंगावर खेळलेली आहेस."

सासूच्या सांगण्यावरून हिराबाई तिजबरोबर खालीं गेली, आणि आदरपूर्वक सासऱ्याच्या पायां पडून एका बाजूस जाऊन उभी राहिली. पायां पडते वेळीं "अष्टपुत्रा सौभाग्यवती भव" असा माधवरावांनीं तिला आशीर्वाद दिला आणि म्हणाले:

"ऐकलेंस मुली; फक्त तुझ्याच बोलावण्यावरून मी येथें आलों आहें. तुझें पत्र पाहून मला जो आनंद झाला तो काय सांगूं! ईश्वर तुझें कल्याण करो. माझें भाग्य खरोखरच मोठें समजावयाचें कीं, तुजसारखी शहाणी व सुशील सून मला मिळाली. माझी पक्की खात्री आहे कीं, आतां आमचे सुखाचे दिवस खचित जवळ आले आहेत. तूं सुचविल्याप्रमाणें लवकरच सर्व कांहीं व्यवस्था करण्यांत येईल."

माधवराव फार दिवसांनीं आपल्या गांवीं आल्यामुळें त्यांचे पहिले दोन चार दिवस तर लोकांस भेटण्यासवरण्यांतच गेले. त्यामुळें तेवढ्या मुदतींत घरखटल्याकडेस लक्ष द्यावयास त्यांस फावलें नाहीं. पुढें एके दिवशीं त्यांनीं सुनेला बोलावून जवळ बसविलें व ठकीला आपल्या समोर उभी करून विचारलें:

"ठके, मी आहें तोंपर्यंत सर्व कांहीं हिशोब करून कोणकोणाचें किती किती द्यायाचें आहे तें सांग; ज्या ज्या लोकांचें देणें आहे त्या सर्वांचा काय हिशोब असेल तो त्यांला आणावयास सांग. ह्मणजे त्यांच्या देण्याची फेड केली जाईल; आणि ज्यांची कांहीं बाकी राहील त्यांस हतेबंदी करून दिली जाईल. माझ्या मनांतून घोंटाळा असा मुळींच ठेवावयाचा नाहीं.

ठकी—धनीसाहेब, एका दोघांचा हिशोब असेल तर तोंडावर याद राहील; वाण्याचा, तेलतूपवाल्याचा, कापडवाल्याचा, शाख भाजीवाल्याचा, हलवायाचा, याचा, त्याचा अशा अठरा जनांचा हिशोब होणें आहे, इतक्यांची काय मीं आपलें कपाळ आठवण ठेवूं? मेल्या तिलकचंदाचा तर एक निराळाच हिशोब आहे. तेव्हां ज्यास जितकें द्यावेंसें वाटतें तितकें मजजवळ द्या, ह्मणजे मी तें त्यांस नेऊन देईन, आणि ते आपल्या नांवें तितकें जमा करतील म्हणजे झालें.

हिराबाई—"मामंजी, ही काय म्हणते तें ऐकिलें? अगे ठके हिशोब केल्याशिवाय कसें बरें चालेल? पहिल्यानें दरएकाचें कर्ज किती आहे तें कळलें म्हणजे त्यास त्या त्या प्रमाणें अधिकउणें देतां येईल.

ठकी—बरें बाई, तुमच्या म्हणण्याप्रमाणें कां होईना. जेवण आटोपलें ह्मणजे मी जाऊन त्या सर्वांस विचारून येईन, म्हणजे मग तर झालेंना? का आणखी कांहीं म्हणणें आहे?

हिराबाई—अग, तूं विचारून येऊन काय होणारा आहे? उलटा गोंधळ मात्र जास्त होईल. ज्यास घेणें आहे त्यांस गरज असेल तर ते येथें येऊन हिशोब करून जातील.

ठकी—वहिनी साहेब बोलावयाचें काम फार सोपें आहे बरें. पण मी सर्वांस कुठें कुठें म्हणून बोलावीत फिरूं? तशांत ते काम-धंद्याचे माणूस पडले; त्यांस इतका वेळ कुठें आहे कीं ते मज-बरोबर येतील?

हिराबाई—अग, हें काय सांगतेस? काय त्यांस दररोज बोल-वायाचें आहे? अग एक घटकेचा मामला; जा त्यांना बोला-वून आण. संध्याकाळचें जेवण करण्याचें काम मी कसें तरी संभाळून घेतें. तूं कीं नाहीं आज हेंच काम कर. कर्जदार लोक हिशोबाचें नांव ऐकतांच कुत्र्यासारखे धांवत येतील. दूर दूर ते कोण आहेत. वाणी, भाजीवाला, हलवाई वगैरे सर्व याच पेठेंत आहेत. कापडवाला व तिलकचंद हे दोघे काय ते जरासे दूर रहातात; या दोघांस पाहिजे तर उद्यां बोलावून आण. पण इतरांचा फुटकळ हिशोब तर आज होऊं दे.

कर्जदारांचा हिशोब व्हावा अशी ठकीमोलकरणीची मुळींच इच्छा नव्हती. पण करते काय? शेवटीं निरुपाय होऊन तिला सर्व कर्जदारांस बोलावून आणावें लागलें. सर्वांच्या अगोदर हलवाई आला त्याला माधवरावांनीं विचारलें:

"भैय्याजी, तुह्मारा क्या क्या देना है?"

हलवाई—अजी सरकारसाहेब, मेरे फक्त तीस रुपये निकलते है; मेरे गरीबका और कुछ नहीं.

माधवराव—तीस रुपये तो झियादा बताते हो. भला क्या क्या चिझें तुम्हारे याहांसें आई सो, तो पेहेले बतावो.

हलवाई—जी सरकार, क्या तीस रुपये झियादा हुये, पंदर रुप-

येकी मिठाई तो कलके दसेरेके तिवारकु आई, उत्तेमें फक्त दस शेर क्या तो शकर है.

सगुणावाई—आग लागो ग हिच्या तोंडाला, अग अवदसे ठके, कसची साखर आणि कसची मिठाई ही? या वेळेस तर आमच्या घरांत पोळीपक्कान्नाकरितां जें कांहीं सामान आणलें तें सगळें रोख पैसे देऊन आणलें; आणि भैय्या हें काय सांगतोस तूं?

ठकी—(हें ऐकतांच तिचें तोंड खर्रदिशीं उतरलें, आणि म्हणते) अरे लाला, ती दाहा शेर साखर व मिठाई यांच्या हिशोबांत लिहिलीस होय? वाः, ती तर मी दुसऱ्याकरितां नेली होती; आणि नेतेवेळीं ती अमक्याकरितां म्हणून तुला बजावूनही सांगितलें होतें. तूं तरी आपला वराच आहेसरे!

हलवाई—मुझे तो तुमने किसी घरका नाम नहीं लिया. इसी सरकारके नामसें लायीहो, नहीं तो भला मुझे क्या फायदाथा, के दुसेरकी चिझ इनके नाम लिखता, और मुझसें तौ और किसी सरकारसें उचापतभी नहीं है.

माधवराव—अच्छा, शक्कर और मिठाईकी रकम रहने देव, भला और दुसरी क्या क्या चीझ सो बतावो.

तेव्हां त्या हलवायानें आणखी अशा पुष्कळ वस्तु दाखविल्या कीं, ज्या कधीं घरांत आणल्या नव्हत्या. तेव्हां त्यांचा हिशोब वजा करतां शेवटीं सहा सात रुपये त्याचें देणें निघालें. बाकी एकूण एक ठकीची लबाडी होती.

माधवराव—(रागानें संतापून) अग चांडाळणी, अवदसे ठके, असेंच का तूं सर्व जगाचें कर्ज या घरावर करून ठेवलें आहेस! आणि याच रीतीनें तूं आज इतकीं वर्षें माझ्या घरादाराची रा

रांगोळी करून ठेविली आहेस? वाहवा; बरे दिवे पाजळलेस पण! (इतक्यांत माळी आला, त्याजकडे पाहून) बरें तुमचें देणें किती आहे?

माळी—शेटसाहेब, माझा गरिबाचा तर रोजचा उकाडा आहे. आपल्या घरांत माझ्याकडची दररोज दोन आण्यांची भाजी येते. गेल्या चैत्र शुद्ध प्रतिपदेपासून मी भाजी देत आहें. तेव्हां किती दिवस झाले ते आपणच पाहा.

सगुणाबाई—अरे, दररोज एक शेर भाजी माझ्या घरांत येते, तिचे दोन आणे होतात काय?

माळी—बाईसाहेब, एक शेर कां ह्मणतां, तीन शेर! ही पाहा येथें आणणारीण हजर आहे. हिलाच विचारा काय तें. कां ठकू मावशे, खरेंना?

ठकी—होय, तीन शेर; एक शेर यांच्या नांवानें, एक शेर माझ्या मुलीकरितां, व एक शेर दुसऱ्यांकरितां. मी कोठें नाहीं ह्मणतें? पण या मेल्यानें तर सगळी तुमच्या नांवावर लिहिली, त्यास मीं काय करूं?

माळी—अग लुच्चे, खोटें बोलतेस काय? तूं पहिल्यापासून याच घराच्या नांवानें रोज तीन शेर भाजी आणीत नव्हतीस? आणि तिजबद्दल पैसेही याच घराच्या नांवानें देत नव्हतीस?

या नंतर वाणी व तेलतूपवाला यांचा हिशोब झाला. त्यांतही वरील प्रमाणेंच लुच्चेगिऱ्या दिसून आल्या. त्यांवरून असें कळून आलें कीं, ठकी या घराच्या नांवानें सौदा करीत असे, आणि त्यांतून कांहीं आपल्या मुलीला देऊन कांहीं शेजारच्या दोन तीन कुटुंबास देत असे, आणि त्यांजकडून पैसे घेत असे. याप्रमाणें संध्याकाळपर्यंत सर्वांचा किरकोळ हिशोब झाला. आतां काय तो

कापडकरी व तिलकचंद हे बाकी राहिले होते. त्यांचा हिशोब दुसऱ्या दिवसावर ठेवला.

माधवराव–(हळूच हिराबाईस) आज रात्रीं ही कोठेंतरी पळून नाहींना जाणार?

हिराबाई–ती आपलें घरदार मुलेंलेंकरें सोडून कस्सची पळून जाते? अब्रूसाठीं कांहीं तरी खाऊन मरून जाईल म्हणावें, तर त्याची कांहीं भीति नाहीं; इतकी अब्रूची चाड तिला असती तर असें कर्म ती कां करती? तरी पण तिच्यावर नजर ठेवावी हें बरें.

माधवरावांच्या तैनातीचे कांहीं चपरासी त्यांच्याबरोबर आले होते. त्यांपैकीं एकास त्यांनीं ठकीवर चांगली नजर ठेवण्यास सांगितलें.

संध्याकाळचें जेवणखाण आटोपल्यावर सर्वत्र सामसूम होऊन सुमारें दीड प्रहर रात्र झाली असतां, ठकी हळूच घरांतून निघून बाहेर जाऊं लागली. हें पाहून तो चपरासी ती कोठें जाते तें पाहण्याकरितां तिच्यापाठोपाठ तिला नकळत निघाला. ती पहिल्यानें आपल्या घरीं गेली; आणि तेथून कांहीं कारेंत मारून बाणासारखी थेट कापडवाल्याच्या घरीं गेली, आणि त्यास हांका मारूं लागली.

कापडकरी–(जागा होऊन) मोठी बेन, तमें अवढ्या राती इयां कुठुनशी?

ठकी–काय सांगूं शेट, कारभारीसाहेब आले आहेत. ते ज्यांचें देणें आहे त्यांस बोलावून हिशेब करीत आहेत. उद्यां तुम्हांसही बोलावणें येईल. तेव्हां तेथें तुम्ही गेल्यावर माझी पुरी फजिती होईल.

कापडकरी–हिसाब करवामां तमच्या फजितीच्या शुं कारण हाय?

ठकी–शेटजी, तुह्मांस तर माहित आहेच कीं, मेली लालूच किती वाईट आहे ती? कारभारीसाहेबांच्या हिशोबीं मी कधीं कधीं आप-ल्याकरितां तुमच्या दुकानावरून बांडाचीं लुगडीं, पातळें, चीट वगैरे नेलीं आहेत.

कापडकरी–हूं काय ज्याणूं के तमे तमच्या वास्ते शुं शुं घेऊन गेला हाय?

ठकी–शेटजी मला या वेळीं हिशोब करण्यास फुरसद नाहीं. पण दोनचार पातळांचे टांके, कांहीं धनवडी खण, दहा बारा वार चीट इतकें माझ्या हिशोबीं निघेल. हे घ्या माझ्या हातांतील गोठ; हे सोळा रुपयांचे केले होते, कधीं कधीं घालून फार तर एक रुपया भार झिजले असतील. तेव्हां यांचें पंधरा रुपये माझ्या नांवें लिहून तेवढी रक्कम कमती करा. आणि जे काय दोन चार रुपये आणखी माझ्या नांवें निघत असतील ते मी तुमचे देईन.

कापडकरी–बेन, तमच्ये बांगडी ज्ये तमे मारे पासे देतां ते ठीक हाय, में ते राखूनसी ठेवते. पण हातां रातच्या वखते तुमचे खाते दुकानाउपर हाय ते फायल्यासिवाय ह्मला तोंडावर शुं ठावक के शुं देले हाय हानी शुं तमच्या जवळून घ्यायच्ये हाय ते.

ठकी–शेटजी, या वेळीं माझी अब्रू राखणें तुमच्या हातीं आहे. कसेंही करून ती राखा ह्मणजे झालें.

याप्रमाणें कापडकऱ्याची समजूत घालून ठकी तेथून निघाली ती तिलकचंदापाशीं आली. तेव्हां तोही कापडकऱ्याप्रमाणें चकित होऊन गेला आणि ह्मणतो.

तिलकचंद–ठके, अवढा दिवस सोडूनसी रातीचेपारीं कां आले?

ठकी–(त्याच्या पायां पडून व रडून) लाला, बाबा, माझ्या हातून एक मोठी चूक झाली आहे.

तिलकचंद–ते चुक केम झ्याली, शांग फाहूं?

ठकी–तूं माफ करशील असें वचन दे ह्मणजे तुला सांगतें.

तिलकचंद–वरें काय हाय ती आधीं शांगशेल तर खरी?

ठकी–आज चार महिने होतील, कोल्हापुराहून खर्चाकरितां हुंडी आली होती, त्यांतून कारभारीसाहेबांनीं शंभर रुपये तुला द्यावयास सांगितले होते. पण ते माझ्या हातून खर्च झाले आहेत. आणि याविषयीं मी अजून घरांत कळविलें सुद्धां नाहीं. आतां कारभारीसाहेब कोल्हापुराहून येथें आले आहेत. ते उद्यां हिशोबासाठीं तुला बोलावतील. तर त्या रुपयांची मी कुठून तरी दोन चार दिसांत तजवीज करितें. तर मजवर दया करून ही येवढी रक्कम तूं तेथें बोलूं नकोस ह्मणजे झालें.

तिलकचंद–ठके, बे चार रुपयांची बात होते तो मे कदाचित् छुपऊनसी ठेवते, पण अटला शंभर रुपया तर माझ्येथी छुपावी ज्याणार न्हाय. माज्ये गरीबाच्या पेसा ठकवूनशी नई खाशेल ये मने पकूं खबर हाय. पण वखत है, हे पडले रुप्यांचें काम.

ठकी–कायरे लाला, आजच मी एवढी लबाड झालें काय? अरे, ह्या शंभर रुपयांपुरती माझी तुजकडे पत नाहीं ना?

तिलकचंद–ठके, खरी बात ह्मणशेल तर अशी हाय कीं, तुझा एक कोरीचा पण ईश्वास मला न्हाय. जे घरांमधी तमे तमचे उमरभर खालेपिलें तेच्यासाथ तमे अशी दगलबाजी केले, ते पारक्यचेसाथे करायला तमे काय च्युकणार हाय?

ठकी–होय बाबा, वेळ वाईट आला ह्मणजे तूं काय पण सारें

जग आपलें वैरी होतें. बरें जर तुला इतका विश्वास वाटत नाहीं, तर ही घे माझ्या मुलीची गळसरी व बाजूबंद. हीं तुज-जवळ असूं दे.

तिलकचंद—हां, हें घेणेदेणची वात हाय, पण दिवश अशाता तर पारखूनशी घ्यायला आला अशता, की कवड्याच्या हायतो, पण अटकळथी हा तमच्या माल अशरे पचाश शाठ रुप्याचा होशेल.

ठकी—अरे, हे दागिने नवे केल्यास अझून चार माहिने सुद्धां झाले नसतील. हे दोन्ही करण्यास जवळ जवळ सव्वाशें रुपये लागले आहेत बरें!

तिलकचंद—ठके, येमंदी तमाला वाईट वाटायच्या काय कारण हाय? तमच्या दागीना शंभरचा होशेल या बेशीच्या होशेल, तरी तो तमच्या, हाल्लाला काय त्यामधूनशी काढून खायच्या हाय? तोलूनशी जेटला होशेल तेटला ठाऊक पडशेल.

असा जिकडचा तिकडे बंदोबस्त करून ती परत घरीं येऊन निजली. हा सर्व प्रकार माधवरावांचा चपरासी, जो तिच्या पाळतीवर होता, त्यानें पाहिला, आणि सकाळीं माधवराव उठले तेव्हां त्यानें ठकीची ती इथंभूत हकीगत सांगितली. मग त्यांनीं कापडकऱ्यास व तिलकचंदास लागोलाग बोलावणें पाठविलें. ते आल्यावर त्यांचा हिशोब तपासतां तपासतां पुष्कळ संशयाच्या रकमा सांपडल्या. तें पाहून ठकी अतिशय चवताळून गेली आणि त्याच्याकडे डोळे वटारून पाहूं लागली; व तोंडानें कांहीं पुटपुटूं लागली.

कापडकरी—ह्मतारी, ये तमे शुं बडबड लगवली हाय! ही

घे तमच्या बांगडी. तमे तर पंदर रुप्याच्ये शांगते होती, पण बजारमधी शराफनें ज्योयली ते तर नवरुप्या शांगते.

तिलकचंद—(बाजुबंद व सरी ठकीपुढें ठेवून) नाहीं ठके, हा मालबी आमच्ये कामाचा न्हाई.

माधवराव—(हा प्रकार पाहून) " केम भाई, ये शुं चीझो छे?" तेव्हां त्यांनीं रात्रीं घडलेला सर्व प्रकार त्यांला सांगितला. या वेळीं ठकीवर जिकडून तिकडून लाखों शिव्याशापांचा वर्षाव होऊं लागला. नंतर सर्वांचा हिशोब रोखठोक करून माधवरावांनीं त्यांस रुपये द्यावयास काढले; आणि त्यांचें जितकें वाजवी देणें निघत होतें त्याच्या निम्मे रक्कम त्यांला त्यानें देऊन सांगितलें कीं, मी कोल्हापुराहून आणखी रुपये मागविले आहेत, ते आठ दहा दिवसांत येतील असें वाटतें. ते आले ह्मणजे तुमचे बाकीचे रुपये देऊन टाकीन. तेव्हां त्यांनीं विचारलें कीं, ठकीवर जे आमचे रुपये निघतात ते आह्मीं कोणापासून घ्यावे?

माधवराव—ठकीवर जें तुमचें येणें निघतें तें सर्व तिजजवळूनच घ्या. त्याचे जबाबदार आह्मीं नाहीं. (ठकीकडेस वळून) बाईसाहेब, यांच्या रुपयांची आधीं काय ती तजवीज करा. नाहीं तर—

ठकी—(खालीं मान घालून) धनीसाहेब, माझ्याजवळ थोडेसे मुलीचे दागिने आहेत. त्यांवर ह्या लोकांनीं आपापली कायती समजूत करून घ्यावी. दुसरें माझ्याजवळ तर कांहीं नाहीं.

याप्रमाणें मुलीचे जेवढे दागिने होते तेवढे सर्व माळी, दाणेवाला, कपडेकरी, या सर्वांच्या देण्याबद्दल गेले; आणि

तिलकचंदाच्या शंभर रुपयांबद्दल तिला आपलें रहावयाचें घर त्याच्यापाशीं गहाण ठेवणें भाग पडलें.

माधवराव—ठकाबाई, आपण आतां अब्रूनिशीं आमच्या घरांतून एकदांचें काळें करा, आणि तुह्मांस वाटेल तिकडे जाऊन रहा. तुमच्यासारख्या, अविश्वासू, कृतघ्न, लबाड माणसास आमच्या घरांत ठेवून चालावयाचें नाहीं.

हिराबाई—मामंजी, हिजवर अविश्वास, कृतघ्नता व लबाडी यांशिवाय दुसरा एक मोठाच आरोप आहे. तो कोणता तर घरांत कुभांडें रचून कलह लावून देण्याचा होय. त्या दिवसच्या भज्यांची आठवण आहे काय ठके तुला? तिकडून भजीं करावयास मला सांगण्यास सांगितलें असतां, मला विचारल्याखेरीज माझें डोकें दुखत आहे, असें खोटेंच जाऊन सांगणारी ती तूंच ना? आतां खरें सांग बरें, तूं मला भजीं करण्याविषयीं केव्हां तरी सांगितलें होतें काय? आणि मी डोकें दुखत आहे ह्मणून केव्हां तरी बोललें होतें काय?

ठकी—वहिनीबाई, मी माडीवर तुह्मांस सांगण्यास आलें होतें. यावेळीं तुह्मी पांडवप्रताप वाचीत बसलां होतां. तेव्हां तुह्मीं वाचण्याच्या नादांत गर्क होतां असें पाहून मी मुकाट्यानें खालीं गेलें.

हिराबाई—तर मग ठके, डोकें दुखण्याचें निमित्त तूं आपल्या घरचें सांगितलेंस कीं नाहीं?

ठकी—होय वहिनीबाई; आतां आपण ह्मणाल तें खरें. पण साधेपणानें असें मनांत आणलें कीं, तुह्मीं सकाळपासून दुपार्यंत एकसारखें वाचीत होतां तेव्हां चुलीजवळ फुः फुः करतांना माझें डोकें दुखूं लागेल ह्मणून तुह्मांस सांगितलें नाहीं.

हिराबाई–बरें ठके, घांटावर जाण्याची गोष्ट तूं कोणत्या हेतूनें सांगितलीस? मी तुझ्याजवळ ही गोष्ट कधीं तरी काढली होती काय? किंवा दुसऱ्या कोणाजवळ कधीं मी बोलतांना तूं ऐकली होतीस?

यावर ठकीच्या तोंडांतून कांहींएक उत्तर आलें नाहीं. मग हिराबाईनें दारावर लावलेला जाहीरनामा आपल्याजवळ काढून ठेवला होता; तो माधवरावांच्या पुढें ठेवून:

हिराबाई–ही पहा या ठकायमावशीची कशी खोल बुद्धि आहे ती! हिनें पेठेच्या चौकावरील हा जाहीरनामा काढून आणून आमच्या दारावर चिकटवला, आणि उजाडण्यापूर्वींच भवानीपेठेंत जाऊन सासुबाईस सांगितलें कीं, दारावर सावकाराच्या कर्जाबद्दल नोटीस येऊन लागली आहे.

माधवराव–(हें ऐकल्यावरोबर पराकाष्ठेचा संतापून) ठके, आतां तर तुला केवळ काढून टाकूनच रहातां कामा नये. कारण तूं मोठी चेटकीण बायको आहेस. (चपराशास) सदू, ये ह्या थेरड्या डंकिर्णीचे हात पाठीमागें बांधून इला चावडीवर घेऊन जा, आणि मी हिची सगळी हकीकत एका कागदावर लिहून देतों, ती नेऊन तेथल्या अमलदारापाशीं दे.

हिराबाई–मामंजी, हिला आतां खरोखरच पश्चात्ताप झाला आहे असें हिच्या मुखचर्येवरून दिसत आहे. ह्मणून आतां हिला चावडीवर पाठवूं नका. एक वेळ हिला क्षमा करा.

असें ह्मणून ठकीला तेथून निघून जाण्याविषयीं तिनें हळूच खूण केली, व आपणही लागलीच तिच्या मागोमाग गेली. ठकी तेथून निघाली ती नीट आपल्या मुलीच्या घरीं जाऊन पोंचली.

तेथें गेल्यावर तिची ती दुःखी व उदास मुद्रा पाहून तिच्या मुलीस फार दुःख वाटलें; आणि तिनें तिच्या गळ्यास मिठी मारून म्हटलें: "आई मी तुला नव्हतें कां सांगितलें, कीं अशी लूट तूं करूं नकोस, ही बरी नाहीं म्हणून. कारण सगळेच दिवस सारखे येतात असें नाहीं. खोटें काम कधींना कधीं तरी बाहेर पडावयाचेंच. पहिल्यापासून दुसऱ्या लोकांनींही तुला पुष्कळ सांगितलें, पण त्यांचें तूं ऐकलें नाहींस, आणि आपलें तेंच खरें करून आपल्या हातानें आपला नाश करून घेतलास. जसें करावें तसें भरावें. आतां तुझ्यावर एकादा खटला होऊन तुला बिन भाड्याच्या घरांत नेऊन न बसवेात म्हणजे झालें. आतां येवढी तरी कृपा कर कीं, माझ्या येथें राहून माझ्या नांवास डाग लावूं नको. तूं येथें राहिलीस तर मला सासूसासऱ्याचा जाच फार होईल. म्हणून तुला वाटेल तिकडे तूं चालती हो. माझ्या येथें राहून तुझा निभाव लागणार नाहीं. माझ्या दागिन्यांवर मी तर पाणी सोडलेंच आहे. दैवांत असतील तर मला ते पुन्हा मिळतील."

प्रकरण तेरावें.

हिराबाईच्या हातीं घरचा कारभार येतो.

मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें सर्व कर्जदारांस थोडे थोडें देऊन माधवरावांनीं ज्यांचा थोडाबहुत हिशोब शिल्लक राहिला होता तो नीट बयादशीरपणें एका चोपडीवर मांडून ती हिराबाईच्या स्वाधीन केली; आणि आपल्या बायकोला सांगितलें कीं, यापुढें ज्यांच्याकडून कांहीं उधारीचा सौदा कराल तो सारा सूनबाईला ह्या चोपडीवर मांडून ठेवावयास सांगा. आणखी त्यानें तिला अशीही ताकीद देऊन ठेविली कीं, त्या मोलकरणीस पुनः दाराशीं उभी करूं नका.

ह्याप्रमाणें घरांतील सर्व कांहीं व्यवस्था नीट लागून ठकीमोलकरणीचा त्रास नाहींसा झाल्यामुळें हिराबाईस मोठा आनंद झाला. इतक्यांत तिच्या बापाकडून असा निरोप आला कीं, आपण लवकरच परत जाणार आहों, तर हिराबाई व ताराबाई या दोघीजणींस आठ दिवस माहेरीं पाठवून द्यावें. परवां त्या आल्या होत्या, पण माधवराव येणार म्हणून लागल्याच दुसरे दिवशीं निघून गेल्या. ह्या निरोपाप्रमाणें माधवरावांनीं आपल्या सुनांस माहेरीं जाण्याची परवानगी दिली.

माहेरीं गेल्यावर हिराबाईनें सासरीं घडलेली सारी हकीगत आपल्या

बापास सांगितली; आणि तेथें तिनें आठ दिवस मोठ्या आनंदांत घालविले. तेवढ्या अवकाशांत बापाच्या तोंडचा तिनें पुष्कळ प्रकारचा बोध चित्त देऊन ऐकला. ताराबाईही नेहमीं तिच्याबरोबर आपल्या बापापाशीं बसून त्यांचें सर्व बोलणें ऐकत असे. यावेळीं, जी शिकलेली असते तिचा लहानमोठीं सर्वजणें किती मान ठेवतात हें ताराबाईच्या लक्षांत चांगलें आलें. कारण ती पाही कीं, तिचा बाप येवढा मोठा गृहस्थ असून आपल्या धाकट्या बहिणीशीं अगदीं मोकळ्या मनानें व बहुतेक बरोबरीच्या नात्यानें बोलतो चालतो. असो; याप्रमाणें ह्या मुली, बाप जाईपर्यंत माहेरीं राहून परत सासरीं आल्या. तेथें आल्यावर हिराबाई आपल्या सासूस चुलीकडे बसलेली पाहून ह्मणते:

"तुह्मीच का चूल फुंकीत आहां? अजून कोणी मोलकरीण मिळाली नाहीं वाटतें?

सगुणा०—अग, कामाला राहण्यासाठीं पुष्कळ बायका येऊन येऊन जातात. परंतु त्यांचा पगार ऐकून माझी छाती दडपून जाते बाई. मेली ठकी कशीही असो, पण जेवूं घालून दरमहा आठ आणे आह्मी तिला देत होतों, तेवढ्यावर तिनें आमच्या इथें पंचवीस वर्षें काढलीं. आणि आतां जी मोलकरीण येते ती जेऊन खाऊन दोन रुपये मागते. यापेक्षां कोणी कमती मागेल तर हराम.

हिराबाई—माझ्या ओळखीची एक मोलकरीण आहे. पण तीं देखाल पगार जास्त मागते. आपणास सखीमोलकरीण माहित असेलच. तिची धाकटी बहीण वेणू म्हणून आहे. तिला कीं नाहीं स्वयंपाककामाची व शिवणकामाची बरीच माहिती आहे.

एकदां सखी मला बोलली होती कीं, एकादें चांगलें घर मिळेल तर तेथें वेणू चाकरीला रहायाला राजी आहे.

सगुणा०—बरें ती काय दरमहा घेईल?

हिराबाई—जेऊन खाऊन तीन रुपये घेईल असें ती मागें म्हणाली होती. पण समजावून सांगितलें असतां कदाचित् ती दोन रुपयांस राजी होईल.

सगुणा०—तिला जेऊनखाऊन दोन रुपये द्यावे लागतील तर आपल्या शेजारची हैबती माळ्याची बायको म्हणजे आपल्या साळूची आई कालपासून येऊन माझ्या हातापायां पडून जाते आहे, तिला ठेवूं म्हणजे झालें.

हिराबाई—खरें म्हणाल तर साळूच्या आईला दरमहा चार आणे देखील देऊन कोणीं ठेवूं नये.

सगुणा०—कां बरें? ती काय वाईट आहे?

हिराबाई—वाईट तर नाहीं; पण शेजारच्या माणसांची नेहमीं बारीक नजर असते; आणि तिचें शेजारीं घर असल्यामुळें ती आपल्या घरीं वारंवार जात येत असायची. तेव्हां एकादी वस्तू तिला न्यावीशी वाटली तर ती तिला सहज घेऊन जातां येईल. रात्रीची तर ती आमच्या घरीं राहणार नाहीं. तिचें घर जवळ असल्यामुळें तेथेंच बहुधा ती निजावयास जाईल.

सगुणा०—बरें, घोंड्याच्या बायकोनें आपली मुलगी सटवाय हिजविषयीं मला पुष्कळ वेळां सांगून ठेविलें आहे. ती हल्लीं रास्त्यांच्या वाड्यांत रहाते.

हिराबाई—जी नटून थटून येत असते तीच कीं नाहीं सटवाय?

सगुणा०—नटून थटून कसची? नुक्तें लग्न झालें आहे ह्मणून बिचारीची दोन दिवस जरा चोळीलुगड्याची हौस आहे.

हिराबाई—असलें नखऱ्याचें माणूस ठेवून आपल्या कामाचें नाहीं.

सगुणा०—खुद्द सटवायची आईही आमच्या घरीं रहायाला राजी आहे.

हिराबाई—तिच्यामागें तर एक लहान मुलगी आहे. ती तिला जागची हालायला देखील देणार नाहीं. तेव्हां आमच्या घरांतलें काम तिच्याकडून होणार कसें? शिवाय त्या मायलेकी दोघीजणी घरांत जेवणार.

सगुणा०—यांच्या खेरीज दुसरें कोणी माणूस माझ्या तर लक्षांत नाहीं बाई.

हिराबाई—कोठें नाहींच मिळत तर मी त्या वेणूला बलावून विचारितें.

सगुणा०—पण तिच्या पगाराचें कसें होईल?

हिराबाई—विश्वासू माणूस पाहिजे तर कमी पगारावर मिळणें कठीण. अशा माणसास दोहोंच्या ठिकाणीं तीन रुपये द्यावे लागले तरी ते पतकरतील. पण ठकीसारख्या माणसास आठ आणे देऊन घर लुटण्यास लावणें ठीक नाहीं.

असो; त्या दिवशीं स्वयंपाक सासूसुनांनीं मिळून केला. जेवण आटोपल्यावर हिराबाई शांतेस घेऊन माडीवर गेली. माधवराव घरीं होतें तोंपर्यंत हिराबाई माडीवरून फारकरून खालीं उतरत नसे; सकाळीं आणि संध्याकाळीं काय ती स्वयंपाक करण्यापुरती खालीं येत असे. शांतेसही तिनें वारंवार खालीं न जाण्याविषयीं सांगन ठेवलें होतें. पण शांताबाईचा पोरस्वभाव

असल्यामुळें तिनें 'कां जाऊं नये' ह्मणून उलट प्रश्न केला. तेव्हां हिराबाईनें ह्मटलें कीं, "शांते, वडिलांच्या समोर वारंवार जाण्यायेण्यानें त्यांची भीड मर्यादा रहात नाहीं." एके दिवशीं माधवरावांचें जेवण आटोपल्यावर दोघां नवराबायकोंत घरखर्चाबद्दल बोलणें झालें. सगुणाबाई ह्मणाली:

"तुह्मी घर खर्चास जो पैसा पाठवितां तो फार थोडा असतो; व मला तर इकडे दोघां मुलांचीं लग्नें केल्यापासून सोयरेधायरे व इष्टमित्र यांस द्यावें घ्यावें लागतें. शिवाय सणवार करावे लागतात. ह्यासाठीं कांहीं तरी अधिक खर्चास पाठवाल तर बरें होईल.

माधवराव—अग, मी तर सरासरी दरमहा पंचवीस रुपये तुह्मांला पाठवितों, ते कांहीं पुण्यासारख्या ठिकाणीं थोडे नाहींत; पण तुझा कारभारच अव्यवस्थित, त्यामुळें खर्च पुरा पडत नाहीं, त्यास मी काय करूं? (शांतेस हाक मारून ह्मणतो) जा तुझ्या वहिनीला बोलावून आण.

शांताबाई—(माडीवर जाऊन) वहिनी, तुला बाबा खालीं बोलावीत आहेत.

हिराबाई—(थोडीशी घाबरून) कां ग शांते, काय काम आहे?

शांताबाई—वहिनी, तें कांहीं बाबानें मला सांगितलें नाहीं.

हिराबाई—बरें; शांते, खालीं काय चाललें आहे तें तर मला सांगशील.

शांताबाई—कसलें खर्चाचें कीं काय भांडण चाललें आहे.

हिराबाई—बरें, चल तर.

माधवराव—(हिराबाईला पाहून) मुली, इकडे अशी ये पाहूं. हिचें माझें घरच्या व्यवस्थेविषयीं बोलणें चाललें आहे. माझ्या मनां-

तून तुझ्या सारख्या शहाण्या मुलीच्या हातीं ती द्यावी असें आहे. तुझें काय ह्मणणें आहे?

हिराबाई—सासूबाई आजपर्यंत जसा सर्व कांहीं कारभार चालवीत आल्या आहेत तसाच त्या पुढेंही चालवितील. माझ्या सारख्या पोरीच्या शिरावर तो लादणें कसेंसेंच दिसतें.

माधवराव—हिचा कारभार आतां पुरे. हिच्या अंगांत अक्कल किती आहे तें सर्व कांहीं मला कळून आलें आहे. ज्या घरीं दर-महा पंचवीस रुपये येत असतात त्याची ही स्थिति असावीना?

हिराबाई—खरें ह्मणाल तर सासूबाईंचा यांत कांहीं अपराध नाहीं. त्या अवदसे ठकीनें हें असें घराचें मातेरें करून टाकलें. तिच्यावर पुरा विश्वास ठेवल्यामुळें तिनें फावलें त्या रीतीनें लुटलें.

माधवराव—पण हिच्यांतच जर मुळीं घरसंसार चालविण्याची अक्कल असती तर ठकीची असें करण्याची काय प्राज्ञा होती? ठकी कशी झाली तरी तीन दमड्यांची मोलकरीण; तिनें हिच्यावर आपला पगडा बसवावा काय?

हिराबाई—चोवीस पंचवीस वर्षांचें जुनें माणूस जर लुटूं लागलें तर घरांतील मनुष्यांस तें कसें कळणार? जुन्या माणसाविषयीं एका-एकी संशय घेतां येत नाहीं.

माधवराव—जुनें माणूस असलें ह्मणून काय झालें? शेवटीं तुला नव्या माणसाला तिजविषयीं संशय आला कीं नाहीं?

सगुणाबाई—इतकी भानगड पाहिजे कशास? शंभर रुप-यांच्या पगारांतून आपल्या एकस्याच्या जीवाकरितां पाउणशें रुपये ठेवावे आणि आह्मां इतक्याजणांस अवघे पंचवीस रुपये पाठवून द्यावे. ते [illegible]रतील तरी कसे?

माधवराव—तूं मला एकटा समजतेस; पण घोडा, चाकर; कपडालत्ता यांस किती खर्च लागतो तें तुला कोठें ठाऊक आहे? आणि तशांत कांहीं पुढला विचार पाहिला पाहिजेना? पुढें हातपाय राहिले ह्मणजे काय करूं.

सगुणा०—घोडा, चाकर, तर सरकारांतून मिळत असतो; त्यास खर्च कसचा?

माधवराव—घोडा मिळाला ह्मणजे झालें? त्यास दाणापाणी कांहीं नको? तें मला आपल्या पदरचें घ्यावें लागतें. शिवाय त्या घोड्याची चाकरी वगैरे करण्यास एक मोतद्दार ठेवावा लागतो. त्यांत आणखी माझी नोकरी पडली दरबारांतली. तेव्हां आपले मानासारखें रहाण्यास हजार पंचायती कराव्या लागतात. मी कोणत्या रीतीनें आपले दिवस काढतों तें एका परमेश्वरास ठाऊक; तें तुह्मांस काय सांगूं?

हिराबाई—आतां उगाच वाद करून काय फळ? पंचवीस रुपये आपणांस मिळतात तींच आपणावर ईश्वराची दया समजावी. हल्लींचा वेळ फार कठीण आहे. परमेश्वरानें मामंजींच्या कमाईला बरकत द्यावी, ह्मणजे ते आह्मांस आणखी पैसे पाठवितील.

सासू—पण माझ्यानें तर पंचवीस रुपयांत घरसंसार चालवणार नाहीं. तुला चालवितां येईल तर पाहा बाई.

हिराबाई—बर, तुमच्या मर्जीप्रमाणेंच कां होईना? पाहिजे असल्यास पंचवीस रुपयांतूनही आणखी दोन रुपये कमती करावे. पण जे रुपये पाठवावयाचे ते मात्र महिन्याच्या महिन्याला मुदतशीर पाठवावे. वेळेस खर्चास नसलें ह्मणजे कर्ज काढावें लागतें; आणि मग त्याची फेड करतेवेळीं अशा भानगडी उपस्थित होतात.

माधवराव—होय मुली; तूं ह्मणतेस तें खरें; पण या मराठी राज्यांत ही एक मोठी वाईट चाल आहे कीं, पगार वेळच्या वेळीं मिळत नाहीं. कधीं कधीं तर सहा महिनेसुद्धां पदरमोड करावी लागते. ह्मणून तुह्माला खर्चास वेळेवर पाठविण्याचें होत नाहीं. असें आहे तरी मी कसेंही करून तुह्मांस महिन्याच्या महिन्यास पंचवीस रुपये देण्याविषयीं तिलकचंदास सांगून जाईन.

हिरावाई—त्यास तर व्याज द्यावें लागेल. मग हांशील तें कोणतें?

माधवराव—नाहीं, तो मजजवळून व्याज घेणार नाहीं; कारण कीं आमच्या सरकारांत त्याचें नेहमीचें घेणें देणें आहे. तेव्हां तिकडूनच सरकारमार्फत हुकूम पाठवीन ह्मणजे झालें.

हिरावाई—असें होईल तर फारच चांगलें.

माधवराव—तर मग मुली तूं आजपासून घरसंसार चालविण्याच्या कामाचा पत्कर घेतेसना? मला पूर्ण खात्री आहे कीं, माझा संसार तूं पाहूं लागलीस कीं माझ्या घरांत लक्ष्मी नांदू लागेल.

सगुणा०—मुली, दूरवर विचार करून काय तें उत्तर दे हो. हा घरसंसार आहे वरें? हीं पुस्तकें वाचायचीं नव्हत. "परस्वाधीन जिणें आणि पुस्तकी विद्या," ही ह्मण तुला समजावून सांगितली पाहिजे असें नाहीं.

हिरावाई—पहाल तर खरें सासूबाई पंचवीस रुपयांत मी कसा संसार चालवितें ती; याविषयीं आपण कांहीं एक काळजी करूं नये. मामंजींस पाऊणशांपेक्षां कमी रुपयांत आपल्या दरजाप्रमाणें राहून आह्मांसतेज्यास्त कांहीं पाठवितां येणार नाहीं. तशांत त्यांस कांहीं बाहेरीलापैदास ह्मणावी तर तीही नाहीं; आणि कांहीं असलीच तरी

तिला मामंजी कधीं शिवणार सुद्धां नाहीं. आतां, आपण उगाच कुरकुर करण्यांत हांशील नाहीं. त्यापासून विनाकारण मामंजींस मात्र दुःख होईल.

हें तिचें शहाणपणाचें भाषण ऐकून सासू उगीच राहिली. नंतर हिराबाईनें वेणू मोलकरणीस बोलावून आणून चार गोष्टी समजाऊन सांगितल्या, आणि जेऊन खाऊन दोन रुपये पगार घेऊन कामाला राहण्यास तिला कबूल केलें. याप्रमाणें ठरवाठरवी झाल्यावर तिनें तिला येणेंप्रमाणें सांगितलें: 'वेणू तुझ्या विश्वासूपणास कलंक लागेल अशी गोष्ट तुझ्या हातून होतां कामानये. मी तर तुझ्या विश्वासूपणाबद्दल घरांत फार तारीफ केली आहे. तेव्हां जशी तुझी वडील बहीण सखी आज कित्येक वर्षें माझ्या माहेरीं विश्वासूपणानें राहिली आहे, तशीच तूं येथें राहून आपलें नांव राख म्हणजे झालें.'

वेणू—वहिनीबाई, दुसऱ्याच्या मालावर जर मी नजर ठेवीन तर त्याच क्षणीं ईश्वरानें माझे डोळे फोडावे. मला कधीं कोणत्याही वस्तूची गरज लागलीच तर मी ती मागून घेईन; प्राण गेला तरी चोरी इतकीशी करणार नाहीं.

प्रकरण चौदावें.

हिराबाईची गृहव्यवस्था.

ह्या प्रमाणें घरची एकंदर व्यवस्था लावून माधवराव परत कोल्हापुरास गेले. जातांना त्यांनीं हिराबाईस वगैरे नीट सेंभाळून वागण्यास सांगितलें.

हिराबाईच्या हातीं घरखर्चाची व्यवस्था आल्यापासून ती प्रत्येक बाबतीमधें काटकसरीनें खर्च करूं लागली. जेणेंकरून घरांतील एकंदर खर्च पंचवीस रुपयांच्या आंत होईल अशी तजवीज ती ठेवीत असे.

हंगामाचेवेळीं तांदूळ, डाळ, गहूं, मिरच्या, कांदे, लसूण, बटाटे, लांकडें, इत्यादि ज्या ज्या वस्तू स्वस्त मिळत असत, त्या त्या ती अगाऊ घेऊन ठेवीत असे. घरांत मोलकरणीसुद्धां पांच माणसें होतीं. तरी खाण्याच्या संबंधानें कांहींच पंचाईत नसे. बहुतकरून दोन्ही वेळां एक दोन प्रकारच्या शाखभाज्या असत. त्या शिवाय दर आठवडयास ती कांहीं तरी मिष्टान्न करी. हंगामाच्यावेळीं आंब्यांचें, लिंबांचें वगैरे लोणचें व मुरंबाही ती घालीत असे. दररोज तेंच तेंच अन्न खालल्यानें भूक कमी होऊन अन्न खपत नसतें, हें जाणून हिराबाई त्यांत नेहमीं कांहीं तरी फेरबदल करी. त्यामुळें अन्न

जास्त खपून सगळ्यांच्या तोंडांवर टवटवी आली. वरांत कोणत्या वस्तूची ह्मणजे कधीं कमताई झाली असें मुळींच होत नसे. इतका सगळा खर्च अठरा एकोणीस रुपयांत ती आटपी, आणि जे पाच सहा रुपये शिल्लक रहात त्यांतून संसारास लागणारीं भांडीं तिनें हळू हळू घेतलीं. त्याचप्रमाणें साधारण प्रतीचीं दोन कपाटें तिनें करविलीं. आणि त्यांतलें एक सैंपाकघरांत ठेवलें, आणि दुसरें दिवाणखान्यांत ठेवलें. हा सर्व संसार तिनें सहा महिन्यांत उभा केला. नंतर घरांतील खुर्च्या, बांक वगैरे जें सामान तुटून मोडून पडलें होतें तें तिनें नीट करविलें. निजावयाकरितां दोन पलंग नवीन करून घेतले. सारांश काय कीं, दरमहा पंचवीस रुपये मिळत असत तेवढ्यांत दोन अडीच वर्षांच्या अवकाशांत तिनें असा टोलेजंग संसार जमवून दिला कीं, ज्यानें पूर्वी या घराची कोणत्या प्रकारची स्थिति होती तें पाहिलें होतें त्याला हल्लींची स्थिति पाहून खचीत विस्मय वाटल्यावांचून रहाताना. ठकीमोलकरणीच्या वेळीं शांताबाईकरितां दररोज निदान एक आण्याचा तरी न्याहरीसाठीं खाऊ बाजारांतून आणावा लागत असे. आज कांहीं घरांत आणलें आणि तें उद्यां-पर्यंत शिल्लक राहिलें असें कधींच होत नसे. पण आतां हा सर्व लुटारूपणा नाहींसा झाला. शांतेसाठीं हवा असलेला खाऊ घरींच करूं लागल्यापासून दररोजचा एक आणा दुकानावर जाईनासा होऊन एकदां तीन चार आण्यांचा केला कीं आठ पंधरा दिवसांचीं बेगमी होत असे. पूर्वीं घरांतून गरीब लोकांस व आंधळ्या पांगळ्यांस कधीं मूठभर तांदूळ किंवा ओला कोरडा भाकरीचा तुकडाही मिळत नसे. पण आतां दारांत आलेला भिकारी कांहीं तरी दिल्या-वांचून परत लावला असें सहसा होत नसे. घरांतलें सामान-

सुमान पूर्वी कोठें तरी अव्यवस्थित पडलेलें असे; आतां तें व्यवस्थित रीतीनें जेथल्या तेथें राहूं लागलें. घरांतल्या सगळ्या माणसांच्या कपडयांच्या चांगल्या घडया करून त्या तिनें कपाटांत निरनिराळ्या नांववार खणांत रचून ठेवाव्या. दाण्या गोट्याच्या खोलींत निर्वाहास लागणारें धान्य वगैरे नीट भरून झांकून ठेववावें. भांडीं कुंडीं वेळच्यावेळीं चांगलीं घांसून पुसून स्वच्छ ठेवावीं. तांब्या पितळेचीं भांडीं निराळीं व चिनी मातीचीं, कांचेचीं वगैरे निराळीं अशीं तिनें नीट फळीवर मांडून ठेवावीं. लहानसहान भांडीं स्वयंपाकघरांतील कपाटांत खणाखणांनीं नीट रचून ठेवावीं.

ज्या दिवसापासून हिराबाईनें घरचा कारभार आपल्या हातीं घेतला, त्या दिवसापासून कर्ज कसें तें मुळींच काढण्याची गरज पडली नाहीं. हिराबाई घरचा सर्व हिशोब जेव्हांचा तेव्हां एका वहींत टिपून ठेवीत असे. कोणतीही वस्तू संपावयास आली कीं वेणूमोलकरणीनें तिला कळवावें. म्हणजे मग हिराबाईनें लागलीच वही काढून तपासून पहावें कीं, संपलेली जिन्नस त्या तारखेला किती आणली; आणि ती रोजच्या खर्चास अजमासें किती दिवस पुरली; आणि हिशोबांत जर करितां काहीं चूक दिसून आली तर तिनें त्या मोलकरणीला विचारावें. तिची प्राज्ञा नव्हती कीं, कधीं हिशोबा बाहेर कोणतीही वस्तू ती अधिक खर्चील. यामुळें हिशोबांत फार करून तफावत होत नसे. दळणावळ, धुणावळ, दुधाचा रतीब, वगैरे बारीक मोठा सर्व हिशोब ती जेव्हांचा तेव्हांच मांडून ठेवी. कालचा हिशोब आठवून आज लिहिला असें तिच्याकडून कधींच होत नसे. ही सर्व व्यवस्था ठेवण्यांत हिराबाईचा सगळा वेळ जात असे काय? कांहीं नाहीं. तिला

वाचायाला, शिवायाला, कशिदा काढायाला वगैरे हवा तितका वेळ मिळत असे.

सत्यवंत ह्या वेळीं विश्रामबागेंतील हायस्कुलांत जात असे. पण त्याचें आभ्यासावर फारसें लक्ष नसे. त्यानें इकडे तिकडे फिरावें, हिंडावें व उनाडक्या कराव्या, आणि शाळेची वेळ झाली ह्मणजे जेऊन शाळेंत जावें, असा त्याचा क्रम असे. त्याचा बाप माधवराव याचें राहणें सर्वदा कोल्हापुरीं असे. तेव्हां त्याचा धाक त्याला मुळापासूनच नव्हता. आतां त्याचा वडील भाऊ कायतो त्याची येऊन जाऊन चौकशी करणारा. पण पुढें तो कांहीं दिवस विभक्त राहिल्यामुळें त्याचा त्याजवर फारसा दाब नव्हता. आतां आईचा दाब त्याच्यावर असावा. पण ती त्याचे फारच लाड करीत असे. यामुळें तो घरीं अभ्यास करावयास मुळींच बसत नसे. त्यानें सारा दिवस सवंगड्यांबरोबर गांजिफा, सोंगट्या, विटीदांडू, क्रिकेट इत्यादि खेळ खेळावे. दिव्यांत वात पडली कीं तो जेऊन बाहेर निघे आणि रात्रीचे बारावारा वाजतां परत घरीं येई. हिराबाईला हें सर्व मुळींच आवडत नसे. पण त्यास वाईट वाटूं न देतां कोणत्या युक्तीनें चार गोष्टी सांगून त्याचें मन वळवावें, या विचारांत ती होती.

एके दिवशीं दोन प्रहररात्र उलटल्यावर सत्यवंत घरीं आला. तो त्यादिवशीं जेवल्यावांचून बाहेर गेला होता. घरीं येतांच त्यानें आपणास जेवावयास वाढण्यास सांगितलें. तेव्हां वेणू लगबगीनें आंबटी ऊन करूं लागली. हें पाहून सत्यवंत ह्मणाला:

"काय ग वेणू, इतकी रात्र झाली तरी अजून तुमचा स्वयंपाकच झाला नाहीं?

हिराबाई–स्वयंपाक कधींच झाला आहे. ती आंबटी तिला

मी गरम करावयास सांगितली आहे. ती अगदीं थंड झाली आहे. अन्न शिळें करून खाण्यांत काय सुख आहे नकळे. भूकच नाहीं कीं काय कोण जाणे. सासूबाई तर वाट पाहून पाहून थकल्या. त्यानीं कोठवर तरी वाट पाहत बसावें बरें? त्या कलंडल्या तेथेंच झोंपीं गेल्या आहेत.

सत्यवंत—काय, तुम्हीं माझ्यासाठीं खोळंबून रहातां? मीं तर इतके दिवस समजत होतों कीं, तुम्हीं सर्वजणें मी येण्यापूर्वीच जेऊन घेत असाल.

हिराबाई—पुरुष जेवण्यापूर्वीं बायकांनीं जेवावें तरी कसें?

सत्यवंत—एकादे दिवशीं असा मला उशीर होता तर निराळी गोष्ट, पण माझीतर ही नेहमीची संवय झाली आहे. म्हणून माझ्या अगोदर न जेवण्याचा हट्ट घेऊन बसण्यांत काय अर्थ? मी खरोखर सांगतों कीं, तुम्हीं आजपासून माझी वाट पाहत बसतां कामा नये.

हिराबाई—हा कोण बाई जुलूम. आपण वेळेवर जेवायला यावयाचें नाहीं; आणि दुसरीं वाट पहात बसलीं तर तें आवडत नाहीं! पण जरा लौकर घरीं येण्यास हरकत कोणती?

सत्यवंत—हरकत कसची? एकदां जेवलों म्हणजे बाहेर जावयाला जिवावर येतें; आणि मला तर अशी संवय पडून गेली आहे कीं, कांहीं केल्या झोंप म्हणून लवकर येत नाहीं; आणि जेवल्यानंतर घरांत रिकामें बसल्यास चैन पडत नाहीं. म्हणून मी दररोज मुद्दाम उशिरां घरीं येतों.

हिराबाई—पण कामांतच जर वेळ घालवावयाचा आहे तर तें काय थोडें आहे? आपल्या वेळेचा चांगला उपयोग करूं

गेल्यास पुष्कळ प्रकारचे उद्योग आहेत. लिहिणेंवाचणें हा एक उद्योग काहीं लहानसहान आहे असें नाहीं. माझा मोठा भाऊ आपले धडे दहा दहा अकरा अकरा वाजत तोंपर्यंत एकसारखा पाठ करीत असे; आणि ज्या दिवशीं जिवास बरें न वाटल्यामुळें लवकर निजण्याचा प्रसंग येई, त्या दिवशीं तर त्याला फार वाईट वाटावें.

सत्यवंत—मी सांज सकाळ आपले धडे पाठ करीत असतों. यापेक्षां जास्त मेहनत ती काय करावयाची आहे?

हिराबाई—मला कीं नाहीं मोठें आश्चर्य वाटतें. इतक्या थोड्या वेळांत आपले धडे कसे पाठ होतात नकळे. त्या दिवशीं ठकीचा हिशोब चालला असतां मामंजींनीं हिशोब विचारिले, पण त्यांचें उत्तर देतां आलें नाहीं. तें पाहून मला मान खालीं घालावी लागली.

सत्यवंत—अग वेडे, हिशोब हा निराळा विषय आहे! तूं शिकलेली असून इतकें का तुला कळत नाहीं? मला तर बीज-गणित, भूमिति, संस्कृत, इंग्रजी, वैगेरे विषय चांगले येतात. तोंडचे हिशोब तेवढे येत नसले ह्मणून काय झालें?

हिराबाई—होय, माझा मोठा भाऊ रमाकांतदादाही असेंच ह्मणत असे. तो तर एफ. ए. पास होऊन बी. ए. च्या परिक्षेसही बसला होता. पण तींत तो पसार झाला नाहीं. आज किती वर्षें तो चाकरीसाठीं धक्के खात आहे. जुन्या लोकांचें असें ह्मणणें आहे कीं, जोंपर्यंत हे इंग्रेजी शिकलेले विद्वान् लोक जमा खर्चाचें काम शिकणार नाहींत, तोंपर्यंत त्यांस चाकरी मिळण्यास पंचाईत पडेल. हल्लीं माझा धाकटा भाऊ वसंतराव हा गांवठी शाळेंत

जात असतो खरा; पण तो ज़माखर्चाच्या कामांत व तोंडच्या हिशेबांत फार हुशार झाला आहे. नुकतेच बाबा आले होते. ते त्यास सांगून गेले आहेत कीं, आणखी दोन वर्षेंपर्यंत तूं जमाखर्चाची चांगली माहिती करून घे, म्हणजे तुला मी कोठें तरी व्यापाऱ्याच्या पेढीवर लावून देईन.

सत्यवंत—तर मग काय तूं मला गांवठी शाळेंत जावयास सांगतेस होय? तेथें तर लहान लहान मुलें शिकतात. आणि मी त्या शाळेंत पूर्वी होतोंही.

हिराबाई—पण आपणांस जमाखर्ची लिहिणें येत नाहीं. तें अवश्य शिकलें पाहिजे. सगळा वेळ खेळण्यांत घालविण्याऐवजीं थोडासा वेळ या उपयुक्त ज्ञानाच्या संपादनाकडे घालवावा हें बरें.

सत्यवंत—मी रात्रंदिवस खेळतच असतों असें तुला वाटतें ना? पण मी फार झालें तर तास दोन तास खेळतों. इतकें खेळणें हें कर्मणुकीला आणि आरोग्याला जरुरीचें आहे, असें मी एका इंग्रजी पुस्तकांत वाचलें आहे.

हिराबाई—अगदीं खेळूं नये असें कोण म्हणतें आहे? खेळांची संवय ही दारूच्या संवयीप्रमाणें आहे. ती संवय एकदां लागली कीं नाहीं म्हणजे मग पुढें ती वाढतच जाते. एक तर खेळ म्हटला म्हणजे तो चांगला नाहीं; आणि दुसरें असें कीं, आपल्यापायीं दुसऱ्या मनुष्यांचा अमूल्य वेळ जातो. उद्योगी मनुष्य कधींही खेळत नाहीं. आळशी मनुष्यें मात्र आपले दिवस खेळण्यांत घालवितात. खेळतांना आपापसांत फुकटचा वाद मात्र उत्पन्न होत असतो. त्यापासून कित्येक वेळां मित्रांमध्यें व्यर्थ वैमनस्य पडून एखादे वेळीं त्याचा परिणाम फार भयंकर

होत असतो. ह्मणून हा खेळ मुळींच सोडून द्यावा, हें बरें. जन आपल्या तोंडावर कांहीं बोलत नसले तरी मागाहून छिः थूः करितात. फार लांब कशाला, पर्वांच्याच दिवसची गोष्ट. कोणी गृहस्थ तुह्मांस भेटण्यास आले होते. तेव्हां मोलकरणीनें आंतून जबाब दिला कीं, आपण कोठें बाहेर गेलां आहां. तेव्हां तो गृहस्थ आपल्या बरोबरच्या दुसऱ्या गृहस्थास ह्मणूं लागला कीं, चला आपण विष्णुपंतछत्र्याच्या येथें जाऊं. तेथें कदाचित् ते सोंगट्यांच्या आखाड्यांत मिळतील. मामंजींचा आज सगळ्या शहरभर कसा नांव-लौकिक आहे? सर्व लोक त्यांस किती चाहतात? तेव्हां आपल्या ह्या अशा नादानें त्यांच्या नांवास कलंक लागतो कीं नाहीं याचा आपणच विचार करावा. ह्या गोष्टी आपणास सांगण्याचा माझा अधिकार नाहीं.

हिराबाईच्या या अशा भाषणानें सत्यवंत शुद्धीवर आला, आणि त्या दिवसापासून खेळण्याचें नांव सोडून देऊन तो शाळेंतील अभ्यास नेमानें करूं लागलां. त्याचप्रमाणें एका गृहस्थाच्या घरीं जाऊन तो जमाखर्चाची माहिती करून घेऊं लागला. ह्याप्रमाणें सत्यवंत आपल्या वेळेचा चांगला व्यय करूं लागल्यामुळें थोडया दिवसांत त्यास वर्गांतील सर्व विषय साधारणपणें चांगले येऊं लागले. आणि जमाखर्च ठेवण्याच्या कामांतही त्याची वरीच गति झाली.

प्रकरण पंधरावें.

हिराबाईची शाळा.

मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें आपल्या नवऱ्याचें मन विद्याभ्यासाकडे लागेसें केल्यावर हिराबाईनें आपल्या पेठेंतील कांहीं निवडक मुली जमवून त्यांस लिहिणें, वाचणें व शिवणकाम शिकविण्याचा क्रम सुरू केला. त्या पेठेंत जगन्नाथराव या नांवाचे एक मोठे कुलीन उमराव रहात असत. हे उमराव एकवेळ गायकवाड-सरकारचे पदरीं मुख्य दिवाणगिरीचे कामावर होते. त्यांचें घरदार मुलेंलेंकरें सर्व कांहीं याच पेठेंत होतें. हवेल्या, वाडे, चाकर, नोकर असा यांचा मोठा थाट होता. यांचें घराणें शहरांतील मोठमोठाल्या संभावित घराण्यांत मोडत असे. त्यांचा शरीरसंबंध मोठमोठाल्या घराण्यांशीं असून त्यांचा डामडौलही कांहीं कमी नव्हता. त्यांचा एक धाकटा भाऊ होता. त्याचें नांव विश्वनाथराव दादा सरनोबत. हे पुष्कळ वर्षें ग्वाल्हेर सरकारच्या पदरीं जमाबंदीच्या कामावर मुख्य होते. परंतु त्या राज्यांत सर दिनकरराव यांचें जेव्हां प्राबल्य वाढलें, तेव्हां विश्वासरावांनीं आपण होऊन आपल्या जागेचा राजीनामा दिला. जवळ लाखों रुपयांची धन दौलत असल्यामुळें चाकरीची त्यांस मुळींच परवा नव्हती. या सरनोबतांस वत्सलाबाई व प्रेमिलाबाई अशा दोन मुली होत्या. त्यां-

पैकीं मोठी मुलगी वत्सलाबाई हिचा विवाह टिपण्याच्या राजवराण्याशीं झाला होता. पण कांहीं कारणामुळें त्या उभयतांत बेबनाव उत्पन्न झाल्या कारणानें दोहोंकडचा व्यवहार व येणेंजाणें मुळींच बंदच पडलें होतें. ईश्वराच्या दयेनें इतकें मात्र बरें होतें कीं, तिच्या नवऱ्यानें अजून कोठें दुसरी सोयरीक केली नव्हती. दुसरी मुलगी प्रेमिलाबाई हिची मागणी धारचे पोंवारांच्या घराण्यांत झाली होती. या मुलीची मावशी निराबाई म्हणून होती. ती हिराबाईच्या माहेरच्या पेठेंत राहत असे. त्या पेठेंत हिराबाईची सर्वत्र कीर्ति झाली होती. यामुळें निराबाईला हिराबाईच्या गुणांविषयीं पूर्ण माहिती होती.

एके दिवशीं निराबाई आपली धाकटी बहीण मिराबाई म्हणजे प्रेमिलाबाईची आई हीस भेटण्याकरितां आली. मिराबाईला जगांतील सर्व कांहीं ऐषआरम अनुकूळ होते. पण दोघी मुलींचें तिला फार दुःख होतें. वत्सलाबाईचा लग्नसोहळा होऊन ती हौसेनें आपल्या घरीं नांदावयाची, पण ती माहेरीं येऊन बसली होती; आणि दुसरें, प्रेमिलाबाईचा तर पराकाष्ठेचा दांडगा स्वभाव होता. या अशा दुःखामुळें तिचा जीव फार झुरणीस लागला होता. प्रेमिलाबाईचा स्वभाव इतका वाईट आणि दांडगा होता कीं, घरांत एकाही मनुष्याबरोबर तिचें जमत नसे. ती आपल्या आईची किंवा मोठ्या बहिणीची मर्यादा मुळींच ठेवीत नसे. बापाचा किंवा भावाचाही धाक तिला नव्हता. चाकर लोक तर बिचारे तिला अगदीं त्रासून गेले होते. ते असें म्हणत असत कीं, "कधीं यां आकाबाईचें एकदां लग्न होऊन येथून काळें तोंड होईल नकळे!" सारांश सांगावयाचें काय कीं, तिच्यामुळें घरांतलीं सारीं माणसें अगदीं त्रासून गेलीं होतीं.

निराबाई गाडींतून उतरली नाहीं तोंच एक मोलकरीण सांगूं लागली कीं, आईसाहेब, धाकट्या बाईंनीं माझा पदर फाडून त्याच्या कशा चिंध्या करून टाकल्या त्या पहा. दुसरी ओरडत आली कीं, "पहा हो आईसाहेब, धाकट्या बाईंनीं माझ्या थोबाडांत मारून माझा गाल कसा लाल करून सोडला तो!" तिसरी येऊन गाऱ्हाणें सांगूं लागली कीं, पहा "तुमच्या लाडक्या धाकट्या बाईंनीं माझा कान पहा हा रक्तबंबाळ करून टाकला!" चवथी हंबरडा फोडून धांवत आली आणि ह्मणाली कीं, "हा पहा प्रेमिलाबाईंनीं माझ्या कुशींत काठी मारून कसा वळ उठविला तो!" इतक्यांत तिकडे सैंपाकीण सैंपाकघरांतून ओरडून ह्मणाली कीं, "या धाकट्या बाईस कांहीं तरी सांगा. पाहा कशी ही साऱ्या भांड्याकुंड्यांत राख उडवीत आहे ती!" हें ऐकून निराबाईनें प्रेमिलाबाईस हांक मारली. मावशीचा शब्द ओळखतांच ती राखेनें भरलेल्या हातापायांनिशींच धांवत धांवत येऊन धाडदिशीं मावशीच्या अंगावर लाडिकपणानें पडली. त्यामुळें मावशीच्या अंगावर व लुगड्यावर प्रेमिलेच्या हातापायांची राख सांडली, हें पाहून ती ह्मणाली:

"प्रेमिले, पोरी तूं हल्लीं फारच दांडगी झाली आहेस; पोरीच्या जातीला इतका दांडगेपणा शोभतो काय?"

प्रेमिला—ह्या अवदसे मोलकरणीनें येऊन कांहीं तरी भलत्या सलत्या चहाड्या तुला सांगितल्या असतील. असें ह्मणून, मांजर उंदरावर उडी घालतें त्याप्रमाणें तिनें मावशीच्या मांडीवरून उडी मारून त्या मोलकरणीच्या केंसाला हात घातला; आणि ते पुष्कळ जोरानें इकडून तिकडे हालवून तिच्या मानेला बरेच हिसके दिले.

मावशीनें तिला सोडण्याविषयीं पुष्कळ धमकावून सांगितलें, पण तिनें तें ऐकिलें नाहीं.

निराबाई—(आपले बहिणीकडेस वळून) बाई मिरे, ही पोर तर फार दांडगी होत चालली आहे हो. मुलीच्या जातीला इतका दांडगेपणा कामाचा नाहीं. हिला एव्हांपासूनच कांहीं तरी उपाय केला पाहिजे. मला तर वाटतें कीं, थोडे दिवस हिला एखाद्या चांगल्या शिक्षकाच्या स्वाधीन करून पहावें. पोर वठणीस आली तर ह्या वयांत येईल, मग जड जाईल.

मिराबाई—काय सांगूं आका, मी आज पुष्कळ दिवस एखादी चांगली शिकलेली बाई हिच्याकरितां पाहत आहें, पण अजून ती कोठें मिळत नाहीं. त्यास काय करूं? पुरुष कीं नाहीं पायलीचे पन्नास मिळतात, पण त्यांस काय करावयाचें आहे? हिला उनाड करावयाची मला का हौस आहे?

निराबाई—"दोन डोळे शेजारीं आणि भेट नाहीं संसारीं" ह्मणतात कीं नाहीं त्यांतली ही गोष्ट तूं सांगितलीस बाई. अग, तुझ्या पेठेंत माधवरावकारभाऱ्यांची धाकटी सून आहे; ती तर हजारांत एक बायको आहे. काय तिची विद्वत्ता व गुण तुला सांगूं? अग तुला तिच्याविषयीं माहिती मुळींच कशी नाहीं?

मिराबाई—आका, तिजविषयीं तर खरोखर मला अद्याप कांहींएक माहिती नाहीं. तिजकडेस मीं हें आतां माणूस पाठवितें. कोण ग तेथें? धोंडे इकडे ये अशी. ऐकलेंस का, कोणी माधवराव या नांवाचे कारभारी या पेठेंत राहतात. आका ह्मणते कीं, त्यांची धाकटी सून फार शिकलेली आहे. ती जर शिकविण्याच्या कामावर रहात असेल तर तिनें प्रेमलेस शिकवावें.

आह्मी तिला तूर्त दरमाहा दहा रुपये देऊं; जेवणखाण व चोळी-लुगडें त्या शिवाय. आमची मुलगी मूळाक्षरें व बाराखडया शिकून थोडथोडें वाचावयास लागली व कांहींशी रीतीला लागली ह्मणजे मग पगारावर तिला आणखी बक्षीस देऊन खूष करूं, असें सांग.

नंतर धोंडी तेथून निघाली ती 'कारभारी साहेबांच्या घरीं येऊन पोंचली. तेथें सगुणाबाईस क्षेमकुशल विचारल्यावर या घरच्या मालकीण आपणच काय ह्मणून विचारलें.

वेणू—(तेथें जवळच होती ती ह्मणते) होय बाई; ह्याच बाईसाहेब घरच्या मालकीण. बाई, आपण कोठून आलां? काय काम आहे?

धोंडी—या बाईसाहेबांच्या धाकट्या सुनेजवळ थोडेंसें बोलावयाचें आहे. ती कोठें आहे?

सगुणाबाई—कां, ती माडीवर आहे.

धोंडी—मी तिजपाशीं वर जाऊं का?

वेणू—बाई, आपलें नांव काय व आपण आलां कोठून तें सांगाल तर मी त्यांसच खालीं बोलावून आणतें.

धोंडी—बाई, मी सरनोबतांच्या येथून आलें आहें. त्यांच्या-जवळ कांहीं नाजूक काम आहे ह्मणून सांगा.

सगुणाबाई—काय तूं सरनोबतांच्या येथून आलीस? मिराबाई आणि त्यांच्या घरची सर्व मंडळी बरी आहेना?

धोंडी—होय बाई; सर्व खुशाल आहेत. त्यांनींच मला आपल्या सुनेकडे पाठविलें आहे.

सगुणाबाई—कां इतकें नाजूक व जरुरीचें असें तिजपाशींच काय काम आहे?

धोंडी–तीसच्च खालीं येऊंद्या, ह्मणजे आपणांस सर्व कांहीं कळेल.

वेणू–(माडीवर जाऊन) वहिनीबाई, सरनोबतांची मोलकरीण आली आहे, ती आपणांस खालीं बोलावीत आहे.

धोंडी–(हिराबाईस पाहून) या बाई, आपण बऱ्या आहांना?

हिराबाई–होय, ईश्वराच्या दयेनें अजूनपर्यंत बरी आहें. तूं कां आलीस? कांहीं काम आहे का?

धोंडी–होय, थोडेंसें काम आहे खरें. आमच्या मांसाहेबांच्या मनांतून आपल्या धाकट्या मुलीला शिकवावयाचें आहे. तेव्हां आपण तिला शिकविण्याचें काम पत्करावें काय ह्मणून मांसाहेबांनीं विचारिलें आहे. त्यांची मोठी बहीण निराबाई ही आपल्यास माहीतच असेल. तिनें आपली फार तारीफ केल्यावरून मांसाहेबांनीं आपलें कसें काय ह्मणणें आहे तें विचारण्यास पाठविलें आहे.

हिराबाई–(शिकविण्याचें नांव ऐकतांच थोडीशी चकित होऊन) दोघांही मांसाहेबांस मी फार फार विचारलें आहे ह्मणून सांग. सासूबाईंची आज्ञा होईल तर मला जें थोडें बहुत वेडेंवांकडें येत आहे तें मी त्यांच्या मुलीस मोठ्या आनंदानें शिकवीन. मनुष्यें ज्ञान संपादन इतक्याच करितां करतात कीं, त्यापासून एकतर स्वतांस फायदा व्हावा, आणि शिवाय त्याचा दुसऱ्यांसही लाभ करून देतां यावा. माझ्या माहेरीं किती मुली मजकडे शिकावयास येत असत, हें मोठ्या मांसाहेबांस माहीतच असेल. माझ्या मनांतून मांसाहेबांच्या मुलीला शिकवावयाचें फार आहे. पण काय करूं? एक तर मांसाहेबांस आह्मा गरीबांच्या घरीं आपल्या मुलीस दररोज पाठवितां येणार नाहीं. बरें माझेंही येणें तिकडे वारंवार होईल असें वाटत नाहीं.

धोंडी—बाई, येण्याजाण्याविषयीं आपण कांहीं एक काळजी करूं नका; त्याची व्यवस्था आईसाहेब सर्व कांहीं करतील. शिवाय तुह्मांस बरेंच वेतन देण्यास त्या तयार आहेत.

हिराबाई—ही त्यांची आह्मांवर मोठी कृपा समजावयाची. असें करणें हें त्यांस मोठें भूषण होय. आह्मी गरीब मनुष्यें त्यांच्याच आश्रयानें आहोंत असें ह्मटलें पाहिजे. त्यांच्याच पुण्याईनें ईश्वर आह्मांस अन्नवस्त्राची कोणत्याही रीतीनें ददात पडूं देत नाहीं. ह्मणून कांहीं मोबदला न घेतां त्यांची सेवा करण्यास मी राजी आहें. आणि पगार देऊनच शिक्षक ठेवावयाचा असेल तर आज या शहरांत त्यांस कांहीं तोटा नाहीं.

नंतर धोंडीनें हिराबाईचा सगळा वृत्तांत विचारला. आणि जेव्हां तिला असें कळून आलें कीं, ती तहशीलदाराची मुलगी असून तिचा सासराही शंभर रुपयांवर कोल्हापुरकरांच्या पदरीं दुय्यम कारभारी आहे, तेव्हां धोंडी अगदीं खट्टू झाली, आणि तिजपाशीं पगाराची गोष्ट कोठून काढिली असें तिला झालें. हिराबाईचा तो सरळ स्वभाव व मधुर भाषण ऐकून ती मनांत फारच खूष झाली, आणि चाकरीविषयीं बोलल्याबद्दल हिराबाईपाशीं क्षमा मागूं लागली.

हिराबाई—यांत अपराध तो कसचा बाई, आणि माफी ती काय करावयाची? पाहिलें असतां चाकरींत कांहीं अपकीर्ति किंवा हलकेपणा आहे असें मुळींच नाहीं. आपण सहज बोललां त्यांत वावगें तें काय झालें?

याप्रमाणें बोलणें झाल्यावर धोंडी सर्वांची रजा घेऊन निघाली, आणि सरनोबतांच्या बायकोस येऊन सांगूं लागली कीं, "आई-साहेब, मास्तरीणबाई तर लाखांत एक बायको आहे. तिचें नुस्तें

तोंड पाहूनच भुकेलेल्या मनुष्याची भूक नाहींशी होईल. आणि तिच्यापाशीं घटकाभर बसल्यानें देखील चार चौघांत बोलावें चालावें कसें हें कळून येईल. फार तर काय पण मला वाटतें कीं, तिची नुस्ती सावली पडली तरी भीड मर्यादा अंगीं येईल. आणि तिचा वारा लागल्यानें देखील तिचे अमूल्य गुण अंगीं येतील. हें सगळें खरें, पण आईसाहेब, ती चाकरीस रहाणारी नव्हे हो! ती तहशीलदाराची कन्या असून कोल्हापूरच्या दुय्यम कारभाऱ्यांची सून आहे. तिच्या घरांत एकदोन मोलकरणी कामास आहेत. दिवाणखान्यांत गालिचा पसरलेला असून त्यावर लोडें, तक्के ठेविले आहेत. हंडचा झुंबर लावले आहेत. याप्रमाणें त्यांचा घरसंसार मोठ्या थाटाचा आहे. तेव्हां चाकरीची त्यांस काय परवा आहे बेर?

निराबाई—बाई मिऱ्ये, धोंडी ह्मणते तें सगळें खरें आहे. तूं तिला पाठविलीस खरी, पण मलाही वाटलें होतें कीं, ती चाकरीस राहणारी नव्हे.

धोंडी—आईसाहेब, पण याबद्दल चिंता करावयास नको. त्या कीं नाहीं इतक्या चांगल्या स्वभावाच्या व मनमिळाऊ आहेत कीं फुकट शिकविण्यास देखील त्या राजी होतील; आणि त्यांनीं याप्रमाणें मजकडे बोलूनही दाखविलें आहे.

मिराबाई—काय ती आमच्या घरीं येऊन शिकवील? आणि फुकट?

धोंडी—बाईसाहेब हें काय विचारितां? अहो जी चाकरीची परवा बाळगीत नाहीं ती आपण होऊन आमच्या येथें चालून काय ह्मणून येईल?

मिराबाई—तर काय मुलीस तेथें पाठविलें पाहिजे? असें असेल तर तें नको बाई शिकणें.

निराबाई—अग मुलीला तिच्या घरीं पाठविण्यास काय अडचण आहे? येथून दोन पावलांवर तर तिचें घर आहे. आणि तशांत तिचा सासरा म्हणजे कांहीं लहानसान असामी आहे असें समजूं नकोस. ते कीं नाहीं, आपले साबाजीराव भोंसले नागपूरकर यांच्या वंशांतले आहेत. पळपुटे बाजीराव नाहींसे झाले तेव्हांपासून पेशवे सरकारांतून त्यांस पेनशन होतें तें बंद झालें. त्या दिवसापासून बिचाऱ्यांच्या घराण्यास उतरती कळा लागली आहे, ती अद्याप सुटत नाहीं. असें आहे तरी, त्यांचें स्वतांचें घरदार व थोडीशी इनाम जमीन आहे. शिवाय कोल्हापुरकरांजवळ ते कारभारी असून दरमहा शंभर रुपये त्यांस मिळतात. त्यांस दुसऱ्याच्या दारीं जाण्याचा प्रसंग अद्याप कसा तो आला नाहीं. त्यांच्या योग्यतेनुसार हल्लीं एक दोन चाकर-माणसेंही त्यांच्या पदरीं आहेत.

मिराबाई—असें आहे तर मग त्यांचें घराणें आपल्याच आप्त-सोयऱ्यांपैकीं समजावयाचें; यास्तव प्रेमिलेस त्यांच्या येथें पाठवि-ण्यास कांहीं चिंता आहे असें नाहीं.

नंतर दुसरे दिवशीं मिराबाई व निराबाई या दोघी बहिणी प्रेमि-लेस घेऊन हिराबाईच्या घरीं गेल्या. हिराबाईचा जरी गरिबीचा संसार होता तरी तिचा आगतस्वागताचा बेतबात व घरांतील सर्व कांहीं सामानसुमान जेथल्या तेथें व्यवस्थित रीतीनें मांडलेलें पाहून दोघी बहिणी मनांत फार चकित होऊन आनंद पावल्या. मग त्या दोघी बहिणी हिराबाईस म्हणाल्या :

"मुली, तूं कृपाकरून या आमच्या मुलीस जीव लावून

चार अक्षरें शिकवून सुमार्गास लावशील तर तुझी मोठी मेहेरबानी होईल. आह्मीं तुझे उपकार जन्मोजन्मीं विसरणार नाहीं."

हिराबाई—आईसाहेब, पण मला आपल्या मुलीस शिकवून सुमार्गासलावण्यापुरतें ज्ञान कोठें आहे? मला जें थोडेंसें वेडें-वांकडें लिहितां वाचतां येतें तें मी आपल्या मुलीस शिकविण्यास कधींही आळस करणार नाहीं.

नंतर इकडच्या तिकडच्या कांहीं गोष्टी झाल्यावर जातेवेळीं मिराबाई एक मोहर काढून हिराबाईस देऊं लागली.

हिराबाई—हें काय आईसाहेब? ही कशास पाहिजे? अहो, आपल्या मुलीस शिकविण्याबद्दल आपणाकडून मी कांहीं घ्यावें अशी गोष्ट मजकडून कदापि घडणार नाहीं.

मिराबाई—छेः छेः, मी तुला शिकविण्याचें वेतन ह्मणून देत आहें असें समजूं नको. आमच्या मुलीस शिकविण्याबद्दल तुला द्यावयास लागलों तर काय आह्मी पुरीं पडणार आहों? पण मुलीच्या शिकण्याचा आज मुहूर्त झाला आहे. त्याबद्दल ही मिठाईसाठीं तुला दिली आहे असें समज.

हिराबाई—हें पाहून, आईसाहेब, मला मोठें नवल वाटतें. मिठाईकरितां ह्मणून एक मोहोर ती कशाला? आतां आपल्यांत चालच आहे, ह्मणून मुलींचीं तोंडें गोड करण्यापुरती फार झाली तर शेर दोन शेर मिठाई ह्मणजे 'शिकस्त झाली. त्यास एवढ्या पैशांची हो मिठाई कशास. सगळ्या शहरास का वाटावयाची आहे?

असें म्हणून हिराबाईनें वेणूमोलकरणीला बाजारांतून एक शेर मिठाई आणण्यास खूण केली. ती तिनें एका तबकांत घालून आणल्यावर हिराबाईनें प्रेमिलेस एका पाटीवर मूळाक्षरें काढून दिलीं;

आणि ईश्वरानें तीस चांगली बुद्धि देऊन या कामीं आपणास यश यावें ह्मणून तिनें त्याची प्रार्थना केली. मग आणलेल्या मिठाईतील थोडी मिठाई प्रेमिलेस देऊन मिठाईचें तबक वेणूकडे देऊन सांगितलें कीं, ही मिठाई सर्व मुलींस वाटून दे.

मिराबाई–मुली, तूं मला खालीं पहावयास लावलेंस, हें चांगलें केलें नाहींस.

हिराबाई–यांत खालीं पहाणें कसचें आईसाहेब? आणि आमच्यासारख्या गरिबांची तुह्मांस खालीं पहाण्यास लावण्याची काय प्राज्ञा? आमच्या घरांत जें कांहीं आहे तें आपल्या दयेनें आम्हांस मिळालें आहे. प्रेमिलाबाई लिहिण्यावाचण्यास शिकल्या ह्मणजे मग आपणास वाटेल तें मला द्या. मी तें आनंदानें घेईन. नको ह्मणणार नाहीं. मग तर झालें ना?

नंतर कांहीं वेळ इकडच्या तिकडच्या आणखी कांहीं गोष्टी झाल्यावर प्रेमिलाबाईस हिराबाईच्या स्वाधीन करून त्या दोघी बहिणी आपल्या घरीं गेल्या. आतां हिराबाईनें प्रेमिलाबाईस शिक्षण देण्याचा क्रम कोणत्या रीतीनें ठेविला होता, त्याची तपशीलवार हकीकत एका निराळ्याच पुस्तकांत* देण्याचें योजिलें आहे. ती सर्व हकीकत येथें दिली असतां हें पुस्तक फारच मोठें होईल. तेव्हां या ठिकाणीं इतकेंच सांगणें बस आहे कीं, ज्या दिवसापासून हिराबाई प्रेमिलेस आपल्या घरीं शिकवूं लागली त्या दिवसापासून साऱ्या पेठेंतील

---

* या बोलीप्रमाणें या मूळ पुस्तक कर्त्यानें सन १८७२ त "बनातुन्ना-आश" या नांवाचें एक पुस्तक छापून प्रसिद्ध केलें आहे. त्याच्या नमुन्या-वर आह्मींही एक पुस्तक लिहून तयार केलें आहे. त्याची जाहिरात या पुस्तकाच्या शेवटीं छापिली आहे. ती वाचकांनीं अवश्य पहावी.

लोक हिराबाईच्या घरीं येऊन आपआपल्या मुलींस शिकविण्याविषयीं विनंति करूं लागल्या. ज्या मुली कुलीन घराण्यांतल्या असून शिकण्यासारख्या दिसल्या, अशांसच सासरच्या मांणसांच्या परवानगीनें शिकविण्याचें तिनें कबूल केलें, आणि बाकीच्यांस वाईट न वाटे अशा युक्तीनें नाहीं ह्मणून सांगितलें. अशी आवडनिवड तिनें केली तरी कमींतकमी वीस बावीस मुली दररोज तिच्या येथें शिकावयास येऊं लागल्या. पण त्यांतून एकाही मुलीकडून हिराबाई शिकविण्याबद्दल कांहींएक घेत नसे. उलट आपल्या पदरचे दोन तीन रुपये कागदलेखण्या व सुईधागा यांस तिनें दरमहा खर्च करावे. शाळेंतील शिक्षणाचा क्रम तिनें येणेंप्रमाणें ठेविला होता: सकाळचे सात वाजल्यापासून तों दहा वाजेपर्यंत लेखन, वाचन व गायन शिकवावें. पुढें दहा वाजले कीं, जेवावयास ह्मणून तीन तासांची रजा द्यावी. नंतर एक वाजल्यापासून तीन वाजततोंपर्यंत गणित, इतिहास, भूगोल इत्यादि विषय सवडीनुसार थोडथोडे शिकवावे; आणि तीन वाजल्यापासून पांच वाजततोंपर्यंत शिवणकाम चालवावें. शिवणकाम एकाच प्रकारचें नसे. तें ती मुलींची योग्यता पाहून त्याप्रमाणें त्यांस शिकवीत असे. कोणास मुलांचीं झुबलीं, कोणास पोलके, कोणास चोळ्या असे कपडे बेतण्यास तिनें शिकवावें. कोणास फांक घालून उभारण्यास तर कोणास तुरपण्यास सांगावें. त्याचप्रमाणें कोणास लोंकर व क्यानवास यांच्या टोप्या करण्यास, कोणास मोजे विणण्यास व दुसरें तरतऱ्हेचें लोंकरीचें सुंदर काम करण्यास तिनें शिकवावें. शिवाय आठवड्यांतून दोनदां त्यांस स्वयंपाककामाची माहिती सांगून त्यांजकडून तो करवून घ्यावा. याप्रमाणें प्रपंचास लाग-

णाऱ्या निरनिराळ्या गोष्टींचें शिक्षण, जें स्त्रियांस मिळणें जरूरीचें आहे, तें तिनें त्यांस क्रमाक्रमानें दिलें. प्रथमतः शिवण्याचें सर्व कांहीं साहित्य घेण्यास तिला दहा पंधरा रुपये खर्च आला खरा; पण पुढें त्या साहित्याच्या योगानें बरेंच उत्पन्न होऊं लागलें. जें जें शिवणकाम व काशिद्याचें काम ती मुलींकडून करवीत असे, तें वेणूमोलकरणीच्या हातीं बुधवारांत पाठवून दुकानदारांस विकी, आणि त्याचे जे पैसे येत ते ती शाळेच्या नांवानें जमा करी. या रीतीनें शाळेच्या नांवें एक बरीच मोठी रक्कम जमा झाली. शाळेंत येणाऱ्या मुलींपैकीं ज्या मुली गरीब स्थितींतल्या होत्या त्यांस कधीं कधीं या रकमेंतून चोळीलुगडें ती घेऊन देत असे. मुलींस पाणी पाजण्याकरितां व शाळेची जागा साफ ठेवण्याकरितां एक बाई ठेवली होती, तिलाही या रकमेंतून ती पगार देत असे. शाळेंत शिकावयास येणाऱ्या सर्व मुलींची हिराबाईवर फारच भक्ति असे, आणि तिचीही सर्व मुलींवर आई-सारखी ममता असे. हिराबाई सकाळीं बिछान्यावरून उठली नाहीं तोंच तिच्यायेथें मुली जमूं लागत. त्या संध्याकाळपर्यंत तिच्या सभोंवतीं बसलेल्या असत. तिच्याजवळ बसून शिकण्यांत जी त्यांना करमणूक व आनंद होत असे, तसा आनंद त्यांस आपल्या आईकडे बसूनही होत नसे. फार काय, पण त्यांस कोणत्याही प्रकारचे खेळही आंवडतनासे झाले. हिराबाईकडून संध्याकाळीं घरीं जावयाचें म्हणजे त्यांच्या अगदीं जिवावर येई. इतकी प्रत्येक मुलीची तिजवर प्रीति जडली होती. याप्रमाणें हिराबाईची शिकविण्याची रीत मोठी तारीफ करण्याजोगी होती. तिनें सहज बोलतां बोलतां त्यांस पुष्कळ विषयांची माहिती करून द्यावी.

हिराबाईस बापानें ज्या रीतीनें शिकविलें होतें तीच रीत तिनें आपल्या शाळेंत चालू केली होती. यामुळें तिच्याकडे येणाऱ्या सर्व मुली तिच्या मैत्रिणींप्रमाणें तिच्याशीं वागत असत. गुरुशिष्यांचें नातें जें साधारणत: मोठें कठोरपणाचें असतें तसा कांहींएक प्रकार हिराबाईच्या शाळेंत नसे. शाळेंतील एखाद्या मुलीचें लग्न होऊं लागलें ह्मणजे तिला प्रसंगानुसार लहान मोठ्या चोळीलुगड्याचा वगैरे शाळेच्या फंडांतून तिनें आहेर करावा. हिराबाईच्या मनांतून आपली शाळा वाढवावयाची असती तर शहरांतील एकूण एक मुलींच्या शाळा उजाड झाल्या असत्या. शेंकडों बायका आपल्या मुलींस शाळेंत घेण्याविषयीं तिची विनवणी करीत. आणि कित्येक मुली तर आपण होऊन तिच्या शाळेंत येण्यास इच्छीत. याचें कारण हेंच होतें कीं, इतर शाळांतून मुलींस सारा दिवस कोंडल्यासारखें रहावें लागत असे. शिवाय मास्तरचा किंवा मास्तरणीचा मुलींनां अतिशय धाक असून शिकणें थोडें पण मार फार असा प्रकार असे. पण हिराबाईच्या येथें कोंडमारा किंवा धाक असें कांहींएक नव्हतें. आपल्या शाळेंतील मुलींस धाक घालावयाचा असला ह्मणजे ती त्यांस येवढेंच सांगे कीं, "मुलींनों, तुह्मीं आपले धडे पाठ करीत नाहीं हें चांगलें नाहीं. यामुळें माझ्या शाळेस मात्र कलंक लागतो. पुन्हा असें कराल तर संभाळा. तुमच्या वडिलांस बोलावून आणून सांगेन कीं, ह्या तुमच्या मुलींस कोठल्या तरी दुसऱ्या शाळेंत पाठवा, त्या येथें कांहीं शिकावयाच्या नाहींत." इतकें हिराबाईनें ह्मटलें पुरे, कीं मुली अगदीं घाबरून जात, आणि मग त्या आपले धडे पाठ करण्याची मेहनत झटून करीत. इतकेंही करून एखाद्या मुलीनें आपला धडा पाठ नच केला तर तिनें

ह्मणावें, "काय मुली, तूं आपला धडा पाठ केला नाहींस? हें फार वाईट आहे बरें; आतां असें कर कीं, संध्याकाळीं इतर मुली शिवण्यास व काशिदा काढण्यास बसल्या ह्मणजे त्यावेळीं तूं आपला धडाच पाठ करीत बैस." असें ह्मटलें कीं, ती मुलगी अगदीं हिरमुसल्यासारखी होई, कारण मुलींचा स्वाभाविक कल ह्मटला ह्मणजे लिहिण्यावाचण्यापेक्षां काशिदा काढणें, शिवणें यांजकडे अधिक असतो, ह्मणून तिला ही शिक्षा मोठी कडक वाटे; आणि मग दुसऱ्या वेळेपासून ती आपला धडा तयार करून येई. शाळेंत अवघ्या दोघी मुली काय त्या जाणत्या होत्या. एक प्रेमिलाबाई व दुसरी शांताबाई. त्यांजकडेस हिराबाईनें हजिरी घेण्याचें वगैरे शाळेंतलें बारीक सारीक काम सोंपविलें होतें.

प्रकरण सोळावें.

हिराबाईची शिकविण्याची रीति.

हिराबाईच्या शाळेच्या संबंधाची एक गोष्ट वाचकांस सांगतों; ह्मणजे तिजवरून हिराबाईची शिकविण्याची पद्धत कशी होती यार्चे थोडक्यांत अनुमान करतां येईल.

अन्नपूर्णा नांवाच्या एका बाईची गंगू ह्मणून एक दहा वर्षांची मुलगी होती, तिला लिहिण्या वाचण्याची व शिवणकामाची स्वभावतांच फार हौस होती. पण तिच्या आईची इच्छा अशी होती कीं, आपल्या मुलीनें घरांतच राहून घरकामांत आपणास मदत करावी. आईच्या सांगण्यावरून अशीं कामें तिला नित्य करावीं लागत. पण तिचें मन त्या कामांकडे मुळींच लागत नसे. एके दिवशीं अन्नपूर्णाबाई आपल्या मुलीवर फारच रागावली; आणि रागाच्या झपाट्यांत गंगूला ओढीत नेऊन तिनें हिराबाईच्या शाळेंत बसविलें; आणि तिला ह्मणाली, "पहा हो मास्तरीणबाई, ही मुलगी अगदीं कशी दांडगी होऊन गेली आहे ती. जें काम सांगावें तें करण्याविषयीं ही कांकूं करते, आणि मला उलट जाब देते. ह्मणून तुमच्यापाशीं हात जोडून एवढीच विनंति करितें कीं, हिचा हा उर्मटपणा जाऊन ही सांगितलेलें

काम करील असें करा. मी आपले उपकार जन्मोजन्मीं विसरणार नाहीं."

हिराबाईनें गंगूची परीक्षा घेऊन पाहिली, तों तिच्याकडून मनाजोगतीं उत्तरें तीस मिळालीं. गंगूलाही पाहिजे होती तशी शिकविणारीण सांपडली हें पाहून पराकाष्ठेचा आनंद वाटला. शाळेंत घातल्यापासून दररोज प्रातःकाळीं तिनें हिराबाईच्या येथें यावें तें दुपारीं जेवावयास मात्र घरीं जावें, व जेवण आटोपलें कीं तसेंच परत शाळेंत यावें, तें पुन्हा दिवे लागतां घरीं जावें. असा तिचा क्रम असे. अन्नपूर्णाबाईनें आपल्या मुलीच्या चौकशीकरितां शाळेंत यावें, तेव्हां गंगूला इतर मुलींशीं कधीं कधीं बाहुल्यांनीं खेळतांना ती पाही. शिवाय एक दोनदां तर ती स्वैंपाक करण्याच्या कामांत गुंतली आहे असेंही तिनें पाहिलें. एके दिवशीं पुष्कळ रात्र झाली तरी गंगू घरीं आली नाहीं असें पाहून तिला बोलवण्याकरितां म्हणून अन्नपूर्णाबाई शाळेंत गेली; आणि पहाते तों शांताबाई गोष्ट सांगत आहे, आणि शाळेंतील बहुतेक मुली तिच्या भोंवतीं जमलेल्या आहेत. स्वतः हिराबाईही मुलींत मिसळून त्यांजबरोबर लक्ष्य देऊन गोष्ट ऐकत आहे; असें पाहून अन्नपूर्णाबाईची तर पायांची तिडीक मस्तकास गेली, आणि ती रागानें म्हणाली:

"वाः बाई, आपण तर मुलींस चांगल्या मार्गास लावण्याचें टाकून त्या आहेत त्यापेक्षां जास्त उनाड करण्याचा धंदा मांडला आहे वाटतें. ठीक, ठीक, हें फार चागलें! जेव्हां जेव्हां म्हणून मी गंगूला पहायाला येतें तेव्हां कधीं म्हणजे ती वाचीत आहे असें मला आजपर्यंत दिसून आलें नाहीं. ही कांहीं शिकण्याची शाळा नव्हे; ही शुद्ध नाटक कीं चेटक शाळा म्हणतात त्यांतली आहे; नव्हे; ही शुद्ध नाटक कीं चेटक शाळा म्हणतात त्यांतली आहे;

आणि गांवांतल्या साऱ्या मुली ह्याच शाळेंत येण्याची इच्छा करितात त्याचें कारण मला आतां कळलें बाई.

हिराबाई—होय बाई, आपल्या ह्मणण्याप्रमाणें एका अर्थानें पाहिलें असतां ही एक नाटकशाळाच आहे. आपल्या मर्जीप्रमाणें मुलीचें शिकणें येथें होत नाहीं असें आपल्यास वाटत असेल तर आपण बेलाशक मुलीस घेऊन जा. आपणास मी विचारतें कीं, आपली मुलगी नंबर एकचे शाळेंत किती दिवस शिकत होती, व येथें येण्यापूर्वी काय काय शिकली होती, हें कृपा करून सांगाल तर बरें पडेल.

अन्नपूर्णाबाई—तेथें तर ती सरासरी तीन महिने गेली असावी. ण तेवढ्या मुदतींत ती सर्व मूळाक्षरें शिकून तिच्या अर्ध्या अधिक बाराखड्याही संपत आल्या होत्या. शिवाय फाटलें तुटलें कापड तांगडून देण्यासही तिला येत असे.

हिराबाई—बरें, तिला इकडे येऊं लागल्यास किती दिवस झाले असतील?

अन्नपूर्णाबाई—तें मला काय विचारतां? त्याची मजपेक्षां तुह्मांस चांगली आठवण असेल; तुह्मीच सांगा किती दिवस झाले ते.

हिराबाई—ज्येष्ठ महिन्याच्या आरंभींच ती आली, व सध्यां श्रावण चालला आहे. पौर्णिमेस अजून चार दिवस बाकी आहेत, तेव्हां गंगूला ह्या शाळेंत येऊन आज अडीच महिने पुरे होतील. येवढ्या मुदतींत तिच्या सर्व बाराखड्या होऊन तिला थोडेंबहुत पुस्तकावरून वाचावयास येत आहे. पूर्वी तिला वीस अंकही बरोबर मोजतां येत नसत. ते आतां तिचे सारे अंक होऊन पंधरांचा फाढा चालला आहे. शिवाय इतके दिवस पांढऱ्यावर काळें कसें करावें हें तिच्या

गांवीं सुद्धां नव्हतें. तीच आतां कागदावर वेडींवांकडीं अक्षरें काढूं लागली आहे. तीं अक्षरें तिच्या शक्तीप्रमाणें पाहिलीं असतां पुष्कळ चांगलीं आहेत. शिवणकामाविषयीं ह्मणाल तर फार लांब जावयास नको. यमुने जा, त्या शेवटल्या खणांत गंगूनें टीप घालून तयार केलेली चोळी आणि तिनें विणलेले पायमोजे आहेत, ते यांला आणून दाखीव.

गंगू–बाई तें मीच जाऊन आणतें.

असें ह्मणून तिनें धांवत जाऊन आपण भरलेला काशिदा आणून हिराबाईपाशीं दिला. अन्नपूर्णाबाई, एका गोष्टीस सत्रा जबाब मिळतातसें पाहून, तोंडांत मारल्यासारखी होऊन गुपचूप बसली.

हिराबाई–(आणलेले नमुने दाखवून) पहा बाई, हातचे काकणास आरसा नको. अडीच महिन्यांत तुमची मुलगी याहून अधिक तें काय शिकणार?

अन्नपूर्णाबाई तें सर्व पाहून इतकी लज्जायमान झाली कीं, तिच्या अंगांतून दरदरून घामाच्या धारा सुटल्या, आणि ती मान खालीं घालून उभी राहिली. तिच्या तोंडावाटे चकार शब्दही निघेना. अन्नपूर्णाबाई आल्यानें शांताबाईची गोष्ट एकीकडेसच राहून सर्व मुली अन्नपूर्णाबाईच्या भोंवतीं मिळून तिच्या तोंडाकडे टकमक पाहूं लागल्या.

अन्नपूर्णाबाई–मास्तरीणबाई, ही इतकी शिकली आहे तें मला काय बरें माहीत? ती सारा दिवस इकडेसच असते, आणि रात्रीं फार उशिरां घरीं येते. घरीं जाऊन जेवली कीं लागलीच निजते. यामुळें मला तिची विचारपूस करण्यास वेळ मिळत नाहीं. मी इकडे फार नाहीं तरी दहा पांच वेळां आलें असेन, पण तितकेदां कधीं

तिला वाहुल्यांशीं खेळतांना, चूल फुंकितांना आणि कधीं गोष्ट ऐकतांना पाहिलें आहे; यावरून मला संशय येण्यास कारण झालें; आणि मी मनांत समजलें होतें कीं, ह्या मुली आपला सर्व वेळ अशाच खेळण्या वागडण्यांत घालवीत असतील. तोंडांतून एक वेळ गोष्ट निघून गेली ती गेली. त्याबद्दल मला आपण आतां क्षमा करा, इतकें पदर पसरून आपल्याजवळ माझें मागणें आहे.

हिराबाई—आपणास संशय येण्यास कारण तर सबळ होतें खरें. पण मी यांस अशा मौजेच्या गोष्टी सांगूनच कित्येक महत्वाच्या गोष्टींची माहिती करून देत असतें. शिवाय यांना स्वयंपाक चांगला करतां यावा ह्मणून कधीं कधीं स्वयंपाकाचें कामही यांजकडून मी करून घेत असतें. गंगू, सांग बरें गेल्या मंगळवारीं मंगळागौरीस तुम्हीं कोणतें पक्वान्न केलें होतें, त्यास खर्च किती लागला, आणि तें कसकसें तयार केलें, याची सर्व माहिती आपल्या आईस सांग पाहूं.

गंगू—बाई, कालच्या मंगळागौरीस आम्हीं मृदुवल्या केला होत्या. त्यांस जो खर्च आला त्याचा तपशीलवार हिशोब शांताबाईनें आपल्या वहींत टांचून ठेवला आहे. मला तो हिशेब बरोबर सांगतां येणार नाहीं. पण मृदुवल्या कशा कराव्या तें मी लक्षपूर्वक पाहिलें आहे. तो प्रकार आपण विचाराल तर मी सांगतें.

हिराबाई—बरें तेवढाच सांग. तुझ्या ध्यानांत तो प्रकार कसा राहिला आहे तो तरी पाहूं.

गंगू—पहिल्यानें आह्मीं एक शेर तांदूळ घेऊन त्यांतील कण्या काढल्या; आणि मग ते चाळीस रुपये भार वजन करून घेतले. नंतर ते थोडा वेळ भिजत घालून स्वच्छ धुतले आणि त्यांचें पाणी चांगलें गळूं दिलें. मग ते थाडेसे वाळल्यावर चांगले बरीक दळले

आणि पीठ वस्त्रगाळ केलें. मग दोन नारळ आणले होते, ते फोडून खवसले; आणि त्यांचें दूध काढून ठेविलें. नंतर ऐशीं रुपये भार साखर, एक रुपया भार मीठ, व तितकीच वेलदोड्यांची पूड, असे तिन्ही पदार्थ वस्त्रगाळ केलेल्या पिठांत घालून, नारळाच्या दुधानें तें पीठ कालवून पळीनें काढतां येई इतकें पातळ केलें. मग एक पातेलें घेऊन तें पाण्यानें अर्धें भरलें; आणि तोंडास फडका बांधून त्यावर घट्ट झांकण बसे अशी एक ताटली आणखी दुसऱ्या दोन लहान ताटल्या घेतल्या. पहिल्यानें एका ताटलीला आंतून लोणी चोळून त्यांत सुमारें दोन पळ्या तयार केलेलें पीठ घालून ती बांधलेल्या फडक्यावर ठेवून त्याजवर झांकण ठेवलें, आणि खालीं मंदाग्नि केला. ताटलींतील पदार्थ शिजतांच एका परातींत बोट बुडे इतकें पाणी घालून ठेवलें होतें त्यांत ती ताटली ठेवली. दुसरी ताटली पहिलीप्रमाणें तयार करून ठेवली. इकडे पाण्यांतील ताटली चांगली निवाल्यावर त्यांतील पक्व झालेल्या पिठाच्या चौकोनी वडया सुरीनें कापून काढून मृदुवल्या तयार केल्या.

हिरावाई—वहावा; गंगू, मृदुवल्या करण्याचा प्रकार तर तुझ्या मनांत चांगल्या रीतीनें बिंबला असें वाटतें. पण पीठ वस्त्रगाळ करतेवेळीं भरड पुष्कळ मागें राहिली असें माझ्या पहाण्यांत आलें होतें. त्यावरून मला वाटतें कीं, तुम्हीं तांदूळ चांगल्या रीतीनें दळले नसावे. (अन्नपूर्णाबाईकडे वळून) कसें काय बाई, आपल्या मुलीनें मृदुवल्या करण्याचा प्रकार कसा चांगल्या रीतीनें सांगितला तो ऐकला ना? स्वयंपाककाम शिकविल्याचा हा फायदा बरें! शांताबाई, तूं मृदुवल्यांस झालेल्या खर्चाचा हिशेब सांग बरें.

शांताबाई—(टेबलाच्या खणांतून वही काढून) वहिनी, रुपयाचे सहा शेर तांदुळ या मानानें एक शेरास अडीच आणे दोन पै पडल्या, व ऐशीं रुपये भार साखर ह्मणजे सरासरी शेर झाली, तिचे सव्वाचार आणे; व पांच पैशांप्रमाणें दोन नारळांचे अडीच आणे झाले. शिवाय अर्ध्या आण्याची वेलची, अर्ध्या आण्याचें लोणी, आणि एक पैशाचें मीठ मिळून साडेदहा आणे दोन पै झाल्या. त्यांतून मीठ थोडेंसें शिल्लक आहे. आह्मीं सर्व मिळून दहा मुलींनीं ही वर्गणी काढली होती. तींत माझे स्वतांचे पावणेदोन आणे होते. त्याचप्रमाणें एक गंगू, दुसरी वेणू, तिसरी प्रेमिला, चौथी यमुना, पांचवी सरस्वती, सहावी गोदावरी, सातवी नर्मदा, आणि आठवी कावेरी व तिची दुसरी धाकटी बहीण मिळून एकंदर नऊजणींत बाकीचे पैसे जमले होते.

हिराबाई—(नंतर प्रेमिलेकडे वळून) प्रेमिलाबाई, मृदुवल्यांस खर्च किती झाला व त्या कोणत्या प्रकारें केल्या हें आपण पाहिलें. पण आतां मृदुवल्यांच्या ताटल्या किती झाल्या आणि त्यांची कसकशी व्यवस्था केली तें तूं सांग पाहूं.

प्रेमिलाबाई—एकंदर पांच ताटल्या झाल्या, त्या प्रत्येकीच्या सात सात वड्या कापल्या. या हिशोबानें एकंदर सर्व मिळून पस्तीस वड्या झाल्या. आह्मी सर्वजणी मिळून त्या दिवशीं पंचवीस मुली शाळेंत हजर होतों. त्यांपैकीं ज्या मुली विवाहित असून ज्यांच्या मंगळागौरी होत्या अशा आठ जणींस दोन दोन वड्या वाढल्या, आणि बाकी राहिलेल्या सोळाजणींस एक एक दिली; आणि शेवटीं तीन वड्या एका ताटलींत होत्या त्या मी घेतल्या.

हिराबाई–(हांसून) वा:, तर मग तूं इतरांच्या दुप्पट खाल्लेंस असें झालें.

प्रेमिलाबाई–नाहीं; माझ्या ताटलींतल्या वड्या एका बाजूकडच्या असून त्या अगदीं लहान लहान होत्या. कोणाला विचारा पाहिजे तर.

हिराबाई–(हांसून) असें होतें तर त्या तूंच कां घेतल्यास.

प्रेमिलाबाई–मी सर्वांच्या मागून आलें होतें, तेव्हां सर्वजणींना वड्या वाटून तेवढ्या तीनच काय त्या एका ताटांत शिल्लक राहिल्या होत्या. त्या मी घ्याव्या असें ठरलें. त्या वड्या मीं एकटीनें खाल्ल्या नाहींत. मागाहून माझा लहान भाऊ श्रीनिवास आला. त्यास त्यांतील एक वडी दुसऱ्या ताटांत घालून दिली.

हिराबाई–दुसऱ्या ताटांत कां दिलीस. आपल्याच ताटांतून ती त्यास खावयास कां सांगितली नाहींस?

वेणू–(मध्येंच) बाई, हिला कोणाचेंही उष्टें खाण्याचा फार किळस वाटतो.

प्रेमिलाबाई–नाहीं बाई, मी अशा अर्थानें त्यास निराळें बसविलें असें नाहीं; पण एक ताट जवळच रिकामें होतें म्हणून त्यास तें निराळें दिलें. निराळें देण्याचा दुसरा कांहीं हेतु नव्हता.

वेणू–तर मग मघां तूं माझें उष्टें पाणी पिण्यास कां बरें आनमान केलास?

प्रेमिलाबाई–तो कसा झाला तरी माझा धाकटा भाऊ आहे. पहा हो बाई, मघाशीं हिला सांगितलें कीं, तुला लागेल तेवढेंच पाणी तूं पंचपात्रींत घे; उष्टें पाणी पंचपात्रींत ठेवूं नको. जेव्हां

पाहावी तेव्हां ही अशीच आपली कांहींना कांहीं दांडगेपणा करते. मला नाहीं बाई हा दांडगेपणा सोसावयाचा.

हिराबाई–पुरे पुरे; असें कोणास दांडगट म्हणूं नये. वेणू तूं पुन्हा असें करूं नकोस. प्रेमिले, त्या दिवशीं गोंधळेकरानें केलेलें "सूपशास्त्रा" चें पुस्तक जें आपण वाचलें त्यांतून सर्व जातींचा स्वयंपाक तुम्हीं केला आहे काय?

शांताबाई–त्यांत सांगितलेलीं कित्येक पक्वान्नें मीं दुसऱ्यांनीं करतेवेळीं व कित्येक स्वतः करूनही पाहिलीं आहेत. येथें जितक्या मुली येतात त्यांतून मोठ्या मुलींस तर साधारण नेहमींच्या स्वयंपाककामाची माहिती आहेच; शिवाय पुरणपोळी, साखरपुरी, केशरी भात, अनारसे, जिलब्या, लाडू, मांडे, विवर, श्रीखंड, बासुंदी, पुऱ्या, वगैरे मिष्टान्नांचे सर्व प्रकार येथें त्यांनीं केले आहेत; आणि बाकीच्या मुलींनीं ते करतेवेळीं पाहिले आहेत.

हिराबाई–(अन्नपूर्णाबाईस) कसें काय बाई, ऐकलेंना? येथें स्वयंपाक शिकविल्यापासून मुलींस किती फायदा होतो हें पूर्णपणें आपल्या ध्यानांत आलेंच असेल. असो. आतां रात्र झाली; कित्येक मुलींचीं घरें दूर असल्यामुळें त्यांस जाण्यास रात्र होईल म्हणून कृपा करून जर उद्यां आपलें येथें येणें होईल तर मी मुलींच्या बाहुल्याबुडकुल्यांची मौज तुम्हांस दाखवीन; आणि संध्याकाळपर्यंत रहाल तर येथें गोष्टी कोणत्या प्रकारच्या सांगतात तेंही तुम्हांला समजेल.

अन्नपूर्णाबाई–असें आहे तर मी खचित उद्यां येईन बाई; पण माझें हात जोडून आपणापाशीं इतकेंच मागणें आहे कीं, मजकडून चुकून झालेल्या अपराधाची मला क्षमा करावी.

इतकें झाल्यावर अन्नपूर्णाबाई व इतर सर्व मुली आपापल्या घरीं गेल्या.

दुसरे दिवशीं अन्नपूर्णाबाई कबूल केल्याप्रमाणें पुनः आली. तेव्हां मुलींनीं स्वतां बेतून शिवलेले तरतऱ्हेचे स्त्रीपुरुषांचे व मुलांचे कपडे, लोंकरीचे विणलेले पायमोजे, टोप्या, गालिचे, तक्के, फुलें, कापडावर काढलेला रेशमी व सुती कशिदा इत्यादि सर्व कांहीं हिराबाईनें तिला दाखविलें. तें पाहून अन्नपूर्णाबाईला फारच आनंद व चमत्कार वाटला. नंतर तिनें तिला मुलींची बाहुल्याबुडकुल्यांची खोली दाखविली. त्या ठिकाणीं घरसंसारास लागणाऱ्या एकंदर वस्तू, ह्मणजे बिछाने, उशा, पलंग, मच्छरदाण्या, चौरंग हांतऱ्या, हांडे, कळशा, तांबे, पंचपात्र्या, समया, पोळपाट, तवे, कालथे, फुंकण्या, इत्यादि सर्व कांहीं स्वयंपाकाच्या व ऐषआरामाच्या वस्तू जेथल्या तेथें व्यवस्थित रीतीनें ठेवलेल्या आढळल्या. तेथल्या सर्व बाहुल्या मुलींनीं आपापल्या योग्यतेनुसार चोळ्यालुगडयांनीं व दागदागिन्यांनीं शृंगारल्या होत्या. त्यांच्याकडे पाहिलें ह्मणजे एकाद्या लग्नघरांत जणूकाय ह्या करवल्याच जमलेल्या आहेत असें वाटे. ही सर्व खोली अन्नपूर्णाबाईनें लक्षपूर्वक पाहिल्यावर हिराबाई ह्मणाली:

"सर्व खेळांत मला बाहुल्याबुडकुल्यांचा खेळ फारच पसंत वाटतो. कारण त्यांत निरनिराळ्या प्रकारचे कपडे कसे बेतावे, शिवावे हें खेळतां खेळतां कळतें; आणि त्या शिवाय घरसंसाराला काय काय सामान लागतें, आणि तें व्यवस्थित रीतीनें कसें ठेवावें वगैरे गोष्टींची माहिती सहज होते. त्याचप्रमाणें लग्नाच्या आणि सणापुरुषांच्या आपल्या लोकांच्या चाली लहानपणींच कळूं लागतात.

अन्नपूर्णाबाई, आपल्या मुलीस माझ्या शाळेंत येऊन थोडेच दिवस झाले आहेत. पण ही सरस्वती, ही प्रेमेलाबाई, आणि माझी नणंद शांताबाई यांच्याप्रमाणें ज्या मुली माझ्या शाळेंत आज पुष्कळ दिवस आहेत त्यांविषयीं मी खात्रीपूर्वक सांगतें कीं, जर एखाद्या मोठ्या कुटुंबवत्सल मनुष्याचा घरसंसार आजच यांच्या स्वाधीन केला तर ह्या अशा रीतीनें व बेताबातानें तो चालवितील कीं जणू काय त्या घरखटल्याच्या कामांत पुष्कळ वर्षें कसलेल्या आहेत असें वाटेल. मी केवळ यांच्या नुसत्या लिहिण्यावाचण्याकडेसच लक्ष पुरवितें असें आपण समजूं नका. तर संसारांतील हरएक गोष्टीची व कामधंद्यांची माहिती त्यांना करून द्यावी असा माझा निश्चय आहे. कारण, हा संसाराचा बोजा पुढें यांच्या माथीं येणार आहे. तो जर यांस चांगल्या प्रकारें वाहतां आला नाहीं तर त्यांचे पुढें हाल होणार आहेत. (प्रेमिलाबाईस हांक मारून), बाई प्रेमिले, तुमचें बाहुल्याबुडकुल्यांचें घर फार चांगलें आहे. पण त्यांत एक उणीव आहे; ती कोणती ह्मणाल तर तुमच्या बाहुल्यांचीं चोळ्या-लुगडीं चांगलींशीं रंगवलेलीं आहेत असें दिसत नाहीं. यावरून कदाचित् तुह्मांस तीं चांगलीं रंगवितां येत नसतीलसें वाटतें.

प्रेमिलाबाई—रंगाविषयींची तर मला शांताबाईनें "उपयुक्त चमत्कारसंग्रह", "व्यवहारदर्पण" व दुसऱ्या कित्येक पुस्तकांवरून चांगली माहिती करून दिली आहे. पण मी त्यांनीं सांगितलेल्या कृतीप्रमाणें हे कपडे रंगविले नाहींत. हे मी अलीकडे विलायतेहून रंगाच्या पुडया येत असतात त्यांचा रंग तयार करून त्यांत रंगवून कसे निघतात तें पाहिलें आहे. आपण ह्मणतां तें खरें, हा रंग मला चांगलासा साधला नाहीं.

हिराबाई–बरें, शांताबाईनें रंगाविषयींची तुह्मांस कसकशी समजूत दिली आहे तें तरी सांगा पाहूं.

प्रेमिलाबाई–प्रथमतः कसल्याही पदार्थास शोभा आणण्याला रंगासारखें दुसरें कोणतेंही साधन नाहीं. असा हा रंगाचा एक गुण प्रसिद्ध आहे. परंतु ह्याखेरीज दुसरा एक गुण रंगांत आहे, तो असा कीं, कांहीं कांहीं रंगांच्या अंगीं उष्णतेचें किरण टाकण्याची शक्ति कमी असते, व कांहींकांच्या अंगीं तीच शक्ति जास्त असते. त्यामुळें रंगविलेल्या वस्त्रादिक पदार्थांच्या अंगीं त्या त्या रंगाप्रमाणें ऊब जास्त किंवा कमी असते. ह्मणून निरनिराळ्या ऋतूंप्रमाणें त्या त्या रंगाची योजना केली असतां ते अधिक दिवस टिकून त्यांपासून शोभा व कांहीं अंशीं शरीरास समाधानही प्राप्त होतें. जसें पर्जन्याच्या दिवसांत गुलाबी, कुसुंबी, केशरी, नारिंगी, खरबुजी, काळा इत्यादि रंग चांगले; हिंवाळ्याच्या दिवसांत तेलिया, आबाशाई, जांभळा, काळा, अस्मानी, निळा, कंदी, पिवळा, इत्यादि रंग वापरावे; उन्हाळ्यांत प्याजी, कापशी, बदामी, सिंदुरी, कापिला, लिंबोळी, हिरवा, पारवा, इत्यादि रंग बरे. ह्यांशिवाय आणखी अनेक प्रकारचे रंग आहेत, पण जे नेहमीं लोकांच्या वापरण्यांत येत असून ज्यांपैकीं बहुतेक मला स्वतः देतां येतात तेच मी सांगितले.

हिराबाई–बरें, हे जे रंग तूं सांगितलेस त्यांची योजना सर्व जातींच्या कापडांवर किंवा पदार्थांवर सारखीच करितां येते किंवा कसें?

प्रेमिलाबाई–मास्तरीणबाई, तसें नाहीं. सर्व पदार्थांच्या अंगीं सर्व द्रव्यांचे रंग घेण्याची शक्ति नसते, ह्याकरितां एका जातीच्या

पदार्थावर ज्या द्रव्याचा रंग बसतो त्याच द्रव्याचा रंग सर्व जातींच्या पदार्थांवर बसतो, असें ह्मणतां येणार नाहीं; आणि बसलाच तर तो चांगलासा खुलत नाहीं. त्याचप्रमाणें सुतास रंग देण्याचीं द्रव्यें निराळीं, रेशमास रंग देण्याचीं निराळीं, लोंकरीस रंग देण्याचीं निराळीं, अशी रंगाच्या द्रव्यांविषयीं निराळी योजना करावी लागते.

हिराबाई—बरें तूर्त थंडीचे दिवस आहेत; व या दिवसांत चोरहळद विपुल मिळते. तेव्हां पिंवळा रंग करावयाचा झाला तर तो कसा करावा?

मेमिलाबाई—पहिल्यानें चोरहळद आणून ती पाण्यांत भिजत घालावी; नंतर ती चांगली भिजली ह्मणजे काढून बारीक वांटावी, आणि तींत शेरास छटाक ह्या प्रमाणानें तुरटी घालून रंग तयार करावा. आणि त्यांत दोन तीन वेळ वस्त्र रंगवून शेवटीं लिंबाच्या किंवा चिंचेच्या रसांत भिजवावें ह्मणजे तें लिंबोळी रंगाचें होतें; व तेंच लिंबोळी रंगाचें वस्त्र एक शेर हळद व छटाक कुसुंबा मिश्र करून तयार केलेल्या रंगानें रंगविलें असतां उत्तम पिंवळ्या रंगाचें होतें.

हिराबाई—बरें, तुरटी न मिळाली तर थोड्या खर्चांत तिच्याबद्दल कोणता जिन्नस घातला असतां चालण्यासारखा आहे?

मेमिलाबाई—हा रंग थोडयाच खर्चांत करावयाचा असेल तर तुरटीच्या ऐवजीं चुना घातला असतां चालतो. या वर्षीं चोरहळद अतिशयच पिकली आहे; आणि त्यामुळें गांवांत पिंवळ्याच रंगानें रंगविलेलीं पातळें पुष्कळ बाया नेसलेल्या दिसण्यांत येतात. चोरहळदीचा मिठाईसही फार चांगला रंग देतां येतो.

माझ्या मोठ्या बहिणीनें परवांच्या दिवशीं चोरहळदीचा रंग देऊन बर्फी पाठविली होती. तिचा रंग केशरापेक्षांही फार चांगला उतरला होता.

हिराबाई–प्रेमिले! तूं चोरहळदीनें रंगिवलेली मिठाई खाल्ली नाहींस ना?

प्रेमिलाबाई–नाहीं बाई, मी नाहीं ती खाल्ली; पण ती खालुयापासून कांहीं अपाय आहे कीं काय?

हिराबाई–अपाय तर! कारण चोरहळदींत विषाचा अंश असतो. ह्मणून चोरहळदीनें रंगविलेली मिठाई न खाण्याविषयीं फार जपलें पाहिजे.

प्रेमिलाबाई–मी तर चोरहळदीनें रंगविलेले तीळ, गेल्या संक्रांतीस पुष्कळ खाल्ले होते.

हिराबाई–त्यांस कांहीं चिंता नाहीं. कारण तीळ रंगवावयास हळद लागणार ती किती? ह्मणूनच तुला त्यापासून कांहीं अपाय झाला नाहीं. पण तींत विषाचा अंश असतो हें चांगलें लक्षांत ठेव बरें.

प्रेमिलाबाई–चोरहळदीनें रंगविलेली मिठाई तर पुष्कळ लोक नेहमीं खातात, पण त्यांस कधीं विष बाधत नाहीं, हें कसें?

हिराबाई–खातात खरी, पण ती खाण्यापासून कांहींना कांहीं तरी अपाय झाल्यावांचून रहात नाहीं. तो दिसत मात्र नाहीं, इतकेंच कायतें.

नंतर संध्याकाळ झाली ह्मणून सर्व मुलींनीं आपलीं दप्तरें व पुस्तकें आटोपून जागचे जागीं ठेविलीं, आणि नित्यक्रमाप्रमाणें कोणी

खेळण्यास, कोणी गोष्टी व उखाणीं सांगण्यास व ऐकण्यास जाऊन बसल्या.

हिराबाई–(अन्नपूर्णाबाईस) बाई, येथें कांहीं कोल्याकुत्र्याच्यां कहाण्या सांगण्यांत येत नाहींत हो. गोष्टींचें एक पुस्तक आहे त्यांत फार मौजेच्या व उपदेशपर लहान लहान गोष्टी सांगितल्या आहेत; आणि शेवटीं त्या गोष्टींचें तात्पर्य दिलें आहे. त्या पुस्तकाची भाषाही फार सोपी व सरळ आहे. ह्या मुली त्या पुस्तकांतील गोष्टी ऐकून फार आनंद पावतात; आणि त्या एकमेकांस सांगण्यानें त्यांस कसें बोलावें तें चांगलें समजतें, आणि त्यांचा भावार्थ समजल्यानें त्यांचें शहाणपण वाढतें. मला जेव्हां जेव्हां ह्मणून वेळ मिळतो तेव्हां तेव्हां मीही त्यांच्यांत बसून त्यांस त्या गोष्टींच्या संबंधानें अनेक प्रश्न विचारतें; आणि जशी त्यांची समजूत होते त्याप्रमाणें त्या मला उत्तरें देतात. दिलेलीं उत्तरें बरोबर नसलीं तर त्यांसंबंधानें मी त्यांची समजूत करून देतें. एकमेकांस घातलेल्या उखाण्यांचा उलगडा केल्यानें यांच्या ज्ञानाची वाढ व बुद्धीचा विकास होतो. आतां आपण येथें अंमळ बसून यांची गम्मत पहा. मला जरा आज सरस्वतीच्या आईनें उभ्यां उभ्यां भेटून जावयास सांगितलें आहे, ह्मणून मी तिकडे जातें. तिच्या मुलाच्या जिवास बरेपण नाहीं ह्मणून पुष्कळ विनवणी करून तिनें मला बोलाविलें आहे. न जावें तर तिला वाईट वाटेल, व माझ्या मनासही तें बरोबर दिसत नाहीं.

अन्नपूर्णाबाई–होय, मींही ऐकिलें आहे कीं, आज कित्येक दिवस झाले, तिचा मुलगा दूध ओढीत नाहीं. काय करील बिचारी! ती फार घाबरून गेली आहे. आज दहा वर्षें मुलगा

मुलगा करून एकदांचें तिनें पुत्रमुख पाहिलें; पण तें हें असें. सरस्वतीच्या पाठीवर हाच कायतो मुलगा वर्ष दीड वर्ष वांचला आहे. मास्तरीणबाई, तुह्मांला तिनें औषधपाणी करण्याकरितां बोलाविलें असेल असें वाटतें.

हिराबाई—औषधपाणी तर बाई मला कांहीं माहीत नाहीं. पण मागें तो अगदीं लहान असतां त्यास उन्हाळे झाले होते, तेव्हां मी त्याला पांढऱ्या गुंजेच्या पाल्याच्या रसांत जिरें आणि साखर घालून द्यावयास सांगितलें होतें. तें औषध दिल्यानें त्यास आराम पडला होता.

अन्नपूर्णाबाई—मास्तरीणबाई, यावरून तुह्मी सर्व गुणांनीं पुऱ्या आहां असें वाटतें. बाई आपण एक अमोलीक रत्नच आहां.

हिराबाई—यांत गुण ते कसचे बाई? माझ्या माहेरीं औषधपाण्याचा फार राबता असे. मी लहान होतें तेव्हां जें औषध घरांत येत असे तें मी चाळून व नीटनेटकें करून ठेवीत असें. ह्मणून मला पाहूनसवरून कोठें दोन चार औषधें माहीत आहेत. शिवाय मजजवळ "बालरोगचिकित्सा" व "गृहवैद्यं" अशीं दोन फार उपयुक्त पुस्तकें आहेत. त्यांतून कोणास कांहीं गरज पडलीच तर औषधें सांगत असतें. मुलांच्या व स्त्रियांच्या लहानसान रोगांवर उपाय स्त्रियांसच माहीत असावे हें बरें; व तसाच कांहीं रोग असला तर मात्र वैद्यांस किंवा डाक्टरांस बोलवावें.

अन्नपूर्णाबाई—मास्तरीणबाई, आपण कृपा करून आपल्या शाळेची सर्व व्यवस्था दाखविली याबद्दल मी आपली फार आभारी आहें. पण आतां वेळेवर आलेंच आहें त्यापेक्षां जरा आपण थांबा, आणि मुली काहण्या कशा सांगतात व आपण त्यांस प्रश्न विचारून

कोणत्या रीतीनें शिक्षण देतां, तेवढें दाखवा ह्मणजे मीही आपली घरीं जातें.

हिराबाई–बाई, आपण ह्मणतां खरें, पण मला जावयास उशीर होतो. तरी आपलीही भीड मोडतां येत नाहीं. मुलींनो, आज कोणाची पाळी आहे?

शांताबाई–वहिनी, पाळी ह्मणशील तर गोदावरीची आहे. पण आज गंगूला बोलवा.

हिराबाई–बरें तसें का होईना. गंगू, एक अगदीं लहानशी गोष्ट काढ पाहूं.

गंगू–(पुस्तकाचीं पानें चालून एक लहानशी गोष्ट काढून वाचते) ए–का–बाद–शाहा–ची–गो–ष्ट.

हिराबाई–गंगू, बादशाहा कोणास ह्मणतात?

गंगू–दिल्लींच्या अकबराला बादशाह ह्मणतात.

हिराबाई–हें तूं असें सांगितलेंस कीं, ज्याला दिल्ली शहर किंवा बादशाह माहित आहे त्यासच तें समजेल.

गंगू–ज्यांच्या हातीं सत्ता किंवा अधिकार असतो त्यांस बादशाह ह्मणतात.

हिराबाई–असें आहे तर ह्या शहरचे कोतवाल, जज्ज हेही बादशाह झाले. कारण त्यांच्या हातीं एकाद्यास दंड करावयाचा किंवा तुरुंगांत पाठवावयाचा अधिकार आहे.

गंगू–नाहीं, कोतवाल, जज्ज हे बादशाह नाहींत. हे राणीसरकारचे चाकर आहेत.

हिराबाई–तर मग काय, कोतवाल, जज्ज हे अधिकारी नाहींत असें तुला वाटतें?

गंगू–हे बादशाह तर खरे. पण बादशाह ह्मणजे जो सर्वांत मोठा अधिकारी असतो त्याला ह्मणतात. जो सर्वांवर हुकूम करितो, व ज्याच्यावर दुसरा कोणी हुकूम करीत नाहीं त्यास बादशाह ह्मणावें.

हिराबाई–बरें, सध्यां आपला बादशाह कोण आहे?

गंगू–अकबर बादशाहाला इंग्रजांनीं धरून काळ्या पाण्यावर पाठविलें तेव्हांपासून हिंदुस्थानांत कोणी बादशाह नाहीं. (हें ऐकतांच सर्व मुली एकदम खदखदां हांसल्या).

हिराबाई–गंगू, तूं फार वेडी दिसतेस. अग, अकबर बादशाहाला इंग्रजांनीं काळ्या पाण्यावर पाठविलें, हें तुला कोणीग सांगितलें? बरें तें जरी घटकाभार खरें धरलें तरी तूं आपल्या तोंडानें कबूल केलेंस कीं, ज्याची सर्वांत मोठी सत्ता असते, व जो सर्वांवर अधिकार चालवितो त्यास बादशहा ह्मणतात. आतां तूं ह्मटलेंस कीं, अकबर बादशाहास धरून इंग्रजांनीं काळ्या पाण्यावर पाठविलें. तेव्हां इंग्रेज नाहीं का बादशाह झाले?

गंगू–होय, झाले तर खरे.

हिराबाई–तर मग आतां सांग बरें हल्लीं आपला कोण बादशाह आहे तो.

गंगू–इंग्रेज; आणखी कोण असणार?

हिराबाई–गंगू, तर मग सगळेच इंग्रेज बादशाह झाले का ग.

गंगू–ह्यांत काय संशय? (हें ऐकून सर्व मुली पुनः खदखदां हांसल्या. मग हिराबाईनें प्रेमिलेस उत्तर देण्याविषयीं खूण केली.)

प्रेमिलाबाई–आपली बादशाहीण चक्रवर्तिनी महाराणी विक्टोरिया साहेब ह्या होत.

हिराबाई–पुरुष कीं स्त्री?

प्रेमिलाबाई–ती स्त्री आहे.

हिराबाई–बरें प्रेमिले, ती कोठें रहाते?

प्रेमिलाबाई–लंडनमध्यें.

हिराबाई–लंडन कोणीकडे आहे?

प्रेमिलाबाई–तें विलायतेंत आहे.

हिराबाई–तें कितीसें लांब असावें?

प्रेमिलाबाई–तें पांच हजार कोस दूर आहे असें एका पुस्तकांत वाचलेलें मला आठवतें.

हिराबाई–बरें, कोस कितीसा लांब असतो?

प्रेमिलाबाई–गारपिरावरचा शर्यतीचा बंगला येथून दीड कोस आहे ह्मणतात, तेव्हां या मानानें कोसाची लांबी मनांत आणावी.

शांताबाई–(हांसून) वहिनी, मी सांगू? १७६० वारांचा एक कोस होतो.

हिराबाई–बरें, शांताबाई, त्या दिवशीं तूं मजबरोबर चतरशिंगीस आली होतीस, तेव्हां तूं पाहिलें असशील कीं, अंतराअंतरावर रस्त्याच्या एका बाजूस निमुळते दगड पुरलेले असून त्यांजवर कांहीं लिहिलेलें होतें. आतां सांग पाहूं ते दगड कशाचे असावे तें?

शांताबाई–वहिनी, कोसांच्या निशाणीचेच ते दगड असावे अशी मी अटकळ केली होती. परंतु गाडी इतक्या वेगानें जात होती कीं, आमची नजर त्या दगडांवर ठरेना; त्यामुळें त्यांवर काय लिहिलें होतें तें मला चांगलेंसें वाचतां आलें नाहीं.

हिराबाई–ते दगड कोसांच्या निशाणीचे नसून मैलांच्या निशाणीचे होत. दोन मैल ह्मणजे एक कोस होतो. आणि प्रत्येक

मोठ्या सडकेवरील एका बाजूस नियामित अंतरावर दगड पुरलेले असतात, व त्यांवर फक्त मैलांचेच अंक लिहिलेले असतात. त्यांवरून समजावें कीं, एथून घोरपडी अमुक मैलांवर आणि चतरशिंगी अमुक मैलांवर. प्रेमिले, लंडन कोणत्या दिशेस आहे तें सांग पाहूं.

प्रेमिलाबाई—उत्तरेस.

हिराबाई—बरें, तो देश थंड कीं उष्ण आहे?

प्रेमिलाबाई—तें मला माहीत नाहीं.

शांताबाई—प्रेमिले, तो देश फार थंड आहे. जसजसें उत्तरेस जावें तसतशी उष्णता कमी होत जाते; आणि जसजसें दक्षिणेस पृथ्वीच्या मध्यभागाकडे जावें तसतशी उष्णता वाढत जाते.

अन्नपूर्णाबाई—मास्तरीणबाई, बादशाह स्त्री कशी हो झाली?

हिराबाई—यांत बाई आपणास नवल कोणतें वाटलें?

अन्नपूर्णाबाई—कां, यांत नवल नाहीं काय? बायका त्या कसली बादशाही चालविणार?

हिराबाई—ज्याप्रमाणें पुरुष राज्य चालवितो त्याप्रमाणेंच स्त्रियाही तें चालवूं शकतात. राज्याचा बंदोबस्त करणें आणि रयतेचें पालन करणें हेंच काय तें राजाचें काम.

अन्नपूर्णाबाई—बायको हो हें काम कसें करील? तें करणारे तर इंग्रज असतील, नांवास मात्र बायकोला बादशाहीण त्यांनीं केली असेल, असेंच ना मास्तरीणबाई?

हिराबाई—होय बाई, हे सारे इंग्रज लोक त्या राणी-सरकारचे नोकर आहेत, व प्रत्येकाचें काम आणि अधिकार निरनिराळा आहे. तें पर्व आपापल्या कामांत सर्वदा तत्पर

असतात; आणि पुरुष बादशाह असला तरीही प्रधानमंडळीच काम पहात असते.

अन्नपूर्णा०—हां असें बोला; स्त्रियांच्यानें राज्य चालवेल असें माझ्या तर मनाला वाटत नाहीं बाई.

हिराबाई—असें ह्मणूं नका बरें. भोपाळच्या राणीचा इतिहास तुह्मीं कधीं ऐकला आहे काय?

अन्नपूर्णा०—ऐकला आहे. माझे चुलतसासरे तेथें चाकरीस होते. ह्मणून तो थोडासा माझ्या कानावर आला आहे.

हिराबाई—त्यांत व यांत भेद इतकाच कीं, तिचें राज्य लहान आहे आणि आपल्या राणीचें राज्य फार विस्तृत आहे. जशी भोपाळची राणी आपल्या लहानशा राज्याचा बंदोबस्त करिते तशीच व्हिक्टोरिया राणी ही आपल्या मोठ्या राज्याचा बंदोबस्त करिते. दुसरें असें कीं, भोपाळ हें राज्य लहान आहे. त्याप्रमाणें तेथें कामदारही थोडे असून त्यांना पगारही थोडाच मिळतो; आणि राणीसरकारचें राज्य फारच आवाढव्य असून भरभराटींत आहे. ह्मणून त्यांत मोठमोठे कामदार पुष्कळ असून, त्यांचे पगारही तसेच मोठमोठाले आहेत.

अन्नपूर्णा०—बरें, आपल्या राणीचा नवरा आहे काय?

हिराबाई—होय, पण मृत्यु कोणालाही चुकला नाहीं. तिचा नवरा स्वर्गवासी झाल्यास थोडींच वर्षें झालीं.

अन्नपूर्णा०—बरें, आपल्या राणीस कांहीं मुलेंबाळें तरी आहेत का?

हिराबाई—होय, ईश्वराच्या कृपेनें मुलेंलेंकरें, नातूपणतू वगैरे सर्व कांहीं आहेत.

अन्नपूर्णा०—असें आहे तर मग खुद्द राणी आपल्या मुलांस घेऊन या मुलखांत कां बरें येत नाहीं?

हिराबाई—बाई, तिच्या राज्याचा काभार मोठा बिकट असल्यामुळें राजधानी सोडून तिला फार दिवस बाहेर राहतां येत नाहीं. पण थोडया दिवसांपूर्वी तिचा मोठा मुलगा प्रिन्स आफ् वेल्स इकडे आला होता. तेव्हां आपल्या शहरांत केवढी मोठी धामधूम उडाली होती, तें तुह्माला नाहीं का आठवत? आतां तिचे दोघे नातू वयानें फार लहान असतांही पृथ्वीप्रदक्षिणा करण्यास निघाले आहेत, असें मी नुक्तेंच एका वर्तमानपत्रांत वाचलें आहे.

अन्नपूर्णा०—बरें, आपल्या महाराणीसाहिब हजारों कोसांवर असून त्यांस येथलें वर्तमान कसें कळत असेल बरें?

हिराबाई—यांत अशक्य कोणतें; येथून रात्रंदिवस तारेंतून बातमी जात येत असते, व शिवाय दर आठवडयाच्या आठवडयास डांकमार्गें पत्रें व वर्तमानपत्रें जातात, त्यांवरून तिला सर्व पृथ्वीवरचें इत्थंभूत वर्तमान कळून येतें.

अन्नपूर्णा०—मास्तरीणबाई, राणीला पहावयाचें असलें तर ती आपल्यास कशी बरें दिसेल?

हिराबाई—आपण विलायतेस गेलें असतां ती आपणास मूर्तिमंत पाहतां येईल. पण तिचें चित्र पहाण्याची इच्छा असेल तर तें येथें दिसेल.

अन्नपूर्णा०—बरें मास्तरीणबाई, तें चित्र तरी कोठें आहे तें दाखवा पाहूं.

हिराबाई—अहो रुपयावर तिचें चित्र नाहीं का आहे? रुपयावर एके बाजूस स्त्रीचा मुखवटा आहे कीं नाहीं तो महाराणीचा बरें!

त्याप्रमाणेंच पोष्टाच्या लाखोट्यांवर ज्या तिकिटा असतात त्यांवरही तिचाच मुखवटा असतो; हें आपल्यास अजून कसें माहीत नाहीं? शिवाय माझ्याजवळ राणीचें एक मोठें चित्र आहे, तें माझ्या बाबास एका साहेबानें दिलें आहे. शांताबाई, जा पाहूं माझें कपाट उघडून रुमालांत गुंडाळलेली राणीची तसबीर आहे ती आण.

शांतेनें कपाटांतील तसबीर आणून हिराबाईच्या हातांत दिली. ती तिनें तिला दाखविली. तेव्हां सर्व मुली मोठ्या उत्कंठेनें त्या तसाबिरीकडे पाहूं लागल्या.

अन्न०—अहाहा, किती तरी सुंदर तसबीर ही! जणूकाय राणी खरोंखरच आपल्यापुढें उभी आहेशी दिसते.

हिरा०—यांत काय संशय? ती राणीची हुबेहूब तसबीरच आहे. रुपयावरील चेहऱ्याशीं ही लावून पहा किती फेर आहे तो. ही तसबीर कीं नाहीं कांहीं हातानें काढलेली नव्हे. चित्र काढावयाचें एक यंत्र असतें. कांचेच्या तुकडयास कांहीं औषधी लावून तें, ज्या मनुष्याची तसबीर काढावयाची असेल, त्या मनुष्याच्या समोर ठेवितात; ह्मणजे त्याची त्या कांचेवर जशाची तशी पडछाया पडून तसबीर आपोआप उठते.

अन्न०—बरें मास्तरीणबाई, मघाशीं प्रेमिलाबाईनें लंडन पांच हजार कोस दूर आहे ह्मणून सांगितलें. तर मग येथून तिकडे जाण्या येण्यास दहा पांच वर्षें लागत असतील; नाहीं का?

हिरा०—छे, वर्षें कशास पाहिजेत! हल्लीं आगबोटीच्या योगानें समुद्रांतून विलायतेस जाऊन दोन महिन्यांच्या आंत परत येतां येतें.

अन्न०—अबबब, काय समुद्रांतून जावें लागतें? किती तरी इंग्रजांचें

धाडस हें! बाई, छातीचे जबरे ते. त्यांस समुद्राची भीति नाहीं का वाटत? मला तर समुद्राचें नांव ऐकतांच कांपरें भरून येतें.

हिरा०—समुद्राची भीति ती कसची? मोठ्या तिर्कटी तारवांत किंवा आगबोटींत बसलें ह्मणजे एखाद्या मोठ्या घरांत बस-ल्यासारखें वाटतें.

अन्न०—काय हो बाई तुमचें तरी सांगणें हें? बुडण्याची नाहीं का पण धास्ती? तिगस्तसालच्या गोष्टीची आठवण झाली ह्मणजे बाई आंगावर कांटा उभा रहातो. मास्तरीणबाई, माझ्या मावससासू कीं नाहीं देशमुखांबरोबर रामेश्वरास गेल्या होत्या. जातेवेळीं कशी वाईट वेळा लागली होती कोण जाणें; त्या पुन्हा परत ह्मणून आल्या नाहींत, समुद्रांतच (असें म्हणून रडूं लागते).

हिरा०—तें बाई कोणाच्या स्वाधीन? होणार गोष्ट कांहीं केल्या चुकत नाहीं. अशीं जहाजें तर पुष्कळ वेळां बुडत असतात. पण असा विचार केला पाहिजे कीं, अशीं सर्वच जहाजें जर बुडूं लागतील तर मग समुद्रांत जावयाचें कोणी नांव सुद्धां घेणार नाहीं. परंतु इंग्रजांचें राज्य झाल्यापासून समुद्रांतील प्रवास पायवाटेपेक्षां पुष्कळ सोईचा झाला आहे. हजारों जहाजें व आगबोटी रात्रं-दिवस महासागरांतून एकसारख्या जात येत असतात. इंग्रज लोक, त्यांचीं बायकामुलें, सामानसुमान, व सर्व कांहीं व्यापाराचा माल ह्या जहाजांतूनच येथें येतो.

अन्न०—मास्तरीणबाई, इंग्रजांच्या बायकांची गोष्ट कोठें? त्या तर स्वर्गींच्या देवांगनाच आहेत. आमची त्यांची बरोबरी कशी होईल? त्या रात्रंदिवस बिनधोक बाहेर हिंडतात फिरतात. माझ्या ऐकण्यांत आलें आहे कीं, त्या आपलीं लहान लहान मुलें देखील

एकटीं विलायतेस पाठवितात. काय तरी बाई त्यांची छाती ही! असें करतांना त्यांच्या मनाला कांहींच का वाटत नाहीं? कशा उफराट्या काळजाच्या बायका त्या! त्यांचें मन किती तरी कठोर! अशा त्या बाहेर फिरणाऱ्या व पाषाणहृदयी बायकांचें काय तुम्ही सांगता? त्यांस तर हवेंतून उडून जाण्यासही कठीण नाहीं.

हिरा०—त्यांच्या देशांत पडदपोशी किंवा आमच्याप्रमाणें घरांत बसून रहाण्याचीं चाल नाहीं म्हणून त्या अशा. त्यांच्या सुना, मुली पाहिजे त्याबरोबर बोलतात, चालतात. यावरून आपण असें समजतां कामा नये कीं, त्यांस म्हणजे लाज, भीड कांहींच नाहीं. माझ्या बापाच्या-ओळखीचा एक साहेब होता. त्याच्या मुली आमच्या घरीं येत असत. त्यावरून व दुसऱ्या कांहीं माहितीवरून मी खात्रीपूर्वक सांगतें कीं, त्यांच्यांत जशी भीड व मर्यादा माझ्या पहाण्यांत आली आहे तशी आम्हां बाहेर न पडणारांच्या अंगीं मुळींच नाहीं. आतां आपण म्हणतां कीं, त्या आपलीं मुलें एकटीं विलायतेस पाठवितात, ह्यावरून त्यांस माया नसते. असें आपण कसें ह्मणतां? त्या लोकांची आपल्या मुलांवर वेडी माया नसते. आपल्या लोकांचा मायाजाळ तेवढा मात्र पाहून घ्यावा. बारीक विचार केला असतां आमच्या लोकांच्या फाजील मायेमुळें मुलांचें पुष्कळ वेळां नुकसान होतें.

इतक्या गोष्टी झाल्यावर सर्वजणी गप्प बसल्या, आणि गंगूनें आपली गोष्ट पुढें चालविली:

गंगू—(वाचूं लागते) "एक बादशहा होता, त्याच्या पोटीं पुत्र नसून एकुलती एक कन्या मात्र होती. आपल्या मागें हीच मुलगी गादीची वारस होईल असें समजून बादशाहानें तीस चांगल्या प्रकारें

लिहिण्यावाचण्यास शिकविलें, आणि पुढें तिला राज्यकारभार चालवितां यावा ह्मणून आपल्या हयातींतच तीस राज्याभिषेक केला.

हिरा०—(गंगूनें इतकें वाचल्यावर मध्येंच ह्मणते) गंगू, तूं फार लवकर वाचतेस, त्यामुळें तुला जे प्रश्न करावेसे वाटतात ते तसेच राहतात. बरें असो; संध्याकाळ होत आली आहे, आणि मला तर सरस्वतीच्या आईच्या येथें जरूर गेलेंच पाहिजे. ह्मणून माझ्यानें आतां फार वेळ रहावत नाहीं. तुह्मीं सर्वजणी ही गोष्ट आपसांत वांचून एकमेकींस प्रश्न करा. अन्नपूर्णाबाई मी आतां येतें. आपली मर्जी असेल तर येथें आणखी कांहीं वेळ बसून यांची गम्मत पहा, किंवा उद्यां पुनः या. येथें हा रोजचाच प्रकार आहे.

इतकें भाषण झाल्यावर हिराबाई सरस्वतीच्या आईच्या घरीं गेली. इकडे अन्नपूर्णाबाई त्या मुलींची हुशारी पाहून इतकी दंग होऊन गेली कीं, रात्र झाली तरी शांताबाई व प्रेमिलाबाई ज्या मनोरंजक गोष्टी वाचीत होत्या त्या ती ऐकत राहिली.

या वरील हकीकतीवरून हिराबाईच्या शाळेची व्यवस्था आणि तिची शिकविण्याची पद्धत कोणत्या प्रकारची होती हें चांगल्या रीतीनें कळून येतें.

हिराबाई प्रेमिलाबाईवर फार प्रीति करीत असे. तिला तिनें इतकें लवकर शिकविलें कीं, अवघ्या दोन वर्षांत तिला शुद्ध लिहितां व वाचतां येऊं लागून साध्या त्रैराशिकापर्यंत ती गणीत करूं लागली. तसेंच तिचा पूर्वीचा तापट व उद्धट स्वभाव जाऊन ती सौम्य, शहाणी आणि सर्वांस आवडती अशी झाली. त्याचप्रमाणें तिची मोठी बहीण वत्सलाबाई ही देखील हिराबाईच्या बोधानें सुधरून, कित्येक वर्षेंपर्यंत अंतरलेल्या आपल्या नवऱ्याच्या घरांत

पुनः सुखानें व आनंदानें नांदूं लागली. तिचा सर्व वृत्तांत एका निराळ्याच पुस्तकांत लिहिला जाईल. सारांश या प्रसंगीं येथें सांगावयाचें इतकेंच कीं, भाऊसाहेबांच्या कुटुंबांतील लहान थोर सर्व माणसें हिराबाईचीं फारच ऋणी झालीं. हिराबाईनें या उपकारांबद्दल कांहीं तरी ध्यावें अशाविषयीं मिराबाईनें हजारो उपाय केले, पण त्या थोर मनाच्या मुलीनें कांहींएक घेतलें नाहीं. प्रेमिलाबाईचें लग्न होऊं लागलें तेव्हां हिराबाईचा सासरा माधवराव यास मिराबाईनें मध्यस्थीस घालून एक हजार रुपयांची जडावाचीं कांकणाचीं जोडी तिला बक्षिस दिली, आणि ह्मणाली, "हिराबाई, तूं मला माझ्या कन्येसमान आहेस, आणि ही जोडी मी तुला तुझ्या शिकविण्याच्या मेहनतीबद्दल देत आहें, असें तिळमात्र न समजतां हिचा स्वीकार कर." याप्रमाणें फारच भीड पडल्यामुळें तिनें ती जोडी घेतली.

.



प्रकरण सतरावें.

सत्यवंताचा वृत्तांत.

वर सांगितल्याप्रमाणें हिराबाई ही आपल्या शाळेच्या खटपटींत गुंतून गेली असतां, इकडे तिचा नवरा सत्यवंत यास उद्योग धंदा कांहींच नसल्यामुळें त्याच्या जिवास अगदीं चैन पडेना. एके दिवशीं तो हिराबाईस सांगूं लागला कीं, मला आतां रिकामें बसून मुळींच चैन पडत नाहीं; ह्मणून तुझी संमति असेल तर घांटावर तुझ्या बापाकडे जाऊन त्याच्या मार्फतीनें कोठें तरी चाकरीचें संधान पाहतों.

हिरा०—(अंमळ विचार करून) आपणास कोठें तरी चाकरी केली पाहिजे यांत कांहीं संदेह नाहीं; कारण घरांत कोणत्या प्रकारची अडचण आहे हें आपणांस ठाऊकच आहे. मामंजींस तर आतां ह्मातारपण आलें आहे. तेव्हां त्यांच्यानें या उपर चाकरीची दगदग होणें कठीण. ह्मणून त्यांचे राहिलेले दिवस सुखानें व शांततेनें जावे असें जर आपण इच्छीत असाल, तर त्यांस घरीं पाठवून आपण कोठें तरी चाकरी धंदा पाहावा, आणि त्यांला या संसाराच्या घोरांतून मुक्त करावें, हें चांगलें. इकडे शांताबाईही दिवसेंदिवस मोठी होत चालली आहे. तिला स्थळ कोठें व कसें मिळतें या चिंतेंत

सासूबाई आहेत. त्यांच्या मनांतून तिला येथेंच कोठें तरी चांगल्या घरीं द्यावयाचें आहे; व त्याविषयीं त्या खटपटही करीत आहेत. काय होतें तें पाहावें. बहुधा याच वर्षीं लग्नाचें ठरेल असें वाटतें. पण त्यासाठीं बराच पैसा पाहिजे. कारण लग्न ह्मणजे खर्चाचें घर, आणि आमच्या घरांत तर पांच रुपये देखील शिल्लक मिळावयाचे नाहींत. भावोजींकडेस पहावें तर त्यांचा पगार त्यांसच पुरत नाहीं. त्यांची चाकरीच मुळीं लहान पगाराची. ह्मणून आपण येथेंच कोठें तरी लहानसहान मिळेल ती चाकरी पहिल्यानें धरा; मग हळूहळू दुसरीकडेस पाहतां येईल. घांटावर जाईन ह्मणतां तें मला तर कोणत्याही रीतीनें प्रशस्त वाटत नाहीं. आतां हें खरें आहे कीं, माझे बाबा आपण गेल्यावर खुष होतील; आणि हरतऱ्हा करून आपल्यास कोठेंना कोठें तरी वीसपंचवीस रुपयांची चाकरी सहज लावून देतील; पण तें ठीक नव्हे. चाकरी लहान कां होईना, पण ती आपल्या हुशारीनें मिळविली पाहिजे. माझे बाबा कीं नाहीं कोणी परकीं नाहींत; त्यांची मदत मागण्यांत कांहीं हलकेपणा नाहीं. पण कोणी कोणाचें ओशाळें रहाणें बरें नाहीं. त्यामुळें आपला मान रहात नाहींसा होतो. बाबा याविषयीं कांहीं मनांत आणणार नाहींत हें खरें. पण आजकाल लोक फारच चमत्कारिक आहेत; तोंडावर कोणी कांहीं बोलणार नाहींत, पण पाठीमागें ह्मणतील कीं, पहा, कोठें कांहीं इलाज चालेना तेव्हां हे सासऱ्याच्या येथें गेले.

सखवंत—तर मग बाबाकडे कोल्हापुरास तरी जाऊन पाहूं?

हिराबाई—कोल्हापुरास जाऊन तरी काय करणार? तसेंच

कांहीं चाकरीचें संधान असतें तर मांमंजींनीं आपणास इतक्या दिवसांत लिहिलें असतें. तें पडलें लहान संस्थान, ते फार दिवसांचे चाकर आहेत ह्मणूनच त्यांस तेथें शंभर रुपये मिळतात.

सत्यवंत—बरें, दुसरीं इतकीं संस्थानें त्यांच्या आसपास आहेत, त्यांत कोठें तरी त्यांच्या ओळखीनें कांहीं तजवीज होईल तर पाहतों.

हिराबाई—इंग्रजी अंमल झाल्यापासून संस्थानांत तरी जिव राहिला आहे काय?

सत्यवंत—तर मग आतां करूं तरी काय?

हिराबाई—येथेंच कोठें इंग्रजी हापिसांत पाहिल्यानें प्रयत्न करून पाहावें काय होतें तें.

सत्यवंत—आजकाल इंग्रजी कारकुनीची चाकरी तर वशिल्याशिवाय मिळत नाहीं, आणि माझ्याहून जास्त शिकलेले व एक एक दोन दोन परीक्षा पास झालेले हजारों उमेदवार चाकरीसाठीं भटकत फिरत आहेत. तेव्हां मला कोण विचारतो?

हिराबाई—जर कोणी मनोभावानें कोणताही प्रयत्न करील तर खरोखर त्यास यश आल्याशिवाय रहाणार नाहीं.

सत्यवंत—तें खरें, पण पहिल्यानें प्रयत्न कसा व कोणता करावा हेंच समजत नाहीं.

हिराबाई—जे लोक चाकरीधंदेवाले आहेत त्यांजकडे जात येत असून त्यांच्याशीं मित्रत्व जोडावें, ह्मणजे त्यांच्या मार्फतीनें चाकरीचा शोध लागेल; आणि त्यांच्याच वशिल्यानें तुमचें काम होईल. असें घरांत बसून का चाकरी मिळणार?

हिराबाईनें याप्रमाणें सांगितल्यावर सत्यवंतानें पहिल्यानें अदा-

लतींतील कारकून लोकांची ओळख करून घेतली. पुढें होतां होतां शिरस्तेदार, अव्वल कारकून, वगैरे मोठमोठ्या लोकांकडे तो जाऊं येऊं लागला. त्याच्या दररोजच्या येण्या जाण्यानें त्यांनीं धोरण बांधलें कीं, हा चाकरीच्या शोधांत असावा. रामभट ह्मणून एक नोटिशी लिहिणारा कारकून होता. त्याची व सत्यवंताची अत्यंत मैत्री जमली होती. तो एक दिवस सत्यवंतास ह्मणूं लागला कीं, "रावसाहेब, आपल्या मनांत उमेदवारी करावयाची असेल तर मजबरोबर कचेरींत येत असा; व शिरस्तेदारीच्या कामाची माहिती करून घेत जा. असें कराल तर एखादे वेळीं येथेंच कोठें तरी आपली सोय होऊन जाईल." त्याच्या सांगण्याप्रमाणें सत्यवंत कचेरींत जाऊं लागला. तेथें कधीं कोणाच्या अर्जाच्या, दस्तऐवजांच्या वगैरे नकला कर, नोटिशी लिहून दे, अशीं लहानसान लिहिण्याचीं कामें करीत्त असे. यामुळें अधिकारी लोक त्यास ओळखूं लागले. पुढें दोन चार लहानसान कारकुनांच्या बदल्याही त्यास मिळाल्या. पुढें कर्मधर्मसंयोगानें एक दहा रुपयांचा नोटिशी लिहिणारा कारकून तीन महिन्यांच्या रजेवर गेला, आणि पुढें तीन महिन्यांनंतर त्यानें आपल्या चाकरीचा राजीनामा लिहून पाठविला. तेव्हां सत्यवंत यास त्याच्या जागेवर कायम केलें. कधीं कधीं हिराबाईकडे चाकरीच्या गोष्टी निघत तेव्हां सत्यवंत अगदीं त्रासून ह्मणत असे कीं, कसली त्रासदायक चाकरी तरी. सारा दिवस लेखणी घांसून महिन्याच्या कांठीं कायते दहा रुपये मिळावयाचे. नाहीं बढतीची किंवा दुसऱ्या कशाची आशा. बाहेरची तरी कांहीं प्राप्ति आहे ह्मणावी तर तिच्या नांवानेंही भोपळा, हे असे निराशेचे उद्गार त्याच्या तोंडून निघाले ह्मणजे हिराबाई त्यास नेहमीं असें

बोलत असे कीं, "किती तरी उतावीळ स्वभाव हा? पहिल्यानें उमेदवारी सुद्धां मिळत नव्हती ते दिवस विसरलां वाटतें? आतां कायमची सरकारी चाकरी लागली असून बाहेर गांवीं जावें न लागतां गांवांतल्या गांवांत दहा रुपये मिळतात ते काय थोडे झाले? भावोजी पाहा, आज कित्येक वर्षें व्यापाऱ्याच्या येथें दहा रुपयांवर रखडत आहेत. असें चाकरीवर नेहमीं त्रासावयाचें तर काम तरी हातून कसें होत असेल कोण जाणे. अशा हवालदील-पणानें इतकें मात्र होईल कीं, अर्धी भाकर मिळत आहे तीही घाल-वन बसाल. मग पुनः येरे माझ्या मागल्या. हींच चाकरी नीट मनापासून कराल तर यांतच हळू हळू बढती होईल. माझे बाबा पहिल्यानें आपल्यासारखेच नकला करण्याच्या कामावर होते. परंतु आतां तहशीलदार झाले आहेत कीं नाहींत? ईश्वराची कृपा असेल तर याहून चांगला मोठा हुद्दा आपणास लवकरच मिळेल. बाहेरच्या प्राप्तीची आपण कधीं आशा ठेवूं नये. कोणा कवीनें झटलें आहे कीं, "अन्यायानें मिळविलेलें द्रव्य फार फार झालें तर दहा वर्षेंपर्यंत रहातें; अकरावें वर्ष लागलें कीं त्या अन्यायानें मिळ-विलेल्या द्रव्याबरोबर स्वकष्टानें संपादिलेलें असतें तेंही जातें." झणून आपल्या श्रमांनीं जेवढें द्रव्य मिळावयाचें त्याहून जास्त मिळत नसल्यास मनुष्यानें मोठा डामडौल व बडेजाव न करितां साध्या रीतीनें रहावें हें चांगलें.

याप्रमाणें हिराबाई ही नेहमीं सत्यवंताची समजूत करीत असे. पुढें कांहीं दिवसांनीं अशी गोष्ट झाली कीं, ज्या साहेबाच्या हाता-खालीं सत्यवंत होता त्याची एकाएकीं दुसरीकडे बदली झाली. ही गोष्ट सत्यवंतास कळल्यापासून तो फार उदास दिसूं लागला.

कारण त्या साहेबाची त्याच्यावर मेहरबानी होती. हिराबाईनें त्याची ती अवस्था पाहून एक दिवस विचारलें:

"आपण हल्लीं असे उदास कां दिसतां? मनाला कसली चिंता लागली आहे?"

सत्यवंत—माझें नशीब. ज्या दयाळू साहेबाच्या हाताखालीं मी होतों त्याची बदली दुसरीकडे झाली; तो साहेब माझा मोठा आश्रयदाता होता. आतां अदालतींत राहून कांहीं हांशील नाहीं. तो गेल्यावर माझें पुढें कसें होईल, याची मला मोठी चिंता लागली आहे.

हिरा०—(कांहीं वेळ विचारांत पडून) खरोखर त्या दयाळू साहेबाची बदली होणें ही दुःख वाटण्यासारखी गोष्ट आहे खरी; पण आपण मानतां तेवढें कांहीं हें दुःख नाहीं. दुसरा जो कोणी साहेब त्याच्या जागीं येईल त्याची आपल्यावर अशीच कृपा होणार नाहीं म्हणून कशावरून? हा तुमचा साहेब जाणार तरी कधीं?

सत्य०—उद्यां संध्याकाळच्या मेलट्रेनींतून जाईल असें वाटतें.

हिरा०—तर मग आपण त्यास भेटावयास कधीं जाणार?

सत्य०—आतां भेटून काय करावयाचें आहे?

हिरा०—वाः, असें कां म्हणतां? भेटण्याची वेळ तर हीच. तो जातां जातां कदाचित् एकादें शिफारस पत्र तरी देऊन जाईल.

सत्य०—बरें तर उद्यां सकाळीं जाईन.

त्याप्रमाणें सत्यवंतानें दुसरे दिवशीं मोठ्या पहांटेस उठून साहेबाच्या बंगल्यावर जाऊन त्यास सलाम केला. तेव्हां तो म्हणाला, "सत्यवंत, मी आतां निलगिरीस चाललों. तुझा स्वभाव मला फार आवडत असे. तुझी मर्जी असेल तर मजबरोबर निलगिरीस चल.

तेथें मी तुला चाकरी लावून देईन, किंवा चाकरी लागेपर्यंत माझ्या खासगी पगारांतून तुला दरमहा पंधरा रुपये देईन." यावर सत्यवंतानें, "आईस विचारून दोन प्रहरांनंतर काय तें सांगेन," असें उत्तर दिलें, व साहेबाची रजा घेऊन घरीं आल्यावर त्यानें तो सर्व वृत्तांत आपल्या आईस कळविला. तो ऐकतांच तिच्या डोळ्यांतून अश्रुधारा चालल्या; आणि हिराबाईही तें ऐकून मोठ्या विचारांत पडली. कांहीं वेळ वाट पाहून शेवटीं सत्यवंत म्हणाला, "काय तें लवकर सांगा म्हणजे साहेबांस त्याप्रमाणें जाऊन सांगतों."

सगुणाबाई—बाळा, सांगावयाचें काय. जा असें सांगण्यास माझा कांहीं धीर होत नाहीं; आणि तूं न गेलास तर साहेबाचें म्हणजे काम अडेल असें कांहीं नाहीं. आतां तूं त्याला भेटूंच नको म्हणजे झालें.

सत्यवंत—नाहीं, तसें नाहीं. मी कायतें कळवितों असें साहेबास सांगून आलों आहें; म्हणून माझी येण्याची खुषी नाहीं असें तरी त्याला जाऊन कळविलेंच पाहिजे.

सगुणाबाई—जा तर तसें सांगून ये.

सत्यवंत—(हिराबाईस विचारतो) कसें काय, याबद्दल तुझें काय म्हणणें आहे?

हिराबाई—मला विचाराल तर याबद्दल माझे दोन विचार आहेत. एक विचार असा कीं, आपण येथेंच रहावें. कारण हा संसार सगळा तुमच्यावर चालला आहे; दुसरा विचार, आपण साहेबाबरोबर जावें हेंच योग्य. कारण साहेब आपण होऊन जर आपणांस नेत आहे तर तिकडे गेल्यावर तो आपलें कल्याण केल्याशिवाय रहाणार नाहीं.

सत्यवंत–घरदार सोडून पांच रुपडयांसाठीं इतक्या लांबीच्या पल्लयावर कोण जातो? माझ्या तर मनांतून जावयाचें नाहीं. ह्मण आहे "घरची अर्धी पत्करली पण बाहेरची सगळी नको."

हिराबाई–आपल्या मर्जीनुरूप करण्यास आपण धनी आहां. पण नशिबानें योग घडून आला आहे तो व्यर्थ घालवूं नका. प्रवास कोण करीत नाहीं? माझ्या व आपल्या वडिलांकडेसच पाहा; त्यांचें तर सगळें आयुष्य प्रवासांत गेलें. आतां आपणच पाहा कीं, पांच पांच करतां त्यांचा पगार किती मोठा झाला तो.

सत्यवंत–बरें, जावयाचें तर चाकरीचा राजीनामा देऊन जावें किंवा कसें? न जाणो तेथें कांहीं नीट बस्तान बसलें नाहीं तर "हातचें सोडा आणि पळत्याचे पाठीस लागा" असें होणार.

हिराबाई–तेथें बस्तान बसणार नाहीं असें ह्मणणेंच बरोबर नाहीं. एवढा मोठा दयाळू साहेब आपणास रोजगारानिमित्त नेत असून, रोजगार लागणार नाहीं असें कधीं होणार नाहीं. तथापि आपल्या मनांत जर संशय असेल तर राजीनामा न देतां एक दोन महिन्यांची रजा घ्यावी ह्मणजे झालें.

सत्यवंत–रजा कोठून मिळावयाला? चाकरी ह्मणतां ह्मणतां ती नुक्तीच कोठें मिळाली आहे, आणि इतक्यांत रजेचें नांव घेतलें तर वाटाण्याच्याच अक्षता!

हिराबाई–रजा मिळण्यास अडचण कोणती? साहेबास नीट समजून सांगाल तर तो रजेसाठीं देखील चिठी लिहून देईल.

हिराबाईनें याप्रमाणें सत्यवंताच्या शंका घालवून त्यास जाण्या-विषयीं तयार केलें, व आपल्या जवळचे पन्नास रुपये रोख काढून वाटखर्चास दिले; आणि त्याचा कपडालत्ता व फराळाचें सामान वगैरे

तयारी करून देऊन तिनें वेणूमोळकरणीचा मुलगा यशवंत यास त्याच्या बरोबर दिलें. अशा तयारीनें सत्यवंत निलगिरीस जावयास निघाला.

इकडे हिराबाईनें सत्यवंत गेल्यावर लगेच आपला सासरा माधवराव यास पत्र लिहून कळविलें कीं, "येथील अदालतींतील साहेब निलगिरीस जाण्यासाठीं निघून गेले, व त्यांच्याबरोबर तेही रोजगारासाठीं गेले आहेत. निलगिरीस जातांना कोल्हापुरावरून जाण्याचा त्यांचा विचार आहे. तेव्हां ते आले म्हणजे साहेबांची मुद्दाम भेट घेऊन त्यांजकडे तेथील रेसिडेंटाकडून त्यांची शिफारस करविली असतां पुष्कळ फायदा होईल." यावरून माधवराव हे साहेब येण्याची वाट पाहत राहिले; व ज्या दिवशीं साहेब येणार अशी बातमी लागली त्याच दिवशीं महाराजांच्या परवानगीनें त्यांच्या बागांत तंबू वगैरे ठोकून त्यांच्या उतरण्याची माधवरावांनीं सर्व कांहीं तयारी केली. पुढें साहेबाची स्वारी आल्यावर ते रेसिडेंट-साहेबांच्या भेटीस गेले. तेथें उभयतांच्या गोष्टी होत असतां माधवराव तेथें होते, ते साहेबांस म्हणाले, "आपण अवघीं दोनच वर्षें पुण्यांत काढलींत; तरी तेवढ्या मुदतींत आपण सर्व लोकांची प्रीति संपादन केली. म्हणून आपल्या वियोगामुळें पुण्यांतील सर्व लोकांस मोठी हळहळ वाटत आहे. आपल्या न्यायीपणाबद्दल व दयाळूपणाबद्दल तेथील लोक आपणास दुवा मागत आहेत. माझा मुलगा आपल्याजवळ चाकरीस आहे. त्याच्या पत्रावरून खावंदांची सर्व हकीकत कळून येत असते."

साहेब—काय तुमचा मुलगा माझ्याजवळ चाकरीस आहे?

माधवराव—होय साहेब, माझा धाकटा मुलगा सत्यवंत तूर्त आपल्या पायांपाशींच आहे.

साहेब–जो कारकून मजबरोबर आला आहे तो तुमचा मुलगा काय?

माधवराव–होय साहेब, ती आपल्या पायांची धूळ आहे.

उभयतांच्या इतक्या गोष्टी झाल्यावर तेथील रेसिडेंट ह्मणाले: "हे कारभारी आज पुष्कळ वर्षांपासून या राज्यांत आहेत. यांची कारभार चालविण्याची रीति मी फार पसंत करितों. पण बिचारे काय करतील! हें राज्य लहान असल्यामुळें यांच्या चिरंजिवाची तूर्त येथें सोय होणें कठीण आहे. याकरितां आपण मेहेरबानी करून त्यांस बढतीची जागा द्याल तर फार चांगलें होईल."

या साहेबांची पहिल्यापासून सत्यवंतावर बहाल मर्जी होतीच. आणि त्यांत आतां दुधांत साखर पडल्याप्रमाणें झालें; तेणेंकरून सत्यवंताविषयीं साहेबांस अधिक आस्था उत्पन्न झाली. साहेब सत्यवंतासह निलगिरीस पोंचले, आणि दुसरेच दिवशीं कचेरी भरल्यावर सत्यवंतास पन्नास रुपयांची अव्वल कारकुनाची जागा रिकामी होती ती दिली; आणि माधवरावांस लिहून पाठविलें कीं, "तूर्त तुमच्या मुलास पन्नास रुपयांची जागा दिली आहे, आणि पुढें याहूनही आणखी बढतीची जागा त्यास मिळेल. ही गोष्ट आपण कृपा करून रेसिडेंटांचे कानावर घालावी." माधवराव हें वर्तमान ऐकतांच फार खुष झाले. ज्या सत्यवंतास कांहीं दिवसांपूर्वी नुसती उमेदवाराची जागा ही मिळण्यास मारामार पडत असे, आणि शेवटीं लहानसहान बदल्या करकरून एक दहा रुपयांची कायमची जागा ज्याला मिळाली होती, तोच आतां एकदम पन्नास रुपयांचा हुद्देदार होऊन बसला. त्याच्या आईनें तो घरांतून जातेवेळीं मोठा आकांत केला होता. तीच आतां आपल्या मुलास दरमहा एकदम पन्नास रुपये

मिळूं लागले हें ऐकतांच फार आनंद पावली. सत्यवंत आपला निम्मे पगार आईकडे पाठवून देत असे. आधींच हिराबाईच्या हातीं कारभार, आणि तशांत पंचविसांच्या ठिकाणीं आतां पन्नास रुपये घरीं येऊं लागले. मग काय विचारतां? पुढें एक वर्षाच्या आंतच सत्यवंत तेथील फौजदार झाला. तेथपर्यंत सर्व कांहीं बेतानें चालले होतें. पण कसें झालें तरी तो ऐन उमेदीचा मनुष्य असल्यामुळें लवकरच वाईट संगतीच्या योगानें तो स्वच्छंदपणानें वागूं लागला. घरीं वेळेवर पत्र येत नाहींसें झाल्यामुळें हिराबाई समजली कीं, कांहीं तरी बिघडलें आहे. आतां यास कोणता उपाय करावा याविषयीं विचार करतां करतां आपण निल-गिरीस गेल्यावांचून गत्यंतर नाहीं, असा तिनें आपल्या मनाचा निर्धार केला.

प्रकरण अठरावें.

हिराबाईचें निलगिरीस जाणें.

मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें हिराबाईनें निलगिरीस जाण्याचा दृढ निश्चय केला होता; तरी त्याविषयीं आपली सोबतीण सुमती हिचें काय मत आहे तें समजून घेण्याकरितां तिनें तीस बोलावणें पाठविलें. ती आल्यावर तिला तिनें आपला जाण्याचा इरादा कळविला.

सुमती–गडे, तुला वेडबीड तर लागलें नाहींना? अग, कोठें पुणें आणि कोठें निलगिरी? काय आपल्या इकडचे गांव आहेत ते?

हिराबाई–मला गांवाशीं ग काय करावयाचें आहे? मी ज्यांच्या पदरीं पडलें आहें ते जेथें असतील तोच माझा गांव.

सुमती–हिरे, तूं म्हणतेस तेंही खरें; पण लोक तुला काय म्हणतील याचा कांहीं विचार केला आहेस का?

हिराबाई–गडे, यांत लोक मला कां म्हणून नांवें ठेवतील? फार तर ते इतकेंच म्हणतील कीं, ही नवऱ्याकडेस निघून गेली तसें त्यानीं म्हटलें तर त्यांत वावगें तें काय झालें? आतां कुटुंबाच्या चालीविषयीं म्हणशील तर पूर्वी आपल्या देशांत हल्लींप्रमाणें

सडका, टप्प्याच्या गाडया, किंवा लोखंडी रस्ते नव्हते, व प्रवास करणें म्हणजे मोठें कठीण व धोक्याचें काम होतें; सबब त्या वेळीं स्त्रियांस प्रवासास जाण्याची मनाई होती, तें योग्यच होतें. पण हल्लींच्या राज्यांत प्रवास करणें म्हटलें म्हणजे इतकें निर्भय व सोपें काम झालें आहे कीं, काठीस सोनें बांधून काशीपासून रामेश्वरापर्यंत गेलें तरी कोणी विचारीत नाहीं. आज जर येथें आगगाडींत बसलें तर परवांच्या दिवशीं खुशाल निलगिरीस जाऊन पोंचावें.

सुमती–बरें, नवऱ्याकडून येण्याविषयीं कांहीं पत्रबित्र आलें आहे काय?

हिराबाई–पत्र म्हणशील तर काहीं नाहीं. पण मीच होऊन जावें असें म्हणतें.

सुमती–माझें ऐकशील तर बोलावल्याशिवाय आपण होऊन जाणें यांत कांहीं शोभा नाहीं.

हिराबाई–गडे सुमती, तुला तर बाई सगळीच थट्टा वाटते. पण या वेळीं जर माझें जाणें तिकडे न झालें तर या सर्व संसाराची व घरादाराची धुळधाणीच झाली असें समज.

सुमती–हिरे, पण इतकें भिण्यास कारण तरी काय झालें? देवाच्या दयेनें तुला काय कमी आहे? तुझी शाळा चांगली चालावी म्हणजे झालें. शाळेच्या उत्पन्नावर तूं एकाचाच काय पण दहाजणांचा चरितार्थ चालवूं शकशील.

हिराबाई–वः, काय तुझा तर्क तरी बाई! अग मी ही पैसे मिळविण्याकरितां का शाळा घातली आहे? माझा वेळ जात नव्हता म्हणून तो घालविण्याकरितां हा एक उद्योग मी उभा केला आहे.

आतां तूं खरें मान कीं नको, पण शाळेच्या फंडांतून आजपर्यंत खासगी खर्चास मी कधीं एक कवडी घेतली असेल तर शपथ.

सुमती—गडे हिरे, पण अशा भर पावसांतून तूं कशी बरें इतकी लांब जाशील? पावसाळा गेल्यावर मग जाण्याचा विचार करावा हें बरें.

हिराबाई—नाहीं ग गडे, आतां दिवसगतीवर लोटणें हें चांगलें नाहीं. कारण आज जें काम एका शब्दानें होणार तें उद्यां मोठ्या प्रयासानेंही होणें कठीण.

सुमती—गडे, घर सोडून इतकें लांब जावयास तुला कांहींच का वाटत नाहीं?

हिराबाई—कां वाटत नाहीं? मी काय मनुष्य नव्हें? पण एक दोन दिवस वाईट वाटलेलें पुरवलें बाई. पण पुढें सारा जन्म दुःखांत जाईल तो बरा का?

सुमती—बरें, याविषयीं तूं आपल्या सासूचें तरी अनुमोदन घेतलें आहेस काय?

हिराबाई—गडे, त्या कशा बरें अनुमोदन देतील? तूं शिकलेली सवरलेली तरी तुझें असें मत. पण एवढें खरें कीं, त्या बिचाऱ्या समंजस आहेत. त्यांस जर समजावून सांगितलें तर माझी खातरी आहे कीं, त्या माझ्या जाण्यास कधींही अढथळा करणार नाहींत.

पुढें हिराबाईनें आपल्या सासूपाशीं ही गोष्ट काढली. तेव्हां ती पहिल्यानें तिला जाण्यास रुकार देईना. पण हिराबाईनें तिची नीट समजूत घातली तेव्हां तिनें शेवटीं तिला संमति दिली. मग तिनें आपल्या माहेरीं जाऊन ही सगळी हकीगत आपल्या आईस कळवून तिचीही आज्ञा घेतली. त्याचप्रमाणें तिनें आपल्या

शाळेंतील मुलींस समजावून सांगितलें कीं, मी केवळ दोन महिन्यांसाठीं तिकडे जात आहें, तेव्हां तितक्या मुदतीत शांताबाई तुह्मांस शिकवितील. तुह्मीं सध्यां येत आहां तशाच पुढें येत असा. तिची ह्याप्रमाणें नवऱ्याकडे जाण्याची तयारी चाललेली पाहून बुद्धिवंत तीस ह्मणतो :

'विजयालक्ष्मी तूं निलगिरीस जाणार ह्मणून मी कालच ऐकिलें. अरें, तुझ्या मागें शाळेची कशी काय व्यवस्था होणार?'

हिराबाई—भावोजी, हें काय विचारतां? माझ्या मागें शाळेसंबंधी सगळी व्यवस्था आपल्या स्वाधीन असावी.

बुद्धिवंत—अगे, तुझ्या शाळेची व्यवस्था माझ्या हातून ती काय होणार?

हिराबाई—भावोजी, त्यांत व्यवस्था ती कसली करावयाची आहे? ताराबाई व शांताबाई शाळेंत येणाऱ्यामुलींस शिकवितील. आपण त्यांस बाजारच्या काय वस्तू लागतील त्या आणून द्या, ह्मणजे झालें. सासूबाई मागें एकट्या आहेत, त्यांस मात्र आतां तुमचाच काय तो आधार आहे. घरांतील [illegible] आतां आपणच पाहिली पाहिजे. ही घ्या हिशोबाची वही. या पुढला हिशोब आपण हींत लिहीत जावा.

या प्रकारें हिराबाई सर्वांचा निरोप घेऊन आगगाडींत जाऊन बसली, आणि परभारें मेटापोलीयम स्टेशनाचें तिकीट काढून निलगिरीस जाण्यासाठीं निघाली. तेथें पोहंचल्यावर ती एकाएकीं आलेली पाहून सत्यवंत फार चकित झाला. नंतर जेवणखाण आटोपल्यावर त्यानें तिला विचारलें :

"अशी एकाएकीं येण्याचें कारण काय? घरांत आईशीं

भांडणबिडण करून तर नाहींना आलीस? मला तर असाच रंग दिसतो.

हिराबाई—माझा तोच धंदा, आणखी काय आहे? आज चार वर्षांत कोणाशीं कितीशी भांडलें हें आपणांसच माहीत आहे. काय तरी बाई विचारणें हें.

वाईट संगतीमुळें सत्यवंत अगदीं भ्रमिष्ठासारखा होऊन गेला होता. सभोंवतीं खुशामती लोकांचा जमाव नेहमीं जमलेला असे, त्यांनीं त्यास अगदीं बिघडून सोडलें होतें. कोतवालीची सत्ता हातीं असल्यामुळें लांच खाण्याचा त्यानें सपाटा चालविला होता. त्याच्या घरीं नाच, बैठकी वगैरे ख्यालीखुशालीचे प्रकार नेहमीं होत असत. पगार एकपट तर खर्च चौपट, अशी त्याची स्थिति होती. ही स्थिति जर कांहीं काळ पर्यंत अशीच चालली असती तर खरोखर साहेबास सत्यवंताचा संशय आला असता, आणि त्याची चाकरीपरी चाकरी जाऊन अब्रूसही मुकला असता. पण इतक्यांत हिराबाई येऊन पोंचली म्हणून बरें झालें. तिनें लागलीच आपमतलबी व लुच्चे लोकांची बैठक घरांतून उठविली, आणि सत्यवंताची चांगली कानउघडणी केली. ती म्हणाली:

"आतां परमेश्वरदयेनें आपणास शंभर रुपये मिळतात. तरीही त्यांत तृप्ति नाहीं; लोकांकडून लांचाची आशा करितां, तेव्हां यास काय म्हणावें?

सत्यवंत—कोणी खुषीनें पैसे देत असला तर ते कां घेऊं नये?

हिराबाई—हल्लींच्या काळीं पैसा म्हटला म्हणजे लोकांस प्राणाहूनही अधिक प्रिय झाला आहे. तेव्हां तो कांहीं अर्थाशिवाय कोणास द्यावासा तरी वाटेल काय? आपल्यावरून जग ओळखावें.

आपणच सांगा कीं, कांहीं मतलबाशिवाय आपण कोणास पैसा द्याल काय? गरीबास एक पैसा देणें झालें तर लोकांचा जीव जातो. इतके दिवस आपणांस कोणी एक पैही आणून देत नव्हते, आणि आतांच कां बरें देतात? तर याचें कारण हेंच कीं, एखाद्या कज्याचा आपल्या तर्फे फैसल्हा होण्याचा रंग लोकांस दिसत नसला ह्मणजे ते निरुपाय होऊन कोणापासून तरी कर्ज काढून किंवा घरांतील एकादा दागिना वगैरे विकून आपल्यास खुष करितात; आणि मग आपल्या हातून सहजीं पक्षपात व अन्याय होतो.

सत्यवंत—मी कांहीं आपल्या हातानें पैसे घेत नाहीं; मग मीं त्याबद्दल काय ह्मणून भीति बाळगावी?

हिराबाई—पाप कधींही लपून रहावयाचें नाहीं, तें कधींना कधीं बाहेर पडावयाचेंच. तशांत क्षणभर असें मानलें कीं, तें कदाचित् मनुष्यास समजणार नाहीं; पण सर्वसाक्षी परमेश्वर तर तें पहात आहे कीं नाहीं? तो या पापाचा जाब घेतल्या शिवाय रहाणार नाहीं.

या रीतीनें हिराबाईनें सत्यवंतास चार गोष्टी समजावून त्याची चांगली कानउघडणी केली, व त्याजडून पुनः लांच घेणार नाहीं, असें अभिवचन घेतलें. पुढें थोडे दिवस गेल्यावर हिराबाईनें विचारलें कीं, ह्या ज्या चार पांच मनुष्यांस रोजचे रोज आपल्या येथें जेवूं घालतां ते कोण आहेत व काय उद्योग करितात?

सत्यवंत—ते उमेदवार चाकरीसाठीं आलेले आहेत. ते बिचारे फार लांबून आले आहेत, व ते इकडेतिकडे भटकत फिरत होते. तेव्हां मला त्यांची दया येऊन मीं त्यांस सांगितलें कीं, तुह्मांस

रोजगारधंदा मिळेतोंपर्यंत माझ्या घरीं भाजीभाकर जी कांहीं मिळेल ती खाऊन रहा.

हिराबाई—इतके दिवस झाले तरी एकासही चाकरी लागली नाहीं हें कसें?

सत्यवंत—चाकऱ्या पुष्कळ आढळतात; पण त्या त्यांच्या मोठेपणास शोभतील अशा पाहिजेतना?

हिराबाई—दुसऱ्याच्या आश्रयानें राहून फुकटचें महिनें गणतीं यथेच्छ बसून खावें यांत मोठेपणा तो कोठें राहिला? त्यांनीं आतां आपल्या मोठेपणाकडेस न पहातां जशा मिळतील तशा लहान मोठ्या चाकऱ्या धराव्या, यांतच त्यांना भूषण आहे.

सत्यवंत—तुला तर आपली एक घाव आणि दोन तुकडे करण्याची संवयच पडून गेली आहे. त्यांनीं आपल्या पदवीपेक्षां हलकी चाकरी पत्करावी काय? त्यांस कांहींच का अब्रूची चाड नाहीं?

हिराबाई—हलकी चाकरी पत्करण्यांत मात्र त्यांची अब्रू जाते, आणि फुकटचें बसून खाण्यांत ती जात नाहीं. यास म्हणावें तरी काय? मला तर आतां खचीत वाटतें कीं, या लोकांस याबद्दल लज्जा वाटत नाहीं, त्या अर्थीं त्यांच्यांत दुसरेही कांहीं दुर्गुण असावे. म्हणून त्यांचा सहवास आतां चांगला नाहीं. खरोखर हे लोक आपल्या नांवानें लोकांपासून कांहीं तरी उपटाउपटी करीत असतील. त्यांची आतां भीड धरतां कामा नये. त्यांस निक्षून सांगावें कीं, पाहिजे असल्यास चाकरी धरा किंवा आपली दुसऱ्या कोणीकडे तरी जेवणाची सोय पहा.

सत्यवंत–माझ्यानें तर एकाद्यास एकदां आश्रय देऊन मग त्याची भीड मोडवत नाहीं; तेव्हां मी त्यांना हें असें सांगूं तरी कोणत्या तोंडानें.

हिराबाई–त्यांस जर शरम वाटत नाहीं तर मग आपण तरी त्यांची भीड कशास ठेवावी? आपल्या नात्यांचीं काय थोडीं गरीब माणसें आहेत? त्यांस मदत करण्याचा तर आपला धर्मच आहे. आपल्यास परोपकार करावयाचाच आहे तर त्याचा प्रारंभ आपल्या आप्तसोयऱ्यांतच झाला पाहिजे. ह्या आळशी लोकांस आपण कठीण शब्दांनींच सांगितलें पाहिजे असें नाहीं, तर चार गोष्टी कोणत्याही रीतीनें समजावून सांगितल्या असतां त्या त्यांस आपोआप समजणार आहेत.

ह्याप्रमाणें नवऱ्याशीं बुद्धिवाद करकरून शेवटीं हिराबाईनें त्या ऐदी लोकांस युक्तीच्या मार्गानें थोड्याच दिवसांत घरांतून काढून लाविलें, व चाकरांपैकीं जे दुर्गुणी असे तीस आढळले त्यांसही तिनें रजा दिली. त्याच प्रमाणें घरांतील एकंदर व्यवस्था नीटनेटकी करून सत्यवंताचा बाहेर फिरण्याभटकण्याचा नाद अगदीं नाहींसा करून टाकला. नाच, रंग, तमाशे वगैरे ख्यालीखुशालीच्या गोष्टींत त्याच्या पैशाची पुष्कळ उधळपट्टी होत असे, ती अगदीं बंद पडून दरमहा पुष्कळ पैसे उरूं लागले. त्यांतले निम्मे अधिक ती सासूकडे दरमहा नियमानें पाठवीत असे. सत्यवंताची जेवणा-खाणाची वगैरे व्यवस्था नीट राहून त्याचा बाहेरख्यालीचाही नाद सुटल्यामुळें त्याची प्रकृति पूर्वीं पेक्षां पुष्कळ चांगली होऊन तो सर्व प्रकारें सुखी झाला. शहरांत पूर्वीं जिकडेतिकडे त्याच्या नांवाचा बोभाटा होऊन लोक त्याच्याकडे बोटें दाखवूं लागले होते.

पण पुढें त्याच्या वृत्तींत हा असा चांगला फरक एकाएकीं पडलेला पाहून त्यांस मोठें नवल वाटलें.

हिराबाईस येथें येऊन दीड वर्ष झाल्यावर एके दिवशीं तिच्या मावशीचा मुलगा उमाकांत याच्या लग्नाची पत्रिका त्यांला आली; शिवाय सुमतीनेंही तिला फार आग्रहानें येण्याविषयीं लिहिलें. त्यामुळें तिनें पुण्यास एकवेळ जाऊन येण्याचा निश्चय केला. परंतु तिनें मनांत असा विचार केला कीं, नवऱ्याला एकटें सोडून जाणें हेंही ठीक नाहीं. एके दिवशीं सहज गोष्टीवरून गोष्ट निघाली असतां ती त्यास म्हणाली कीं, "प्रवासांत आपल्या जिवाचें कोणी असल्याशिवाय एकटें रहाणें बरें नाहीं; म्हणून आपल्या मावशीचा मुलगा सुमंत यास आपल्याकडे बोलावून घ्या. तो तिकडे राहून तरी काय करणार? इकडे आपणांबरोबर असला तर तो कांहीं कामाची माहिती तरी करून घेईल; आणि तसचा कांहीं योग घडून आला असतां, त्यास आपल्या हाताखालीं एकादी चाकरी मिळण्यासही उशीर लागणार नाहीं." यावरून सत्यवंतानें आपल्या मावशीस पत्र लिहिलें; व हिराबाई तेथें असतांच सुमंत यास आपल्याजवळ बोलावून घेतलें. हा मुलगा फार विश्वासू व मेहनती होता, आणि वयानें म्हटला असतां सत्यवंतापेक्षां सारा दोन अडीच वर्षांनीं लहान होता. तो येऊन पोहंचला तेव्हां हिराबाईला पुष्कळ धीर आला. मग ती तेथून निघून कोल्हापुरास आली. तेथें तिचा सासरा माधवराव याजजवळ ती एक आठवडा राहिली. माधवरावाचें नाहीं तरी या वेळेस साठ वर्षांहून अधिक वय होऊन गेलें होतें. कोल्हापूरसरकारच्या चाकरींत त्यास फार दगदग पडत असे. दररोज सकाळीं मुलकी व फौजदारी कचे-

ऱ्यांत जाऊन लोकांचे दावे येत ते त्यांस तपासावे लागत, आणि तिकडून येऊन जेवले कीं लागलेच पुनः कचेरींत जात. तेथें तर सर्व राज्याच्या जमाबंदीचा वगैरे हिशेब संध्याकाळपर्यंत पाहून ते फारच थकून घरीं येत. हें पाहून हिराबाई त्यांस ह्मणाली,

"मामंजी, आतां हे आपले दिवस मेहनत करावयाचे नव्हत. आतां आपण घरीं बसून सुखानें आयुष्य घालवावें. मनुष्यानें आपल्या आयुष्याचे बाळपण, तरुणपण, आणि ह्मातारपण असे तीन भाग करून, त्यांतून पहिला भाग विद्यासंपादन करण्याकडे, दुसरा जगांतील व संसारसंबंधी कामकाजांकडे, आणि तिसरा विश्रांति व ईश्वरभक्ति यांकडे घालवावा. तर आपण आतां प्रपंचसंबंधी सर्व कांहीं दगदग सोडून घरीं स्वस्थपणें बसून ईश्वरसेवेंत आनंदानें काळ घालवावा, इतकेंच माझें अज्ञान लेंकराचें आपल्या चरणापाशीं करद्वय जोडून मागणें आहे."

माधवराव—विजयालक्ष्मी, तुझें सर्व ह्मणणें अक्षरशः खरें आहे; व माझीही फार दिवसांपासून हीच इच्छा आहे. पण काय करूं? महाराज मला सोडण्यास खुषी नाहींत. दुसरें, मीं जें काम हल्लीं करितों तें करणारा दुसरा कोणी तरी हुशार मनुष्य मिळाला पाहिजे ना?

हिराबाई—महाराजांजवळ आपण आपल्या ह्मातारपणाचें कारण सांगाल, तर मला वाटत नाहीं कीं, ते या गोष्टीस कोणत्याही प्रकारें ह्मणजे हरकत घेतील. आतां आपलें काम चालविणारा पाहिजे तर आमचे भावोजी काय कमी हुशार आहेत? ते आपलें काम चालवूं शकणार नाहींत काय?

माधवराव—त्याला दरबारच्या कामाची माहिती कोठें आहे?

हिराबाई—त्यांस थोडे दिवस आणून आपल्याजवळ ठेवाल

तर मला वाटतें कीं, तें काम त्यांच्या सहज लक्षांत येईल. ज्यांला ट फ करतां येत नाहीं ते देखील कचेरींचें काम नुस्तें कांहीं दिवसांच्या अनुभवानें करतात, मग भावोजी तर चांगले पाठशाळेंत शिकलेले आहेत.

माधवरावांनीं विचार करून पाहिलें, तों हिराबाईचें ह्मणणें योग्य आहे असें त्यांस वाटलें. पुढें हिराबाई ही पुण्यास येऊन पोहंचल्यावर माधवरावांनीं बुद्धिवंतास येण्याविषयीं पत्र पाठविलें. त्यानें तेथें गेल्यावर थोड्याच दिवसांत बापाचें सर्व काम लक्षपूर्वक पाहून तें सारें ध्यानांत घेतलें, व वेळोवेळीं बापाचें कांहीं कांहीं काम स्वतः महाराजांस समजाविण्याकरितां घेऊन जाऊन त्यांची मर्जी संपादन करून घेतली. पुढें एके दिवशीं, आतां माझा वृद्धापकाळ आला ह्मणून मला रजा आसावी, माझें काम चालविण्यास बुद्धिवंत हा आपल्या चरणापाशीं तत्पर आहे, असें माधवरावांनीं महाराजांस समजावून सांगितलें. महाराज स्वभावतः मोठे विचारी व मायाळू होते, त्यांनीं माधवरावांस दरमहा पन्नास रुपये पेनशन ठरवून त्यांच्या जागीं बुद्धिवंतास कायम केलें.

प्रकरण एकोणिसावें.

शांताबाईच्या लग्नाचा विचार.

हिराबाई पुण्यांत येऊन पोंचल्यावर शांताबाईच्या लग्नाची तजवीज करूं लागली. प्रेमिलाबाई धारसंस्थानांत आपल्या घरीं गेली होती, तीही याच संधीस पुण्यांत आपल्या माहेरीं आली असून, तिला भेटण्याकरितां तिची मोठी बहीण वत्सलाबाई ही देखील सासऱ्याहून नुकतीच आली होती. सरनोबतांच्या घरचीं बहुतेक मुलें हिराबाईच्या हाताखालीं शिकलेलीं होतीं; ह्मणून या दोघां बहिणींस हिराबाई परत आल्याची बातमी लागतांच त्या मोठ्या उत्कंठेने तिला भेटण्याकरितां तिच्या घरीं आल्या. परस्परांचें क्षेम-कुशळ विचारणें झाल्यावर त्यांचें येणेंप्रमाणें संभाषण सुरू झालें :—

वत्सलाबाई—मास्तरीणबाई, काय सांगूं, आपली भेट एकदांची कधीं होईल असें झालें होतें. प्रेमिला तर आपली शिष्यच आहे, पण मी तिजहूनही आपली अधिक ऋणी आहें. कारण मला अंतरलेल्या घरीं आपण पुनः नांदावयास लावलें, याबद्दल मी आपले उपकार जन्मोजन्मीं विसरणार नाहीं बरें.

हिराबाई—छे बाई, असें बोलूं नका. आपणास घरांत नांदा-वयास लावण्याजोगा असा मजमध्यें कोणता पराक्रम आहे?

वत्सलाबाई–तुह्मीं कांहीं का ह्मणाना, परंतु आमच्या अंगाच्या चामड्याचे जोडे करून जरी आपल्या पायांत घातले तरी देखील तुमचे उपकार फिटणार नाहींत.

हिराबाई–मजकडून तुमच्यावर उपकार कोणते झाले आहेत तें मला समजत नाहीं. त्यांतूनही माझी यःकश्चित् सेवा तुह्मांस आवडलीच असेल तर तुह्मीं मोठ्या मनाच्या आहां. ईश्वरानें आपणास सर्व गोष्टी अनुकूल केल्या आहेत. तेव्हां तुह्मांस आह्मांसारख्या गरिबांला खुष राखण्यास मुळींच अशक्य नाहीं.

प्रेमिला०–मास्तरीणबाई, आपण असें काय बोलतां बरें?

हिराबाई–प्रेमिलाबाई मास्तरीणपणाचें नातें आतां बाकी राहिलें नाहीं बरें. तें तुह्मी शाळेंतून गेलां तेव्हांच सरलें. आतां ईश्वरकृपेनें तुमचें लग्न झालें आहे. तुह्मी मानानें मोठ्या आहां; व तुह्मांस ऐश्वर्य प्राप्त झालें आहे. तुह्मांस कोणत्याही गोष्टीची कमतरई नाहीं. तुह्मी मोठ्या सरदारांच्या कन्या आहां. आज तुमच्यासारखी वजनदारी अवघ्या शहरांत कोणाची नाहीं. तुमच्यासारख्यांच्या जवळ येऊन जर कोणाचा हेतु पूर्ण झाला नाहीं तर तो त्याच्या नशिबाचा दोष समजावयाचा.

प्रेमिला०–मास्तरीणबाई, असा आपला कोणता मनोदय आहे तो तर कळूं द्या.

हिराबाई–प्रेमिला बाई, काय सांगूं; एक मोठा हेतु माझ्या मनांत आहे. पण तो निष्फळ होणार नाहीं असें मला पूर्वी वचन द्याल तर तो मी तुह्मांस सांगतें.

दोघी बहिणी–मास्तरीणबाई, काय हेतु आहे तो तर सांगा. आह्मी तो सिद्धीस नेण्याविषयीं मनापासून झटूं. आपण एखादें

काम आह्मांस सांगावें आणि आह्मीं तें करावें, यांत आह्मांस मोठें भूषण वाटतें.

हिराबाई–काम तर फार मोठें आहे. पण तुह्मी दोघी बहिणी मनावर घ्याल तर तें सहज होण्यासारखें आहे.

दोघी बहिणी–मास्तरीणबाई, आह्मी कीं नाहीं तुमचें काम करण्याविषयीं कोणत्याही प्रकारें आळस करणार नाहीं. तें काम आमच्या हातून होण्यासारखें मात्र पाहिजे.

हिराबाई–(त्यांच्याकडून पुरें वचन मिळालेंसें पाहून) आतां सांगूंच तर? माझी अशी इच्छा आहे कीं, आमच्या शांताबाईस आपल्या बंधूला द्यावी.

हें ऐकतांच दोघी बहिणी स्तब्ध राहिल्या. नंतर ती गोष्ट ऐकिली न ऐकिलीशी करून त्यांनीं इकडच्या तिकडच्या गोष्टी काढल्या. कांहीं वेळानें दोघीजणी उठून जाऊं लागल्या, तेव्हां हिराबाई एका हातानें वत्सलाबाईचा व एका हातानें प्रेमिलाबाईचा हात धरून ह्मणाली.

"बाई, असें नाहीं, दिलेलें वचन खरें करूं असें ह्मणाल तेव्हांच मी तुह्मास सोडीन."

प्रेमिला०–पण मास्तरीणबाई, या गोष्टींत आमचा काय अधिकार? तशांत धनपाळ तर लहान आहे. आमचे आईबाप असतां त्यांच्यापुढें आमचें काय चालणार आहे बरें?

हिराबाई–मुलाच्या विवाह झालेल्या वडील बहिणी त्याच्या आईच्या बरोबरीच्याच असतात; व सोयरेसंबंध होणें तो सर्वांच्या विचारानें होत असतो. ह्मणून धनपाळाच्या लग्नाच्या बाबतींत आई तुमचें मत विचारल्याशिवाय रहाणार नाहीं.

प्रेमिला०—मास्तरीणबाई, अजूनपर्यंत या गोष्टीची चर्चा आमच्या येथें झाली नाहीं. जेव्हां होईल तेव्हां आम्ही आपलें मत दिल्याशिवाय रहाणार नाहीं.

हिराबाई—ही गोष्ट तुम्हांस अजून माहीत नाहीं हें मोठें नवल समजावयाचें. अहो, तुमच्या धनपाळासाठीं सर्जेरावांच्या येथें मागणी गेली होती. पण काय कारण झालें असेल तें देवास माहीत; त्यांना ती मागणी कबूल झाली नाहीं.

वत्सलाबाई—आपणास हें वर्तमान कोठून कळलें असेल तें असो. पण याविषयीं आम्हांस कीं नाहीं अद्याप मुळींच माहीत नाहीं. माहिती होईल तरी कशी? आम्हांस आल्याला अजून पुरा एक आठवडाही झाला नाहीं.

हिराबाई—(पुनः त्या दोघां बहिणींनीं ती गोष्ट सोडून दुसऱ्या गोष्टी काढल्या असें पाहून) बायांनो, माझा प्रश्न एकीकडेस राहिला. त्याचें होय कीं नाहीं, काय तें उत्तर मला द्या.

वत्सलाबाई—मास्तरीणबाई, आपणच सांगा बरें कीं, ह्याचें उत्तर आम्हीं याच वेळीं कसें द्यावें तें?

हिराबाई—तें खरें आहे, पण मागणीची गोष्ट निघाली असतां तुम्ही आमच्या शांताबाईविषयीं शिफारस कराल तर मोठे उपकार होतील. लग्नाच्या कामांत पैसा, गुण, आणि रूप या तीन गोष्टींकडे मुख्यतः पाहतात. त्यांपैकीं पैसा म्हणाल तर आम्हां गरिबांजवळ त्याचें नांव घ्यावयास नको. गुणांविषयीं म्हणाल तर तुम्ही शांताबाईस चांगली ओळखितां. सुमारें दोन वर्षेंपर्यंत तुम्ही व ती एके ठिकाणीं होतां. आतां खरें सांगा कीं, लज्जा, भीड, मर्यादा, सात्विकपणा व बातम्रेत, तसेंच लिहिणें, वाचणें, शिवणें, कशिदा

काढणें, स्वयंपाक करणें, इत्यादि सर्व गुण शांताबाईच्या अंगीं आहेत कीं नाहींत ते? माझी ती नणंद आहे किंवा माझ्या हाताखालीं ती शिकली आहे, ह्मणून तिची मी बढाई सांगतें असें नाहीं. तिच्या अंगीं असलेले चांगले गुण कोणासही दिसून येणारे आहेत. मी ह्मणतें तें खरें कीं खोटें तें तुह्मीच सांगा.

प्रेमिलाबाई—शांताबाईसारखी गुणी मुलगी मोठ्या घराण्यांतसुद्धां मिळणें कठीण. तिच्या पासंगासही पुरणारी मुलगी मी आजपर्यंत पाहिली नाहीं.

हिराबाई—तर मग गरिबीशिवाय आमच्यांत दुसरा कोणता दोष आहे? तुह्मी असें समजूं नका कीं, मी ह्मणजे लहान तोंडीं मोठा घांस घेत आहें. कारण संभाजीरावभोंसले नागपूरकर यांस निवर्तल्यास अजून दोन पिढ्या लोटल्या नाहींत. त्यांच्याच घरण्यापैकीं आह्मीं आहों बरें.

दोघी बहिणी—मास्तरीणबाई, आपण आमच्यापेक्षां कांहीं कमी नाहीं. तुह्मी आह्मी काय निराळ्या आहों? एकाच रक्ताच्या व एकाच पदवीच्या. हें ह्मणजे आपण आह्मांस सांगितलें पाहिजे असें नाहीं. तें आह्मांस पुरें ठाऊक आहे.

हिराबाई—तर मग माझी गोष्ट कबूल करण्यास तुह्मांस हरकत ती कशाची?

प्रेमिलाबाई—मास्तरीणबाई, आह्मी ही गोष्ट आज आईजवळ काढूं. पाहूं बरें ती काय बोलते तें.

हिराबाई—नुस्ती गोष्टच काढावयाची तर ती माझ्यानें नाहीं का काढवणार? पण तसें नाहीं. आपण मनोभावानें आईची समजूत केली पाहिजे. ज्या अर्थी या गोष्टीची तुमच्या घरीं तूर्त

चर्चा चालली आहे, त्या अर्थीं तुम्ही या वेळीं माझी येवढी गोष्ट मनावर घ्याल तर मोठें कार्य होणार आहे.

मग त्या दोघां बहिणींनीं हिराबाईस वचन दिलें कीं, "आपला हा जो मनोरथ आहे तो शेवटास नेण्यास आम्ही मनापासून झटूं." इतकें बोलणें झाल्यावर त्या दोघी बहिणी निघून गेल्या. दुसरे दिवशीं हिराबाई स्वतः मिराबाईस भेटण्यास गेली; व दिडशें रुपये किंमतीची एक मद्रासी शालू व जरीचा खण तिनें निलगिरीहून येतांना आणला होता तो तिनें तीस त्या प्रांताची भेट म्हणून नजर केला.

मिराबाई–मुली, तूं मला जेव्हां तेव्हां खालीं पहावयास लावतेस हें चांगलें नाहीं. अग, आम्ही अजून तुझ्या उतराई झालों नाहीं, असें असतां, उलट तुझ्या कडूनच आम्हीं ही अशी मोलवान नजर घ्यावी हें आम्हांस शोभत नाहीं.

हिराबाई–मांसाहेब, हा जरीकांठी खण व ही शालू आपल्याकरितां मीं तेथें मुद्दाम काढविली आहे. तेव्हां तिचा आपण स्वीकार केलाच पाहिजे. आज कीं नाहीं जवळ जवळ वर्ष होत आलें, ही घडी माझ्या पेटींत जशीच्यातशी पडून राहिली होती. कारण माझा असा हेतु होता कीं, पुण्यास आल्यावर स्वतः आपल्या हातानें ही आपणास नजर करीन.

मिराबाई–मुली, मला खरोखर फार वाईट वाटतें. पण ज्या अर्थीं तूं इतक्या लांबून मुद्दाम मजकरितां ती आणिली आहेस, त्या अर्थीं तुला वाईट न वाटावें इतक्याच करितां ती मी घेतें. तुझें कांहीं काम मजकडून होण्यासारखें असल्यास सांगशील तर मला कांहीं तरी समाधान वाटेल.

हिरावाई—(इतकें वचन मिळतांच हात जोडून म्हणाली) मांसाहेब, माझा एक मनोदय आहे तो आपण पूर्ण कराल तर सांगतें.

मिराबाई—बरें, कळूं दे तर खरा तुझा कोणता मनोदय आहे तो.

हिराबाई—सांगूंच तर? पण मांसाहेब आपणास कदाचित् वाईट वाटेल.

मिराबाई—यांत वाईट ग काय वाटावयाचें?

हिराबाई—मांसाहेब, माझा मनोदय एवढाच आहे कीं, आमची शांताबाई आपल्या धनपाळास द्यावी.

मिराबाई—हात्तेच्या! यांत ग वाईट तें काय वाटावयाचें? बरें तूं आधीं खालीं तर बैस, मग त्याचा विचार पाहूं.

हिराबाई—नाहीं मांसाहेब, मला अगोदर याचें काय तें उत्तर द्या.

मिराबाई—(हिराबाईचा हात धरून खालीं बसवून ह्मणते) मुली, लग्न ह्मटलें ह्मणजे कांहीं लहानसान काम नव्हे. कुंभाराच्या येथून मातीचें भांडें घ्यावयाचें असलें तर तेंही चांगलें पाहून व वाजवून घेतात; आणि हें तर लग्न. एक वेळ गांठी बांधून दिल्या कीं जन्मभर सुटावयाच्या नाहींत. ह्मणून मागचा पुढचा चांगला विचार करून काय करणें तें केलें पाहिजे. तूं जी ही गोष्ट सांगतेस ती त्यांच्या (नवऱ्याच्या) कानावर घालून व माझ्या मोठ्या बहिणीचे व आमच्या कुटुंबांतील दुसऱ्या एक दोन माणसांचें अनुमत घेऊन काय विचार ठरतो तो पाहतें. तशांत धनपाळाचें वय अद्याप लहान आहे; त्याच्या लग्नाची तूर्त कांहीं घाई नाहीं.

हिराबाई—मी लहान तोंडीं मोठा घांस घेतात त्याप्रमाणें आप-

ल्याकडे शब्द टाकला आहे; पण आपली कृपा असली तर त्याप्रमाणें होण्यास उशीर लागणार नाहीं.

मिराबाईनें या तिच्या बोलण्यावर आणखी कांहीं सवालजबाब केला नाहीं. तरी तिच्या मुद्रेवरून ती गोष्ट तिला वाईट वाटली असावी असें दिसलें नाहीं. जातेवेळीं हिराबाई, प्रेमिलाबाई व वत्सलाबाई यांस सूचना करून गेली कीं, ती गोष्ट आईच्या मनांत भरवून देणें आतां आपल्या हातीं आहे. हिराबाई गेल्यावर त्या दोघां बहिणींनीं शांताबाईची अतोनात तारीफ करून मिराबाईचें मन पुष्कळ अंशीं वळविल्यासारखें केलें. पण मिराबाईची बहीण निराबाई हिच्या जावेची मुलगी सुंदराबाई ह्मणून होती, ती निराबाईच्या मनांतून धनपाळ यास द्यावयाची होती. पण याविषयीं तिनें अद्यापपर्यंत मिराबाईजवळ गोष्ट काढली नव्हती. वर सांगितल्याप्रमाणें हिरावाईनें आपल्या नणंदेविषयीं गोष्ट काढल्यावर मिराबाईनें निराबाईजवळ जाऊन तिचें त्याबद्दल अनुमत विचारलें. निराबाई तर ही गोष्ट ऐकून मनांतल्या मनांत फारच खिन्न झाली; आणि शांताबाईची मागणी मोडून सुंदराबाईची मागणी कायम होण्यास काय युक्ति करावी या विचारांत ती पडली. ह्मणून त्या वेळीं तर ती मिराबाईला कांहीं बोलली नाहीं. पण याचा विचार करून उदईक उत्तर सांगेन असें ती ह्मणाली. दुसरे दिवशीं ती स्वतां मिराबाईच्या येथें गेली; आणि मागणीच्या गोष्टी निघाल्या तेव्हां तिला ती ह्मणाली कीं, "कोठें तुह्मी आणि कोठें हिराबाई. जमीनअस्मानचा फेर. तुमची बरोबरी त्यांच्यानें कधीं तरी होईल काय? बरें पण ही गोष्ट तुझ्या डोक्यांत आली तरी कोठून ग"?

मिरावाई–हिराबाई त्या दिवशीं स्वतः येथें आली होती; तिनेंच ही गोष्ट काढली आहे.

निरावाई–तर मग मी आतांच हिराबाईकडे जातें.

असें ह्मणून प्रेमिलाबाईस बरोबर घेऊन ती हिराबाईच्या येथें गेली, आणि तिला ह्मणाली, "काय हिराबाई, आपण इतक्या शाहाण्यासुरत्या असून आपणास एवढें कसें समजलें नाहीं कीं, सोयरेसंबंध बरोबरीचीं असतील त्यांच्याशींच होत असतो? त्यांनीं सर्जेरावांकडील मागणी कां फिरविली हें तुम्हांस माहीत नाहीं का? पांच हजार रुपयांचे दागिनें मुलीचे अंगावर घालावयाचें नाकारिलें इतक्याच करितां बरें! तुम्ही तर सांगूनसवरून गरीब; तुमच्यापाशीं त्यांच्या योग्यतेस साजेसा हुंडा देण्याचें सामर्थ्य कोठें आहे?

हिराबाई–मांसाहेब, मी नुस्ती शांताबाईच्या मागणीविषयीं गोष्ट काढली होती, देण्याघेण्याविषयीं कांहींएक बोललें नव्हतें. जीं आपली मुलगी देणार तीं आपल्या शक्त्यनुसार काहीं तरी देतीलच, नुस्ती मुलगीच देऊन रहाणार नाहींत. आतां बरोबरीविषयीं जर म्हणाल तर आम्ही कितीशा श्रीमान् आहों हें तर जगजाहीर आहे. सर्जेरांवांच्या चौथ्या हिश्शानें देखील आमची ऐपत नाहीं. पण आपणांस हुंडयाची एवढी परवा कां असावी बरें? ईश्वराच्या दयेनें आपणांस काय उणें आहे? आपण मुलगी कराल ती रूपानें व गुणांनीं पाहून करा म्हणजे झालें. हुंडयासाठीं अडवून बसण्यांत काय अर्थ आहे? शांताबाईस आपण रात्रंदिवस पाहत असल्यामुळें तिची कोणतीही गोष्ट आपणांपासून लपली आहे असें नाहीं. आतां आमचें कुलशील कसें आहे हें आपणांस सांगितलें पाहिजे असें नाहीं. कारण तें आपणांस सर्व माहीतच आहे.

निराबाई–तरी पण बरोबरीचें घराणें पाहून त्याच्याशीं संबंध करण्याची रीत आहे ना?

हिराबाई–मांसाहेब, बोलण्याची माफी असावी. जेव्हां संभाजीरावानें या घरांत आपली बहीण दिली तेव्हां बरोबरी होती, आणि आतां तेंच घर सोयरीक करण्यास मागेंपुढें पहात आहे काय? तेव्हां हा आपला दोष नव्हे, तर आमच्या नशिबींच हें आलें आहे, त्यास आपण तरी काय कराल?

निराबाई–(हिरमुसल्यासारखी होऊन) हिराबाई, तुम्हांस माझ्या बोलण्याचा राग आलासें वाटतें.

हिराबाई–मांसाहेब, रागावून मी आपलें काय करणार? मला अशी उमेद होती कीं, या गोष्टींत आपण आम्हाला मदत कराल. परंतु तें एकीकडेसच राहून आपण या गोष्टीस आड येतां, हें पाहून बरीक मला फार वाईट वाटतें.

निराबाई–हिराबाई, तुम्ही मला बरी म्हणा किंवा वाईट म्हणा, पण तुमच्या घराण्याशीं संबंध जुळविला असतां आम्हांस मुलाची हौस पुरवितां येणार नाहीं.

हिराबाई–होय मांसाहेब, धनदौलतीच्या संबंधानें आमच्यानें आपली बरोबरी करवणार नाहीं खरी; पण घराण्याच्या नात्यानें पहातां आमची व आपली बरोबरीच आहे बरें. आतां गुण, बुद्धि व ज्ञान यांविषयीं पहाल तर शांताबाईची बरोबरी करणारी आमच्या मराठ्यांत एकही मुलगी या प्रांतांत मिळणें कठीण.

निराबाई–हिराबाई, राघोबादादांचा मुलगा आहे, त्याला तुमची शांताबाई देण्याचा विचार तुम्हीं कां करीत नाहींत बरें?

हिराबाई–मांसाहेब, माझ्या ऐकण्यांत असें आलें आहे कीं,

त्याच्यासाठीं आपल्या सुंदराबाईला मागणी आली होती. ह्मणून मीं त्याविषयीं फारशी विचारपूस केली नाहीं. शिवाय मीं असा विचार पाहिला कीं, हा संबंध जुळल्यानें विद्या व लक्ष्मी यांचा योग होणार आहे. विद्या श्रीमंतांस मोठें भूषण आहे, व श्रीमंतांच्या अंगीं तीस लौकिकास आणण्याचें सामर्थ्य आहे. तेव्हां हा योग जर घडून आला तर त्यांत उभयतांसही मोठें भूषण आहे. आतां राघोबादादांच्यायेथें आपली सुंदराबाई द्यावयाची असल्यास बेलाशक द्यावी. त्यास आमचें कांहीं ह्मणणें नाहीं.

निराबाई–आमची सुंदरा कीं नाहीं अजून लहान आहे, ती लग्नाला योग्य व्हावयास अजून फार दिवस पाहिजेत; आणि तशांत माझा इरादा तिला कोठें तरी परक्या घरीं देण्याचा आहे. कारण नातेवाइकांमध्यें सोयरीक करणें हें बरोबर नाहीं. इतकें बोलून निराबाई निरोप घेऊन जाऊं लागल्या. तेव्हां प्रेमिलाबाई तेथेंच बसून राहिली असें पाहून त्या तिला ह्मणाल्या, "कां मुली, येत नाहींस का?"

प्रेमिलाबाई–नाहीं मावशे तूं जा. मी फार दिवसांनीं मास्तरीणबाईकडे आलें आहे, तेव्हां तिच्याजवळ थोडा वेळ बसून येतें. (निराबाई गेल्यावर ती हिराबाईस ह्मणाली) मास्तरीणबाई, आई तर या गोष्टीस राजी आहे. पण हीच मावशी मध्यें आडवी येत आहे. ही तोंडानें तर अद्यापपर्यंत उघड बोलत नाहीं. पण हिच्या मनांतील हेतु असा आहे कीं, कोठून तरी सुंदराबाई आमच्या घनपाळास द्यावी.

हिराबाई–प्रेमिलाबाई, हें आतां सर्व परमेश्वराधीन आहे. ज्ञेथें त्यांच्यासारख्या मध्यस्थ आहेत तेथें आमच्यासारख्या गरिबांचें

काय चालणार आहे? पण मी कांहीं वावगा विचार केला नव्हता. हा जोडा चांगला शोभेल असें वाटलें, म्हणूनच बोललें होतें. आपलें एवढें मोठें कुटुंब व त्यांत एकुलता एक मुलगा. तेव्हां एवढी मोठी धनदौलत आहे ती सर्व त्याची आहे. म्हणून या अशा मोठ्या दौलतीची नीट व्यवस्था लावण्याकरितां बुद्धीचें व सारासारविचाराचें साहाय्य पाहिजे. आमची शांताबाई गरीब कुटुंबांतली आहे खरी, पण बुद्धि, चातुर्य, सारासारविचार जसा तिच्यांत आहे तसा मोठ्या श्रीमंतांच्या मुलींतही नसेल. आपल्या घरांत एकादी अडाणी मुलगी येऊन तिनें हजारों रुपयांचा हुंडा आणला तरी तो काय कामाचा?

प्रेमिलाबाई—मास्तरीणबाई, मीं आणि आकानें पुष्कळ प्रकारें आईची समजूत केली आहे; आणि आतांही या सगळ्या गोष्टी पुन्हा मी आईस सांगून बहुतकरून तुमचा हेतु शेवटास जाईल असें करीन.

या प्रकारें हिराबाईनें प्रेमिलाबाईस चांगल्या प्रकारें शिकवून घरीं पाठविलें. इकडे निराबाईनें जाऊन आपल्या बहिणीस सांगितलें कीं, "मी मास्तरीणबाईची चांगली खोड मोडली. मी म्हटलें, असें करणें तुम्हांस शोभत नाहीं. मनुष्यानें आंथरूण पाहून पाय पसरले पाहिजेत." निराबाई इतकें बोलली खरी, पण तिच्यानें आपल्या जावेच्या मुलीविषयीं तोंडांतून शिफारशीचा एक शब्दही काढवेना. ह्याप्रमाणें व्यवस्था केल्यावर निराबाई आपल्या घरीं गेली. ती गेल्यावर मिराबाईनें आपल्या दोघां मुलींकडे या गोष्टीचा पुनः विचार काढला.

प्रेमिलाबाई—आई, खरोखर विचारशील तर मावशीच्या मनां-

तून सुंदराबाईला आमच्या घरीं द्यावयाची आहे, व त्याकरितांच तिचा एवढा हा खटाटोप चालला आहे.

मिराबाई—बरें जा, धनपाळास इकडे बोलाव. त्याच्या मनांत काय आहे तें तर पाहूं.

वत्सलाबाई—(धनपाळास हाक मारून तो आला तेव्हां) आपा, तुझ्या लग्नाची वाटाघाट चालली असून सुंदराबाई तुला सांगून आली आहे; तर तुझा याबद्दल कसा काय विचार आहे बोल?

धनपाळ लाजून आई पुढें कांहीं बोलला नाहीं. पण आपल्या बहिणीकडे वाईट तोंड करून त्यानें आपली नाखुषी दर्शविली. वत्सलाबाई व प्रेमिलाबाई यांस तर हेंच पाहिजे होतें.

प्रेमिलाबाई—रूप, लक्षण, विद्या, शहाणपण इत्यादि गुणांनीं पाहिलें असतां शांताबाईच्या नखाचीही सर कोणास येणार नाहीं बरें! तिची हमी पाहिजे असल्यास मी घेतें. आतां सोन्यारत्नांचे दागिने व हुंडाबिंडा ह्मणशील तर तो कांहीं त्यांच्याकडून फारसा मिळणार नाहीं. ती बोलूनचालून गरिबाची मुलगी आहे. त्या बिचाऱ्यांजवळून फार पैका कोठून असणार?

मिराबाई—अग आपणाला मुलीकडे पहावयाचें आहे. ईश्वरानें आपणास काय कमती केलें आहे? त्यांचा हुंडा आपणास हवा कशास?

वत्सलाबाई—तर मग उशीर कां लावतेस आई? बाबाच्या कानावर ही गोष्ट घालून काय तो एकदांचा ठराव करून साखरपुडा होऊं दे.

प्रेमिलाबाई—आई, आमच्या मास्तरीणबाई गरीब दिसतात खऱ्या, पण त्या मोठ्या धूर्त व चलाख आहेत हो! तोंडानें आपण

गरीब गरीब म्हणतात मात्र, पण ऐन वेळीं मोठा थाट जमवून देतील कीं नाहीं तो पहा. त्या आपला कमीपणा इतका देखील नाहीं हो दाखवावयाच्या. त्या मोठ्या मानी आहेत.

मिराबाई—बरें तर मुलींनो, संध्याकाळीं ते आले ह्मणजे त्यांच्या कानावर ही गोष्ट घालून तिकडून काय बोलणें होतें तें पाहतें.

संध्याकाळीं सरनोबत घरीं आले, तेव्हां वत्सलाबाई व प्रेमिलाबाई यांनीं शांताबाईची गोष्ट त्यांच्या कानावर घातली; आणि तिचा पक्ष घेऊन जसा एखादा वकील आपल्या कुळाच्या तर्फेनें पुरावा करीत असतो, त्याप्रमाणें त्यांची समजूत केली. तेव्हां सरनोबतांच्याही मनांत ती गोष्ट भरली. हें पाहून त्या दोघां बहिणींचा आनंद गगनांत मावेना. त्यांनीं दुसरे दिवशीं सकाळींच हिराबाईच्या येथें जाऊन तिला हें वर्तमान कळविलें.

प्रेमिलाबाई—मास्तरीणबाई काम फत्ते. आतां आमचें बक्षीस येऊं द्या.

हिराबाई—ईश्वर आपल्या खटपटीस यश देवो ह्मणजे झालें. तुह्मांस योग्य बक्षिस देण्यास मी कोठें समर्थ आहें? मी तुमचें ईश्वराजवळ शुभ चिंतीन; एवढेंच बक्षिस मजकडून आपणास मिळण्यासारखें आहे.

प्रेमिलाबाई—तें तर मास्तरीणबाई आपण नेहमीं करतांच आहां, हें आह्मी जाणून आहों. पण आज आमचें तोंड तर गोड कराल कीं नाहीं?

हिराबाई—हां, तुह्मांस मिठाई पाहिजे, इतकेंच कीं नाहीं? कोण आहे ग तेथें, वेणू हे पांच रुपये घेऊन शनवारपेठेंत जा, आणि लाला

मिठाईवाल्याच्या दुकानावरून पेढे, बर्फी, बतासे, आणि खडी-साखर इतकें घेऊन ये.

याप्रमाणें वेणूला मिठाई आणावयास पाठवून आपण पानाचे विडे करूं लागली. मिठाई आल्यावर ती प्रेमिलाबाई व वत्सला-बाई यांस लागेल तितकी देऊन बाकीची शाळेंतील सर्व मुलींस वांटली. त्या दोघी बहिणी परत जाण्यास निघाल्या तेव्हां हिराबाई त्यांस ह्मणाली कीं, "अद्याप पर्यंत मी ही गोष्ट सासूबाईंच्या कानावर घातली नाहीं. पुष्कळ दिवसांमागें मामंजीकडे त्या ह्मणाल्या होत्या कीं, शांताबाई तुमच्या घरीं पडेल तर फार बरें होईल. ही गोष्ट येथपर्यंत येऊन पोंहचली आहे, हें अद्याप त्यांस माहीत नाहीं. त्यांच्या कानावर हा सगळा प्रकार घालून त्यांच्या अनुमतानें साखर-पुडयासाठीं एखादा चांगला दिवस नेमूं."

इतक्या गोष्टी झाल्यावर त्या दोघी बहिणी आपल्या घरीं गेल्या. इकडे हिराबाईनें आपली सासू शांतपणें बसली आहे असें पाहून तिला ह्मणाली :

"सासूबाई, आतां शांताबाई मोठी झाली तरी तिच्या लग्नाची आपणास अद्याप काळजी नाहीं हें कसें?

सगुणाबाई—काळजी करून काय करावयाचें? कोठें तरी चांगलें घर मिळेल तेव्हांच कीं नाहीं? माझ्या मनांतून तिला साधल्यास राधाबाईचा मुलगा यशवंतराव यास द्यावयाची आहे.

हिराबाई—काय त्या यशवंतरावास होय? तो कोठें आणि आमची शांताबाई कोठें! त्याचें वय आमच्या भावोजींपेक्षां कमी नसेलसें वाटतें.

सगुणा०—होय, माझा बुद्धिवंत त्याच्यापेक्षां सहा महिन्यांनीं

वडील आहे. दोघांचाही जन्म एकेच वर्षीं झालेला आहे, हें मला पक्कें आठवतें.

हिराबाई—तर हें काय थोडें अंतर ह्मणावयाचें ?

सगुणा०—तर मग दुसरा कोठें योग जमेलसें वाटत नाहीं.

हिराबाई—सासूबाई, माझ्या मनांत एक स्थळ आहे. तें आपणास मान्य असेल तर खटपट करून पाहतें.

सगुणा०—बरें असें कोणतें स्थळ तें सांग तर पाहूं.

हिराबाई—सरनोबतांचा मुलगा धनपाळ.

सगुणा०—तूं म्हणतेस तसें झालें तर मग सोन्याहून पिंवळें होईल. आंधळा कांहीं दोन डोळे मागत नाहीं. पण "कोठें इंद्राचा ऐरावत आणि कोठें शामभटाची तट्टाणी." कोठें सरनोबत व कोठें आम्ही. आज त्यांच्याजवळ इतकी संपत्ति आहे कीं अवघ्या पुर्ण शहरांतही कोणाजवळ तितकी नसेल. ते आमच्याशीं कोठले सोयरीक करावयाला? उगाच शब्द टाकून जनांत हंसें करून घेण्यांत कांहीं हांशील नाहीं.

हिराबाई—त्यांची श्रीमंती आपणास काय करावयाची आहे? ते श्रीमंत असले तर आपल्या घरीं पंचपक्कान्नें खातील; आम्ही तर आपल्या घरीं भाजीभाकर खाऊन आनंद मानूं. पण आमच्या शांताबाईच्या अंगीं जे गुण व जी विद्या आहे ती त्यांच्या येथल्या अनुभविक व शहाण्या ह्मणविणाऱ्या बायांत तरी सांपडेल काय?

सगुणा०—तें सगळें खरें. पण सर्व विद्या व कलाकौशल्य हीं कीं नाहीं एका पैशाच्या पुढें हात जोडून उभीं रहातात. अगोदर मुलीच्या अंगावर घालण्याकरितां पांच हजार रुपयांच्या दागिन्यांची तयारी करा तेव्हां पुढें त्यांच्याशीं सोयरीक

करण्याची गोष्ट काढा. एवढें सांगितलें आहे कोणी? आपल्या-सारख्या गरिबांनीं हें असें बडेजावी नातें जुळविण्याच्या नादांत पडणें मला तर प्रशस्त वाटत नाहीं बाई. फार कशास त्या आपल्या सर्जेरावांस कशाची उणीव नसतांही त्यांच्यायेथें गेलेली मागणी परत आली. मुली, गरिबांनीं आपल्या बरोबरीच्यांशीं सोयरीक करावी यांतच शोभा आहे हो.

हिराबाई–सौंदर्य ही गोष्ट मोठ्या दौलतीहूनही अधिक आहे. हरिणीसारखे डोळे, गोंडस बांधा, स्वरूपानें व गुणांनीं संपन्न अशी आमच्या शांताबाईसारखी मुलगी त्यांस मिळाली तर मग आणखी काय पाहिजे?

सगुणा०–काय मुली तूं पोरांसारख्या गोष्टी सांगतेस मग ह्या? अग, बरोबरीचें घराणें मिळाल्यावर मग कोणी सुंदरपणा का पहात असतात? आणि आमची मुलगी सुंदर आहे अशी टिमकी का वाजवीत फिरायाचें? सुंदर बायका तरी सगळ्यांनाच कोठें आवडतात? मी पुष्कळ ठिकाणीं पाहिलें आहे कीं, मोठमोठ्या सुंदर बायकांना घरांत कोणी विचारीनासें होतें; पण ज्या कित्येक काळ्यासांवळ्या ओबड धोबड असतात त्या आपल्या अंगच्या गुणांनीं सासरच्या माणसांच्या अगदीं गळ्यांतल्या ताईत होऊन राहिलेल्या असतात.

हिराबाई–सुंदरपणा ही एक अशी वस्तु आहे कीं, जिच्या योगानें मनुष्य अगदीं मोहून जातो. पण ज्या स्त्रिया स्वरूपानें चांगल्या असून दुष्ट चालीच्या व खराब स्वभावाच्या असतात, त्या आपल्याच हातानें आपल्या तोंडांत माती घालून घेतात, यांत संशय नाहीं. पण त्या जशा दिसण्यांत सुंदर असतात तशाच जर गुणांनींही चांगल्या असतील तर मग त्यांची किंमत कोण करील? आमच्या

शांताबाईची गोष्ट अशीच आहे. ती जशी स्वरूपानें चांगली आहे, तशीच सर्व गुणांनींही संपन्न आहे.

सगुणा०—तें सगळें खरें, पण शेवटीं कांहीं हुंडा तर दिला पाहिजे ना? आम्हां गरिबांजवळ त्यांच्या डौलास साजण्यासारखी कोठें ऐपत आहे? सध्यां सुखाची भाजीभाकर खाऊन कोणाच्या देण्या घेण्याची काळजी वाहावी लागत नाहीं, अशी आपली स्थिति आहे. तीं आम्हीं या भानगडींत पडून मग लोकांकडून छी थू करून घ्या, ऐवढें कोणीं सांगितलें आहे? घटकाभर असें समज कीं, त्यांनीं ही गोष्ट कबूल केली, आणि तसा योगही घडून आला, तरी शेवटीं आपली मुलगी गरीब घरची ठरणार, व तेणेंकरून मुलीस कशा-नाकशावरून तरी जाचणूक होणारच.

हिराबाई—अब्रू आणि मोठेपणा हीं कांहीं हुंडयावरच अवलंबून असतात असें नाहीं; तर नवराबायकोचें मन मिळण्यावर तीं असतात. वत्सलाबाई काय थोडा हुंडा घेऊन गेली होती? पण ती एक दिवस देखील सासरीं सुखानें नांदली नाहीं.

सगुणाबाई—अग, स्त्रीपुरुष चांगलेपणानें एकत्र नांदणें हें हुंडा देण्यावर नाहीं खरें; पण हुंडा दिला नाहीं तर सासरचीं मनुष्यें वेळोंवेळां ठोमणे मारल्याशिवाय रहातील काय? एकट्या नवऱ्यानें त्याकडे लक्ष दिलें नाहीं म्हणून काय झालें?

हिरावाई—सासरच्या इतर मनुष्यांशीं आपल्याला काय कर्तव्य आहे? आतां हें खरें कीं, सासवानणंदांच्या ठोमण्यांनीं अंमळ मनाला वाईट तर वाटणारच. पण या संबंधानें प्रेमिला व वत्सला यांची मुळींच धास्ती बाळगण्याचें कारण नाहीं. त्या तर आमच्या शांताबाईला जिवापलीकडे जपतील अशा आहेत. बरें इतक्या

उपरही शांताबाईला जाचच होऊं लागला तर मी कांहीं कोठें गेलें नाहींना? शांताबाईला त्या वाईट रीतीनें वागवूं लागल्या तर मला तोंड दाखविण्यास तरी त्यांला जागा राहील काय?

सगुणाबाई—बरें आतां तूं ह्मणतेस तरी काय? लग्न नुस्त्या साखरपुड्यावरच का उरकावयाचें आहे?

हिराबाई—सासूबाई, आपणास राग येऊं देऊं नका. माझी इच्छा शांताबाई कोठून तरी चांगल्या घरीं पडावी अशी आहे. आंता हुंडयाविषयीं ह्मणाल तर त्याबद्दल आपणास फारशी पंचाईत करावयाला नको. आपणास जितकी अनुकूळता असेल तितका तो द्यावा. नांवलौकिक मिळण्यासाठीं उगीच दिवाळें काढून बसण्यांत काय अर्थ आहे? माझ्या शाळेंत मुक्ता नांवाची एक मुलगी येत असते. तिचा बाप एका पलटणींत होता. त्यानें सत्तावन सालच्या बंडांत कोणा मडमेचा जीव वांचविल्यावरून सरकारांतून त्यास दहा हजार रुपये बक्षिस मिळाले होते. शिवाय त्या धांदलींत त्यास लूट मिळाली होती ती निराळीच. ते दहाच हजार रुपये जर त्यानें बेताबातानें खर्चले असते तर त्यास जन्मभर मोठ्या अब्रूनें राहतां आलें असतें. पण शिपाईबोवा एवढें मोठें बक्षिस मिळाल्यामुळें फुगून गेले; आणि त्यांनीं सरकारांतून मिळालेले ते दहा हजार रुपये व शिवाय आणखी दुसरे हजार बाराशें रुपये काढून एका मुलाच्या व एका मुलीच्या लग्नांत सारे उधळून टाकले. त्या वेळीं त्यांची जिकडेतिकडे मोठी वाहवा झाली. पण आतां घरांत वेळेस अन्न मिळण्याची पंचाईत पडूं लागली आहे. त्या लग्नास मीही गेलें होतें. तेव्हां काय विचारतां, जिकडेतिकडे हंड्याझुंबरांचा लखलखाट पडला होता,

च कोचें खुर्च्या यांची एकच गर्दी होऊन गेली होती. तेव्हां मुक्तेच्या आईजवळ मी सहज झटलें, "बाई, सध्यां हा डामडौल डोळ्यांस सुख व मनास आल्हाद देत आहे खरा; पण पुढें हाच नडणार आहे बेर. मनुष्यानें मागचा पुढचा विचार पाहून वागलें पाहिजे." इतकें माझ्या तोंडांतून आलें मात्र, तों तिच्या अंगाचा अगदीं तिळपापड झाला. तिनें तत्काळ झटलें कीं, "खर्चणारांचें खर्चेतें आणि पाहणारांच्या पोटांत ढवळतें."

सगुणाबाई—तें सगळें खरें, पण जगाच्या तोंडाला हात कोणी लावावा? आपणांस लोकांत रहाणें आहे. तेव्हां जवळ कांहीं असो अथवा नसो, पण जनरूढीप्रमाणें सगळें कांहीं केलेंच पाहिजे. मी कोठेंसें असें, वाचलें आहे कीं, पूर्वीं आरबलोक आपल्या मुलींस जन्मतांच मारून टाकीत असत. याचें कारण तरी हेंच असावें.

हिराबाई—इतकें लांब कशाला जातां; आपल्या देशांतील रजपूतलोक देखील हें दुष्ट कर्म करीत असत. परंतु इंग्रजसरकारचें राज्य झाल्यापासून ही चाल व अशाच दुसऱ्या निर्दयपणाच्या कित्येक चाली कायदा करून सरकारानें बंद केल्या. तरी देखील अजून कैक वेळां चोरून छपवून केलेल्या बालहत्या उघडकीस येतात.

सगुणाबाई—खरें आहे. जनरूढीपुढें कोणाचें शहाणपण चालत नाहीं.

हिराबाई—पण गरीब लोकांला श्रीमंतांची रूढि काय कामाची बरें?

सगुणाबाई—कामाची नाहीं हें खरें. इंग्रजसरकार जर लग्नका-

यांत अवाढव्य खर्च करण्याचें मना करील तर किती चांगलें होईल बरें ?

हिराबाई—सासूबाई, कलकत्त्याकडे व मद्रासेकडे अशा हेतूनें एक मंडळी स्थापन झाली आहे, व सरकारही या गोष्टीस अनुकूळ आहे, असें थोडया दिवसांपूर्वी मी वर्तमानपत्रांत वाचलें होतें. पण त्याचा विचार करण्याकरितां सरकारांतून मोठमोठ्या गृहस्थांचें मत विचारिलें होतें, व त्यांच्या मतानें लोकस्थितीच्या मानानें खर्चाची एक इयत्ता कायम केली होती, व हुंडा अमुक अमुक द्यावा असेंही ठरलें होतें. पण आपले लोकच जर एकमतानें व एकविचारानें चालतील तर हा डामडौल व उधळेपणा सरकाराचे मदतीवाचून सहज कमी होऊन त्यांची अब्रू रहाणार आहे.

सगुणाबाई—मुली, डामडौलाविषयीं जें तूं झटलेंस तें खरें नाहीं. कारण ईश्वरानें ज्याला दिलें आहे त्यानें खर्च केला तर तो वावगा नाहीं. पण ज्याच्याजवळ एक कवडीची सुद्धां माया नाहीं त्यानें मात्र आपल्या शक्तीच्या बाहेर खर्च करणें वाजवी नाहीं.

हिरा०—सासूबाई, असें झणूं नका, केवळ लग्नकार्याकरितांच जे खर्च आहेत ते फार थोडे आहेत, परंतु बाहेरील डामडौलाकरितांच मोठा अवाढव्य खर्च होत असतो. पहा, आपल्या लोकांत वरवोडा, नाच, बैठकी, गाणीं, दारूकाम वगैरे पुष्कळ प्रकार होत असतात; त्यांस शेंकडो रुपये खर्च होतात कीं नाहींत.

सगुणाबाई—नाच बैठकी ज्यांच्या येथें होत असतील त्यांस तें माहित. पण आमच्या येथें असा कोणता वावगा खर्च होणार आहे, सांग बरें ?

हिराबाई—कां नाहीं? वरघोडा, तासे, वाजंत्री, हिलाल मशाली, मंडप, दागिने ह्या सर्व गोष्टी डामडौलाच्याच आहेत.

सगुणाबाई—तर मग असेंही कां ह्मणूं नये कीं, लग्न करणें हा ही एक डामडौलच आहे?

हिराबाई—(किंचित् गालांत हंसून) छे, छे, सासूबाई, असें ह्मणूं नका. लग्न करणें हा एक ईश्वरानें नियमच लावून दिलेला आहे. पण त्या प्रीत्यर्थ भलत्या सलत्या चालीरुढींस अनुसरणें हा मात्र मोठा वेडेपणा होय.

सगुणाबाई—बरें, मंडपाबिंडप हा वेडेपणा असें घटकाभर मानलें; तरी लत्ताकपडा, दागदागिना यांबद्दल होणारा खर्च तूं वेडेपणाचा ह्मणतेस, याचें मात्र मला मोठें नवल वाटतें.

हिराबाई—सासूबाई, साधा कपडा आणि साधे दागिने याला कांहीं हरकत नाहीं; परंतु मोठ्या किमतीचीं लुगडीं, शालू, दाग-दागिने हीं काय बरें कामाचीं? माझे जडावाचे दागिने व उंची कपडे आज निकामी पडून व कुजून जात आहेत कीं नाहींत? ते घरांत तर नेहमीं वापरतां येत नाहींत. कधीं कोठें लग्नकार्य किंवा सण-वार असला तर तेवढ्या वेळेकरितां मात्र त्यांचा उपयोग, बाकी बारा महिने पेटींत दडपून ठेवलेले असावयाचे. त्यांस वरचेवर ऊन दाखविण्याची व स्वच्छ करून ठेवावयाची मात्र दगदग. विकावयास गेलें तर त्या मालाचें मोल मूळ किंमतीहून किती तरी कमी यावयाचें. कोणा एका रावबहादुराचें थोडया दिवसांपूर्वी सोलापूर मुक्कामीं अगदीं साध्या रीतीनें लग्न झालेलें मीं ऐकलें आहे. तशा प्रकारचा लग्नाचा बेत मला फार आवडतो.

सगुणाबाई—असल्या वेडया रावबहादुरांची गोष्ट मला सांगूं नकोस. ; त्यांनीं असें केलें खरें, पण लोक त्यांची टर उडविल्या-शिवाय राहिले काय?

हिराबाई—लोक काय? ते पाहिंजे त्याची टर उडवितात. ह्मणून आपण चांगला मार्ग टाकून वाईट मार्गानें जाणें योग्य नव्हे.

सगुणाबाई—तर मग तुझ्या मतें आपण त्यांच्यासारखें गुप-चुपचिें लग्न करावें नाहीं?

हिराबाई—सासुबाई, खरोखर पुसाल तर लोकांच्या बोलण्याची मी कांहीं परवा करीत नाहीं. माझें चालण्याजोगें असतें तर शांताबाईचें लग्न त्या रावबहादुरांप्रमाणेंच अगदीं साध्या रीतीनें केलें असतें.

सगुणाबाई—छे बाई, असले विचार तूं मनांत देखील आणूं नकोस. मला कोठें आणखी पांच दहा मुलांचीं लग्नें करावयाचीं आहेत? माझ्या डोळ्यां देखत एवढें शांताबाईचें लग्न थाटमाटानें झालें ह्मणजे माझीं गंगेस घोडीं न्हालीं!

हिराबाई—सासुबाई, मी आपल्या मनांत तर दृढनिश्चय केला आहे कीं, या कार्याकरितां ह्मणून एक पैसादेखील कर्ज काढा-वयाचा नाहीं, किंवा घरांतील दागिना गहाण ठेवावयाचा नाहीं. जो कांहीं कपडालत्ता या कार्याकरितां आजपर्यंत आपण राखून ठेविला आहे, तेवढ्यावर लग्नसंबंधाचा सर्व खर्च आटपून ध्यावयाचा. शिवाय भावोजींकडून व तिकडून जे कांहीं थोडेबहुत रुपये येतील तेवढ्यांत काय करतां येईल तें करावयाचें.

सगुणाबाई—अग, तुझ्या नवऱ्याकडून काय येणार आहे तें समजतेंच आहे; आणि तेवढ्यांत सर्व कांहीं खर्च आटपेल

तर मग आणखी काय हवें. पण नवऱ्यामुलाकडचीं मनुष्यें या अशा कंजूसपणास राजी होतील तेव्हांच कीं नाहीं?

हिराबाई—बरें, त्यांलाही कोणत्या तरी युक्तीनें राजी केलें तर मग?

सगुणाबाई—त्यांचें राजी होणें कांहीं आपल्या हातचें नाहीं हो. त्यांचा तर तो एकुलता एक मुलगा; तेव्हां त्याची हौस पुरविण्यास तीं अगदीं कमी करणार नाहींत. ह्मणून त्यांच्या तोलास जीं कोणी उतरतील त्यांजबरोबरच तीं सोयरेसंबंध करितील, आणि आपली सगळी हौस यथास्थित पुरवून घेतील.

हिराबाई—सासुबाई, ज्या दिवशीं मी निलगिरीहून येथें आलें, त्या दिवसापासून याच गोष्टीच्या खटपटींत मी आहें; आणि आतां बहुतेक जमल्यासारखें झालें आहे. हरकत काय तीं आपल्याकडूनच आहे. आतांच प्रेमिलाबाई व वत्सलाबाई मजकडे येऊन गेल्या. त्यांनीं मला असें सांगितलें कीं, ही गोष्ट सरनोबतांस देखील मान्य झाली आहे. निराबाईनें कीं नाहीं आपल्या पुतणीसाठीं पुष्कळ अट्टाहास केला, पण शेवटीं तिचें कांहीं एक चाललें नाहीं. याकरितां आतां वेळ घालवूं नका. उद्यांच्या उद्यां साखरपुडा करून एकदांचें ठरवून टाका, ह्मणजे पुढें लग्नाचें पाहतां येईल.

सगुणाबाई—ही गोष्ट घडेल तर मी आपणाला मोठी भाग्यशाली समजेन. त्यांची स्थिति आपल्या स्थितीशीं ताडली असतां त्यांची आमच्यापेक्षां हजारपटीनें अधिक चांगली आहे. पण त्यांच्या डामडौलास शोभेल असें करण्यास आपणांला मात्र सामर्थ्य नाहीं. इतकीच काय ती अडचण आहे.

हिराबाई—सासुबाई, कोणतीही गोष्ट घडवून आणणारा सर्व-

समर्थ प्रभु आहे. तेव्हां तोच ती अडचण दूर करणार नाहीं ह्मणून कशावरून? ज्यापक्षीं शांताबाईचा अशा मोठ्या घरीं पडण्याचा योग त्यानें घडवून आणला आहे, त्यापक्षीं तोच आपल्या सामर्थ्यानें ह्या अडचणींतूनही आह्मांस पार पाडील.

सगुणाबाई—बरें, तूं त्यांच्या कानावर ही गोष्ट घातली अस-शीलच? आतां त्यांना येऊं दे, ह्मणजे त्यांच्या विचारानें साखर-पुडयाचा बेत करूं.

माधवराव बाहेर गेले होते, ते थोड्या वेळानें घरीं आले. मागणी पक्की होऊन साखरपुडा व्हावयाची मात्र खोटी आहे, असें हिराबाईनें सांगितलें तेव्हां त्यांना फारच आनंद झाला; आणि ते ह्मणाले कीं, "आतां विलंब न लावतां उद्यांच्या उद्यांच साखरपुडा पाठविण्याचें करा ह्मणजे झालें." त्याप्रमाणें हिराबाईनें प्रेमिलेच्या माहेरीं कळविलें. दुसरे दिवशीं नवऱ्यामुलाच्या येथून पांच मण मिठाई, लुगडीं, चोळ-खण, व पांच मोहरा आल्या. तसेंच इकडूनही जांवईबुवांकरितां शेला-आगोटें व सव्वा मण मिठाई गेली. नंतर सरनोबतांनीं माधवरावांस सांगून पाठविलें कीं, "आतां दिवस थोडे राहिले. माझा बेत काशियात्रेस जाण्याचा आहे; त्यास हीच काय ती हरकत आहे. या आयुष्याचा नेम नाहीं; घडी जाते ती आपली. तेव्हां आपण फाल्गुन वद्य प्रतिपदेचा मुहूर्त धराल तर मजवर मोठी कृपा होईल." हा निरोप माधवरावांनीं हिराबाईस कळविल्यावर तिनें सांगितलें कीं, "त्यांस तूर्त इतकाच निरोप पाठवा कीं, आह्मीं त्याच प्रयत्नांत आहों; व जितकी लवकर तयारी होईल तितकी करण्यास झटत आहों; आणि आपल्या योग्यतेस कांहीं तरी शोभेल असें करण्यास आमच्या शक्तीप्रमाणें पाहत आहों." हा निरोप

सरनोबतांस पोंचल्यावर त्यांनीं लागलेंच सांगून पाठविलें कीं, "आह्मीं आपल्याशीं सोयरीक केली ती आपणांकडून आह्मांस कांहीं तरी प्राप्त व्हावें, किंवा आमच्या योग्यतेसारखा आपल्याकडून खर्च व डामडौल व्हावा या उद्देशानें केली नाहीं, तर केवळ मुलीच्या गुणांकडेस पाहून केली आहे. यास्तव आपणास कोणत्याही गोष्टीविषयीं काळजी करण्याची गरज नाहीं." त्यावर माधवरावांनीं उत्तर पाठविलें कीं, "आपल्या मर्जी बाहेर आह्मी नाहीं. आपण ह्मणतां त्या मुहुर्तासच लग्न धरण्यास आह्मी कबूल आहों."

शेवटीं फाल्गुन वद्य प्रतिपदेचा मुहूर्त कायम झाला; आणि त्याला फारच थोडे दिवस राहिल्यामुळें दोहोंकडील तयारी मोठ्या तांतडीनें होऊं लागली. तयारी होत असतां खर्चाविषयीं माधवरावांस मोठी काळजी पडली; मुदत फारच थोडी राहिल्यामुळें त्यांनीं आपल्या मनांत एकवेळ असा बेत केला कीं, तिलकचंदापासून कर्जीं रुपये काढावे. परंतु तो एवढी मोठी रक्कम कांहीं तरी ऐवज घेतल्यावांचून देणार नाहीं, असें त्यांच्या मनांत येऊन त्यांनीं आपली जमीन त्याच्याकडे गहाण ठेवण्याचा विचार केला. एके दिवशीं हिराबाईनें आपल्या सासऱ्यास चिंतातुर पाहून विचारलें:

"मामंजी, हल्लीं आपण असे चिंतातूर कां दिसतां बरें?"

माधवराव—काय सांगूं मुली, मुहूर्त अगदीं जवळ येऊन ठेपला तरी अजून खर्चाची कांहींच तजवीज होत नाहीं. तिलकचंदापाशीं रुपयांविषयीं गोष्ट काढिली होती, पण तो भलभलतींच निमित्तें सांगतो. ह्मणून बाग आहे तो गहाण ठेवावा किंवा जमल्यास विकून टाकावा, असा बेत केला होता. परंतु त्यासही कोणी

या आयत्या वेळीं सावकार उभा रहात नाहीं. आतां मोठी फजितीचीच वेळ आली आहे.

हिराबाई—आपण कर्जाचें नांव सुद्धां काढूं नका, व इनामी जमीन आहे तीही विकूं नका. कां कीं कर्जासारखा मोठा शत्रु दुसरा कोणताही नाहीं; व जमीन आहे ती एकदां विकून टाकल्यास तशी पुनः मिळविण्यास महाप्रयास पडतील.

माधवराव—कर्ज काढूं नको, व बागही विकूं नको, तर काय करूं? खर्चास लागणारें द्रव्य कोठून पैदा करूं?

हिराबाई—मामंजी, आपल्यास राग येऊं देऊं नका; मी म्हणतें कीं, पहिल्यानें घरांत आहे काय, नाहीं काय, तें पाहून नंतर जरूर किती आहे तें पाहावें. जांवईबुवांकरितां पोषाक व इतर घडोतीचीं सनगें तर पहिल्यानें तयार करून ठेविलींच आहे. कांहीं चोळखणांची आयत्या वेळीं गरज लागलीच तर माझ्या लग्नाच्या वेळचे पुष्कळ खण पेटींत उगाच पडून राहिले आहेत ते काढतां येतील. तांब्ये, पंचपात्र्या वगैरे आंदण द्यावयाचीं भांडीं काल आणलींच आहेत. आतां अडचण काय ती किरकोळ खर्चाकरितां रोकड रकमेची, व शांताबाईस आणि जांवईबुवांस कांहीं दागदागिने कराल त्याची. आपल्यापाशीं थोडेबहुत रोख रुपये असतीलच.

माधवराव—होय, माझ्यापाशीं पांचशें रुपये रोख शिल्लक आहेत.

हिराबाई—पांचशें रुपये आहेत तर मग आणखी काय पाहिजे? मी निलगिरीस जावयास निघालें होतें, तेव्हां मजजवळ शाळेच्या फंडाचे ४०० रुपये शिल्लक होते, ते मी तसेच अनामत ठेविले आहेत. शिवाय मी गेल्यावर माझ्यामागें २०० रुपये जमा

झाले आहेत; त्यांपैकीं अर्ध्या ह्मणजे १०० रुपयांवर माझ्या आक्काचा हक्क आहे, व बाकी राहिलेल्या १०० रुपयांवर शांताबाईचा आहे. तेव्हां शाळेच्या फंडापैकीं ५०० रुपये मजपाशीं आज तयार आहेत. शिवाय ३०० रुपये पाठवून देण्याविषयीं मी निलगिरीस कालच लिहिलें आहे; व आपणाकडूनही भावोजींस २०० रुपयांविषयीं पत्र गेलें आहे. ते आले ह्मणजे सर्व मिळून दीडहजार रुपये होतील. एक हजार रुपये किंमतीचीं रत्नजडित कांकणें, जीं मला प्रेमिलाबाईच्या लग्नांत बक्षिस मिळालीं होतीं, तीं माझ्या मनांतून शांताबाईस द्यावयाचीं होतीं. पण मागाहून मला असा विचार सुचला कीं, ज्या घरचीं कांकणें त्याच घरीं परत देणें हें योग्य नाहीं. मला दुसरी अशी एक युक्ति सुचली आहे कीं, आपण जर भावोजींस आणण्याच्या निमित्तानें कोल्हापुरास जाल, आणि महाराजांपाशीं त्यांच्या रजे-विषयीं गोष्ट काढतांना घरीं लग्नकार्य आहे असें सुचवाल, व महाराजांसही आमंत्रण द्याल, तर महाराज मोठ्या मनाचे आहेत, आणि आपण आपलें बरेंच आयुष्य त्यांच्या सेवेंत घालविलें आहे, ह्मणून या कार्यास ते आपणांस कांहीं तरी मदत केल्याशिवाय रहाणार नाहींत. कारण आपल्या पदरीं इमानें इतबारें काम केलेल्या चाकरांस अशा प्रसंगीं मदत करण्याची चाल आपल्या देशांतील राजेरजवाडयांत पुरातन काळापासून चालत आलेली आहे.

याप्रमाणें हिराबाईनें आपल्या सासऱ्याची समजूत करून त्यास कोल्हापुरास पाठविलें. माधवराव तेथें पोंचल्यावर महाराजांच्या भेटीस गेले. छत्रपति महाराजांनीं त्यांस पाहून येण्याचें कारण काय ह्मणून विचारलें. माधवराव हात जोडून ह्मणाले, "सरकार, आपल्या पायांपाशीं

अर्ज इतकाच आहे कीं, माझी एकुलती एक कन्या शांताबाई हिचें लग्न करण्याचें मी योजिलें आहे, व सरकारचे चरण लग्नमंडपीं लागावे असा ह्या सेवकाचा हेतु आहे. तसें करण्यास सवड नसेल तर निदान आपल्या आप्तसोयऱ्यांपैकीं कोणी तरी लग्नास यावें, ह्मणजे मी कृतकृत्य होईन, अथवा सरकारचे मुख्य दिवाणसाहेब हल्लीं पुणें मुक्कामीं अनायासें गेले आहेत, त्यांस माझ्या मुलीच्या लग्नास जाऊन मंडपशोभा करण्याची आपणांकडून आज्ञा होईल तरीही मजवर हुजुरचे फार उपकार होतील. दुसरी विनंति ही कीं, माझा थोरला मुलगा बुद्धिवंत आपल्या पायांपाशीं आहे. त्यास एक महिन्याची रजा असावी." छत्रपतींनीं बुद्धिवंतास रजा देण्याचें कबूल करून माधवरावांस पांचशें रुपये रोख व येण्याजाण्याचा खर्च दिला, आणि पुण्यास मुख्य दिवाणास हुकूम पाठविला कीं, " तुह्मीं माधवरावांच्या मुलीच्या लग्नास आमच्या तर्फे जावें, व पांचशें रुपयांचा वधुवरांस आहेर करावा." याप्रमाणें हिराबाईच्या मसलतीनें बसल्याबसल्या आणखी हजार रुपये सहज घरीं आले. अशा रीतीनें द्रव्याची जिकडून तिकडून अगदीं रेलचेल होऊन गेली. तसेंच हिराबाईच्या दक्षतेनें दागदागिने व इतर सर्व प्रकारचें सामानसुमान याची सिद्धता अशी उत्तम प्रकारें झाली कीं, ती पाहून माधवराव अगदीं खुष होऊन गेले. नवऱ्यामुलाकडचे लोकही ही यांची तयारी पाहून फार दंग झाले? ते जी जी वस्तु व सामान पहात, तें तें मोठ्या किंमतीचें असून नवीन तऱ्हेचें आहे असें दिसे. दागिने व हुंडा यांची तर मुबलक तयारी झाली. नाकांत हिरकणीजडित टिकेची नथ; कानांत कर्णफुलें, कारलें, वोंसबाळी व बुगडी; हातांत बाजूबंद, गोखरू, कांकणें व पाटल्या; डोकींत मूद, राखडी व केतक; गळ्यांत पुतळ्यांचा हार, ठुशी, वज्रटिका

व सरी; पायांत सांखळ्या, गेंद, पैंजण व मासोळ्या; इत्यादि दागिने शांताबाईस घातले. हे सर्व नवे व जुने दागिने मिळून कमींत कमी दोन हजारांवर झाले होते.

प्रकरण विसावें.

शांताबाईचा लग्नसमारंभ.

मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें सर्व कांहीं सिद्धता होऊन लग्नकार्यास आरंभ झाला. हिंदुशास्त्रांत सांगितलेले व इतर व्यवहारांतले सर्व कांहीं विधि क्रमाक्रमानें दोन्ही पक्षांकडे करण्यांत आलेच. परंतु एक दोन नवीन प्रकार हिराबाईच्या सूचनेवरून यावेळीं घडून आले. एक तर असा कीं, अंतरपाट धरून संस्कृत भाषेंत रचलेलीं मंगलाष्टकें ह्मणण्याचा परिपाठ आहे. पण तीं प्रसंगास अनुरूप अशीं फारशीं नसतात, आणि शिवाय वधुवरांस व इतर जमलेल्या बहुतेक लोकांस संस्कृत भाषा येत नसल्यामुळें शांताबाईच्या लग्नांत मराठींत नवीन मंगलाष्टकें रचून ह्मणावीं अशी आपली इच्छा आहे, असें हिराबाईनें माधवरावांस कळविलें. तेव्हां त्यांलाही तो विचार पसंत वाटला; आणि त्यांनीं आपल्या एका मित्राकडून मंगलाष्टकाच्या चालीवर कांहीं पद्यें करविलीं, आणि तीं पुरोहिताकडून अंतरपाटाच्या वेळीं ह्मणविलीं. तीं पद्यें येणेंप्रमाणें होतीं:—

वत्से[1] होतिस धाकुटी चिमुकली दुग्धें[2] तुला पोषिलें ॥
प्रेमानें लडिवाळिलें निशिदिनीं[3] जीवा परी पाळिलें ॥

---

१ मुली. २ दुधानें. ३ रात्रंदिवस.

वर्षें षोडश[४]; झालिशी उपवरा आतां ग्रिये कोमले ॥
सत्पात्रीं[५] तुज अर्पिणें उचित हें मातापित्या प्रेमलें[६] ॥ १ ॥
ज्ञानी दक्ष कुलीनही सुहृदयी[७] सुस्निग्ध[८] ऐसा पिता ॥
माता सौम्य सुशील वत्सल सती धर्मीहि तैशी रता[९] ॥
हें दांपत्य सुभाग्यवान् जनन[१०] दे ज्यातें असा नोवरा ॥
पाहोनी तुज अर्पिली समय हो भाग्योदयाचा वरा ॥ २ ॥
आनंदें पतिच्या गृहासि श्वशुरश्वश्रूचिया[११] आश्रया ॥
जावें त्वां तनये न खेद करणें स्त्री जन्मली जावया ॥
मातावंधुपितावियोग न गणीं सर्वांप्त[१२] जाणीं पती ॥
प्रेमाची सकलां सुशीलवति तूं तेथें करीं संहती[१३] ॥ ३ ॥
भर्त्याचया कुशलींच[१४] जागृत असें आज्ञा तयाची मनीं ॥
जेणें होइल रोष तें न करणें ठेवीं सदां हें मनीं ॥
सत्कार्यीं पतिशीं सहाय करिं तूं धर्मानुकूला[१५] सुते[१६] ॥
राहें साधि सकांत[१७] भक्ति प्रभुची मुक्तीशि सर्वानते[१८] ॥ ४ ॥
ठेवीं संतत[१९] सौम्य वृत्ति विनयें शोभा असे स्त्रीजनीं ॥
सौजन्यें मित भाषणें मृदुपणें वर्तीं नयें नंदिनी[२०] ॥
लज्जाशील असें सदां स्मितवती[२१] कोपासि त्यागूनियां ॥
सेवीं आप्तजनासि किंकरिं[२२] सुते ठेवीं सुशीले दया ॥ ५ ॥
जाईं तूं पतिच्या गृहासि जिवसे[२३] आनंदवृत्ती धरीं ॥
भर्त्यामागुनि जाइं सन्निध तया राहें घरीं अंतरीं ॥
जो हे गोल असंख्य वांधुनि धरी दूरस्थ[२४] आकर्षणें ॥
रक्षो जोडुनियां तुह्मां वधुवरां प्रेमाचिया सद्गुणें ॥ ६ ॥

४ सोळा. ५ योग्यवरास. ६ प्रिय. ७ चांगल्या हृदयाचा. ८ चांगला प्रिय. ९ निमग्न. १० जन्म ११ सासुसासऱ्याच्या. १२ एकंदर इष्टमित्र. १३ संग्रह. १४ कल्याणासच. १५ धर्माप्रमाणें असलेल्या. १६ मुली. १७ नम्रतेने वागणारे. १८ सर्वांशीं नम्रतेने वागणारे. १९ नेहमीं. २० मुली. २१ हंसतमुख. २२ चाकरांवर. २३ जिवाप्रमाणें प्रिये. २४ दूर दूर असलेले.

हिराबाईनें सुचविलेला दुसरा प्रकार असा कीं, वधुवरांचें पाणिग्रहण होऊन लज्जाहोम वगैरे विधि आटोपल्यावर वधुवरें मंडळींत येऊन बसतात, तेव्हां कोणातरी संभावित, विद्वान् व पूज्य अशा गृहस्थाकडून त्यांस प्रसंगास उचित असा बोध करवावा. हाही विचार माधवरावांस फारच चांगला वाटला, आणि त्यांनीं आपल्या दुसऱ्या एका वयोवृद्ध मित्राकडून हा बोध करविला. त्या गृहस्थानें केलेला बोध असा होता :—

"हे वधुवर हो, हा तुमच्या आयुष्यांतला अत्यंत मंगल, गंभीर व महत्वाचा समय होय. येथून तुमचा संसार सुरू झाला. आजपर्यंत तुम्हीं आपआपल्या मातापितरांच्या आश्रयानें राहून केवळ निश्चिंतपणें कालक्रमणा करीत होतां. संसारसंबंधीं कोणताही व्याप किंवा दगदग तुमच्या पाठीस लागली नव्हती. तुमची आजपर्यंत केवळ कुमरावस्था असून विद्यादि ज्या गोष्टींचें या संसारयात्रेंत अगत्य लागतें त्यांचें संपादन तुम्हीं निर्वेधपणें केलें. ही तुमची अवस्था आजपासून पालटून तुमच्या शिरावर नवा बोजा व नवी जबाबदारी चढली आहे. हा बोजा तुमच्या शिरीं आमरण राहून त्या संबंधाचीं कर्तव्यें तुम्हांस सदैव केलींच पाहिजेत. तीं करण्यास तुम्ही चुकाल तर तुम्हांस ऐहिक व पारलौकिक सुख मिळणें नाहीं. ह्यासाठीं तुम्हीं हीं आपलीं कर्तव्यें समजून घेण्यास मुळींच आळस करूं नका. या संसारयात्रेंत दर पावलीं येणाऱ्या अडचणी व संकटें कशीं टाळावीं, प्रतिदिनीं करावीं लागणारीं नाना प्रकारचीं कर्तव्यें कशीं बजवावीं, आणि उभयतांस जेणेंकरून सुख होईल असें आचरण ठेवण्यास कोणत्याप्रकारें झटावें, या गोष्टींचें ज्ञान तुम्हीं अवश्य मिळवा. या संबंधानें

हलगरजीपणा किंवा बेपरवाई तुम्हीं बिलकूल दाखवूं नका. तुम्हां दोघांसही थोडेंबहुत शिक्षण मिळालें आहे. तेव्हां, ह्या गोष्टी तुम्हांस मुळींच कठीण नाहींत. आपला फावलेला वेळ तुम्हीं संसारास उपयोगीं पडेल असें ज्ञान मिळविण्यांत घालवीत जा; आणि मिळालेल्या ज्ञानाचा आपल्या आचरणानें योग्य उपयोग करा. हा जो तुमचा आज परम मंगल संबंध घडला आहे तो परस्परांचें कुटुंबसौख्य वाढविण्यासाठीं आहे. संसारांत एकमेकांस हरएक गोष्टीमध्यें अत्यंत प्रेमानें साहाय्य करण्यासाठीं तुमच्या ह्या गांठी आज बांधल्या आहेत. कोणी एकानें ह्या संसाराची गाड्याशीं तुलना करून त्याचीं स्त्री आणि पुरुष हीं चाकें आहेत असें ह्मटलें आहे. तें सर्वथा सत्य आहे. गाडयाचीं दोन्ही चाकें समसमान असून एकमेकांच्या तंत्रानें एकाच दिशेनें चालू राहिलीं तरच गाडा नेमलेल्या ठिकाणीं सुरळीतपणें जावयाचा. अशीच गोष्ट संसार चालविण्याऱ्या स्त्रीपुरुषांची आहे. त्यांच्या अंगीं गृहस्थाश्रमास लागणारे गुण अवश्य असले पाहिजेत. शिवाय उभयतांनीं नेहमीं एकदिलानें वागलें पाहिजे. हें लक्षांत वागवून तुम्ही नेहमीं एकमेकांशीं कोणत्याही निमित्तावरून भांडूं नका, परस्परांचा द्वेष यत्किंचित्ही करूं नका. एकमेकांवर सदैव प्रेम ठेवा. एकमेकांच्या सुखासाठीं नेहमीं झटा. असें तुम्हीं कराल, तरच तुमची ही संसारयात्रा सुखानें पार पडेल. कित्येक तरुण वधुवरांचा हा विवाहसंबंध जुळल्यावर मग तीं आपल्या वडील माणसांची परवा करीतनाशीं होतात. त्यांना वाटतें कीं, आपणांस आतां कोणाचीही गरज नाहीं. परंतु हा प्रकार खरोखरीच मोठा निंद्य आहे. ज्यांनीं नाना प्रकारचीं दुःखें, संकटें व

अडचणी सोसून मोठ्या ममतेनें व आस्थेनें तुमचें आजपर्यंत संगोपन केलें आहे, तुमचें या संसारांत नेहमीं कल्याण व्हावें असें ज्यांस मनापासून वाटत आहे, ज्यांचें तुम्हांवर केवळ निरपेक्ष प्रेम आहे, तुमची विपत्ति किंवा दुःख पाहून ज्यांचें चित्त कळवळून जातें, आणि तुमच्यासाठीं आपले प्राणही वेंचण्यास जीं नेहमीं तयार असतात, त्यांस त्यांच्या उतार वयांत कोणत्याही प्रकारें दुःख होईल असें वर्तन ठेवूं नका. आपल्या नवऱ्याचीं जीं वडीलमाणसें तीं स्त्रीनें आपल्या माहेरच्या वडिलांप्रमाणेंच प्रिय व पूज्य मानून घरांत वागलें पाहिजे, आणि त्यांच्या आज्ञेंत नेहमीं वागून त्यांस प्रिय वाटेल असें आपलें आचरण ठेवलें पाहिजे. हिराबाई, तूं तर शहाणी मुलगी आहेस. तुझ्या वडिलांच्या कृपेनें व तुझी वहिनी हिराबाई हिच्या सहवासानें तुला चांगलें शिक्षण मिळालें असून सुगृहिणीस अनुरूप असे सर्व गुण तुझ्या अंगीं आहेत, हें मी जाणून आहें. तर ही तुझी वृत्ति तूं पुढें कायम ठेव. आणि आपण मोठी शिकलेली या घमंडीवर जाऊन आपल्या नवऱ्याच्या माणसांशीं कोणतेंही अमर्यादपणाचें वर्तन करूं नकोस.. आपल्या नवऱ्यास नेहमीं संतुष्ट राखण्याविषयीं जपत जा. तूं जें कांहीं थोडेंबहुत शिकली आहेस, तें कायम ठेवून त्यांत नित्य नवी भर घालीत जा. तुझ्यासारख्या शिकलेल्या मुली आमच्या लोकांत फार कमी आहेत. त्यांच्या हातून शेजारपाजारच्या अशिक्षित मुलींचा व बायकांचा पुष्कळ फायदा होण्यासारखा आहे. तूं मनावर घेशील तर तुला आपल्या अशिक्षित भगिनींस थोडेंबहुत शिकवितां येईल. या संबंधानें तूं हिराबाईचा कित्ता उचलावा. तूं मोठ्या श्रीमंत कुटुंबांत पडली आहेस, तेव्हां तुझ्या हातून अनेक प्रकारीं लोककल्याण होण्यासारखें आहे.

घरांतील कामधंदा करण्याकडे जो वेळ जावयाचा तो तुला परोपकाराचीं कामें करण्यास सांपडणार आहे. त्याचा कसा उपयोग करावा हें तुला हिराबाईच्या उदाहरणावरून चांगलें कळलें आहे. तर तूं आपल्या ऐपतीचा, आपल्या बुद्धीचा व आपल्या ज्ञानाचा सद्व्यय करून लोकांकडून धन्य म्हणवून घे. धनपाळ, तुम्हालाही माझें असें सांगणें आहे कीं, तुम्हीं आपला विद्याभ्यास मोठ्या उत्साहानें व आवडीनें पुढें चालवावा. आपलें लग्न झालें, आपला संसार थाटला, आपणांस पैशाअडक्याची कांहीं उणीव नाहीं, तेव्हां आतां सुखांत व मौजेंत काळ घालविण्यापलिकडे आपली कांहीं इतिकर्तव्यता उरली नाहीं, असें समजूं नका. असा अविचार कराल तर तुम्ही पुढें आमरण पश्चात्ताप पावाल. तुमचें हल्लींचें शिक्षण अगदीं थोडें आहे. तुमच्या एक दोन तरी परीक्षा व्हाव्या अशी सरनोबतांची इच्छा आहे. तुमचें हें ज्ञानसंपादनाचें वय आहे. या वयांत आपल्या वेळेचा व शक्तीचा कृपणाप्रमाणें व्यय करून मोठ्या अधाशाप्रमाणें तुम्हीं ज्ञानसंग्रह केला पाहिजे. तुमचें वय लहान आहे तोंपर्यंत तुमच्या हातून हा विद्याभ्यास घडणार आहे. ह्यासाठीं तुम्हीं आपला वेळ व्यर्थ दवडूं नका, वाईट लोकांची संगत धरूं नका, कोणत्याही प्रकारचीं दुर्व्यसनें लावून घेऊं नका. केवळ विद्याव्यासंगांत आपलें लहान वय घालवाल तरच तुम्हाला खरें संसारसुख प्राप्त होईल. केवळ संपत्तीच्या बळावर विद्याधनाचा अव्हेर करणें, किंवा तें कमी लेखणें उचित नव्हे. संपत्तीचा विद्येशीं योग झाला असतां मनुष्यास खरें व शाश्वत सौख्य प्राप्त होण्यासारखें असतें. मोठी धनदौलत असली तरी तिचा सद्व्यय करण्याचें जर मनुष्यास ज्ञान नसलें, तर तीपासून सुख होण्याऐवजीं नाना प्रकारचें दुःख होतें. अंगीं ज्ञानबलानें येणारा

सुविचार नसल्यामुळें श्रीमंत मनुष्य अविचारवश होऊन, व वाईट लोकांच्या नादीं लागून वेडे वेडे ढंग, अनाचार व कुकर्में यांत गढून जातो; आणि आपल्या साऱ्या वित्ताची उधळपट्टी करून कफल्लक होऊन बसतो. मग त्याचे अतोनात हाल होतात. यासाठीं धनपाळ, तुम्ही विद्या व ज्ञान यांचें संपादन अहर्निश करीत जा; आणि आपल्या संपत्तीचा व संपादित ज्ञानाचा विनियोग आपलें, आपल्या कुटुंबाचें, आपल्या नातलगांचें, आणि आपल्या देशबांधवांचें कल्याण करण्याकडे करण्याचा निश्चय करा. कोणा एका कवीनें म्हटलें आहे कीं:—

विद्या विवादाय धनं मदाय शक्तिः परेषां परिपीडनाय ॥
खलस्य साधोर्विपरीतमेतद्दानाय ज्ञानाय च रक्षणाय ॥ १ ॥

याचा भावार्थ असा कीं, विद्या, धन आणि सामर्थ्य यांचा उपयोग दुष्ट आणि साधु अगदीं निरनिराळ्या प्रकारें करितात. दुष्ट जे असतात ते विद्येच्या बलावर इतर लोकांशीं व्यर्थ वादविवाद करितात, धनाच्या विपुलतेनें अगदीं उन्मत्त होऊन कोणास मोजिनातसे होतात, आणि आपल्या अंगच्या सामर्थ्याचा दुसऱ्यांस दुःख देण्याकडे दुरुपयोग करितात. परंतु याच तीन गोष्टींचा उपयोग चांगले लोक कसा करितात तो पहा. ते विद्येचा उपयोग दुसऱ्यांस सज्ञान करण्याकडे करितात, वित्ताचा सद्व्यय परोपकार करण्याकडे करितात, आणि सामर्थ्याचा उपयोग दुसऱ्यांचें दुःख व संकट निवारण्याकडे करितात. तर हे धनपाळ, तुम्हीं आपल्या धनाचा, ज्ञानाचा आणि सामर्थ्याचा उपयोग जनाहितार्थ करण्याचा निर्धार करून संसारांत वागण्याचा प्रयत्न करा, म्हणजे तुम्हाला दुःख असें कधींही प्राप्त व्हावयाचें नाहीं. तुमच्या नशिबानें शांताबाईसारखी सुशिक्षित स्त्री

तुह्माला प्राप्त झाली आहे. हिला तुह्मी संभाळून घ्या. हिच्याशीं एकपत्नीव्रतानें वागा. हिला विनाकारण त्रास देऊं नका. स्त्रीला चांगले गुण लावणें, व तिचें आपणावर अढळ प्रेम जडेल असें करणें, हें पुरुषांच्याच हातीं असतें. हें तुह्मी नित्य ध्यानांत ठेवून हिजशीं वागा. आपला संसार दक्षतेनें चालवून आपल्या सर्व संबंधिजनांस व स्वदेशबांधवांस जेणेंकरून सुख होईल असें तुह्मी करीत जा; आणि हें नित्य ध्यानांत वागवा कीं, आपला संसार चांगल्या प्रकारें चालला ह्मणजे आपण कृतकृत्य झालों असें समजणें रास्त नव्हे. तर आपल्या हातून आपल्या आसपासच्या लोकांचें थोडेंबहुत हित झालें पाहिजे. ह्यासाठीं हे वधुवरांनों, तुह्मीं आपल्या शक्तीप्रमाणें लोकांच्या उपयोगीं पडण्यास तनमनधनेंकरून झटा, यांतच जीवितांचें खरें सार्थक्य आहे. आपल्या कोणत्याही प्रकारच्या आचरणानें दुसऱ्यास यत्किंचित्ही दुःख देऊं नका. तर आपलें, आपल्या संबंधिजनांचें आणि आपल्या देशबांधवांचें जेणेंकरून खरें व शाश्वत हित होईल तें कायावाचामनेंकरून करा. असो, तर, शेवटीं माझी येवढीच मनापासून इच्छा आहे कीं, तुह्मीं एकमेकांच्या साहाय्यानें आपलीं संसारांतलीं कर्तव्यें ओळखून त्याप्रमाणें वर्तण्यास अहर्निश झटावें, आणि आपणांस, आपल्या वाडवडिलांस व आपल्या संततीस धन्य म्हणवून घ्यावें. सर्वसाक्षी परमेश्वर तुमची ही संसारयात्रा सुखानें पार पाडण्यास तुह्मां उभयतांस शक्तिमान् करो.

ह्याप्रमाणें उपदेश आटोपल्यावर आलेल्या मंडळीस पानसुपारी, अत्तरगुलाब, हार तुरे, नारळ वगैरे चालीप्रमाणें वाटले. याप्रसंगीं आणखी एक नवी गोष्ट माधवरावांच्या आग्रहावरून करण्यांत आली. ती अशी कीं, रीतीप्रमाणें ब्राह्मणांस दक्षिणा वांटण्यासाठीं जी

रक्कम निराळी काढली होती. तींतील अर्धी रक्कम गरीब लोकांस बोलावून आणून त्यांस धोतरें, घोंगड्या व थाळे वाटण्यांत खर्चिली. ह्याप्रमाणें वधूच्या घरीं प्रकार घडल्यावर वरात निघाली. पुढें वराच्या घरीं सर्व कांहीं प्रकार चालीप्रमाणें घडले.

सारांश, सांगावयाचें काय कीं, हें लग्न उभय पक्षांस साजे अशा रीतीनें मोठ्या थाटानें झालें, आणि शांताबाई सासरीं रहावयास गेली. तिचें सासरचें नांव सुभद्राबाई असें ठेविलें होतें. सरनोबत व त्यांचे वडील बंधु जगन्नाथराव उर्फ भाऊसाहेब हे फार निस्पृही व सचोटीचे मनुष्य असून, त्यांची स्वधर्मावर फार श्रद्धा असे. पुष्कळ दिवसांपासून सरनोबतांनीं काशीयात्रेस जाण्याचा बेत केला होता; परंतु त्यांस धनपाळाच्या लग्नाची काय ती हरकत होती, असें मागें सांगितलेंच आहे. लग्न झाल्यावर थोडे दिवस ते सुभद्राबाईची चालचलणूक व रीतभात पहात राहिले. शांताबाईनें हिराबाईचा कित्ता इतका हुबेहूब गिरविला होता कीं, सासरीं कोणत्याही गोष्टीविषयीं तिला नांव ठेवण्यास जागा उरली नाहीं. सरनोबत हे जों जों तिजवर अधिक लक्ष ठेवीत, तों तों ती फार बुद्धिमान्, मर्यादशील व प्रत्येक कामांत चाणाक्ष अशी दिसे. म्हण आहे कीं, 'आधींच दूध आणि त्यांत पडली साखर,' तशी शांताबाई ही मूळचीच बुद्धिमान् होती, आणि तशांत आणखी तिला हिराबाईकडून शिक्षण मिळालें होतें. मग काय विचारतां? सरनोबतांची पूर्ण खात्री होऊन चुकली कीं, आपल्या कुळाचा या सुशील सुनेमुळें खरोखर उद्धार होईल. ही सुभद्राबाई आपल्या घराण्याची कीर्ति व लक्ष्मी निःसंशय वाढवील, असें त्यांस वाटूं लागलें. नंतर सरनोबत घरची सर्व कांहीं व्यवस्था धनपाळावर सोंपवून आपण काशीयात्रेस चालते झाले; व काशीयात्रा करून

आल्यानंतरही घरसंसाराकडे फारसें लक्ष न देतां तो धनपाळावरच्च संपवून आपला सारा वेळ ते ईश्वरभजनांत घालवूं लागले. शांताबाईचें लग्न होऊन जरी ती सासरीं जाऊन राहिली होती, तरी ती हिराबाईचें मत घेतल्याशिवाय कोणतेंही मोठें काम स्वबुद्धीनें करीत नसे. सरनोबतांचें घर झटलें झणजे लहानसान नव्हतें, तर मोठ्या जहागिरदाराच्या घराप्रमाणें तें सदा गजबजलेलें असे. तथापि, त्याचा कारभार शांताबाईच्या धोरणानें व मसलतीनें चालूं लागला, तेव्हां त्याची व्यवस्था पूर्वीपेक्षां पुष्कळ पटींनीं चांगली राहूं लागली. नंतर थोड्याच वर्षांनीं धनपाळास चक्रवर्तिनी महाराणी साहेबांकडून "**प्रिन्स ऑफ् दि मर्चंट**" झणजे 'सावकारांचा राजा' हा किताब मिळाला. त्याच्या सारखा श्रीमान् सरदार अवघ्या पुणेंशहरांत तर काय, पण साऱ्या मुंबईइलाख्यांत देखील मिळणें दुर्मीळ. इतकी त्याची संपत्ति थोड्याच काळांत वाढली.

असो, आतां शांताबाईच्या संबंधानें येथें आणखी कांहींएक लिहीत नाहीं. तिनें आपल्या पतीच्या घरीं गेल्यावर कोणकोणतीं सत्कृत्यें केलीं, व एकंदर घरसंसार कसा चालविला, याविषयीं सांगूं लागल्यास एक स्वतंत्र पुस्तकच होईल. यास्तव वर सांगितली आहे इतकीच शांताबाईची हकीगत सांगून वाचकांस एवढें मात्र सुचवितों कीं, सुसंगतीचा व सुशिक्षणाचा परिणाम कसा उत्कृष्ट होतो, याचा दाखला ह्या हिराबाईच्या व शांताबाईच्या गोष्टीवरून चांगला लक्षांत येण्यासारखा आहे; आणि एका स्त्रीस चांगलें शिक्षण मिळून तिचें आचरण शुद्ध असल्यास तिच्या साहाय्यानें इतर स्त्रिया सुधारण्याचा कसा संभव असतो, हें चांगलें कळून येईल.

आतां यापुढें हिराबाईच्या संबंधाचा सर्व वृत्तांत लिहूं गेलें असतां

एक मोठा ग्रंथच होईल. पण स्थलसंकोचामुळें या ठिकाणीं तसें करतां येत नाहीं. लग्न होईपर्यंत हिराबाई ही गरीब स्थितींत होती. पण आतां ईश्वराच्या दयेनें तिची धनदौलत बरीच वाढली होती. तिच्या नवऱ्यास मोठ्या अधिकाराची जागा मिळून त्याची प्राप्तिही पुष्कळ वाढली होती. शिवाय घरची सर्वकांहीं व्यवस्था तिच्या हातांत येऊन एकंदर प्राप्तीचा खर्चवेच तिच्या हातानें होऊं लागला, आणि तेव्हांपासून व्यर्थ उधळपट्टी न होतां पुष्कळ पैका शिलकीस राहूं लागला.

प्रकरण एकविसावें.

हिराबाईचीं मुलें.

ह्या पुस्तकाचा शेवट करण्यापूर्वी एका गोष्टीविषयीं लिहिणें फार अगत्याचें आहे. एथवर हिराबाईच्या संततीविषयींचा उल्लेख आम्ही मुळींच केला नाहीं. येथें तीविषयीं थोडेंसें लिहिणें उचित दिसतें. ह्या गुणवती स्त्रीनें आपल्या मुलांस कोणत्या प्रकारें वागविलें व त्यांची काय स्थिति झाली असेल, हें जाणण्यास वाचक फार उत्सुक असतील, व तें न सांगितलें तर गोष्ट अपूर्ण राहील, सबब त्याविषयीं येथें थोडक्यांत निरूपण करितों.

हिराबाईला चार मुलें झालीं. पण त्यांतून तिच्या दुर्दैवानें शांताराम नांवाचा एकच मुलगा काय तो जिवंत राहिला होता. यावरून हिराबाईनें आपल्या बालकांच्या आरोग्याविषयीं काळजी न बाळगल्यामुळें तीं मरण पावलीं असें कोणी म्हणेल, तर तसें अगदीं नाहीं. तिनें त्यांची कोणत्याही प्रकारें हेळसांड किंवा अनास्था न करितां त्यांचें चांगल्या रीतीनें संगोपन केलें होतें. मुलांस कोणत्या प्रकारचें खाणेंपिणें, औषधपाणी, चिरगुटपांघरूण वगैरे लागतें, याचें तिला चांगलें ज्ञान असून, मुलांच्या लहानसान रोगांवर उपचार कसे करावे, हें तिला चांगलें ठाऊक होतें. मुलांस पांच सहा महि-

न्यांच्या आंत देवी काढणें, दांत येतांना त्यांस फार इजा होत असते ती कमी करण्याविषयीं उपाय योजणें, वगैरे गोष्टी ती फारच सावधगिरीनें व वेळच्या वेळीं करीत असे. सारांश, मुलांच्या रक्षणासाठीं जितकें ह्मणून आपल्या हातून होण्यासारखें असे तितकें सर्व ती केल्याशिवाय रहात नसे. पण तिचे ते सारे प्रयत्न व्यर्थ होत. पुरुषोत्तम नांवाचा तिचा एक मुलगा मोठा गुणी होता. तो चार वर्षांचा झाल्यावर त्याच्या पोटांत डबा धरून त्यास हगवण लागली. ती बंद होण्यार्चीं पुष्कळ औषधें दिलीं, पण कांहीं गुण न पडून पुढें उलट्या सुरू झाल्या, व शेवटीं त्यांतच त्याचा अंत झाला. हें हृदयभेदक दुःख हिराबाईला अत्यंत दुःसह झालें. तें ती विसरते न विसरते तों तिची सुंदरी नांवाची मुलगी होती, तीही आजारी पडली. तिला असा कांहीं खडतर ताप लागला कीं वैद्यांचे व डाक्टरांचे सर्व औषधोपचार व्यर्थ होऊन एका आठवड्याच्या आंतच ती मुलगी गेली. या मुलीच्या मरणानें तर हिराबाईस पराकाष्ठेचें दुःख झालें. कां कीं त्या मुलीचें हिराबाईवर इतकें प्रेम होतें कीं, ती तिची पळभरही पाठ सोडीत नसे. ती सैंपाक करावयास चुलीजवळ बसली कीं, तिनें तिच्या भोंवती वावरावें; ती निजवयास गेली ह्मणजे तिनें तिजबरोबर निजावयास जावें, ती उठली कीं तिनें उठावें, ती गाऊं लागली तर तिनें तिच्या मागून सूर द्यावा. लिहिण्यावाचण्यावर तर तिचें फारच लक्ष असे. अगदीं लहान वयांतच मूळाक्षरें व बाराखड्या शिकून इसापनीतींतील गोष्टी तिला वाचतां येऊं लागल्या होत्या. पुरुषोत्तम मृत्यु पावला तेव्हांपासूनच शेजारच्या बाया हिराबाईस सांगत कीं, तुमचीं मुलें मरतात याचा कांहीं तरी लवकर बंदोबस्त करा. कोणी ह्मणत कीं, गांवच्या देवीला बकरा

कोंबडें द्यावें, कोणी म्हणत कीं, तुम्ही लांबच्या प्रवासांतून आलां आहां, तेव्हां कांहीं तरी भूतबाधा झाली असेल; म्हणून पंचाक्षऱ्याला बोलावून ताईत वगैरे करून घ्या. असें कोणी कांहीं, कोणी कांहीं सांगत. परंतु हिराबाईनें असला वेडगळ उपाय कांहींएक केला नाहीं. तिचीं रत्नासारखीं बाळकें एका पाठीमागून एक गेलीं, तरी तिनें सर्व हवाला जगन्नियंत्या प्रभूवरच ठेविला होता. कोणी कांहीं म्हटलें तरी सर्वांस तिचें असें उत्तर असे कीं, "ईश्वराची कृपा असेल तर तोच माझ्या बाळकांचें रक्षण करील."

सुंदरी निवर्तल्याची बातमी जेव्हां हिराबाईचे वडील विश्वासराव यांस कळली, तेव्हां त्यांस पराकाष्ठेचें दुःख झालें, आणि त्यांनीं त्या दुःखाच्या प्रसंगीं खालील मजकुराचें बोधप्रद व कोणाच्याही मनांत विवेक उत्पन्न करणारें असें पत्र हिराबाईस लिहिलें, तें पत्र येणेंप्रमाणें होतें:—

निपाणी, आश्विन शुक्ल १ शके १८०२.

चिरंजीव सौ. हिरावाई हीस,

अनेक आशीर्वाद विशेष—पत्र लिहावयास कारण कीं, हल्लीं पुण्याहून मला पत्र आलें त्यावरून चि. सुंदरी निवर्तल्याची बातमी समजून अत्यंत दुःख झालें. तुजकडून सुंदरीची अत्यावस्था असल्याबद्दल पत्र आले होतें. परंतु त्यानंतर बरेच दिवस पत्र आलें नाहीं, त्यावरून मला वाटलेंच होतें कीं, कांहीं तरी विपरीत घडलें असावें. तिच्या मरणामुळें तुला फारच दुःख झालें आहे, तरी अज्ञ मनुष्याप्रमाणें शोक करीत बसणें हें मला प्रशस्त वाटत नाहीं. मला आतां अशी चिंता लागली आहे कीं, तुला या कन्यावियोगामुळें फारच मोठा धक्का बसून तूं शोकसागरांत अगदीं बुडून जाशील, आणि तुझी प्रकृति क्षीण होईल. परंतु अशा अनिवार दुःखाच्या प्रसंगीं मनुष्यानें सारासार विचार केला पाहिजे. जगन्नियंत्या प्रभूनें आपणास बुद्धि दिली आहे, ती इतक्याच करितां कीं, आपणास दुःख होवो, अथवा सुख होवो, दोन्ही स्थितींत आपण त्याच्या इच्छेप्रमाणें चालावें. या भवसागराविषयीं विचार करणें फार अगत्याचें आहे, व तो विचार केला असतां त्यापासून म्हणजे

आपलें अहित होईल असा मुळींच अर्थ नाहीं. आकाश, जमीन, पर्वत, अरण्य, समुद्र, पशु, पक्षी, मनुष्य इत्यादि अनेक प्रकारच्या स्थावरजंगम वस्तु या पृथ्वीच्या आधारावर आहेत. त्यांपैकीं मानव प्राण्याविषयीं विचार करितां तो जन्मास कसा येतो, कोणत्या रीतीनें लहानाचा मोठा होतो, बालपण, तरुणपण व ह्मातारपण या तीन अवस्थांत त्याचा कसा बदल होतो, त्यास हा घोर भवसागर तरून जाण्यास काय काय करावें लागतें, या विषयींचा विचार क्षुल्लक आहे असें समजूं नकोस. तर तो अतिमहत्वाचा व फार गहन आहे. हें सृष्टीचें रहाटगाडगें जगन्नियंत्याने कांहीं तरी इष्ट हेतूनें चालू ठेविलें आहे; आणि जोंपर्यंत त्याची इच्छा असेल तोंपर्यंत हें असेंच चालावयाचें.

अलीकडील शोधावरून असें कळून येतें कीं. एका तासांत सुमारें साडेतीन हजारांजवळजवळ मनुष्यें मृत्यु पावतात; ह्मणजे दर पळास सरासरी एक मनुष्य मरतें, व सरासरी एकच मनुष्य नवें जन्मास येत असतें. यावरून विचार कर कीं, दर महिन्यास लक्षावधी मनुष्यें मृत्युमुखांत पडत आहेत, व तितकींच जन्म पावत आहेत. तेव्हां आजपर्यंत असंख्यात मनुष्यें या पृथ्वीवर जन्मास येऊन नाहींतशीं झालीं आहेत. यावरून हें सिद्ध होतें कीं, मृत्यु हा प्रत्येक मनुष्यास केव्हांना केव्हां येणारच. मोठमोठाले बलाढ्य राजे, मोठमोठाले वैद्य, पंचाक्षरी, ज्योतिषी आणि मोठमोठाले साधुसंत, कीं ज्यांच्या अंगीं मेलेल्यांस जिवंत करण्याची शक्ति असे असें ह्मणतात, तेही या मृत्यूच्या दाढेंत सांपडल्याशिवाय राहिले नाहींत. तस्मात् या जगांत ज्यानें ह्मणून जन्म घेतला त्यास एक दिवस मृत्यूच्या स्वाधीन झालेंच पाहिजे, असा ईश्वरीसंकेत दिसतो. तर मग ही पाळी कोणा दिवशीं आपल्यावर किंवा आपल्यास जीं अतिप्रिय अशांवर आली तर त्याविषयीं कोणत्याहीं रीतीने खेद किंवा दुःख करण्याची जरुरी नाहीं. याविषयीं तूं शांतपणें विचार करशील तर तुझ्या मनास समाधान वाटून स्वजनांच्या मरणाविषयीं शोक करणें हे निरर्थक होय, असें तुझ्या ध्यानांत येईल.

कोणाच्याही मरणाविषयीं आपणास दुःख किंवा हळहळ वाटणें, तीं त्याच्याशीं आपला कांहीं तरी संबंध किंवा ओढा असल्याशिवाय वाटत नाहीं. उदाहरणार्थ रशियाचा बादशाहा मारला गेला किंवा मृत्यु पावला, असें आपण ऐकिलें तर त्याजविषयीं आपणास यत्किंचित् तरी दुःख वाटेल काय? नाहीं. कां कीं, त्याच्याशीं आपला कोणत्याही प्रकारचा संबंध नाहीं. त्याचप्रमाणें, आपल्या पेठेंतील एकादा परकी मनुष्य किंवा ज्याच्याशीं आपला मुळींच संबंध नाहीं असा इसम मेला, तर त्याच्याविषयीं देखील आपल्या मनास कांहीं खेद वाटणार नाहीं, हें उघड आहे आतां आपणांस दुःख जें होतें तें ज्याच्याशीं आपला कांहीं तरी संबंध असतो त्याच्याविषयीं होय; आणि हा संबंध जितका अधिक निकट असेल त्या मानानें दुःखही अधिक होईल.

दुःखाचें कमीजास्त प्रमाण प्रीतीवर अवलंबून असतें. आतां ही प्रीति अधिक कोणावर असते हें पाहिलें असतां त्याविषयीं कांहीं निश्चयानें सांगतां येणार नाहीं; कारण केव्हां केव्हां अगदीं जवळचें नातें असूनही एकमेकांशीं हमेशा कज्जे कजावती होत असतात; आणि कधीं कधीं अगदीं परकी लोकही आपल्या नातेवाइकांपेक्षां आपणास फार प्रिय होतात. यावरून असें दिसतें कीं, प्रत्येक मनुष्य आपल्या हितासाठीं दुसऱ्या मनुष्याशीं संघटण ठेवीत असतो. जर आपले नातेवाईक आपल्या हिताच्या आड येऊं लागले तर आपणास खरोखर असें वाटेल कीं, ते आपल्यापासून जितके लवकर दूर होतील तितके चांगले. आणि एखादा परकी मनुष्य असून तो जर आपल्या उपयोगीं पडत आहे तर आपल्या हिताच्या संबंधानें तो आपणांस प्रिय होईल. तसेंच आपण कोणापाशीं संबंध ठेवितों तो पैशाच्या किंवा द्रव्याच्या आशेनें ठेवितों असेंच केवळ सर्वदा नसतें. असे पुष्कळ लोक आपले मित्र आहेत कीं, ज्यांच्याकडून आपणास कधीं कांहीं मिळत नसतें, तरी आपणास मोठी आशा ही असते कीं, आपणावर कोणताही प्रसंग आला असतां ते खरोखर आपल्या कामीं पडतील. मित्रत्व किंवा संबंध घडून येण्याचे अनेक योग आहेत.

लेंकरांविषयींचें जें प्रेम तें स्वाभाविक असून सर्व प्राण्यांस साधारण आहे. हें प्रेम केवळ स्वार्थाकरितांच जडत नसतें, तर सर्व पृथ्वी उत्पन्न करणारा जो ब्रह्मांडनायक भगवंत त्याची योजनाच अशी आहे कीं, आईबापांस आपल्या लेंकरांविषयीं प्रेम असलेंच पाहिजे. लेंकरें जन्मल्यानंतर कित्येक वर्षेंपर्यंत स्वतांच्या पोषणाविषयीं असमर्थ असतात; तेव्हां त्यावेळीं त्यांचें पालनपोषण चांगल्या प्रकारें व्हावें, या करितांच आईबापांस त्यांजाविषयीचें प्रेम लावून दिलें आहे. या प्रेमबंधनामुळेंच आपलीं लेंकरें आपला चरितार्थ चालविण्यास शक्तिमान् होत तोंपर्यंत त्यांचें संगोपन आईबाप करितात. यावरून हेंही सिद्ध होतें कीं, या संगोपनाबद्दल लेंकरें आईबापांची सेवाचाकरी करण्यास बांधलीं जातात. तसेच आपल्या लेंकरांचें चांगल्या प्रकारें संगोपन करावें इतकीच काय ती ईश्वराची आईबापांस आज्ञा आहे. बाकी कोणास लेंकरें न झालीं तर तीं होण्यासाठीं भलभलते नवस किंवा औषधोपचार करणें, किंवा गर्भारपणीं मुलगी न होतां मुलगा व्हावा अशी आशा करणें, व जीं मुलें होतील तीं सर्व जिवंत रहातील असा भरंवसा बाळगणें, हें सर्व केवळ अज्ञान होय. मनुष्य जो लेंकरांविषयीं इतकी आवड धरितो त्याचें बीज पाहिलें असतां असें दिसतें कीं, ही आवड केवळ त्याच्या स्वार्थाकरितांच असते, व हा स्वार्थ अनेक प्रकारचा असतो. त्यांत मुख्य तीन आहेत. ते येणेंप्रमाणें:—

१ मुलें झालीं म्हणजे आपलें नांव मागें राहील.

२ तीं म्हातारपणीं आपली सेवा करण्यास उपयोगीं पडतील.

३ तीं आपल्या मालमिळकतीचीं व जिनगीचीं वारस होतील.

हे स्वार्थाचे तिन्ही प्रकार किती अयोग्य व भ्रांतिमूलक आहेत, ते आतां तुला थोडक्यांत सिद्ध करून दाखवितों.

पहिला प्रकार, नांव मागें रहावें हा होय. याचा अर्थ असा कीं, लोकांनीं म्हणावें कीं, हा अमक्या तमक्याचा मुलगा व अमक्या तमक्याचा नातू. या संबंधानें असें पाहा कीं, या जगांतून आपण गेल्यावर आपल्या मागें आपलें नांव राहिलें नाहीं तर त्यांत काय नुकसान आहे? कांहीं नाहीं. बरें, हें असें नांव राहिलें तरी फार झालें तर एक दोन पिढ्यांपर्यंतच राहील. दूर कशास, एखाद्यास त्याच्या पूर्वजांचीं नांवें विचारलीं असतां त्यास फार तर आपल्या आज्याचें किंवा पणज्याचें नांव सांगतां येईल. पण आज्याच्या आज्याचें किंवा त्याच्या पणज्याचें ज्याला नांव सांगतां येईल असा मनुष्य विरळा. आपल्या संततीचीच जर पूर्वजांच्या नांवांविषयीं इतकी अनास्था तर मग दुसऱ्या लोकांस आपल्या नांवांची काय परवा असणार?

दुसरा, स्वार्थाचा प्रकार म्हटला म्हणजे म्हातारपणीं मुलें आपली सेवाचाकरी करण्यास उपयोगीं पडतील हा होय. हाही स्वार्थ भ्रांतिमूलकच आहे. कारण आपलीं मुलें हिंडूं फिरूं लागत तोंपर्यंत तरी आपण जिवंत राहूं याचा काय भरंवसा? दुर्दैवानें तसाही योग आला तरी तीं आपणांस म्हातारपणीं उपयोगीं पडतील असा खात्रीपूर्वक भरंवसा बाळगणें हाही वेडेपणा होय. हल्लींच्या काळीं आईबापांचा सन्मान राखणारे किंवा त्यांचा संभाळ करणारे असे मुलगे फारच थोडे सांपडतात. आईबापांचा सन्मान व संभाळ तर एकीकडेसच असो, पण उलट आईबापांस दुःखांत व संकटांत घालणारीं मुलें मात्र पुष्कळ निपजतात. जे लोक संततीची हौस बाळगतात ते पहिल्यापासून शेवटपर्यंत संततीमुळें दुःखच भोगीत असतात. म्हणजे प्रथमतः तीं लहान असतात त्यावेळीं त्यांचें संगोपन करणें मोठें कठीण काम असतें. आज एकाचें पोट फुगतें तर उद्यां दुसऱ्याला झाडा होऊं लागतो, तिसऱ्याला दांत फुटूं लागतात व चवथ्याला गोवरच येतें. असें नेहमीं कांहींना कांहीं पाठीशीं लचांड असतेंच. त्यांतूनही ईश्वराच्या दयेनें पार पडून तीं मोठीं झालीं म्हणजे त्यांच्या खाण्यापिण्याची व कपडयालत्त्याची काळजी पाठीस लागते. अशा वेळीं आईबाप कोणत्याही स्थितींत असले तरी त्यांचीं सर्व कांहीं तर्तूद त्यांना करावी लागते. शिवाय दसरा, दिवाळी वगैरे सणाचे दिवस आले म्हणजे मुलांस कपडयांसाठीं, मिठाईसाठीं, खेळण्यांसाठीं पैसे खर्चिले पाहिजेत. आईबापांला अशी आशा असते कीं, असें केल्यानें पुढें आपलीं मुलें मोठीं होऊन विद्या किंवा कामधंदा शिकून आपल्या उपयोगीं पडतील. पण कांहीं मुलें पुढें इतकीं वाया निपजतात कीं, शिकण्याचें नांव घेतलें कीं तीन कोस पळत सुटतात. शेवटीं त्यांस शाळेंतील चार मुलें आणून उचलांगडी करून शाळेंत न्यावें लागतें. तेथें गेल्यावर इकडे तिकडे वेळ काढून

साधल्यास पंतोजीची नजर चुकवून कोठल्या कोठें नाहींतशीं होतात. पुढें तीं जरा मोठीं झालीं कीं आईबापांस उलट जबाब करूं लागतात, आणि आईबापांचा थोडासा लौकिक असला तर त्यालाही कमीपणा आणतात. या प्रकारचा लाभ संततीपासून पुष्कळ आईबापांस मिळत असतो; व या प्रकारचीं हजारों उदाहरणें रात्रंदिवस डोळ्यांपुढें घडत असून देखील लोक मुलें होण्याविषयीं अनेक प्रकारें यत्न करीत असतात. एवढी लेंकरांची प्रीति आहे. एका कवीनें झटलें आहे कीं:—

वरमेको गुणी पुत्रो न च मूर्खशतैरपि ।
एकश्चंद्रस्तमो हंति न च तारागणैरपि ॥ १ ॥

भावार्थ.—एकच पुत्र असावा, पण तो गुणवान् व नीतिमान् असावा. गुणाचा व नीतीचा ज्यांच्याठायीं अभाव असे शेंकडो मूर्ख पुत्र असले तरी ते काय कामाचे? जशा आकाशांत कोट्यावधि चांदण्या असूनही त्यांच्या योगानें अंधकार दूर होत नाहीं, तर तो एका चंद्रानेंच होतो.

आतां तिसरा स्वार्थाचा प्रकार असा कीं, तीं आपल्या मिळकतीचीं वारस होतील. हाही वरील दोन प्रकारांप्रमाणेंच भ्रांतिमूलक व अविचाराचा आहे. कारण आपण स्वतः या जगांतून नाहींतसे झाल्यावर मग आपली मालमिळकत कोणी कां घेईना. ती मुलानें घेतली काय आणि बेवारशी झणून सरकारानें जप्त करून नेली काय सारखेच. त्यामुळें आपला तोटा किंवा नफा कांहींच नाहीं. झणून आपली संपत्ति आपल्या हातानें ईश्वरास प्रिय अशा कृत्यांकडेस खर्च केली तर तेवढीच सार्थकीं लागली असें होईल. असें न करितां त्या संपत्तीची व्यवस्था आपल्या मुलांवर टाकून आपण मेलों तर आपल्यासारखा मूर्ख कोणीही नाहीं. आईबापांनीं संपादन केलेलें द्रव्य ज्या मुलांस आयतें मिळतें, त्यांस तें जपून व चांगल्या कामीं खर्च करण्याची वासना होत नाहीं. ज्या मनुष्यानें आपल्या निढळच्या घामानें द्रव्य संपादन केलेलें असतें त्यासच त्याची काळजी असते. श्रम केल्याशिवाय ज्यांस द्रव्य मिळतें त्यांस त्याची खरी किंमत कळत नाहीं; आणि मग ते निष्काळजीपणानें तें द्रव्य, नाच, तमाशे, वगैरे चैनीच्या प्रकारांत उडवून टाकतात. वडिलांच्या नांवानें कांहीं धर्मकृत्य करण्यास सांगितलें असतां त्यांस मोठें संकट वाटतें. बापानें मोठ्या काटकसरीनें व कंजूसपणानें सांठविलेलें द्रव्य मुलाच्या हातांत गेले कीं त्याची थोडयाच काळांत राखरांगोळी झाल्याचीं शेकडो उदाहरणें आपल्या पहाण्यांत येतात.

या सर्व गोष्टींवरून तुला समजेल कीं, आपण आपल्या लेंकरांविषयीं अशी वेडी ममता बाळगितों तें आपण आपलें नुकसान करून घेतों. यास्तव मुलें

जोंपर्यंत लहान आहेत तोंपर्यंत त्यांचें लालनपालन करणें हें आपलें कर्तव्य आहे, अशा समजुतीनें व निरपेक्ष बुद्धीनें तें करावें. परंतु त्यांचें पालनपोषण करून त्यांस वाढविलें ह्मणून त्यांनीं पुढें आमची सेवाचाकरी करावी अशी आशा बाळगणें मात्र मूर्खपणा होय. ईश्वर जो सर्व जगाचा नियंता अर्थात् आपला धनी आहे, त्यानें त्यांची जोपासना करण्याचें काम आमच्यावर सोपविलें आहे, असें मानून स्वस्थ असावें. कुटुंब हा एक बाग असून त्याचा मालक ईश्वर आहे. व आपण त्याच्या वतीनें या बागाचे माळी आहों. ह्मणून बागाच्या मालकानें जर एखादें झाड कापून टाकण्याचा हुकूम दिला तर माळ्यास असें ह्मणण्याचा अधिकार नाहीं कीं, मीं हें झाड फार मेहनत घेऊन लहानाचें मोठें केलें आहे. ते कां कापून टाकतां? दुसरें असें कीं, भगवंत आपणांस उत्पन्न करून कोणाचा बाप, कोणाची आई, कोणाचा पुत्र, कोणाची मुलगी, कोणाचा भाऊ, कोणाची बहीण करितो, व असें करण्याचा मुख्य उद्देश हा कीं, मनुष्यांनीं परस्परांस साहाय्य करून हें क्षणभंगुर जीवित सुखानें घालवावें. हें जग आपलें शाश्वत वसतिस्थान नव्हे. हें सोडून आपणांस परलोकीं आज नाहीं उद्यां जाणें आहे. ह्मणून आपण अमक्याचे बाप किंवा अमके आपले पुत्र हा केवळ ऐहिक संबंध होय.

तर आतां यावरून तुझ्या ध्यानांत सहज येईल कीं, आपण कोणास मरतांना पाहिलें तर त्याविषयीं शोक करण्याची जरुरी नाहीं. जर आपणांस या जगांत अक्षय रहावयाचें असेल तरच शोक करावा. पण तसा प्रकार कांहीं एक नसून आपणांस मृत्युमार्गानें गेल्याशिवाय गत्यंतर नाहीं. आपणांस परमेश्वराचें कोणत्या वेळीं बोलावणें येईल, व आपणांस केव्हां जावें लागेल हेंही, कोणांस कळत नसतें. तसेंच या आपल्या शरीरांतून एकदां जीव निघून गेला ह्मणजे सर्व आटोपलें असें नाहीं; तर तो ईश्वराजवळ निरंतर रहाणारा आहे. देवापाशीं आपल्या कृत्यांविषयीं झडती देणें हें कोणास कदापि चुकावयाचें नाहीं. दुर्वासनांनीं अंतःकरण मलिन करणें, कुविचारांनीं तें भ्रष्ट करणें, असत्य भाषण, चाहाड्या, शपथा आदिकरून पापकर्में करणें डोळे पापी नजरेनें दूषित करणें, कान कोणाची निंदा किंवा गुह्य गोष्ट ऐकून अपवित्र करणें, हात कोणावर जुलूम करून किंवा कोणाचें कांहीं चोरून मलिन करणें, पाय आडमार्गांत टाकून अमंगळ करणें, या सर्व पातकांनीं मनुष्यांची अत्यंत नीच व भयंकर स्थिति होते; आणि त्याबद्दल जरी कदाचित् इहलोकीं जाब द्यावा लागला नाहीं, व त्याचा पस्तावा होऊन मन जरी सतत खेदयुक्त होऊन गेलें नाहीं, तरी या यातना परलोकीं खर्चांत भोगाव्या लागतील यांत तिलमात्र संदेह नाहीं. यास्तव माझे प्रिय मुली हिराबाई, तूं सावध राहून त्या दिवसाच्या तयारींत तत्पर ऐस. तेथें सत्कृत्याशिवाय दुसरे कांहीं एक कामीं पडावयाचें नाहीं, आणि सर्व जगाचा नियंता व पालक जो सर्वसमर्थ प्रभु त्यास नम्र

भावानें शरण जाऊन हेंच मागणें माग कीं, त्यानें आपला शेवट चांगला करावा. फार काय लिहूं? कळावें हे आशीर्वाद.

तुझें सतत प्रिय चिंतिणारा,

विश्वासराव.

हें बापाचें खऱ्या कळवळ्यानें लिहिलेलें व सद्बोधानें भरलेलें पत्र हिराबाईनें पुनः पुनः वाचून आपल्या दुःखाचा उपशम केला; आणि तेव्हांपासून ती संसारांत विरक्तपणें वागूं लागली. घरांतील कामधंदा आटपून जो फुरसतीचा वेळ सांपडे त्यांत ती अनेक परोपकाराचीं कृत्यें करी. गरीब दुबळीं माणसें तिच्याकडे कांहींना कांहीं मदत मागण्यास नेहमीं येत. त्यांस ती कधींही नकार सांगत नसे. आपल्या शक्तीप्रमाणें प्रत्येकास थोडीबहुत मदत करीत असे. याप्रमाणें ह्या नीतिमान् व बुद्धिमान् स्त्रीनें आपलें उरलेलें आयुष्य सत्कर्मांत घालविलें.

समाप्त.

हें पुस्तक करण्याचा उद्देश.

शार्दूलविक्रीडित.

लोकीं या पुरुष स्त्रिया मिळुनियां, संसार तो मांडिती ॥
बाहेरी खपती पती, परि गृहांमाजी[1] स्त्रिया राहती ॥
व्हाया प्राप्त कुटुंबसौख्य करिती उद्योग दोघेंजणें ॥
ऐसें हो न जरी, तरी सुख नरां[2] नाहीं कधीं लाधणें ॥ १ ॥

उपजाति.

स्त्रिया पतींतें, पतिही स्त्रियांतें ॥
अन्योन्य[3] देवोत परा[4] सुखातें ॥
आणोनियां हेतु असा मनांत ॥
निर्मी कुटुंबाप्रति विश्वतात[5] ॥ २ ॥

दिंडी.

तया हेतूतें पार पाडण्यातें ॥
जगीं धन्यत्वाप्रती मिळविण्यातें ॥
उभयतांहीं पाहिजे यत्न केला ॥
नीतिमार्गाच्या करुनि वर्तनाला ॥ ३ ॥

आर्या.

"केल्यानें देशाटन, पंडितमैत्री, सभेंत संचार ॥
शास्त्रग्रंथविलोकन[6] मनुजा[7] चातुर्य येतसे फार" ॥ ४ ॥
हें सत्य, परी याचा अनुभव पुरुषांस मात्र होउं शके ॥
तैसा स्त्रियांस व्हाया साधन राहुनि घरीं नसेचि निकें[8] ॥५॥

---

१ मध्ये. २ मनुष्यांस. ३ एकमेक. ४ श्रेष्ठ. ५ जगाचा बाप, परमेश्वर.
६ पाहाणें. ७ मनुष्यास. ८ शुद्ध.

आणुनियां हें हृदयीं, अबलांसि यथामती सुबोधातें ॥
द्यावया, अल्प रचियलें पुस्तक हें होउ तत्प्रमोदातें[1] ॥ ६ ॥

शार्दूलविक्रीडित.

संसारीं पति, आप्त, बंधु, गुरुही जे जे कुटुंबांतरीं ॥
त्यांशीं वर्तन योग्य तेंचि असणें हेची प्रतिष्ठा खरी ॥
दासी, दास घरीं असोनि विनयें[2] त्यां दाविजे सौम्यता ॥
बुद्धीनें निज[3] सर्व आत्मवशते[4] नेणें खरी योग्यता ॥ ७ ॥
संसारीं स्वपतीस सर्वहि परी साहाय्य तें देइजे ॥
सन्मार्गानुसृता[5] पतीस विनयें-रोषें[6] न-सांभाळिजे ॥
ऐशा या परिचा सुबोध लिहिला बिंबस्वरूपें[7] जयीं[8] ॥
तो हा दर्पण चित्ततर्पण[9] सदा राहो वधूंच्या शयीं ॥ ८ ॥
या लोकीं सुगुणी[10] स्त्रिया सततही कैशापरी वर्तती ॥
येतां संकटही महा निजमनीं स्थैर्या[11] कशा राखिती ॥
अंतीं सद्गुण त्यांस उत्तम अशां देतो फलांतें[12] कसा ॥
हें साक्षात् बघण्या तुह्मां भगिनिंनो! हा अर्पितों आरसा ॥९॥

---

१ त्यांच्या आनंदास. २ नम्रतेनें. ३ आपलें. ४ आपल्या स्वाधीन ५ खऱ्यामार्गानें जाणाऱ्या. ६ रागानें. ७ प्रतिबिंबाच्या रूपानें. ८ जेव्हां ९ चित्ताचें समाधान करणारा. १० चांगल्या गुणांच्या. ११ स्थिरपणा १२ हितांस.